

...एक वाटसरु, काहीतरी शोधत होतो....
काय शोधत होतो हे सांगता यायचं नाही... वाट
चालत राहिलो... अनवाणी पाय... मातीशी नातं
जोडून... भक्तीमार्गाच्या अवघड घाटावरचा तो
प्रवास सुरु होता. माणसांच्या गर्दीत हरवून
जातो की काय असं वाटत असतानाच चिरंतनाचा
मार्ग दाखविणारे गुरुजन भेटले...
मन सुखावले... स्थिरतेच्या अवस्थेपर्यंतचा
हा प्रवास कृतज्ञतेची शिदोरी सोबतीला घेऊन!
कधी तरी प्राक्तनाच्या समयी
मंदीराच्या आलयां-वलयांच्या नांदीचे सूर
कानावर येतात. वृंदावनातील
तुळस बहरुन येते आणि कृतज्ञतेचा एक
सहवास सुगंधात दरवळून जातो.
जीवन लहरीच्या सुरात व्यक्त होते
कृतज्ञता ! आणि कृतज्ञता !

**– बजरंग झेंडे**

कृतज्ञता

बजरंग झेंडे



# कृतज्ञता

**बजरंग झेंडे**

## माझ्या जीवनातील ही वटवृक्षे...
## त्यांच्या सहवासात जडण-घडण झाली



**स्व.श्रीमती आक्काताई यशवंत जाधव, मिरज**
ज्यांनी श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचा मार्ग दाखविला



**स्व.माईसाहेब शिर्के, कोल्हापूर**
ज्यांनी गुरु जीवनाचा मार्ग दाखविला



**स्व.श्रीमती सोनुताई कृष्णाजी कुलकर्णी** (अक्कोळ)
ज्यांनी श्रीक्षेत्र पंत महाराज बाळेकुंद्रीकर व श्रीशिव चिदंबर महास्वामीजी मुरगोड यांचा मार्ग दाखविला



**श्री. सतिश रतनचंद शहा (आरगकर)**
ज्यांनी श्रीरमेश महाराज कुलकर्णी (अक्कोळकर) यांचा शेष परिचय करुन दिला

।। मातृ देवो भव।। पितृ देवो भव।।



वै.भिमराव गणू झेंडे, मिरज



कै.श्रीमती लक्ष्मीबाई भिमराव झेंडे, मिरज



स्व.कृष्णाजी नारायण कुलकर्णी
(अक्कोळ)




स्व.श्रीमती सोनुताई (राधाई) कृष्णाजी कुलकर्णी
(अक्कोळ)



स्व. बाबुराव जोतिबा सूर्यवंशी, सांगली
स्व. लक्ष्मीबाई बाबुराव सूर्यवंशी, सांगली

गुरूर्ब्रह्मा गुरूर्विष्णु: गुरूर्देवो महेश्वर:।
गुरू:साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नम: ।।

## ।। गुरूपीठ ।।



।। श्रीस्वामी समर्थ महाराज ।।
अक्कलकोट



।। श्रीशिवचिंदबर स्वामी महाराज ।।
मुरगोड



।। श्रीनृसिंहसरस्वती महाराज ।।
कारंजा



।। श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज।।
कोल्हापूर



।। श्रीपंत महाराज ।।
बाळेकुंद्रीकर

मी गुलाम मी गुलाम मी गुलाम तुझा।। तुं सद्‌गुरू स्वामी माझा ।।धृ।।
अन्न रोटी वस्त्र लंगोटी।। पुरती संसृतिकाजा ।।१।।
धरणी शयन गगन प्रावर्ण।। सेवक ऋतु माझा ।।२।।
आनंद कानन नित्य त्रिभुवन।। दत्त गुरूराजा ।।३।।
– श्री दत्त प्रेमलहरी



एक कौटुंबिक छायाचित्र उजवीकडून श्रीमती भामाबाई सपकाळ (लहान बहिण), श्रीमती जनाबाई जाधव (मोठी बहिण), मातोश्री स्व. लक्ष्मीबाई भिमराव झेंडे



स्व. वसंतराव भिमराव झेंडे यांच्या लग्न प्रसंगी घेतलेले कौटुंबिक छायाचित्र



मातोश्री लक्ष्मीबाई भिमराव झेंडे यांच्या समवेत




मिरजेचे श्रध्दास्थान हजरत मिरासाहेबांचा दर्गा



नदीवेस मिरज येथील जागृत मारुती

## प.पू.श्री. रमेश महाराज कुलकर्णी (अक्कोळ)
## यांची दुर्मीळ छायाचित्रे






















प.पू.श्री. रमेश महाराज कुलकर्णी (अक्कोळ) यांचे समाधी मंदिर

## प.पू.श्री. रमेश महाराज कुलकर्णी (अक्कोळ) यांच्या सोबतची छायाचित्रे



प.पू.श्री. रमेश महाराज (अक्कोळ) यांचे मार्गदर्शन



प.पू.श्री. रमेश महाराज (अक्कोळ) यांच्या समवेत
अक्कोळ घरी एक निवांत क्षण



प.पू.श्री.रमेश महाराज कुलकर्णी (अक्कोळ)यांचा सत्कार करताना



श्रीक्षेत्र सोरटी सोमनाथ येथे
प.पू.श्री.रमेश महाराज (अक्कोळ) यांच्या समवेत



प.पू.श्री.रमेश महाराज कुलकर्णी यांच्या समवेत
एक आनंदी क्षण



प.पू.श्री.रमेश महाराज कुलकर्णी यांच्या समवेत
एक आनंदी क्षण









श्री क्षेत्र पांगरे






श्री क्षेत्र गरुडेश्वर येथील प.पू.श्री.रमेश महाराज कुलकर्णी
यांच्या समवेत एक निवांत क्षण

## श्री झेंडे महाराज यांची दुर्मिळ छायाचित्रे





मिरज येथे बंडू कुत्र्यासोबतचे छायाचित्र




श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर




श्रीक्षेत्र पांगरे




श्रीक्षेत्र तिरुपती बालाजी



श्रीक्षेत्र आळंदी



श्रीक्षेत्र ललितपूर नेपाळ (दि.१०/०७/१९८२)



श्रीक्षेत्र तिरुपती



श्री क्षेत्र कनकादित्य (अडिवरे जवळ)



२८/०२/२०१० सेवानिवृत्ती




श्री क्षेत्र शिर्डी डाविकडून- स्व.शिवाप्पा येवारे, दत्तोपंत शिंदे,
श्री.सावंता म्हेत्रे, श्री.राम महाजन, स्व. शंकरराव कांबळे (२८/०२/८२)




विजापूर दौरा - डाविकडून श्री. मंगल शिंदे, आनंदा काशिद, मधुकर चव्हाण,
स्व. प्रभाकर गोखले, श्री. राम महाजन, श्री. पंडीतराव भुयेकर,
श्री. सदाशिव करवडे, श्री. बाळासाहेब परीट इत्यादी. (दि.११/०४/८२)



श्री क्षेत्र सज्जन गड-डाविकडून स्व.सौ.लक्ष्मीबाई सुर्यवंशी, स्व.दत्तात्रय शिंदे,
सौ.भुयेकर, स्व.विजयमाला शिर्के, स्व.बाळासाहेब शिर्के, स्व. शिवलिंग घेवारे,
स्व.शंकरराव कांबळे, स्व.बाबुराव सुर्यवंशी, स्व.शेडबाळे, श्री. पंडीतराव भुयेकर (०६/३/८३)






श्री क्षेत्र केदारनाथ दि.२१/०६/१९८२



स्व. इंदिरा गांधी यांच्या समवेत घेतलेले छायाचित्र
(१८/०६/१९८२)



श्री क्षेत्र बद्रीनाथ
(२४/०६/१९८२)



गौरीकुंड ते केदारनाथ
पायी प्रवास (२१/०६/१९८२)



श्री क्षेत्र पशुपतीनाथ,नेपाळ (१०/०७/१९८२)



श्री केदारनाथ मंदिर - डाविकडून रमेशमहाराज कुलकर्णी, स्व.आईसाहेब कुलकर्णी,
व औरंगाबाद चे सौ. आणि श्री. कुलकर्णी (२१/०६/१९८२)



श्री क्षेत्र गौरीकुंड ते केदारनाथ पायी प्रवास



श्री क्षेत्र बद्रीनाथ (दि.२४/०६/१९८२)




श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर (०२/१०/८३)



श्री क्षेत्र कुडलसंगम - डाविकडून श्री.चंदू होमकर, श्री.आनंदराव मंडले, डॉ.म्हेत्रे, श्री.एस.एम.सन्नके, श्री आप्पा कुडचे, श्री.मंगल शिंदे, बसलेले - डाविकडून श्री.कुलकर्णी, स्व. सुभाष उळागड्डे, श्री. पंडितराव भुयेकर, श्री. आनंदराव माळी, श्री. विनोद गोखले



श्री क्षेत्र पिठापुरम-डाविकडून श्री.आप्पा कुडचे, श्री.बाळकृष्ण गोखले, श्री. विनोद गोखले, स्व. राम हरी खराडे



श्री क्षेत्र बद्रीनाथ ( दि.२३/०६/१९८२)



श्री क्षेत्र पिठापूरम् डाविकडून श्री. बाळकृष्ण गोखले, श्री. बेळगावी, श्री मारुती ओवूळकर



श्री क्षेत्र पिठापूरम्-डाविकडून श्री. बेळगावी, श्री. रमेशमहाराज कुलकर्णी श्री. बालाजी काटकर



श्री क्षेत्र गिरनार - रमेश महाराज यांच्या हस्ते श्रीदत्त पादूका पुजन (२०/११/१९९२)



श्री क्षेत्र सोरटी सोमनाथ (नोव्हेंबर १९९२)



श्री भगवान स्वामी नारायण मंदीर, गोंडल-डाविकडून अॅड.श्री.कोतवाल, रमेश महाराज कुलकर्णी, स्व.गिरीजावहिनी कुलकर्णी, श्री.आप्पा कुलकर्णी



श्री क्षेत्र सोरटी सोमनाथ (नोव्हेंबर १९९२)



श्री क्षेत्र नृसिंह मेहता मंदीर, जुनागड (नोव्हेंबर १९९२)



श्री क्षेत्र सोरटी सोमनाथ डाविकडून श्री. प्रमोद बसरगे, प.पू. रमेश महाराज कुलकर्णी (नोव्हेंबर १९९२)



श्री क्षेत्र शिखर शिंगणापूर-डाविकडून स्व.राम हरी खराडे, डॉ.श्री.म्हेत्रे



श्री क्षेत्र पांगरे प.पू. रमेश महाराज यांच्या बरोबर निवांत क्षण



एका उद्घाटन प्रसंगी घेतलेले छायाचित्र -डाविकडून
स्व. दिनकर गोखले डॉ. जयसिंगराव शिंदे म्हैसाळकर,
श्री.विजयकुमार कोळेकर स्वामीजी, स्व.मा.आ.मोहनराव शिंदे व इतर




श्री ज्ञानेश्वर पारायण सोहळा विठ्ठल मंदीर मिरज- डाविकडून
स्व.बापूसाहेब जामदार, स्व.के.के.काळेसाहेब, स्व.आप्पाण्णा वांडरे,
श्री. शामराव पवार, श्री.बाबूराव पाटील, दि. फेब्रुवारी१९८४





श्रीगणेश मंदिर विजयनगर (म्हैसाळस्टेशन)कलशारोहण प्रसंगी प.पू.गोविंद महाराज कुलकर्णी, प.पू.केशवराव गोखले,
प.पू.रमेश महाराज कुलकर्णी,  श्री. शिवाजीराव धुळुबुळु, श्री. तुकाराम चव्हाण साहेब(पोलिस आयुक्त), श्री. आनंदराव मंडले,
श्री. शैलेश शिंदगी, श्री.राम महाजन, स्व. सुभाष उळागड्डे आदी.(दि.१८/०६/१९९८

## श्री श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज संजिवन समाधी शताब्दी सोहळा -ऑगस्ट २०००



प.पू.श्री. दा.का.थावरे (भाऊ)



डाविकडून श्री. लक्ष्मणराव जाधव, श्री.मनोजबाबा शिंदे,
मा.आ.श्री.हाफिजभाई धत्तुरे, श्री.रमेश महाराज कुलकर्णी, प्रा.श्री.म.बा.जोशी



स्व. प्रा.शिवाजीराव भोसले(फलटण)



स्व.राम हरी खराडे, प.पू.रमेश महाराज कुलकर्णी. स्व.चिमासाहेब जगदाळे



श्री.कृष्ण सरस्वती दत्त महाराज संजिवन समाधी सोहळा-डाविकडून
श्री.विजयकुमार कोळेकर स्वामीजी, श्री. राजू शिंदे, श्री.ज्ञानेश्वर खाडे,
प.पू.रमेश महाराज कुलकर्णी, श्री.बापूसाहेब पुजारी,श्री चंद्रशेखर केळकर आण्णा



दवाखाना उद्घाटन प्रसंगी- डाविकडून डॉ.मधुकर म्हेत्रे, श्री.रामदास पाटील,
श्री. विद्याधर कबुरे, श्री. रतनबाबा शिंदे (म्हैसाळकर), श्री. सुभाष नागरगोर्जे
स्व. शिवाजीराव शेंडगे(बापू), स्व. नानासहेब सगरे, श्री जी. आर. कुलकर्णी साहेब





स्व.सुरजमलजी रतनचंदजी लुंकड वाचनालय/ ग्रंथालय व साने गुरुजी व्याख्यानमालेचे उद्घाटन

डाविकडून मा.उद्योगपती प्रविणशेठ लुंकड व मा.आ.श्री. हाफिजभाई धत्तुरे,

रमेश महाराज कुलकर्णी व मा. उद्योगपती श्री. प्रविणशेठ लुंकड
(चाकण ऑईल मिल्स, सांगली, पुणे)



स्व.बबीबाई लुंकड वाचनालय/ग्रंथालय उद्घाटन प्रसंगी
मा.आ.श्री. हाफिजभाई धत्तुरे, मा.आ.शरद पाटील,
मा.उद्योगपती श्री.प्रविणशेठ लुंकड श्री. मारुती आलदर, (सप्टेंबर २००६)



मा. उद्योगपती श्री.
प्रविणशेठ लुंकड



सांगली येथील दत्तमंदिर उद्घाटन प्रसंगी
डाविकडून प.पू.रमेश महाराज कुलकर्णी,
प.पू. दासराम महाराज, मा.बापूसाहेब देशमुख





मोफत पाणी पुरवठा योजनेचे श्रीदत्त मठी विजयनगर (म्हैसाळस्टेशन) उद्घाटन
स्व.आर.आर.पाटील (आबा) ग्रामविकास मंत्री महा.राज्य) यांच्या हस्थे सोबत स्व.राम (तात्या) खराडे इ. दि.२१/०७/२००२

## स्व.सुरजमलजी रतनचंदजी लुंकड वाचनालय विजयनगर आयोजित सानेगुरुजी व्याख्यानमालेतील छायाचित्रे



मार्गदर्शन करताना पद्मश्री डॉ. श्री. डी.वाय. पाटील साहेब (माजी राज्यपाल त्रिपूरा/बिहार)



माजी मंत्री मा.श्री. आण्णासाहेब डांगे यांचा सत्कार



श्री.महेश शिर्के, कोल्हापूर यांचा सत्कार



श्री.दिपकबाबा शिंदे (म्हैसाळकर) यांचा सत्कार



मार्गदर्शन करताना स्व.पी.बी.पाटील सर



मार्गदर्शन करतना मा.आ.श्री.सुधाकर परिचारक



मार्गदर्शन करताना प्रा.श्री.बापू जाधव



मार्गदर्शन करताना मा.उद्योगपती श्री. प्रविणशेठ लुंकड





मा.उद्योगपती श्री. प्रविणशेठ लुंकड यांचा सत्कार

सुप्रसिध्द व्याख्याते श्री. इंद्रजीत देशमुख यांचा सत्कार





श्रीमती पद्मिनीदेवी शिंदे (म्हैसाळकर) यांचा सत्कार

श्रीमती शांतादेवी शेलार यांचा सत्कार





सुप्रसिध्द गायिका किर्ती शिलेदार यांचा सत्कार

योगासने प्रात्यक्षिके





श्री शंकरराव गुंडवाडे, सलगरे यांच्या फुड प्रोसेसिंग
कार्यक्रमाचे मा.डॉ.श्री.अनिल काकोडकर (अणुशास्त्रज्ञ) यांचा सत्कार करताना



मा.पद्मश्री डॉ.श्री.डी.वाय.पाटील यांच्या समवेत



विजयनगर-म्हैसाळ मठी येथे स्व.सुप्रसिध्द संगितकार ओ.पी.नय्यर यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी विचार मांडताना ॲड.श्री. चिमण लोकूर सोबत श्री.ए.वाय.मेश्राम, श्री.दिपकबाबा शिंदे (म्हैसाळकर) आदी




मातोश्री बबीबाई सुरजमलजी लुंकड प्रशिक्षण केंद्र विजयनगर उद्घाटन प्रसंगी मा.पद्मश्री डॉ.डी.वाय पाटील, स्व.आर.आर.पाटील (आबा) (गृहमंत्री म.राज्य) स्व.सा.रे.पाटील,मा.खा.संजय(काका)पाटील, मा.श्री.उद्योगपती प्रविणशेठ लुंकड,




प.पू.साने गुरुजी उद्यान उद्घाटन प्रसंगी मा.पद्मश्री डॉ.श्री.डी.वाय पाटील, स्व.आर.आर.पाटील (आबा), स्व.सा.रे.पाटील, मा.श्री.सुधाकर परिचारक, मा.श्री.मोहनशेठ कदम डॉ.श्री.भाऊ जोशी इ.



सुप्रसिध्द जागतिक व्हायोलिन वादक संगितकार श्री. प्रभाकर जोग यांच्या समवेत



सुप्रसिध्द जागतिक व्हायोलिन वादक श्री. प्रभाकर जोग यांच्या हस्ते मा.खा.संजयकाका पाटील यांच्या सत्कार प्रसंगी



श्री दत्तमठी म्हैसाळ स्टेशन डाविकडून- श्री चंद्रकांत कुरणे, श्री.मनोजबाबा शिंदे (म्हैसाळकर), श्री.बिसलाप्पा नाईक, श्री. रतनबाबा शिंदे (म्हैसाळकर) श्री. तानाजी शिंदे इ.



श्री क्षेत्र गरुडेश्वर डाविकडून : श्री. आप्पा कुडचे, प.पू.रमेश महाराज, स्व.गिरीजा वहिनी, श्री.चंद्रकांत कुरणे, श्री.सावंता म्हेत्रे, स्व.बसरगे, श्री.प्रमोद बसरगे इ.



मिरज येथिल दत्तमठीत भेट - डाविकडून श्री.राजाराम घाटगे,
स्व. वसंतराव कुलकर्णी, स्व. बापू दिक्षीत, स्व.दिक्षीत वहिनी स्व.छायाकाकू



श्री क्षेत्र नृसिंहवाडी येथे प.पू.श्री.महादबामहाराज पाटील
यांचे दर्शन सोबत स्व.दत्तोबा माळी (मालगांव)



मिरज येथिल जाधव दत्तमठीत भेट - डाविकडून ह.भ.प.स्व.बाळासाहेब भारदे
(अध्यक्ष विधानपरिषद), श्री प्रल्हाद जाधव, उभे-स्व.दत्तात्रय जाधव, कोपार्डे बुवा
दादासाहेब लांडगे, बापूसाहेब जामदार, चंद्रकांत जाधव, दामू उडपी



मिरज येथिल जाधव दत्तमठीत भेट - डाविकडून किसनमहाराज साखरे,
श्री. शिरवळकर माऊली, उभे- अण्णाप्पा सुतार, केशवराव गोखले, धोंडिराम म्हेत्रे,
स्व.दत्तात्रय जाधव, चंद्रकांत जाधव इ.



मिरज मठी येथे स्व. बाळासाहेब शिर्के, कोल्हापूर यांची भजनसेवा



स्व. केशवराव गोखले यांच्या समवेत



मिस्टर युनिव्हर्सल प्रेमचंद्र डोग्रा यांच्या समवेत सोबत श्री. सामंत



श्री. राम नाईक (राज्यपाल, उत्तरप्रदेश) यांचा सत्कार करताना,
सोबत श्री. बापूसासहेब पुजारी दि.०१/०३/२००८

## थोरा मोठ्यांच्या गाठी भेटी





सुप्रसिध्द हिंदी सिने संगितकार श्री.ओ.पी.नय्यर यांच्या सोबत



श्री क्षेत्र आडिवरे येथे डॉ.श्री. भाऊ जोशी, सौ वहिनी व किरण




सुप्रसिध्द व्हायोलिन वादक सौ. एम.राजम यांच्या समवेत



श्री. चंद्रशेखर केळकर आण्णा व श्री. डी.के. पाटील यांच्या समवेत



श्री क्षेत्र पंत बाळेकुंद्री येथील पालखी सेवा श्री पंडितराव चव्हाण कोल्हापूर, व श्री आनंदराव शेलार इस्लामपूर यांच्या समवेत




ज्येष्ठ सिने अभिनेते स्व. चंद्रकांत गोखले यांच्या समवेत



श्री सुधाकरजी परिचारक यांच्या सत्कार
प.पू.रमेश महाराज कुलकर्णी यांच्या हस्ते


## मंदीर भूमिपूजन/उद्घाटन



श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज मठी,
मिरज भूमिपूजन हस्ते
श्री.प.पू.गोविंद महाराज कुलकर्णी



श्रीकृष्ण सरस्वती
दत्त महाराज मठी, मिरज
(सन१९९५)



श्रीकृष्ण सरस्वती
दत्त महाराज मठी, म्हैसाळ स्टेशन (सन १९८६)



श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज मठी, म्हैसाळ स्टेशन उद्घाटन हस्ते स्व.बाळासाहेब शिर्के,
बापूसाहेब जामदार, स्व.अरुण जोशी, स्व.आण्णा शिंदे, धोंडिबा शिंदे (सन१९८६)



श्री गणेश मंदिर म्हैसाळ स्टेशन (सन१९९८)



श्री. साई समर्थ विठ्ठल मंदीर म्हैसाळ स्टेशन (सन २००३)




श्री. शेगाव संत गजानन महाराज मंदीर (सन २०१३)



श्री स्वामी समर्थ मठ
कृष्णा घाट मिरज



श्री कृष्णा बुवा
कृष्णा घाट मिरज



स्व. सुरमलजी रतनचंदजी लुंकड वाचनालय/दवाखाना म्हैसाळ स्टेशन

## प्रवासातील छायाचित्रे



गोकर्ण महाबळेश्वर




गोकर्ण महाबळेश्वर



श्री क्षेत्र गिरनार



श्री क्षेत्र मुरगोड



श्री क्षेत्र मुरगोड



श्री क्षेत्र हेदवी



श्री क्षेत्र हेदवी



श्री क्षेत्र शेगाव



कोकण



कोकण



श्री.क्षेत्र वेळणेश्वर



हेदवी समुद्र किनारा



हेदवी समुद्र किनारा



श्रीक्षेत्र पांगरे, ता. राजापूर



श्री क्षेत्र पांगरे वटवृक्षाजवळचे छायाचित्र



श्री क्षेत्र गणपतीपुळे

## कल्पवृक्षाच्या छायेत



श्रीमंत केदारराव शिंदे (म्हैसाळकर)



प.पू.महादबा पाटील महाराज (धुळगांवकर)



प.पू.दासराम महाराज केळकर, सांगली



प.पू.गोविंद महाराज कुलकर्णी सांगली



प.पू.हनुमानदासजी महाराज, यशवंतनगर/सांगली



श्री लक्ष्मी नारायण कृपा, अक्कोळ



*The Woods are lovely, dark and deep*
*But i have promises to keep,*
*Miles to go and before i sleep*
*Miles to go and before i sleep*

# कृतज्ञता____

(सर्वांच्या उपकाराची जाण)

बजरंग झेंडे.

■ **प्रकाशक** :
श्री. बजरंग भिमराव झेंडेमहाराज
विजयनगर (म्हैसाळ स्टेशन), मिरज.

■ **आवृत्ती : प्रथम**
दि.२८ फेब्रुवारी २०१६
(माघ वद्य पंचमी)

■ **अक्षरजुळणी :**
श्री.अमित गोविंद कुलकर्णी, सांगली .
श्री. तम्मा काशिराम शिष्टे, मिरज.

■ **मुद्रक :**
**श्री ऑफसेट प्रिंटर्स,**
परांजपे पार्क, माधवनगर रोड,
सांगली. ४१६ ४१६

■ **स्वागत मूल्य** : रु. १२५/-

सर्व हक्क सुरक्षित

# प्रस्तावना

**कृतज्ञता** हा ग्रंथ वाचताना एका वैचारिक प्रांगणातला हा माणूस देवरूपाकडे वळत गेला आणि आठवण झाली ती ......

आयुष्यात काही माणसं भेटतात –तशी खूप माणसं भेटतात. काहीची ओळख तर काहींची पारख असते. काही प्रसंगाच्या निमित्ताने भेटत राहतात, काही नोकरीच्या निमित्ताने, काही पै–पाहुणे–नातेवाईक असे सह परिवार, सह मित्र अशा अनेक माणसांची मैफल होत राहते. काही माणसं सहज विसरून जातात, काही अल्पकाळी, काही माणसं मात्र थेट मनाला जावून भिडतात. एक प्रकारचे स्थान निर्माण करून घट्ट नातेही निर्माण करून जातात. त्यांचा वारंवार संपर्क असो वा नसो, सहवास असो वा नसो पण ती आपलीच बनून जातात. इथं एक महत्त्वाचं. केवळ आपण आपला माणूस म्हणून नातं जोडता येत नाही. ज्यांना आपण आपला माणूस मानतो त्यानंही आपल्याला आपलं मानलं पाहिजे. अशी माणसं एकमेकांची, आपल्या जातीची, आपल्या विचारांची होतात. अशातली एक आदरणीय व्यक्ती म्हणून मी झेंडे महाराजांच्याकडे पाहत आलो. पहिली भेट मी किर्लोस्करवाडीला नोकरीला होतो तेव्हा झाली. त्यांच्या सोबत माझा मित्र सुभाष होता आणि ती प्रथम भेट इतकी भावली, मनात रूतून बसली, आवडली ती आजही तशीच आहे. गेल्या दोन तपाहून अधिक काळ त्यांना भेटत आलो, पाहत आलो. हा माणूस माणसं जोडू शकतो. **माणसातला माणूस–देवपणाकडे चाललेला माणूस !** म्हणून त्यांचेकडे पाहावे असे मनापासून वाटते.

आज त्यांच्या जीवनाकडे पाहताना एक सामाजिक जागर घालणारी विभूती म्हणून त्यांना पाहत आलो. महाराज ही त्यांना त्यांच्या सहवासातील लोकांनी आपण होऊन स्वखुषीने दिलेली पदवी. अंगावर कफनी नाही की सभोवताली गंडा,दोरा,लिंबू, बाहूली नाही. फक्त शब्द, सकारात्मक

भावनांची आभाळमाया. त्यांच्या जवळ आलेला माणूस कधी दुरावल्याचा मला तरी आठवत नाही. हे सारं लिहिण्याचं कारण त्याचं अल्प चरित्रपर लेखन! कोणी याला आत्मचरित्र म्हणतील, कोणी आत्मकथा, कोणी आणखी काही पण एक वास्तव लेखन म्हणून आपल्या जीवनातील वास्तवतेचा एक वास्तव इतिहास म्हणजे हा ग्रंथ.

त्यांच्या जीवनाकडे पाहताना त्यांनी जनहितासाठी देवाच्या प्रांगणात मागितलेली भिक्षा सर्वांनाच पावन करणारी आहे. एक पावन भिक्षा मागणारा हा आगळा वेगळा माणूस. स्वत: विमल करणीचा माणूस. विद्या वैभवाचा ध्यास धरणारा, सज्जनांच्या सहवासाचा भूकेला, समाजावर प्रेम करणारा, अंतर्यामी अभेद भावना बाळगणारा, प्रसंग ओळखणारा, लोकांचे मनोगत विचारात घेणारा, त्यांचे अंतरंग पारखणारा. आपले वागणे बोलणे लोकांना खुपू नये याची काळजी घेत आपला स्वतंत्र बाणा आयुष्यभर जतन करणारा. जे जे नवसुखकारक ते ते आग्रही अशा विचारांनी सजलेला आणि हे सर्व घडण्यासाठी देवाचे दास्यत्व पत्करणारा. **हा माणसांतला माणूस–अध्यात्म मार्गातला एक वाटसरू.** वाटचाल सुरू आहे. अखंडपणे हे सारं त्यांच्या जीवनाचे सार आहे.

त्यांच्या या लेखनात त्यांचे विचार, संकल्प, बुद्धी, भावना, प्रेरणा अशा विविध रूपाने प्रकट झाले आहे. जीवनाच्या विविध अवस्था अनुभवताना आलेले अनुभव त्यांनी प्रांजलपणे मांडलेले आहेत. त्या लेखनात अनुकूल आणि प्रतिकूल, हवे ते आणि नको ते, सुख आणि दु:ख, उत्कर्ष आणि अपकर्ष, दिवस आणि रात्र, ऊन आणि सावली, नोकरी आणि निवृत्ती, दगदग आणि विश्रांती, भक्तीचे मीलन आणि वियोग अशा साऱ्या जीवनाचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनातून सहज दर्शन देवून जाते. हे त्यांनी मनोगतातही व्यक्त केले आहे. या ग्रंथात अनेक विषयांची मांडणी आहे. अर्थात अध्यात्म आणि भक्ती मार्ग हा विचारांचा पाया आहे. प्रवास वर्णन, अविस्मरणीय प्रसंग, सुख–दु:खाच्या पलीकडे असलेली अविचल

आत्मश्रद्धा हीच त्यांची साधना बनली असावी. परिणामी देवपणाचे जागरण घालण्यात त्यांनी उभं आयुष्य वेचले. हेवा-दावा, मत्सर यापासून मुक्त होण्याचे भाग्य त्यांना लाभले. विष्णुमय जग, वैष्णवांचा धर्म, अभेद-भेद अशा अमंगल जाणीवेने ते जगत राहिले. **जे जे भेटीजे भूत । ते ते जाणिजे भगवंत ।।** आणि तो सारा भाव जसा सुचला, भावला तसा मांडला आहे. सभोवतालची सृष्टी जशी दिसली तशी ती शब्दबद्ध केली. उगीच शब्द सजावटींची आणि अलंकारीक वाक्यांची पेरणी नाही. थोरा-मोठ्यांच्या सहवासातील त्यांचे वर्तन, त्यांची सांस्कृतिकता, त्यांनी पाळलेली आचार संहिता, त्यांची विद्वत्ता आणि त्यांना समजलेल्या, उमजलेल्या सामाजिक भक्तीचे अथांग दर्शन यांचे वर्णन करताना वास्तव हा गुणधर्म त्यांनी सोडला नाही. अलीकडे ज्ञान दर्शन दुर्लभ झाले आहे, पण लेखकाने त्यासही स्पर्श करण्याचा प्रयत्न केला आहे. वास्तविक-आस्तिकांच्या मतभेदात स्वत:ला फारसे गुंतवून न घेता, जन सुखकारकाची भूमिका बजावली आहे. सज्जनांच्या, साधूसंतांच्या पदापर्यंत पोहचलेल्या साधकांच्या संगतीत राहणारे हे झेंडे महाराज संगीतात रमून जातात. विचारवंताची व्याख्यानं मनापासून श्रवण करतात. त्यांचे वाचनही अखंड आहे. चांगल्या साहित्यावर ते मनापासून प्रेम करतात कारण शरद्चंद्र चटर्जी, साने गुरुजी, आण्णा भाऊ साठे, वि. स. खांडेकर, बाबा आमटे ही त्यांची श्रद्धास्थाने आहेत. कुरुक्षेत्रातील श्रीकृष्ण आणि चले जाव आंदोलनाचे प्रवर्तक महात्मा गांधी अशा विचारधारेचा संग्रह झेंडे महाराजांच्या ठायी आहे. महापुरुष हे जीवनमार्गाचे दीपस्तंभ असतात ही त्यांची विचारधारा या ग्रंथात आढळते त्यांचे सकल जीवनच माणूसपणाला आठवणारे, थोरांचे भव्यतेविषयी कुतूहल त्यांना असावे. पण हे सगळे भक्ती साधनांच्या अढळ बैठकीवर आहे. निरपेक्ष वृत्तीचे आहे. भक्ती, भजन, आख्यान, कीर्तन, गायन, वादन, वाचन, चिंतन, मनन ही त्यांची साधना आहे.

त्यांना आज सन्मानाचे जीवन लाभले आहे. अंधश्रद्धेवर त्यांचा

विश्वास नाही. विरक्त जीवनाची आरती घेवून समाज प्रांगणात त्यांनी आपल्या परीने प्रकाश टाकायचा प्रयत्न, कृतज्ञता या पुस्तकातून केला आहे. माणसांनी मोठे व्हावे, गावांनी मोठं व्हावं, सुधारावं, श्रद्धा जपावी, सहकार्यानं जगावं, आधुनिकता असावी पण माणूसकीच नातं जपत, या त्यांच्या भावना आहेत.

विशेष हे की कृतज्ञता मध्ये आग्रह नाही. कोणावर काही लादायचे असेही नाही. समाजाशी योग्य तो संवाद साधून समाज ऋणातून मुक्त होण्याचा त्यांचा मनापासूनचा प्रयत्न म्हणजे त्यांचे सकल जीवन. कृतज्ञता मधून त्यांचे चिंतन सद्य पिढीला आणि उद्याच्या पिढीसाठी एक शिदोरी असेल.एक सामान्य माणूस असामान्य होऊ शकतो, असे दर्शन देत कृतज्ञतेनेच एक मंदिर वाचकांना सहज दर्शन देवून जाईल, अशा शुभादरपूर्वक भावनेसह लेखन सीमा.

**प्रा. बापू जाधव**

## मनोगत...



प. पू. आक्काताई जाधवांचा आणि माझा परिचय सन १९७३-७४ च्या आसपास झाला. सदरचा परिचय माझ्या नोकरीतील अडचणीमुळे झाला. त्यांच्या बरोबरच त्यांच्या घरात राहणाऱ्या कु. रतनताई क्षीरसागर यांचाही. २०-२१ व्या वर्षी त्यांच्यावर श्रीदत्तावतार स्वामी समर्थ, श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज कोल्हापूर यांचा कृपावर्षाव झाला. कु. रतनताई यांची तब्येत नेहमी बिघडलेली असे. त्यांचे वडील शेती करीत. घरची गरीब परिस्थिती. यामुळे ते श्रीमती आक्काताई जाधवांच्या घरी भाड्याने राहत. श्रीमती आक्काताई जाधवांनी कु. रतनकडून अनेक प्रकारची साधना करून घेतली होती, उपासना करून घेतली होती. त्यांच्या घरातच अनेक वर्षे सुप्तपणे वाहणाऱ्या, श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या गूढ, रहस्यमय वाहणाऱ्या मार्गाचा दिव्य परिचय त्यांनी रतनताईंना दाखवून त्यांची विलक्षण प्रगती करून घेतली होती. या मार्गाचा झरा अनेकांच्या जीवनात आणून आक्कांनी त्यांच्या जीवनात नंदनवन फुलविले होते. उपकृत केले होते. त्यात मीही होतो.

सन १९७४ च्या अंदाजे मे-जून मध्ये प. पू. रमेश महाराज कुलकर्णी (अक्कोळ) यांचा परिचय झाला. ते आयुर्वेदिक डॉक्टर होते. ते अक्कोळ गावचे वतनदार इनामदार (सरकार) होते. ते संसारी होते. आयुर्वेद, ॲलोपॅथी विज्ञान असा त्यांचा सर्व अभ्यास होता. आध्यात्मिक शास्त्रातील

त्यांचा प्रवास गूढ व रहस्यमय होता. ते त्यांच्या सासूबाईंची तब्येत दाखवायला मिरजेला आले होते. माझे एक अत्यंत जवळचे मित्र श्री. सतिश रतन शहा (आगरकर) यांनी मला प.पू रमेश महाराजांचा परिचय करून दिला. वास्तविक सन १९७३ पासून आक्कांच्या मार्गदर्शनाखाली माझी उपासना चालू होती. कोल्हापूर येथील पुण्यश्लोक ताराबाई शिर्केंच्या घरी असलेल्या कुंभार स्वामींच्या समाधी दर्शनाला जाणे चालू होतेच.

प. पू. रमेश महाराजांची आध्यात्मिक विषयातील रहस्यमय विलक्षण प्रगती, आपुलकी, साधा-सोपा उपदेश, निर्व्याज्य प्रेमळ वृत्ती, निरंकार वृत्ती यामुळे माझे मन त्यांच्याकडे आकर्षित झाले. मन आणि जीवन त्यांच्या प्रभावाने भारावून गेले. पुढे अनेक वर्षे त्यांच्या अंतरंगाची ओळख करून घेत गेलो, त्यांच्या जीवनाचे मूल्यांकन करत गेलो. कधी त्यांच्या उपदेशातून तर कधी त्यांच्या रोजच्या बाल सदृश्य वागण्यातून तर कधी त्यांच्या शांत, निर्व्याज स्वभावातून. कधी कधी मला वाटे की अशा या महापुरुषाचे जीवन चरित्र रेखाटावे. परंतू एक वेळा असे वाटे या महापुरुषांच्या जीवनाचे पूर्ण आकलन झाले आहे काय? तसेच नोकरीतच माझा बराच वेळ जात असल्याने मला ते जमत नव्हते. तसेच त्यांची साहित्य संपदाही नव्हती. ज्यातून त्यांच्या जीवनाचे पूर्ण रहस्य उलगडेल. लौकिक जीवनाविषयीची, पूर्वपुण्याविषयी फारच कमी माहिती होती. संयमपूर्वक, संकोचानेच ते बोलत. चमत्काराबद्दल तर फारच कमी बोलत. त्यांच्या सहवासाने पूर्व भाग्याने मला काका, आई, गिरीजा वहिनी, मुले, नोकर चाकर, वाडा यांचा परिचय

झाला, नियतीने जो शेष परिचय करून दिला होता याचा परिचयच या लिखाणातून व्यक्त करण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

लहानपणापासून मी फारच धार्मिक होतो अशातला मुळीच भाग नाही. दिवसभर न्हावी धंदा करून रात्री भजन, कीर्तनाला सूर पेटीची साथ करणारे माझे वडील कै. भगवद्‌भक्त भिमराव गणू झेंडे. आयुष्यभर अत्यंत कष्ट उचलणारी माझी आई, यांच्या मुळेच आमच्या पवार गल्लीतील श्रीविठ्ठल मंदिरात, मिरासाहेबच्या दर्ग्याला, श्रीदत्तावतार आण्णा बुवाला, मारुतीला दर्शनासाठी जाणे एवढीच माझी धार्मिकता. स्व. आक्का, स्व. रमेश महाराज यांच्या नंतर माझ्या पूर्व भाग्याने पुण्यश्लोक माईसाहेब शिर्केंचा परिचय झाला. तसेच प. पू. रमेश महाराजांच्या आईंचा परिचय झाला. अर्थात हा त्यांचा परिचय जरी बाह्य जीवनाचा असला तरी विशेष आदर्श होता. यांच्या आदर्श जीवनामुळे माझा जीवनाचा, अंत:प्रवाहाचा मार्ग, साधनेचा मार्ग, निश्चयाचा मार्ग, कार्याचा मार्ग, वृद्धिंगत होत गेला, वाढत गेला, पसरत गेला. म्हणूनच वरील सर्व जण माझे गुरू आहेत. त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करणे, हा माझा स्वभाव आहे.

भारत वर्षात अनेक महान अवतार होवून गेले. अवतारांची पूर्व परंपरा ही प्रदीर्घ व उदात्त अशी आहे. असे अवतारी संत सामान्य मनुष्याला निरंतर जगण्याची छाया देवून प्रगतिपथावर नेतात. अशा थोर संत अवतारात श्रीस्वामी समर्थ, श्रीशिवचिदंबर महास्वामी, श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज, पंत महाराज बाळेकुंद्रीकर यांचा समावेश होतो. या महापुरुषांच्या चरित्राचे मूल्यमापन, लोक शिक्षणाचे मूल्यमापन

अनेकांनी केले आहेच. त्याच लेखनातील काही भाग, मौखिक कथा भाग या विराट महापुरुषांचा परिचय या लेखनात करण्याचा मी प्रयत्न केला आहे. त्यांच्या साधन पद्धती, उपदेश पद्धती या अधिकारी पुरुषाने, सिद्ध महात्म्यानीच बोलणे योग्य असल्याने त्या विषयी मी माझ्या लेखनात चर्चा केलेली नाही. पूर्व भाग्याने मला अनेक संत महात्म्यांचा सहवास लाभला. त्यांच्या अध्यात्म साधना ऐकायला, पहायला मिळाल्या. त्या सर्वांचे मानवी जीवनाविषयी प्रेम होते. मानवी जीवनाची मानसिक, वैचारिक पातळी, परंपरागत संस्कार, शिक्षण, आत्मीयता, सहजता या सर्वांचा त्यांनी निरंतर अभ्यास केला होता.

मी वयाच्या २० व्या वर्षापासून या गुरूपरंपरेच्या मार्गावर वाटचाल करीत आहे. अनेक चढ-उतार पार केले आहेत. आगीच्या वणव्यातून तावून सुलाखून मी निघालो आहे. सर्व सुखांचा त्याग करून कष्टमय जीवनाचा स्वीकार केलेला आहे. परंतु माझं जीवन साधनेनं अनुभव संपन्न कसं होईल यासाठी सतत प्रयत्न केला आहे. तसेच लोकजीवन सुखी करण्याचा काहीसा प्रयत्न मी केलेला आहे. स्व. सुरजमलजी रतनचंदजी लुंकड वाचनालय, दवाखाना, बालवाडी प्रशिक्षण केंद्र इत्यादींची उभारणी श्रीमान प्रवीणशेठ लुंकड यांच्या मदतीने केली आहे. त्यांच्या उदारपणामुळेच हे शक्य झाले आहे.

दि. २८/२/२०१० रोजी अडतीस वर्षानंतरच्या प्रदीर्घ सरकारी सेवेतून मी सेवानिवृत्त झालो. १२/१०/२०१० रोजी माझ्यावर एक मोठी शस्त्रक्रिया करणेत आली. डॉ. श्री. बिंदुसार पलंगे, डॉ. श्री. मधुकर म्हेत्रे, डॉ. श्री. केदारीप्रसाद

कुलकर्णी, डॉ. श्री. संजय कुलकर्णी, डॉ. श्री. विनोद शिंदे या सर्वांनी माझी उत्तम देखभाल करून सेवा करून जीवनाला उभारी दिली. पुढे मी सहा महिने विश्रांती घेत राहिलो. या काळात लहानपणींच्या आई वडिलांच्या आठवणी, श्री. शिवाजीराव धुळुबुळु यांनी लावलेली नोकरी ते सेवानिवृत्ती या काळातील अधिकारी मित्र, मला नेहमीच मदतीचा हात देणारी मित्रमंडळी तर माझ्या कार्यात झोकून काम करून निघून गेलेल्या मंडळींची मला आठवण येत असे. सुखदुःखाचे क्षण आठवून रडू येत असे. या सर्वांनीच माझे जीवन घडविले आहे. त्यांच्या विषयी आपण कृतज्ञ राहिले पाहिजे. या विचारानेच या लिखाणात, पुस्तकात उल्लेख केलेल्या **सर्वांच्या उपकाराची जाण ठेवण्यासाठी कृतज्ञता** सादर केली आहे. व्यक्त केली आहे. माझेपण सांगण्यासाठी नाही.

सन १९६० ते सन २०१० हा कालखंड लक्षात ठेवून हे पुस्तक लिहिले आहे. या गत पन्नास वर्षातील आठवणी सुद्धा खूप अंधुक होत चालल्या आहेत. तरीसुद्धा ज्या ज्या आठवल्या आहेत त्या त्या संकलित करण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

''**कृतज्ञता**'' पुस्तकाचे लिखाण सन २०१०-२०११ मध्येच व्हायला हवे होते. प. पू. रमेश महाराजांचे मार्गदर्शन लाभले असते. ''**कृतज्ञता**'' मध्ये प. पू. रमेश महाराजांच्या दिव्य जीवनावर प्रकाश टाकण्याचा अल्पसा मी प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या कृपाप्रसादानेच हे पुस्तक तयार होत आहे. यातच मी समाधान, आनंद मानतो आहे. ब्रह्मलीन रमेश महाराज कधी प्रवचन करीत नसत. परंतु प्रवासाच्या निमित्ताने मला त्यांचा खूप सत्संग झाला. प्रवासात त्यांच्या बरोबर मी

एकटा असताना त्यांचे दिलखुलास मार्गदर्शन होत असे. प्रवासात ते स्वस्थचित्त असत. माझ्याही अगोदर त्यांच्या या सत्संगात महत्त्वपूर्ण व्यक्ती होत्या, कृपापात्र व्यक्ती होत्या. परंतु माझे सुदैव असे की प्रथम परिचयानंतर त्यांच्या बरोबर फिरायला जाणे, प्रवासाला जाण्याची सुवर्णसंधी मला मिळाली. श्री. रमेश महाराज दि.२२/७/२०११ रोजी ब्रह्मलीन झाले. त्यानंतर मला त्यांची सतत आठवण येत राहिली. आठवणीने मन, शरीर अस्वस्थ होऊन जाई. सन १९७५ ते २०११ या छत्तीस वर्षातील जुन्या आठवणीने मी व्यथित होऊन जाई. कधी उत्कट प्रेम करताना, तर कधी खळखळून हसतानाचे प्रसंग मला दु:खी करीत. अबोल करीत. या काळातील जेवढ्या म्हणून घटना माझ्या डोळ्यासमोर घडल्या त्या त्या मी शब्दांकित करण्याचा प्रयत्न केला आहे. अनुकूल आणि प्रतिकूल, सुख आणि दु:ख, उत्कर्ष आणि अपकर्ष, दिवस आणि रात्र, ऊन आणि सावली, नोकरी आणि निवृत्ती, दगदग आणि विश्रांती, अध्यात्म आणि भक्तीमार्ग, चिंतन आणि शोध–बोध अशा या माझ्या जीवनाची–अनुभवाची हे शब्दफुले आहेत. ही वाचकांच्या प्रांगणात उधळली आहेत. सदर पुस्तक तयार करण्यासाठी प्रा. श्री. बापू जाधव, डॉ. श्री. गो. रा. कुलकर्णी यांचे अनमोल सहाय्य झाले आहे, मी त्यांचे विशेष आभार मानतो.

**आपल्या सर्वांचा सेवक**

**ब.भि.झेंडे**

**विजयनगर, म्हैसाळ (स्टेशन)**

**|| श्रीगुरुदेव दत्त||**
**|| श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज प्रसन्न||**
**|| श्रीस्वामी समर्थ महाराज प्रसन्न||**
**||श्रीशिव चिदंबर स्वामी महाराज प्रसन्न||**
**|| श्रीपंत महाराज प्रसन्न||**

माझ्या भटक्या आयुष्यातील सांजसमयी जीवनातील एक एक क्षण लिहितांना कितीतरी गोष्टींचा पाझर वाढतो आहे. आठवणीत असलेल्या आणि आठवणीतून विसरत चाललेल्या या साठवणी एकमेकांत गुंफून राहतांना अनेक भावतरंग उमटतात. एखादा आरसा फुटावा-त्याचे अनंत तुकडे व्हावेत आणि त्या प्रत्येक तुकड्याकडे कुतुहलाने पाहतांना माझे प्रतिबिंब प्रत्येक तुकड्यांत दिसत राहावे असे होऊन गेले आहे. यातली अनेक प्रतिबिंबे माझ्या जीवनातील आठवणींचे सूर आहेत. या सुरांची साठवण म्हणजे माझे जीवन! या जीवनाच्या सांजसमयापर्यंत चांगुलपणाच्या सामर्थ्यावर यशाच्या वाटचालीचा मी एक वाटसरू बनलो. वाट वहिवाटीची नव्हती. बिकट होती. वळणाची होती. कधी सुखद मुलायम तर कधी काटेरी, खाचखळग्यांनी भरलेली, ही पाऊलवाट अनेक संतांच्या मंदिरापर्यंत नेणारी तर कधी सामाजिकता अशा घरकुलांच्यापर्यंत जाणारी. कायम चालत राहणं हा माझा बालपणापासूनचा पिंड बनला. माझ्या घरातून ही पाऊलवाट सुरू झाली होती. आज त्या वाटांना अनेक वाटा भेटल्या, मिळाल्या आणि कोठे वाट नव्हती तिथं पावलं टाकत टाकत वाट बनवली. ही एकट्याची वाट नव्हती. असंख्य पावलं या वाटेला मिळाली. जीवनाच्या समृद्ध आणि माणुसकी नावाच्या धर्मवाटा तयार झाल्या. अशा या वाटेवरचा मी एक भटकंती करणारा प्रवासी. जीवनातील प्रत्येक परीक्षेत पास होणारा मी एक सामाजिक विद्यार्थी!

कोणत्याही माणसाचं बालपण हा आनंदाचा वारसा असतो. साधु-संतांनी म्हटल्याप्रमाणे **लहानपण देगा देवा** असा आणि असं बालपण पुन:

कोणाच्या वाट्याला येत नाही, हा शाश्वत अनुभव. माझं सारं बालपण मिरजेत गेलं. माझा जन्मच हनुमान जयंतीच्या सूर्योदयाला झालेला. तो दिवस होता १०/४/१९५२ त्या काळच्या शाळेतील नाव दाखल करण्यासाठी सोयीची तारीख १/३/१९५२ अशी नोंद करण्यात आली आणि एका अर्थानं जन्मापूर्वी जन्म असं काहीतरी आज वाटतयं.

माझ्या वडिलांचे नाव भिमराव गणू झेंडे तर आईचं नाव लक्ष्मीबाई झेंडे. माझ्या आजोबांचे नाव गणू सदू झेंडे तर आजीचे नाव कासाबाई गणू झेंडे असे होते. काका महादेव गणू झेंडे तर काकी मंजुळा महादेव झेंडे.यापैकी आज कोणीच हयात नाहीत-पण त्यांचा मी वारसदार, त्यांच्या आठवणीनं मन भरून येतं, मनाला उबारी मिळते आणि तो काळ सहज डोळ्यासमोर येतो. घरच्या आठवणीचं हे रांजण सदैव भरलेलं असतं. तो स्नेह, प्रेम, दया, त्यांचा सर्वांचा स्पर्श आजही भारावून टाकतो.

आम्ही तशी पाच भावंडं. थोरले वसंतराव, दुसऱ्या क्रमांकाचे भाऊ पांडुरंग, तीन नंबरची बहीण जनाबाई. माझा चौथा क्रमांक आणि पाचवी भामाबाई. त्या काळातील आमचा हा छोटा परिवार खाऊन-पिऊन सुखी होता.

असं सांगतात की, माझ्या जन्माच्यावेळी माझी आई बाळंतपणाच्यावेळी तीन दिवस अडली. असह्य वेदना आणि खूप त्रास होत होता. तो काळच तसा होता. प्रसूतिगृहे नव्हती. विज्ञानानं आपल्या भागात तरी पंख विस्तारलेले नव्हते. गल्लीमधील महिलांच त्याकाळी बाळंतपणाचा कार्यभाग उरकत असत. त्यांपैकी गौरा आजी नावाच्या या कार्यात प्रसिद्ध होत्या. प्रामुख्याने त्याच बाळंतपण करीत असत. पण त्यांनाही हे शक्य होईनासे झाले. परिणामी घरातील सर्वजण चिंतेत, काळजीत. अडचणीत अडकलेले.

माझे चुलते महादेव झेंडे हे नित्यनियमाने सकाळी नदीवेशीतील मारुतीला जात. दररोज वाटीतून साखर नेणे आणि उदबत्ती हा संकेत निश्चित होताच. तो दिवस गुरुवार होता आणि हनुमानजयंतीचा होता. म्हणून काका भल्या पहाटेच मारुती मंदिरात गेले होते. मारुतीचे दर्शन घेता घेता काकांनी नवस बोलला. वहिनी सुखरूप बाळंत होऊ दे. मुलगा होऊ दे. त्याला देवा तुझंच नाव ठेवतो आणि काकांच्या नवसाप्रमाणे हनुमान जयंतीला गुरुवारी माझा जन्म झाला.

घरातल्या सर्वांना खूप आनंद झाला. साऱ्यांनीच एक सुस्कारा सोडला आणि सर्वांत महत्त्वाचे, माझ्या आईची या त्रासातून आणि असह्य वेदनेतून सुटका झाली. आमच्या काकांना आम्ही आण्णा म्हणत असू. आयुष्यभर नदीवेशीतल्या मारुतीचे दर्शन त्यांनी कधी चुकवलं नाही. त्यात माझा जन्म हा हनुमान जयंतीला म्हणून माझे नाव बजरंग ठेवण्यात आलं.

आम्ही बरीच वर्षे घरात एकत्रित राहिलो, वाढलो. पुढल्या भविष्यात एकत्रपणाचा अनुभव आला. आम्ही तीन भाऊ, दोन बहिणी तर सहा चुलत भाऊ आणि एक बहीण. आम्हा बारा बालगोपाळांचं घर म्हणजे आनंदी घर, श्रीमंती नव्हतीच पण गरीबात जो प्रेमळपणा, साधेपणा, जिव्हाळा, एकमेकांवरील श्रद्धा याचं मिश्रण म्हणजे आमचं सुखद बालपण ! राम, विजय, एकनाथ, आनंद, गोविंद, रमेश या सहा भावंडांवर मुलगी झालेने काकांनी बहिणीचे बारसे त्याकाळी जोरात केले होते. तिचं नांव आक्काताई. सहज आठवलं त्या काळातही मुलीचं बारसं मोठ्या थाटात घालणारी एक पिढी होती.

माझे काका आमच्या आई–वडिलांना दादा–वहिनी म्हणत. आम्ही भावंडंही त्यांना दादा–वहिनीच म्हणू लागलो. तर काका–काकींना आण्णा–आक्का म्हणत असू.  मला एक आत्या होती. तिचं नांव कृष्णाबाई. त्यांना इचलकरंजी जवळच्या तारदाळ येथे दिले होते. त्यांच्या पतीचे नांव मोरू जाधव. त्यांना मात्र मी पाहिलं नव्हतं. आत्यांना तुकाराम, महादेव, सदाशिव अशी मुलं आणि शकू, गुणवंती, मालू अशी त्यांच्या मुलींची नावं. यातील मालूचा विवाह माझे चूलतबंधू राम यांचेशी झाला होता.

माझे आजोबा गणू सदू झेंडे. मुळ गाव कवलापूर, पण त्यांची विधवा बहीण रखमाबाई या मिरजेला होत्या. त्यांना आधार देण्यासाठी आजोबा मिरजेत आले. पण मिरजेत स्वतंत्रपणे वास्तव्य करून राहू लागले. त्यांना एक भाची होती. आम्ही सारी भावंडं त्यांना नानी म्हणत असू. बहिणीच्या आधारासाठी माझे आजोबा मिरजेत आले. स्वत:चे गाव सोडून आधारासाठी जाणं ही घटना आज मला–नात्यांना आधार कसा द्यायचा असतो, याचा कायमचा संदेश देऊन जाणारा ठरला.

आजोबा त्याकाळी फिरून सलूनचा व्यवसाय करीत. तो काळही

तसाच होता. आम्ही राहात होतो ती पाटील गल्ली ही प्रामुख्याने लिंगायत पाटील परिवारांची वस्ती होती. सलूनच्या व्यवसायाबरोबरच ते फाळ्याने शेतीही करीत. स्व.मलगौंडा पाटील, स्व. दादासाहेब पाटील यांची शेती ते बरीच वर्षे करीत होते. थोडीशी अधिक स्थिरता प्राप्त झाल्यावर आजोबांनी कांही शेती खरेदी केली. आमच्या बालवयात आमच्या घरी बैलं, बैलजोडी, म्हैशी, शेळ्या असा व्याप होताच. शेतीत शाळू, भाजीपाला पिकवला जायचा. गवतही विक्रीसाठी जात असे. आमचा व्यवसाय पूर्वीच्या काळी बलुतं या सदरात मोडत असे. सावळीजवळचे कानडवाडी ही वाडी आणि प्रामुख्याने न्हावी काम बलुत्यानं करीत. वर्षाकाठी पंधरा-वीस पोती ज्वारी, भुईमूग, तूरडाळ अशा जीवनावश्यक वस्तू आम्हास मिळत. परिणामी आमचं खातं-पितं सुखी कुटूंब होतं. जेवणाची भ्रांत नसे. घरापुरतं सारं काही होतं आणि आम्ही सर्व जण त्यात समाधानी होतो.

त्या काळी दर उन्हाळ्याच्या सुट्टीत आम्ही कर्नाळला जात असू. तसं ते माझे आईकडून आजोळ. आईच्या वडिलांचे नाव होते मारुती हरी जाधव. तर आईचे नाव आक्कुबाई मारुती जाधव. त्या घरात माझी आई मोठी म्हणून तिची सर्व भावंडं तिला आक्का म्हणत. कासा, भागू, गंगू या तिच्या बहिणी, तर मनोहर हा एकच भाऊ, असा हा कर्नाळचा गोतावळा मला खूप आवडायचा. आईचं गाव आणि आजोबांची माया-आजोळ हे आजोळच. मग ते कोणाचेही असो. आजोळचं नातं मनापासूनच असतं ते कधीही तुटत नाही, हा माझा अनुभव. माझ्या आजोबांचा व्यवसायही सलूनचाच. ते या व्यवसायाबरोबर आणखी एका छंदाशी नातं जोडून होतं. ते स्वभावाने अतिशय विनोदी होते. माझा मामाही सलूनचा व्यवसाय करत असे. त्याच बरोबर शेतीही करे. पुढे तो वसंतदादा सहकारी साखर कारखान्यात नोकरीसही लागला.

कर्नाळ म्हटलं की मला आवर्जून आठवण होते ती स्व. वसंतदादा पाटील यांची. दादांचे आप्तस्वकिय व पाहुणे कर्नाळात होते. सुट्टीत आम्ही कर्नाळला गेलो की, वडिलधाऱ्यांच्याकडून दादांनी स्वातंत्र्यलढ्यात घेतलेला सहभाग, त्यांनी फोडलेला तुरुंग, कृष्णेच्या पात्रात मारलेली उडी हे सारं ऐकून त्यांच्याबद्दलचे गूढ अधिक वाढत असे आणि मनात आदराचे स्थान दरखेपेला

वाढतच होते. आजही कर्नाळ म्हटलं की, माझ्या मनात आठवण येते ती वसंतदादांची. काही गावं अशी असतात की, विसरलीच जात नसतात. नात्याची, आठवणीची अशी एक घट्ट वीण त्या गावाशी जडून जाते ती कायमचीच.

येथे हनुमान जयंतीला मंदिरात खीर, भात, आमटी असा गावकऱ्यांचा प्रसाद असे. त्याकाळी ताट, पाण्याचा भरलेला तांब्या घेवून अशा कार्यक्रमात जेवायला जाण्याची रीत असे. इतकेच काय तर लग्न समारंभातही ग्रामस्थ स्वत:च्या घरातल्या पाण्याचा तांब्या घेऊनच जेवायला जात असत. हनुमान जयंती, रामनवमी, ऊरूस हे पाटील-माने परिवाराकडून मोठ्या उत्साहाने साजरे केले जात असत. गावातल्या तालमीत बरेच तरुण मल्ल घामाने भिजून जाण्याइतपत व्यायाम करीत. त्याकाळी कुस्तीचा छंदही बराच होता. तसं त्याकाळी सुखाचं गाव असा माझा अनुभव होता आणि सुट्टीत मला ते गाव आवडत असे. गावचं एकूण वातावरण सुखमय वाटून जायचं. सायंकाळ झाली की, ग्रामपंचायतीचा रेडिओ लागत असे. बाहेरील पटांगणात ग्रामस्थ रेडिओवरील कार्यक्रम ऐकण्यासाठी जमत-बैठक मारत. त्याकाळी अद्याप घराघरात रेडिओ नव्हता. फोनही नव्हता. पण लोकमात्र सुखी होते हे नमूद करावसं वाटतं.

गावच्या वेशीवर लुगडे धर्मशाळा होती. तर त्या धर्मशाळेला लागूनच मानेंचा मळा होता. तेथील विहीर बांधीव होती. तेथेच आम्ही पोहायला जात असू. विहीरीला मोट होती. इंजिन वगैरे कमी प्रमाणात होते. पलीकडे खोपटवजा तराळाचे हॉटेल. हॉटेलच्या मागच्या बाजूला प्रशस्त अशी खण. ती खूप खोल होती. आजही तिच्या अस्तित्वाच्या खुणा गावानं जूपन ठेवल्या आहेत. त्या खणीतच एक आड होते. त्या आडाच्या पाण्याचा वापर भांडी-कपडे धुण्यासाठी होत असे. पिण्यासाठी मात्र नावरसवाडीतील ओढ्यातील पाणी लोक कावडीने आणत. कावडीच्या दोन्ही बाजूला बंडा घागरी तर काहीजण दोन्ही बाजूला पत्र्याचे डबे बांधून पाणी आणत. पाण्याच्या कावडीचा एक लयबद्ध आवाज, त्या माणसाची चाल जणू श्रमाला संगीताची साथ, असं एक समीकरण माझ्या मनात त्या काळापासून रुतून बसले आहे.

माझे आजोबा निरंकारी संप्रदायाच्या मेळाव्यात जात. ते एक अत्यंत साधे पण अतिशय प्रामाणिक गृहस्थ म्हणून कर्नाळला परिचित होते. आता

मात्र कर्नाळ बदलत चालल्याचे, शहराची हवा लागल्याचे आणि ग्रामीणपणा हळूहळू बाजूला सारण्याचे प्रयत्न करीत असतानाचे दिसते आहे. पण मला वाटते माझ्या लहानपणाचे कर्नाळ आता राहिले नाही. जीवनाच्या धावपळीत निवांत प्रसंगी माझे आजोळ, आजोळची माणसं, आजोळच्या घरी आरामात गप्पा मारणारी लक्ष्मूदादा, चन्नाक्का, शाराक्का यांच्या आठवणी बऱ्याच वेळा बालपणात घेऊन जातात. मन गलबलतंय, उर भरून येतो आणि पुन: वास्तवात...

माझे वडील अतिशय साधे, विनम्र पण विनोदी, स्वभाव सहज दुसऱ्यांच्या मनात स्थान पटकावून जाणारा. वडिलांचे सलूनचे दुकान कनवाडकर मशिदीच्या गाळ्यात तर काकांचे सलून दुकान स्व. दुंडाप्पाण्णा हारगे यांच्या भाड्याच्या जागेत होते. त्यावेळी सलून दुकानाला नाव वगैरे ठेवण्याची पद्धत नव्हती. जवळची वस्ती मुस्लिम असल्याने माझ्या वडिलांना मुस्लिम लोक भीमू हज्जाम म्हणत. तर इतर समाज भीमू न्हावी म्हणत असे. व्यवसाय तो असल्याने त्या काळी व्यवसायावर आडनाव ठरल्यासारखे असे. गवंडी, सुतार वगैरे. त्यांच्या आडनावावर व्यवसायाची ओळख समाज रीत असावी.

सकाळी सात वाजता माझे वडील सलूनचे दुकान उघडत असत. दोनप्रहरी दुकान बंद असे. दोनप्रहरी वडील सर्व कपडे धुवून, अंघोळ करीत आणि स्वत:बरोबर स्वत:च्या आईला घेऊनच ते जेवत. दुकानात पुंडलिकसिंग रजपूत, बाबूसिंग रजपूत, भीमसिंग रजपूत, नानासाहेब पवार, मालोजी पवार, तुकाराम पवार असा जिवाभावाचा मित्र परिवार, त्यांच्या गप्पा, चेष्टा-मस्करी, अशी एक मैफलच सजत असे.आमच्या दुकानाला लगतच मकबुल चाऊस यांचे टेलरिंगचे दुकान होते. तेसुद्धा स्वभावाने अतिशय विनोदी, चहाला दुकानात येत असत. बाबूराव कुरणे (वर्दीवाले) यांच्याही अधूनमधून विनोदाची मेजवानी, विनोदी किस्से या साऱ्यांमधून बालपणीच जीवन एक शाळा असते, इथूनच शिक्षणाचा प्रारंभ होतो. या जीवनरूपी शाळेत-अक्षर, गणित, विज्ञान नसेल कदाचित पण याच शाळेत खऱ्या अर्थाने शाळेचा प्रारंभ होतो. सामाजिक शिक्षणाची ही पहिली पायरी अशी माझी धारणा आहे.

माझ्या वडिलांचे अनेक मित्र ते सारेच जीवाभावाचे. बंधुवत प्रेम

करणारे, आणि साऱ्याच क्षेत्रातील हा मित्र परिवार. पैगंबरवासी शहाबुद्दीन कलंगडे, मकबुल चाऊस यांनी आमच्या परिवाराला सोडून कधीच ईद साजरी केली नाही आणि आम्ही त्यांना सोडून दीपावली साजरी केली नाही. जात ना पात, धर्म ना व्यवसाय, गरीब अथवा श्रीमंत, फक्त साऱ्यांच्याच ठायी होता एकच धर्म आणि तो होता माणुसकीचा, माणुसकीच्या नात्याचा, माणुसकीची वीणच तशी घट्ट होती.

त्याकाळी श्रावणात लोक केस अथवा दाढी करून घेत नसत. त्यामुळे हा महिना आम्हाला आर्थिकदृष्टया तसा अडचणीत आणणारा. थोडे बहुत हालही होत असत.पण गल्लीतल्या पाटील मंडळींचा आम्हांला आधार मिळायचा. कोणी डाळ, कोणी जोंधळे आणि जीवनावश्यक वस्तूही वेळ प्रसंगी देत आणि आमचा श्रावण संपायचा. इतरांच्या दृष्टीने श्रावणमास हमखास आनंदाचा, सणांचा, उत्सवाचा पण आमच्यासाठी तो सुनासुना.

वडिलांचा दिनक्रम-दैनंदिन साचेबद्ध असा होता. दिवसभर सलूनचे काम आणि रात्री भजन. ते रात्री भजनाहून कधी परत येत हे आम्हांला कळतच नसे. जाग यायची ती त्यांच्या सूरपेटीने. भाऊसाहेब पवार (गोंधळी) यांच्याकडून सूरपेटी शिकून घेतलेली. या पवारांचे घर ब्राह्मणपुरीतील एक नंबर शाळेच्या पाठीमागे होते. आमच्या दुकानात ते येऊन बसलेले मी अनेकवेळा पाहिलेले आहे. गोरेपान, उंच, अंदाजे वय ७० ते ७५ वर्षाचे, पांढरे शुभ्र दुटांगी धोतर, कोट, काळी उंच आकाराची टोपी आणि हातात बारा काड्यांची छत्री असं भारदस्त व्यक्तिमत्व. ते बालगंधर्व कंपनीत बालगंधर्वांना साथ करीत. पायपेटीचीही ते साथ उत्तम करीत. त्यामुळे आमच्या सलून दुकानात भाऊराव पवार आले की बालगंधर्व आणि त्यांच्या आठवणी, त्यांचे किस्से, गप्पा, लहर आली की, नाट्यपदांची झलक ऐकायला मिळायची आणि सारेजण रमून जायचे, त्यांना दाद द्यायचे. अशा दर्दभरी कार्यक्रमासाठी आसपासची दुकानदार मंडळी सहज जमत आणि मैफलीला जणू सूर जमून जायचा. दुकानातील जागा अपुरी वाटू लागली की, समोरच्या कनवाडकर वाड्याच्या पायरीवर अनेक मंडळी सहभागी होऊन जायची.

माहीत नाही, माझ्या वडिलांना संगीताचा छंद कोठून आणि कसा

लागला. बहुधा बालगंधर्वांचा तो काळ आणि त्यांचा परिणाम त्यांच्यावर झाला असावा, असं सहज वाटून जातं. पण मला मात्र या संगीताचा छंद लागला तो माझ्या वडिलांच्यामुळे. सूरपेटीवर त्यांची बोटे सहज फिरत आणि उत्कृष्ट सूरपेटीवादक म्हणून इतरांच्या अनेकांकडून प्रशंसा ऐकायला मिळे. त्यांचा हा छंद फक्त छंद नव्हता, तर ते सुरांचे भोक्ते होते. त्याकाळी आमच्या घरी जर्मन बनावटीची एक सूरपेटी त्यांनी विकत आणली होती. पहाटे चारला ते जणू रियाजला बसत. बालगंधर्वांची अनेक नाट्यपदे ते अस्खलीत वाजवित. सारी गल्ली त्या सूरांना भारावून जाई. सूरांचे तरंग भल्या पहाटे साऱ्यांना जागे तर करीतच पण मंगल पहाटेचा आरंभ झाल्याची जाणीव साऱ्या गल्लीला होई. वडिलांचे सूरपेटीचे सूरमयी सूर, त्याचवेळी आईची जात्यावरची गाणी. घरातल्या या सूरांनी तर जणू प्रार्थनाच होत असे.

माझी आई खेड्यातली. जात्यावरील अनेक गाणी येत होती. नागपंचमीची गाणी येत. उखाणे, पाळणे यातही तिचा हातखंडा होता. लोकसंगीताची, लोक साहित्याची ती जणू एक खाण होती. आई वडिलांचा हा वसा-वारसा मला लोकसंगीताकडे आणि नाट्य संगीताच्या सूरात माझं जीवन केव्हा एकरूप करून गेला ते कळलंच नाही. संगीत सूरात, मी एकरूप होऊन गेलो.

तो प्रसंग मला आजही आठवतो. माझ्या थोरल्या भावाच्या परीक्षा फीसाठी आमची सूरपेटी केवळ पन्नास रूपयाला विकतांना माझ्या वडीलांच्या डोळ्यांत आलेले अश्रू आजही मला आठवतात आणि मी गहिवरून जातो. त्यानंतर मी हजारो रूपयाच्या सूरपेट्या पुढील काळात विकत घेऊन वडिलांना दिल्या, पण विकलेल्या सूरपेटीचे सूर पुन्हा वडीलांच्या हातून उमटले नाहीत. असे न उमटलेले सूर बराच काळ अस्वस्थ करून गेले. आजही तसे कधीतरी वाटत राहाते.

गाण्यावर, सूरावर, संगीतावर प्रेम करायला मला वडीलांनी शिकवलं आणि सूरांच्या मैफलीत एक श्रोता म्हणून भीमसेन जोशी, कुमार गंधर्व, हिराबाई बडोदेकर, सरस्वती राणे, कपिलेश्वरबुवा, पंचाक्षरीबुवा या गायकांच्या मैफलीत रमलो तर अनेक सतार, सरोद, तबला, सनईवादक यांच्या मैफलीत सहज

सामावून गेलो, याचे कारण वडिलांच्या बरोबर अशा अनेक कार्यक्रमांना उपस्थित राहता आले आणि सुदैवानं या अनेक दिग्गजांना मिरासाहेबांच्या प्रांगणात ऐकण्याचे भाग्य मला लाभले, हे माझ्या आयुष्यातील सोनेरी क्षण आहेत.

भजन असो वा कीर्तन माझे वडील अभंगांना सुंदर चाली लावत. दर शनिवारी किल्ल्यातील मारुती मंदिरात किंवा तासगाव वेशीच्या मारुती मंदिरात भजनाला जात. मिरजेचं वैशिष्ट्य असं की, मिरजेच्या प्रत्येक वेशीत एक मारुती मंदिर होतं. तसं तासगाव वेशीचं मारुती मंदिर हे वस्तीपासून खूप दूर आणि टेकडीवर होते. मंदिराच्या मागल्या बाजूस पाण्याचा मोठा तलाव. वडाची मोठाली झाडं. या मंदिराचे पुजारी रजपूत घराणे. त्यांचाही माझ्या वडिलांचा खास परिचय, मैत्री होती. एके शनिवारी माझी तब्येत बरी नसलेने ते उशीराच मंदिरात गेले. त्यावेळच्या  त्यांच्या भजनाच्या साथीला असणारे परशुराम (सोनीकर) माळी, वसंतराव पिसे यांनी माझ्या वडिलांना भजनाला उशीर होण्याचे कारण सहज विचारले. त्यावर माझे वडील म्हणाले माझा मुलगा बजरंग याचे पोट झाडत असून, अन्न पचन होत नाही. डॉक्टरी इलाज लागू पडत नाही. त्यामुळे त्याची तब्येत अशक्त आणि बेभरवशाची बनली आहे. अशा कारणामुळे उशीर झाल्याचे सांगितले.

तेथे मुक्कामाला असणाऱ्या एका बैराग्याने ही हकीगत ऐकली. त्याकाळी गावाबाहेरच्या देवळात, देवळाशेजारी असे बैरागी मुक्काम करीत. त्या बैराग्याने वडिलांच्याकडे भजन संपल्यानंतर काही वनस्पती मुळ्या दुधातून औषध म्हणून मला द्याव्यात असे सांगितले. मला दुसऱ्या दिवसापासून हे बैराग्याचे औषध सुरू झाले आणि विशेष म्हणजे पंधरा दिवसात माझ्या पोटाचा मुरडा बंद होऊन जुलाबही बंद झाले. मी यामधून वाचतो की नाही, अशी अवस्था होती पण मी यातून ठणठणीत बरा झालो. मग वडिलांनी बैराग्याच्या दर्शनासाठी मला घेऊन या मंदिरात आणले त्या बैराग्याचा शोधाशोध केली पण त्याचा पत्ता लागला नाही. या घटनेनंतर मात्र माझ्या वडिलांना असं वाटलं की साक्षात मारुतीरायानेच बैराग्याच्या रूपात माझ्या मुलाला औषध देऊन वाचवले आणि माझ्या मुलाला वाचविले ही भावना इतकी दृढ झाली की, माझ्या मुलाचा पुनर्जन्म झाला आणि त्याचा परिणाम म्हणून तासगांव वेशीच्या मारुती मंदिरात

माझे वडील न चुकता भजनाला शनिवारी आणि हनुमान जयंतीला हजेरी लावू लागले. सध्या या मंदिराचे आणि परिसराचे सारे स्वरूपच बदलून गेले आहे. मंदिराच्या परिसरात बरीच वस्ती वाढली आहे. पाण्याचे तळे इतिहासजमा होऊन तेथे इमारती झाल्या आहेत. चौकात कर्मवीर भाऊराव पाटील यांचा पुतळा उभा आहे. मंदिराच्या सभोवतालची झाडी नाहीशी झाली आहे. तेथील त्याकाळची एक नीरव शांतता आज नाही, एवढं मात्र खरं.

तसं आमचं मूळ गाव बाभूळगाव. तालुका सांगोला. तेथील पाटीलकी आणि वतनदारी आमच्या घराण्याकडे होती. छत्रपती शिवाजी महाराज यांचे वडील शहाजीराजे हे विजापूरच्या आदीलशहाच्या दरबारात सरदार म्हणून कार्यरत होते. परंतु छत्रपती शिवाजी राजाच्या स्वराज्याच्या चढाया, कारवाया यामुळे आदीलशहाने शहाजी राजांनाच नजरबंद केले. शहाजी राजाच्या पदरी असलेल्या आमच्या पूर्वजांनी रात्रीत विजापूर सोडून कवलापूर येथे भगवा झेंडा फडकावला. हा भगवा झेंडा फडकावला म्हणून आमचे पाटील हे आडनाव इतिहास जमा होऊन झेंडे हे आडनाव पडले आणि ते कायमचे राहीले. कवलापूरला शे-पाचशे उंबरा झेंडे घराण्याचा आहे. आजही ते स्वाभिमानाने जगताहेत. विटा, कडेगाव परिसरात मात्र आमच्या समाजाची पाटील अडनावाची अनेक घराणे आहेत.

मिरज माझ्या बालपणी छोटेसे गाव, छोटा तालुका. येथे गरीबांची वस्ती त्याकाळी अधिक होती. मिरजेचा पूर्वभाग दुष्काळव्याप्त, बारा बुरूज, वारांच्या नावावरून पडलेल्या पेठा मिरजेत आजही आहेत. सोमवार पेठ, मंगळवार पेठ, बुधवार पेठ, गुरुवार पेठ, शनिवार पेठ, अशा पेठांचा भाग म्हणजे वस्ती आणि वस्ती ओळखण्याची सोय म्हणून आठवड्यातील वारांची नावे. तसं आम्ही बुधवार पेठेतील गल्लीत राहात होतो. छोटेखानी दोन मजली आमची दोन घरे होती. घराच्या उजव्या बाजूला कुरणे वाडा, बाणदार अशी मुस्लिम वस्ती, ढोरगल्ली, चांभारगल्ली, मग मिरासाहेबांचा दर्गा, तर घरच्या डाव्या बाजूला मागे पवार गल्ली, पवार वाडा, श्रीविठ्ठल मंदिर,तर समोर खोत, येसूमाळी, हरिजनवाडा, चक्कर सडक, चक्कर सडकेच्या पलीकडे रेल्वेचे शेड. मिरजेच्या मध्यवर्ती लक्ष्मी मार्केट समोर टाऊन हॉल, त्याकाळी मुनिसिपालटी

होती. या मुनिसीपालटीचा दोनप्रहरी १२ ला एक भोंगा, रात्री ८.३० ला दुसरा भोंगा होत असे. त्याकाळातील लोकांना वेळ समजण्याचा हा उपक्रम अशिक्षित ते सुशिक्षित साऱ्यांनाच उपयुक्त ठरला होता. या लक्ष्मी मार्केटातील कट्ट्यावर फळे, भाजीपाला विक्रीची दुकाने होती. तर काहीजण रस्त्यावरच बसूनच भाजीपाल्याची विक्री करीत असत. विक्रेत्यांच्यामध्ये काही भाजीपाला विकणाऱ्या महिलाही स्वतंत्रपणे भाजी विकत, ही मिरजेतील खासियतच त्या काळी होती. स्त्री समानतेचा हा एक मिरजेने त्याकाळी घालून दिलेला संदेशच होता. मिरजेत भाजीपाला स्वस्त आणि मस्त व ताजा मिळत असे. इतरत्र अशी अवस्था नसे, असे त्याकाळचे लोक म्हणत असत. **ख्वाजाकी बस्ती भाजी-रोटी सस्ती** अशी एक म्हण मिरजेत त्याकाळी प्रसिद्धीला आली होती. दर मंगळवारी कडधान्य, धान्य आणि लोणी यांचा बाजार भरे. बुधवारचा बाजारही मोठा होता.शेजारच्या खेड्यातूनही भाजीपाला घेऊन शेतकरी येत. या बाजारातून फिरतांनाही एक प्रकारचा आनंद मिळत असे. आताही वेगवेगळ्या पेठेत बाजार भरतो पण त्यावेळची कळा या बाजारात दिसत नाही. कारणे बरीच असू शकतील. आता फक्त व्यवहारवाद आणि व्यवहारवाद, एवढाच बाजारपेठांचा अर्थ असं मला मनापासून वाटतं.

तसं पाहतां त्याकाळी मिरज एक सुधारलेलं खेडं. तथापि, मिशनऱ्यांनी बांधलेले मिशन हॉस्पिटल दिव्य-भव्य होतं. अत्यंत कमी पैशात वैद्यकीय सेवा देणारे हे एक केंद्रच बनले होते. डॉ. डोनाल्डसन, डॉ. फ्लेचर आणि स्थानिक नामांकित डॉक्टर्सनी नावारूपाला आणले. गावातही बरेच दवाखाने होते. त्याकाळातील प्रामुख्याने डॉ. एन. आर. पाठक, डॉ. भडभडे, डॉ. गोसावी ही नावाजलेली मंडळी होती. विशेष हे की मिरजेला आरोग्यासाठी अनुकूल असे हवामान, वातावरण, निसर्गाने दिलेले चांगले पाणी आणि रुग्णांसाठी रेल्वेची सोय. परिणामी मिरज ही वैद्यकीय पंढरीच बनली. मिरजेहून जवळच असलेल्या वानलेसवाडीचे टी.बी.हॉस्पिटल हे भारतात प्रसिद्ध होते. रुग्णांना राहणेसाठी प्रशस्त अशी हिंदू धर्मशाळा हीसुद्धा नावारूपाला आलेली.

मिरजेतील गणेश तलावही प्रसिद्ध होता. गणेश मंदिरासमोर असलेला मोठा तलाव आणि साऱ्या मिरजेचे गणेश विसर्जन याच तलावात. आजही तेच

चित्र पाहायला मिळते. माझ्या लहानपणी रेल्वे स्टेशन, एस.टी. स्टँड, लक्ष्मी मार्केट, मिशन हॉस्पिटल जवळचा शिवाजी चौक, गुरुवार पेठ अशा विविध ठिकाणी सार्वजनिक गणेश मूर्तीची स्थापना होत असे. या गणेश उत्सवात रोज रात्री कलापथके, मेळे, डान्सिंग पार्टी अशा करमणूकीच्या कार्यक्रमास प्रचंड संख्येने नागरिक, महिला, तरुण पिढी उपस्थित असे. या निमित्ताने मी संगीतकार वसंत पवार, संगीतकार कल्याणजी यांच्या कार्यक्रमास उपस्थित राहात असे.

त्याकाळी गणेश विसर्जनाची मिरवणूक सायंकाळी चार वाजता निघे आणि रात्री अकरा वाजता विसर्जन समाप्ती होई. या मिरवणूकांत बँड, लेझीम आणि पारंपारिक वाद्यांचा समावेश असे. तर शिवाजी चौकाच्या उत्सव मंडळात शिवाजी महाराज, मावळे आणि सजीव देखावे हे विसर्जनाच्या मिरवणूकीत लक्ष वेधून घेत. गावातील नागरिकांच्यासह परिसरातील खेड्यातूनही हा विसर्जन सोहळा पाहण्यास लोक येत व त्याची प्रसिद्धी मिरजेला प्राप्त व्हायची. मिरजेचा हा मान समजला जायचा. गणेश विसर्जनाच्या दिवशी सर्व उत्सव मंडळांचे गणपती मिरज मार्केटला येऊन येथूनच पुढे गणेश तलावात विसर्जनासाठी जात. हेसुद्धा या नगरीचे वैशिष्ट्य मानले जायचे. आता गणेश तलाव तोच आहे, फक्त उत्सवाचे स्वरूप बदललेले आहे.

मिरजेचा भुईकोट किल्ला, इतिहास प्रसिद्ध मानला जात असे. मिरज हे आदिलशहाच्या राज्यातील महत्त्वाचे ठिकाण, तसा मिरजेला खूप जुना इतिहास आहे. आता या भुईकोट किल्ल्यात मामलेदार कचेरी, प्रांत कचेरी, कोर्ट आहे. तर नृसिंहाचे व रामदास स्वामी स्थापित केलेले हनुमानाचे जागृत मंदिर किल्ला परिसरात आहे. पूर्वी किल्ल्याच्या सभोवताली मोठा खंदक होता. त्यात बारमाही पाणी असे. किल्ल्याच्या आतील भागात लोकवस्ती विरळ होती. बुरुज होते. आज त्यांचे स्वरूप बदलत चालले आहे आणि तेथील नीरव शांतता, ऐतिहासिक स्वरूप संपत चालली आहे.

मिरज त्याकाळी प्रसिद्धीला आले ते रेल्वे स्टेशन खूप जुने. त्याकाळी अनेक प्लॅटफार्म नव्हते. पण दोन प्रकारच्या रेल्वेची वाहतुकीची सोय होती. नॅरोगेज आणि नंतरच्या काळात मिटर गेज. मुंबई-पुणे, बेंगलोर, पंढरपूर, कोल्हापूर या गावांना ये-जा करण्यासाठी या परिसरात आणि कर्नाटकच्या

गावांना हे एक मोठे रेल्वे स्टेशन होते. ठराविक वेळेत पण मर्यादित रेल्वेची ये-जा सुरू असे. मला आठवतं, पंढरपूरच्या आषाढी-कार्तिकी वारीला पंढरपूरला जाणारी गाडी खचाखच भरून जायची. काही प्रवासी तर रेल्वेच्या डब्यावर बसून प्रवास करीत. ही गाडी नॅरोगेज वरून धावत असे. परिणामी तिचा वेग अत्यंत कमी होता. गाडी मिरज सोडून पुढच्या मार्गावर धावू लागली की, रेल्वेतील उतारू रेल्वेतून उतरून शेतात जात व भुईमूग शेंगाचे वेल उपटून पुन्हा डब्यात प्रवेश करीत. असा या रेल्वेचा वेग. तर काही वेळेला कोळश्याचे इंजिन असल्याने रेल्वे मध्येच थांबायची. या मार्गावर अनेक गमती-जमतीच्या प्रसंगाची चर्चा भरपूर होई.

पुणे-मुंबई-बेंगलोर-हुबळी या मार्गावर दिवसातून दोन गाड्या धावत. सकाळी आणि संध्याकाळी मग दिवसभर शुकशुकाट असे. त्याकाळी मनगटी घड्याळे फार जणांच्याकडे उपलब्ध नसायची. कांही श्रीमंत मंडळीच ते वापरत. पण रेल्वेच्या ये-जा मुळे मिरज वासियांना कितीची गाडी गेली-आली यावरून वेळ समजली जायची. या खेरीज रेल्वेच्या लोकाशेड मधून सकाळी ७ व ११ वाजता भोंगा होई. शिवाय दोन प्रहरी एक वाजता, सायंकाळी पाच वाजता भोंगा होत असे. या भोंग्याच्या आवाजावर किती वाजले हे ओळखले जाई. हा भोंगा केवळ मिरजेलाच ऐकू येत असे नाही, तर मिरज परिसरातील अनेक खेड्यांना, वस्तींना हा भोंगा ऐकायला येत असे.

स्टेशनच्या बाहेर बाबूलाल आग्रवाल यांचे कँटीन तर जवळच मारुतीचे मंदिर. या मंदिरात गोसावी, बैरागी मुक्कामाला असत. ते पत्र्याचे शेडवजा मंदिर होते. बाहेर फळांची दुकाने, चहाच्या टपऱ्या तर समोरच्या बाजूला रेल्वे पोलिसांची चाळ होती. तर या रस्त्यावर त्या काळातील अत्याधुनिक सुखनिवास हॉटेल असा हा रेल्वे स्टेशनचा परिसर. माझ्या लहानपणी मोहित करणारा आणि शांतता असणारा हा परिसर.

आता मिरज रेल्वे स्टेशन खूप विस्तारलेले, अनेक प्रांतांना जोडणारे, राजधानी पर्यंत पोहचणारे भारतातील एक अग्रणी रेल्वे स्टेशन बनले आहे. आता धूर सोडणारी कोळशाची इंजिने बंद झालीत. डिझेल इंजिन्स आलेत. प्लॅटफॉर्म वाढलेत. दादरे वाढलेत. प्रवाशांची संख्या भरपूर आहे. दिवस-रात्र

ये-जा करणाऱ्या वाढत्या गाड्या. पण कानावर आवाज येत नाही. बदलते वातावरण, वेगवान सुधारणा आणि मिरजेचे गतिमान जीवन आज पाहावयाला मिळते.

आमची बुधवार पेठ ही अशीच सलोख्याची जागा होती. कनवाडकर सरकारांचा मोठा वाडा. समोर भव्य पटांगण. दोन्ही बाजूला बकुळीची झाडे. एका कडेला डेरेदार चिंचेचे झाड, निसर्गरम्य वाड्याचा परिसर. ते कनवाड गावचे इनामदार होते. त्यांना सरकारही म्हणत. हे कनवाडकर मोठे सरकार आणि धाकटे सरकार हे दोन बंधू, दोन्ही सरकार. गोरेपान, भरपूर उंची, पांढरा हाफ शर्ट, पांढरी विजार असं हे व्यक्तिमत्व खूप दयाळू , धार्मिक आणि प्रेमळ होते. मोठे सरकार ब्रह्मचारी होते. ते दर शुक्रवारी नमाज पठण झाल्यानंतर आजारी मुलांना आशीर्वाद देत. त्यांच्या आशीर्वादाने बालकांचा ताप, खोकला व इतर आजार बरे होत. मलाही एकदा आमच्या वडिलांनी त्यांच्याकडे नेले होते.

सायंकाळी सरकार मशिदी समोरच्या पायरीवर येऊन बसत. त्यावेळी जवळपासची अनेक मंडळी आणि माझे वडीलही त्यात असत. या मोठ्या सरकारांनीच आमच्या वडिलांना मशिदीच्या बाहेरचा दुकानगाळा देऊ केला होता. याच गाळ्यात आमचे सलूनचे दुकान होते. या दुकानावर आमचे पोट भरणं चालू होतं. या बुधवार पेठेत मुख्यत: वस्ती पटवेगारांची, मलिदवाले, मुजावर यांची होती. सायंकाळी दुकानासमोरील कट्ट्यावर लोक गप्पा मारत असत. विनोद, हास्य, चेष्टा आणि चर्चा अशा विविध विषयाने भारावलेले आनंदाचे दिवस होते. बुधवार पेठेत बाळकोबा सोनारांचा (क्षीरसागर) वाडा होता. तेथे ते दररोज रात्री ज्ञानेश्वरीवर प्रवचन करीत. माझी आजी त्या प्रवचनाला रोज जात असे. त्यांच्या परसात एक जुने औदुंबराचे झाड होते. उंबराची फळं खाण्यासाठी माझ्यासह अनेक मुले तेथे जात.

कनवाडकर सरकारांच्या मशिदीतून तेथील बांगी रोज बकुळीच्या झाडाची पांढरी शुभ्र फुलं व पिकलेली बकुळीची फळं खाण्यासाठी देत असत. त्यावेळचा बकुळांच्या फुलांचा बकुळगंध आजही काही क्षण दरवळून जातो. आलाव्याची कत्तलरात्र संपली की, दुसऱ्या दिवशी मशिदीत डाळ तांदळाची

खिचडी प्रसाद म्हणून वाटत. प्रतिवर्षी न चुकता त्या प्रसादाचा आस्वाद अनेक वर्षे मी घेतला. तर वडील घरी तो प्रसाद इतरांच्यासाठी आणून देत. त्या प्रसादाची चव चविष्ट अशी होती. आजही बुधवार पेठेतून कधीतरी जाताना या सर्व गोष्टी डोळ्यासमोरून झर्रकन जातात. आमच्या दुकानाजवळ पावलं आजही क्षणभर थांबतात आणि पुन्हा पुढे सरकतात. आता माझे वडिल नाहीत, मकबुल मामा नाहीत. रझाकचे किराणा दुकान नाही. रहिमान मामा नाहीत. इस्त्रीवाले नागूमामा, नामदेव मामा, मांडववाले खतीब ही सारी माणसं निघून गेलीत. हौदावर गर्दी नाही आणि सुगंध देणारे बकुळीचे झाडही नाही.

याच परिसरात मशिदीला आमची जिल्हा परिषदेची शाळा नं. ३ प्राथमिक शाळा होती. या शाळेत पहिली ते सातवीचे काही वर्ग होते. शाळा अब्दुल पटवेगारांच्या इमारतीत भाड्याने होती. आम्हाला अमीर घुडुलाल जमादार हे अत्यंत शिस्तप्रिय असे हेडमास्तर लाभलेले होते. पहिलीला माझ्या वर्गाला स्व. कमल विभुते या अत्यंत प्रेमळ शिक्षिका होत्या. हल्ली प्रमाणे प्रत्येक विषयाला स्वतंत्र शिक्षक त्या काळी नव्हते. एकच शिक्षक सर्व विषय आणि त्याच वर्गाला पुढे नेत असत. पाचवी ते सातवी पर्यत मला स्व. दगडू नारायण सातपुते हे शिक्षक होते. ते नवीनच होते. सुंदर हस्ताक्षर आणि ध्येयवादी, खूप मारतही असत. पण आपला विद्यार्थी हुषार व्हावा, त्याची प्रगती व्हावी अशी त्यामागची त्यांची भावना होती. तत्कालीन परीक्षा पद्धतीप्रमाणे सातवीला केंद्राची परीक्षा द्यावी लागे. आपले विद्यार्थी सातवीच्या परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण व्हावेत अशी त्यांची भावना होती.त्यांच्या लग्नानंतरच्या सातव्या दिवशी आम्हा विद्यार्थ्यांना रात्री अभ्यासाला व तेथेच झोपायला सांगून स्वत: रात्री आमच्याबरोबर शाळेतच झोपत असत. त्यांच्यामुळे शिक्षण, स्वावलंबन आणि संस्कार अशा त्रिगुणांचा लाभ आम्हांला त्या काळी मिळाला. त्यांचे आम्ही सारे विद्यार्थी आयुष्यात यशस्वी झालो हे नमूद करण्यात मला अभिमान वाटतो. सन १९६५ या आमच्या तुकडीचा सातवीचा निकाल शंभर टक्के लागला. माझे वर्गमित्र श्री. आण्णासाहेब कुरणे, श्री. सहदेव पवार, श्री. रुईकर बंधू, श्री. राम दुर्गाडे, श्री. सुरेश लोखंडे आम्ही सारेजण चांगल्या गुणाने उत्तीर्ण झालो ही गुरूजींची प्रेरणा, आशीर्वाद हे आम्हाला भावी जीवनाची शिदोरी देऊन जाणारी

ठरली. आमची बुधवार पेठ, माझी शाळा, कनवाडकर हौद, आमचे दुकानही माझी श्रद्धास्थाने बनली, म्हणून स्मरणात राहिली.

आमचं मिरज ना मोठं शहर ना खेडेगाव. महाराष्ट्र आणि कर्नाटकच्या सीमेवरचं तालुक्याचं ठिकाण. त्यामुळे मराठी, कानडी, तुळू, तेलगू, हिंदी,उर्दू अशा विविध भाषांचा वापर लोकजीवनात होता आणि कोणीही कोणतीही भाषा न शिकविता अनेक भाषा लोकांना अवगत झाल्या.

कोल्हापूर रोड, सांगली रोड मधील हा पट्टा रेल्वे स्टेशन, रेल्वे गुड्स, लोको शेड, रेल्वे कर्मचाऱ्यांची, कोल्हापूर रेल्वे चाळ, माणिकनगर रेल्वे चाळ, यांनी व्यापलेला होता. मिरज जंक्शनच्या रेल्वे स्टेशनमुळे येथील कर्मचारी वर्ग कानडी, तुळू, तेलगू, हिंदी, उर्दू भाषा बोलत असे. मराठी आणि हिंदी-उर्दू या त्रिभाषेचे मिश्रण म्हणजे मिरजेतील ती आणखी एक वेगळी भाषा. आजही त्या भाषेचे संवाद कानावर ऐकायला मिळतात आणि अशी भाषा बाहेर गावी वापरली तर आपण मिरजेचे काय असं विचारलं जातं. ती भाषा शुद्ध नसेल पण एक आपुलकीचं, स्नेहाचं आणि सर्वधर्मसमभावनेचं ते एक प्रतीकच. रेल्वे चाळीतील लोक बाजारच्या दिवशी मार्केटमध्ये बाजारासाठी येत. तर अनेकजण सिनेमा पाहण्याच्या निमित्ताने येत.

त्या वेळी मिरजेत पाच चित्रपटगृहे होती. रेल्वे स्टेशच्या बाजूला अमर टॉकीज. शहराच्या मध्यवर्ती, मंगल टॉकीज, माधव टॉकीज, देवल टॉकीज तर गणपती तळ्याकडे जाताना आशा टॉकीज, तर माझ्या लहानपणी बंद पडलेले हंसप्रभा टॉकीज तेच आता बालगंधर्व नाट्यमंदिर झालेले आहे. रात्री सिनेमाच्या मध्यांतराला आणि सिनेमा सुटल्यावर टॉकीज समोरील हातगाड्यावर लोक सोडा, लेमन, मिक्स पित असत. सोड्यांच्या बाटल्यांचा आवाज लक्ष वेधून घेत असे.

त्या काळी सिनेमाचे तिकीट पाच आणे म्हणजे ३१ नवे पैसे असे होते. तर काही चित्रपट कधीतरी निम्या दरातही दाखवले जात. लोकांना सिनेमाचे वेड लावण्याचे ते दिवस होते. अमर टॉकीजला रेल्वे कर्मचारी आणि कानडी लोकांच्यासाठी तेलगू, कन्नड सिनेमा फिल्म दाखवत. नव्या सिनेमासाठी प्रचंड गर्दी असे, तर तिकीटासाठी काळाबाजर, हाणामारी असा प्रकारही होत असे.

टॉकीजमध्ये खुर्च्यांना क्रमांक नव्हते आणि सिनेमा तिकीटावरही, त्यामुळे तिकीट काढून मिळेल ती जागा आणि खुर्ची पकडणे हे एक प्रकारे अवघड काम होऊन जायचे. बऱ्याच खुर्च्या मोडक्या असत पंख्यासाठी आरओरड, लवकर सिनेमा सुरू करावा म्हणून दंगा. इंडियन न्यूजसाठीही आरडाओरड, सिनेमा चालू झाला की, शांतता पसरत असे. अशा अनेकविध प्रसंगातही सिनेमा पाहण्यात एक आगळी-वेगळी मजा यायची. खलनायकांना मोठ्या आवाजात एखाद्याने दिलेली शिवी व प्रसंगाने अनेक महिलांचे स्फुंदन रडणे सुरू असायचे. तर आवडलेले गाणं नृत्य सुरू झालं की शिट्यांनी थिएटर हादरून जात असे. अशा अनेक भावभावनांचे चित्रपट त्याकाळी समाजाला स्पर्श करून जात. वक्त, अनाडी, मोगले आझम, मदारी, इन्सानियत पासून अनमोल घडी, गाईड पासून शागीर्द, शोले पर्यंत बरेच सिनेमा मी याच टॉकीज मधून आनंदाने पाहिले आहेत. तर सम्राट चंद्रगुप्त, स्कूल मास्टर वगैरे सिनेमे निम्या दरात शाळेने दाखविले. भाभी, छोटी बहेन, खानदान, गजगौरी असे सिनेमे खेडेगावातून लोक बैलगाडीने येऊन बघत असत. या सिनेमाच्या जाहिराती त्रिकोणात तयार करून एक्का गाड्यावर दोन्ही बाजूला बोर्ड लावून तर कांही वेळेला टांग्याला बोर्ड अडकवून स्पीकरवर गाणी लावून जाहिराती केली जात असे आणि ही सिनेगाणी ऐकण्यासाठी त्या टांग्याच्या पाठीमागे मी लांब अंतरापर्यंत जात असे. त्या त्या सिनेमाची गाणी ऐकण्याचा हा छंद मला लागला होता. देव आनंदच्या सी.आय.डी. सिनेमाची गाणी हा प्रयोग होताच. वैशिष्ट्य म्हणजे त्यात सी.आय.डी. सिनेमाचे संगीतकार ओ.पी. नय्यर होते आणि योगायोगाने त्यांचा माझा परिचय एखाद्या स्वप्नाप्रमाणे पुढील काळात झाला. स्वप्नी वसे ते सृष्टीत दिसे असे घडले. उन्हाळ्याच्या सुट्टीत सिनेमा बघणे हा एक वेगळाच आनंद वाटे. लहानपणी स्व. बाळ पवार, श्री. अशोक माळी, श्री. वसंत खोत, श्री. विठ्ठल विजापुरे, श्री. रामलिंग चिकोडे असा आमचा मित्र परिवार आणि मित्रांच्या बरोबर सिनेमा पाहण्यात खास आनंद.

मिरज गाव जरी फार मोठं नसलं तरी सर्व समाजाची वस्ती त्याकाळी गुण्यागोविंदाने नांदत होती. मिरासाहेबांचा दर्गा तसं हे ग्रामदैवतच. हिंदू-मुस्लीम सारेच दर्ग्याला जात. आजही ते दृश्य दिसते. दर गुरुवारी मात्र खूप गर्दी असे.

तसं पाहतां माझ्या आध्यात्मिक जीवनाचा प्रारंभ येथूनच झाला अशी माझी धारणा आहे. माझी आई मला दर गुरुवारी पहाटे अजानला नेत असे. शेतातील मळणी झाली की, पहिली ज्वारी मिरासाहेबांच्या दर्ग्याला जात असे. पाच फकिरांना घरी जेवायला घालायचे. तर रमजान महिन्यात माझी आई महिनाभर रोजा करीत असे. दिवसभर शेतात मजूरीनं कामाला जायचं, सायंकाळी शेतावरून परतांना प्रथम दर्ग्याला जायचं आणि नंतर घरी, असा तिचा उपक्रम असे. रोजा सोडतांना तेथीलच चिंचेची एक-दोन पानं खाऊन रोजा सोडायचा. रजमजानच्या काळात अनेकांच्याकडे घडयाळे नसल्याने मुस्लिम तरुण भल्या पहाटे त्यांची भक्तीगीते म्हणत परिसातील मुस्लिम बांधवांना जागं करीत असत.

त्या वेळी दारासमोर वासुदेव आपली गाणी म्हणत जणू साद घालत असत. तर पायाला घुंगरू बांधून जंगम भिक्षा मागायला येत असत. शुक्रवारी फकीर लोक भिक्षा मागत. पावसाळ्याच्या सुरूवातीलाच पोतराज देवीची गाणी म्हणत हजेरी लावून जात असत. या सर्वात लक्षात राहण्यासारखा सण म्हणजे मोहरम/आलावा. फार गंमत वाटे, मोहरम मध्ये आमच्या गल्लीत राहणारे, रेल्वेत काम करणारे लोक अंगावर पिवळा रंग लावून त्यावर पट्टे मारून वाघाची सोंगं काढीत. आजच्यासारखी त्याकाळी करमणूकीची साधनं नव्हती. पण लोककला आणि भक्ती मार्ग यांचा एक सुंदर मिलाप विविध सणांच्या निमित्ताने दर्शन देऊन जात असे. वाघांचे सोंग, अस्वलाचे, गौळणीचे, पैलवानाचे, स्वामी विवेकानंदांचे  सोंग अशी विविध प्रकारची सोंग आम्हा बालमंडळीना करमणूक आणि आनंद देऊन जात. दर्ग्याच्या पटांगणात पंजाच्या भेटी होत आणि ते पाहण्यासाठी मोठी गर्दी होई. गावातील व खेड्यातील लोक सायंकाळी व पहाटे होणाऱ्या ताबूतांच्या भेटीसाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहत. ताशांचा तो कडकडाट, उंचच्या उंच अब्दागिऱ्या, अबीराची मनोसोक्त उधळण, आनंदाच्या सीमारेखाचं उल्लंघन आरामात करीत. परगावचे पै-पाहुणे, नातेवाईक या ताबुताच्या भेटीसाठी येत आणि घरी मुक्काम करीत. घर माणसांनी भरून जायचे. शेवटच्या दिवशी तर ट्रकमध्ये बॅरल ठेवून रंगीत सरबत वाटले जायचे. आजही तशा चवीचे सरबत मला प्यायला मिळाले नाही. मोहरम संपल्यानंतर आमच्या गल्लीतील देसाईवाडा, कुरणेवाडा, बाणदार, कलंगडे हे मुस्लिम

बांधव आम्हांला रोट आणून देत ते एक बंधूभावाचे प्रतीक आजही हे चालू आहे.

बहूरूपी सुगीच्या दिवसांत दिवाळीच्या दरम्यान भिक्षा मागायला येत. राम, लक्ष्मण, शंकर-पार्वती अशी विविध सोंगे घेऊन अभंगाच्या चालीवर बाजाच्या पेटीवर गाणी म्हणत गल्लीतून फिरत असत. त्यांना धन-धान्य देण्याची पद्धत त्या काळी होती. असेच रामाचे सोंग घेणारे बंडू बहुरूपी हे पुढे निरंजनस्वामी म्हणून आदराने पुजू जावू लाागले. ते गावाबाहेर पालात राहत. या निरंजन स्वामींची समाधी ढवळी (मिरज) येथे असून, हिंदू-मुस्लीम धर्माचे श्रद्धास्थान मानले जाते. हुपरी येथील श्रीविनयानंद महाराज व त्यांच्या शिष्यांनी मौजे वडगाव (जि. कोल्हापूर) येथे निरंजन महाराजांचा मठ बांधला आहे. तर दरवेशी प्रत्येक सुगीला येत. अस्वलाबरोबर कुस्ती खेळून हातातले कडे वाजवत. ते दिवसही आज दुर्मिळ होत चालले आहेत.

दरवर्षी रज्जीब महिन्याच्या २४ तारखेला मिरासाहेबांचा उरूस मोठा भरे. पहिला दिवस मुख्य दिवस आणि नंतरच्या दिवशी शिळा उरूस असे. दुसऱ्या दिवशी उस्ताद अब्दूल करीम खाँ साहेबांच्या पुण्यतिथी दिवशी देशातील नामवंत गायक, वादक, संगीत महोत्सवाला हजेरी लावत. या कलाकरांनी गुरूंच्या चरणी सादर केलेली सेवा, असे मानले जात असे आणि या दरबारी सेवा केली की, या कलाकारांना भारतभर मान सन्मान मिळे. दर दरबारात सरस्वती राणे, हिराबाई बडोदेकर, कपिलेश्वर बुवा, पं.भीमसेन जोशी, उस्ताद बालेखान, उस्ताद बडे गुलाम गली खाँ अशी मान्यवर मंडळी सेवेसाठी हजेरी लावत. बऱ्याचवेळा माझे वडील या गायकांना हार्मोनियमची साथ करीत त्याचा अभिमान मला वाटे. त्यांच्या या संगीत साधनेमुळे माझ्याकडे या संगीताचा वारसा आला. संगीत माझा आवडता छंद. जणू जिव की प्राण. रागदारी राग असतो, अभंग असो, पदे असोत किंवा चित्रपटातील गाणी, भक्तीगीते, सुगम संगीत असो मी आजही या अनेकविध संगीतात तल्लीन होतो, ऐकतो. एक समाधान लाभते जणू मला प्राणवायू लाभतो या छंदामुळेच. संगीतकार ओ.पी. नय्यर, मदन मोहन, प्रभाकर जोग, वसंत पवार, राम कदम यांचा स्नेह जमला. परिचय झाला तो वाढत राहिला. मिरासाहेबांच्या उरूसात बाहेरगावची दुकाने,

स्टॉल्स, विजेवर चालणारे पाळणे, हाताने फिरविण्यात येणारे पाळणे, सर्कस, प्राण्यांचे प्रयोग, फुगेवाले, विविध प्रकारची खेळणी, ऊसाचे चरखे, खाण्याच्या पदार्थांचे स्टॉल्स, कंदमुळे, मिठाई यांची दुकाने, तर थरार वाटणारा मौत का कुवाँ-यात मोटर सायकलवर वर्तुळाकार लोखंडी पिंजऱ्यात आडव्या-उभ्या पद्धतीने मोटार सायकल फिरवणारा कलाकार पाहताना अंगावर शहारे येत आणि त्याच्या या कलेबद्दल मनात कुतूहल निर्माण होई. तो या मृत्युगोलात आडव्या-उभ्या फेऱ्या मारी. एका आण्यात असे विविध प्रयोगाचा लाभ घ्यायला मिळे. मिरज स्टँड पासून दर्गा ते पोलीस कचेरी-माधव टॉकीज असा परिसर उरूसानिमित्त भरगच्च भरून जाई. साऱ्यांच्याकडे आलेल्या पै-पाहुण्याने गर्दी वाढतच असे. माझा आत्तेभाऊ सदा व माझी मित्र मंडळी या ऊरूसात दिवसभर फिरत असायचे. या उरूसातील स्पिकरचा आवाज, गाणी, जादूगारांचा आरडा-ओरडा, पिपाणी आणि विविध प्रकारच्या आवाजात सारा माहोल रमून जायचा, रोज रात्री दुकानातील खरेदीसाठी झुंबड उडायची. कपडे, खेळणी ते जीवनावश्यक वस्तुंचे स्टॉल गर्दीने फूलून जायचे. अगदी पहाटे पर्यंत ही गर्दी असे. कालांतराने एकेक दिवस जायचा आणि हळूहळू दुकाने कमी होत जायची. हे दुकानदार दुसऱ्या यात्रे-जत्रेकडे जात. या साऱ्यांचे आयुष्य भटकंतीचे होते. आज इथं तर उद्या तिथं, पण ही मंडळी मला कष्टाळू, प्रामाणिक वाटायची. दारिद्र्य असेच, पण जनसेवा हे त्यांचे ब्रीद असावे असे मला वाटे. उरूसातील दुकाने हळूहळू निघून जात पण त्याच्या स्मृती अनेक दिवस मनात रेंगाळत असत. त्या आठवणी म्हणजे पुढच्या वर्षाच्या आनंदाच्या ठेवी वाटत, असा यात्रेतला-जत्रेतला आनंद यात्री मी !

नवरात्र महोत्सवात मिरजेचे ग्रामदैवत असलेल्या अंबाबाईची यात्राही मोठी असे. हे मंदिर ब्राह्मणपुरीत असून, ते जागृत देवस्थान मानले जाते. नवरात्रीत रोजच गायन-वादनाचा कार्यक्रम असे. पं. गणपतराव कवठेकर, पं. भानुदास गुरव ही मंडळी या कार्यक्रमाचे नियोजन करीत. आजी बरोबर लहान असतांना दरवर्षी नवरात्र महोत्सवात अंबाबाईच्या दर्शनाला जात असे. आजही जातो. अशा ठिकाणच्या श्रद्धा माझ्या बालपणीच रूजल्या आणि सातवी नंतर मी त्याकाळच्या सांगली शिक्षण संस्थेच्या मिरज हायस्कूल, मिरज येथे दाखल

झालो. हे हायस्कूल शहराच्या मध्यभागी मार्केट जवळ. प्रशस्त वर्ग, विस्तीर्ण खेळाचे मैदान, मोठाली चिंचेची झाडी. दगडी इमारतीचे बांधकाम, नामवंत शिक्षक वर्ग, एक नामवंत शाळा असा तिचा नावलौकिक होता. मिरजेत त्यावेळी जनता विद्यालय, आर. एम. हायस्कूल, विद्या मंदिर, ज्युबिली कन्या शाळा अशा माध्यमिक शाळा होत्या आणि त्यात मिरज हायस्कूलचा शैक्षणिक दर्जा उच्चतम होता. माझे माध्यमिक शिक्षण मराठीतूनच झाले. त्याकाळी इंग्रजी माध्यमाच्या शाळा नव्हत्या. विज्ञानासारखा विषयही मराठीमधूनच शिकवला जायचा. १९६६ ला मी आठवीत प्रवेश घेतला. वर्ग शिक्षिका श्रीमती कमल वाटवे या होत्या. त्या एक उत्तम शिक्षिका होत्या. तर भा. द. सहस्त्रबुद्धे हे मुख्याध्यापक होते. अभ्यासाबाबतची जागरूकता, अभ्यास हा केंद्रबिंदू आणि विद्यार्थी यशस्वी होणं या पाऊलवाटा असं एक सूत्र या मिरज हायस्कूलचं होतं. परिणामी या शाळेतून बाहेर पडणारा विद्यार्थी भावी काळात यशाची शिखरं गाठत असे. असा तो अनुभव संपन्न होता. अभ्यास करून घेण्याचं काम कु. शरयू गाडगीळ (भिडे) सौ. हेमलता त्र्यं. भागवत, एस. के. कुलकर्णी,डी. जे. कुलकर्णी, करमरकर, वसंत करंदीकर, अरविंद परचुरे, जी. जी. कुलकर्णी आदी गुरुजन मंडळी पार पाडत. ही सारी मंडळी आम्हाला दिग्गज वाटत आणि त्यांच्या बद्दलचा वाटणारा आदर आजही उच्चस्थानी आहे.

दहावी अकरावीला  वै. ह.भ.प. हरेरामपंत बोडस सर हे आम्हाला इंग्रजी आणि संस्कृत शिकवत. बोडस हे महाराष्ट्रातील आध्यात्मिक क्षेत्रातील वै. ह.भ.प. गुरुवर्य सोनोपंत दांडेकर, वै.ह.भ.प. धुंडामहाराज देगलुरकर यांच्या परंपरेतील आदरणीय व्यक्तिमत्व, त्यांच्या हाताखाली शिकायला मिळणं हेच माझ्या सारख्याचं मोठं भाग्य होतं. स्व. शोभना बागेवाडी, दाते सर, आ.म. ग्रामोपाध्ये, रा.शं. ग्रामोपाध्ये, पटवर्धन सर यांनी आम्हाला घडवले. आपटे सर गणित शिकवत एन. सी. सी. चेही काम पाहात. ते कडक शिस्तीचे. त्यांची दत्तात्रय व नंदू ही दोन्ही मुले माझे चांगले मित्र होते.

या हायस्कूलमध्ये मला बरेच मित्र मिळाले. फुटबॉलपटू मद्रासी, मधुकर कांबळे, खूप विनोदी-अस्लम तारळेकर, रामलिंग चिकोडे, विठ्ठल विजापुरे, सलीम भोकरे, शब्बीर अत्तार, लाला मोमीन, तर अभ्यासात हुषार

मित्र, पुढे डॉक्टर झालेले डॉ. बशीर भोकरे, डॉ. मिलिंद पटवर्धन, डॉ. रणजीत सुल्ह्यान, इतर क्षेत्रातील वासुदेव जोशी, मुकुंद दातार, थत्ते, बाबूराव पिड्डे, आण्णाप्पा करोले, शंकर गौराजे, वायचळ अशा असंख्य मित्रांचा सहवास या शाळेने मला दिला. ते सुखाचे, संपन्नतेचे दिवस होते. बघता बघता १९६९ साल उजाडले. एस. एस.सी. चे वर्ष आले. परीक्षा म्हटले की अपेक्षित प्रश्नसंच, नवनीत गाईड, इतर गाईड न वापरता फक्त मी अभ्यासाची क्रमिक पुस्तकेच वाचली. ती वाचताना मुळात जाऊन अभ्यास करीत असे. आजच्या सारख्या सर्व विषयासाठी क्लासेस नव्हते आणि क्लासचे फॅडही नव्हते. श्री. चौगुले यांचा सुगम क्लास येथे फक्त इंग्रजी हा विषय शिकवला जाई. तर आर. टी. कुलकर्णी व सुतार हे सर गणिताचे क्लास घेत. फी अतिशय कमी असे.

त्या काळी आमच्या मिरज हायस्कूलचा एस. एस. सी. चा निकाल उत्तम असे. पण त्या काळी कौतुक करणारे हारतुरे, मुलाखती अशा फारशा नसत. मार्च-१९६९ च्या एस.एस.सी.परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालो. अशा तऱ्हेने माझे माध्यमिक शिक्षण मिरज हायस्कूल येथे पूर्ण झाले. आता हे हायस्कूल सांगली-मिरज-कुपवाड शहर महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात आले. मिरज हायस्कूलने सुखाच्या शिक्षणाची जबाबदारी पार पाडली होती.

एस. एस. सी. नंतर मी विलिंग्डन महाविद्यालयात प्रवेश घेतला. त्याकाळी प्राचार्य होते एन.बी. तारेसर. कॉलेजचे अमृतमहोत्सवी वर्ष होते. आम्हांला मराठी विषय शिकवण्यासाठी प्रा.गोविंद जोशी सर शिकवीत. इंग्रजीसाठी सलातीसर, प्रा.भिडे, प्रा. कुलकर्णी वगैरे. सायन्स शाखा सोडून मी स्वामी विवेकानंद संस्थेचे आर्टस, कॉमर्स कॉलेज, जे स्व. बापूजी साळुंखे यांनी मिरज येथे नव्यानेच सुरू केले होते, तेथे मी १९७० ला दाखल झालो. त्याचे प्राचार्य डॉ. जे. सी. सिन्हा हे होते. रुबाबदार व्यक्तिमत्व, ज्ञानी, गांधीवादी विचारांचे ही त्यांची वैशिष्ट्ये होती. वर्गात ते मिळून-मिसळून वागत. मी मुख्य विषय मराठी ठेवला. प्रा. गो.ल. गबाळे मराठी शिकवत तर प्रा. सबनीस इंग्रजी शिकवत. कमवा व शिका ही योजना प्राचार्य सिन्हा यांनी कॉलेजमध्ये सुरू केली. तासाला दहा रूपये मोबदला मिळत असे.

सकाळी ७ ते ११ कॉलेज असे. कॉलेज सुटल्यानंतर मी श्री. इंद्रकुमार

शहा यांच्या न्यु मेडीकल स्टोअर्स मध्ये रात्री पर्यंत काम करीत असे. काम संपायला आठ वाजत, असा माझा दिनक्रम होता.

मिरजेच्या मध्यभागी श्री. बाळासाहेब सरस्वती लायब्ररी होती. तेथे आमच्या घराशेजारील स्व. बाळकृष्ण खोत नोकरीस होते. त्यांच्या ओळखीने अनेक पुस्तके आणून त्यांचे वाचन करी. ह. ना. आपटे, वि.स. खांडेकर, ना. सी. फडके, प्र. के. अत्रे, चिं. वि. जोशी, श्री. ना. पेंडसे, श्री. म. माटे, लक्ष्मीबाई टिळक, वि. द. घाटे, साने गुरूजी, नाथ जाधव, व्यंकटेश माडगुळकर, रणजित देसाई, इरावती कर्वे, अनंक काणेकर, मनोहर माळगावकर, आण्णाभाऊ साठे, शरदचंद्र चटर्जी या साऱ्या लेखकांची पुस्तके मी झपाटल्यासारखा वाचत होतो. तसेच धार्मिक पुस्तके, अमृत, नवनीत, मार्मिक ही मासिके, वृत्तपत्रे, साप्ताहिके, वाचत असे. या वाचनामुळे माझं जीवनच बदलत चालले होते. जगण्याची भाषा बदलत चालली होती.


काही पुस्तके मी स्वत: खरेदी करीत असे. वाचनाची आवड माझे थोरले बंधू स्व. वसंतराव झेंडे यांनी लावली होती. जेवण करताना वर्तमानपत्र वाचणे ही देणगीही मला त्यांनीच दिली आहे.

माझ्या घरच्या खालावत चाललेल्या आर्थिक अवस्थेचा, स्थितीचा उल्लेख मी यापूर्वीच केला आहे. या परिस्थितीमधून बाहेर पडावे यासाठी माझे थोरले बंधू वसंतराव हे स्व. माधवराव ईश्वरराव पवार (दादा) यांच्याकडे मुंबईला निघून गेले. ते आमचे गल्लीतील एक प्रतिष्ठित व्यक्ती होती.तर मुंबईत ते बिल्डींग कॉन्ट्रॅक्टर म्हणून काम करीत होते. त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. प्रतापराव पवार हे माझ्या बंधूंचे वर्गमित्रच होते. मुंबईला जाण्यापूर्वी माझे बंधू श्री. इंद्रकुमार शहा या त्यांच्या मित्राच्या औषध दुकानात बसत-उठत.श्री. इंद्रकुमार शहा त्यांचे मोठे बंधू स्व. रतनचंद खेमचंद शहा, उत्तमचंद खेमचंद शहा (आगरकर) हे लक्ष्मी मार्केटला देवल टॉकीज शेजारी अशोक मेडीकल स्टोअर चालवत. या अशोक मेडिकल स्टोअर्सची नवीन शाखा न्यू अशोक मेडिकल स्टोअर्स हे डॉ. गोसावी हॉस्पिटल जवळ चालू करणेत आली. हे दुकान इंद्रकुमार शहा पाहत. मी सातवीची परीक्षा पास झाल्यानंतर उन्हा-तान्हात भटकंती करण्यापेक्षा चांगल्या लोकांच्या संगतीत राहता येईल अशा

हेतूने माझे ज्येष्ठ बंधू स्व. वसंतराव मला शहा यांच्याकडे घेऊन गेले. वसंतरावांनी माझी व शहा यांची ओळख करून दिली. त्या दिवसापासून मी शहा परिवाराचा एक घटक होऊन गेलो आणि आजही आहे. दुकानातील औषधे आणणे, ती व्यवस्थित लावून घेणे, गिऱ्हाइकांना औषध देणे, बिल करणे, दुकानातील स्वच्छता करणे, ही सर्व कामे मी घरच्या सारखी करे.

शेठजी इंद्रकुमार शहा बाहेरगावी गेले तर दुकान व्यवस्थित चालवून रात्री सर्व विक्रीची रक्कम व दुकानाच्या चाव्या देऊन घरी जाई. माझ्या सोबत त्याकाळी दुकानात शशांक अध्यापक, राजाराम घाटगे ही मंडळी कार्यरत होती. १९६६ ते १९६९ हायस्कूलची वेळ १२ ते ६ अशी असल्याने दुकानातून मी साडेअकरा वाजता निघत असे. शेठजी मला खर्चासाठी महिन्याकाठी साठ रूपये देत असत. मी ती रक्कम घरी देत असे. त्यावेळी स्वताई होती. पलीकडे भाऊ जोशी यांच्या सुग्रास भोजनालयात दोन रूपयात पोटभर जेवण मिळे. शेडजी शनिवार करीत. स्वत:साठी आणि माझ्यासाठी घरातून खिचडी आणत. अशा मोठ्या मनाचे, परोपकारी वृत्तीचे आमचे शेठजी होते. माझे बंधू स्व. वसंतराव यांनी शेठजीची ओळख करून देऊन जीवनातील अमूल्य असा ठेवाच दिला होता. त्यांच्यामुळेच संस्कार, व्यवहार आणि जीवनाची दिशा मला प्राप्त झाली. त्यांच्यामुळेच त्यांचे पुतणे माझे गुरुबंधू श्री. सतीश शहा यांचा परिचय झाला. हा परिचय आणि वीण अधिक घट्ट–मजबूत होत आहे.

सन १९७२ दुष्काळी वर्ष. पावसाचे प्रमाण कमी होतं. त्यावर्षी दुष्काळच पडला. आता शेठजींच्या दुकानात मन लागत नव्हते. पगार वाढवून मागावा तर


कॉलेज जीवनातील छायाचित्र (१९७४)


कॉलेज जीवनातील छायाचित्र (१९७४)


सत्कार समारंभातील छायाचित्र

आणखी दोन नोकर होते. त्यांनाही पगार वाढवावा लागणार होता. मला इतक्या कमी पगारात घर चालवणे अवघड झाले होते. मधले भाऊ स्व. पांडुरंग हे मराठे मिलमध्ये नोकरी करीत होते. पण त्यांनाही ले ऑफ मिळे. परिणामी एस. वाय. बी.ए.मध्ये असतांनाच नोकरीची शोधाशोध होती. एक एक वेळा मी बुधवार पेठेतील सलूनच्या दुकानात जाऊन बसे. असाच एक रविवार होता. स्व. मलगौंडा पाटील हे जिल्हा परिषद, सांगली येथे ऑफीस सुपरिटेंडेट होते. ते केसकर्तनासाठी आले होते. माझ्या वडिलांनी त्यांना माझ्या शिक्षणाची कल्पना देऊन नोकरीच्या आवश्यकतेची बाब नमूद केली. श्री.पाटीलसाहेबांनी मला जिल्हा परिषद, सांगली येथील नुकत्याच सुरू झालेल्या समाज कल्याण खात्यांत नाव नोंदविण्यास सांगितले आणि लवकरच मी तशी नाव नोंदणी केली. सन १९७३ मध्ये मला मुलाखतीसाठी बोलविण्यात आले. सार्वजनिक बांधकाम विभाग, सांगली (शिवाजी पुतळ्याजवळ) श्री. संकपाळसाहेब उपअभियंता यांनी माझी मुलाखत घेतली. मुलाखतीसाठी बरेच उमेदवार आले होते. पदवीधर, उच्चपदवीधरही त्यात होतेच. मी तर त्यावेळी एस.वाय. बी.ए.ला ॲपिअर होतो. त्यामुळे मला कनिष्ठ लिपिकाची नोकरी मिळणे अवघडच होते. याच काळात जिल्हा मध्यवर्ती बँकेतही नोकरीचा प्रयत्न करीत होतो. चेअमन गुलाबराव पाटील तर कार्यकारी संचालक टाकवेकर साहेब होते. बँकेचा जीना चढून-उतरून मी दमलो होतो. पदवीधर नसलेने नोकरी लागत नव्हती. परंतु पुढे गुरुकृपेने चेअरमनच्या गाडीतून पुढे फिरू लागलो. चांगले सल्लेही देऊ लागलो हा केवळ योगायोगच होता.

नोकरीसाठी भटकंती चालू होती. मला आठवते त्यावेळी वसंतदादा पाटील पाटबंधारे मंत्री होते. त्यांना नोकरीसाठी साखर कारखान्यावर भेटण्यासाठी गेलो होतो. परंतु त्यांची गाठ पडली नाही. त्यावेळी मिरजेचे एक सुपूत्र धडाडीचे, संयमी आणि कर्तबगार नेते म्हणून परिचित असलेले श्री. शिवाजीराव धुळूबुळू हे साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन होते. हे माझ्या लक्षात आले आणि दुसऱ्या दिवशी मी त्यांना भेटण्यासाठी बंगल्यावर गेलो. माझी त्यांनी आस्थेने चौकशी केली व एक पत्र म.ना.शेवडे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सांगली यांचे नावे देऊन त्यांना भेटण्यास सांगितले. ते पत्र घेऊन मी

शेवडेसाहेब यांना भेटण्यास गेलो. परंतु ते फिरतीवर गेल्याचे कळाले. असे बऱ्याच वेळा होई. एके दिवशी त्यांची भेट झाली. शेवडे साहेब म्हणाले आम्हाला ग्रॅज्युएट पाहिजेत. यावर मी म्हणालो आता मी शेवटच्या बी.ए. च्या वर्षाला आहे. तो पर्यंत मला शिपायाची नोकरी द्या. बी.ए. नंतर क्लार्कची नोकरी द्या मला. नोकरीची अत्यंत आवश्यकता आहे. यावर शेवडेसाहेब काही बोलले नाहीत.

परंतु मी काही स्वस्थ बसलो नाही. कारण अवस्थाच तशी होती. अधून मधून श्री.धुळूबुळू साहेबांना भेटत असे आणि शेवडे साहेबांनाही भेटण्यास जात असे. माझ्या सततच्या प्रयत्नाला यश म्हणा, माझ्यावर असणारी ईश्वरीकृपा म्हणा किंवा माझ्यासाठी श्री. धुळूबुळू साहेबांनी केलेले प्रयत्न म्हणा. मला २३/५/१९७३ रोजी नोकरीची ऑर्डर मिळाली. दि.२५/५/१९७३ रोजी पब्लीक हेल्थ डेव्हलपमेंट सबडिव्हीजन नं. १, उपविभागीय अधिकारी शेखसाहेब यांच्या कार्यालयात कारकून म्हणून हजर झालो. अशा प्रकारे नोकरी लागली. भाकरीची सोय झाली. घरात सर्वांना आनंद झाला. येथुनच भाग्याची सुरूवात झाली. याची मात्र मला किंवा माझ्या घरच्यांना पुसटशीसुद्धा कल्पना आली नाही.

नोकरी लागली ही माझ्या प्रयत्नाने लागली की, माझ्या पाठीमागे असणाऱ्या अदृश्यशक्तीने लागली? हे कळायला बरीच वर्षे जावी लागली. परंतु माझी ही नोकरी माझ्या गुरुदेवांच्या आशीर्वादाने लागली, असे माझ्या आईच्या बोलण्यातून आले. मागे आलेच आहे की १९७२-७३ मध्ये मोठा दुष्काळ पडला होता. वडील आजारी, थोरले बंधुराज मुंबईला नोकरीसाठी गेलेले. मधल्या भावाचा विचित्र स्वभाव, परिणामी घरची अवस्था विचित्र झाली होती.

आमच्या पाटील गल्ली, पवार गल्लीमध्ये श्रीविठ्ठल मंदिर आहे. या मंदिरातील सप्ताह, कीर्तन, भजन साथीला माझे वडील जात असत. परंतु रोजचा उपक्रम याच विठ्ठल मंदिरात. संपूर्ण आयुष्य त्यांनी या भजनात आणि अनेक मंदिरात घालवले. लोक त्यांना आदराने दादा म्हणत असत. ऑगस्ट महिन्यात रामचंद्र जाधव यांची पुण्यतिथी होती. या पुण्यतिथीच्या भजनाच्या

कार्यक्रमासाठी वडिल श्रीविठ्ठल मंदिरातील मंडळांसह जाधवांच्या घरी जवळच भजनासाठी गेले. या भजनी मंडळीत स्व. भिमसिंग रजपूत, पुंडलिकसिंग रजपूत बाबूसिंग रजपूत व इतर मंडळी होती. भजनानंतर चेष्टा मस्करी विनोद हा रोजचाच एक भाग असे. माझे वडिल तसे विनोदी आणि चेष्टाखोर होते. त्यादिवशी चेष्टा जरा जास्तच झाली आणि त्यात वडिलांचे धोतर फाटले. सर्व मंडळी जेवण करून आनंदाने परतली. वडिल मात्र जाधवांच्या आक्का बरोबर बोलत बसले. बोलता बोलता घरचा विषय निघाला. डोळ्यात पाणी आणून घरची सर्व परिस्थिती कथन केली. यावर आक्कांनी माझ्या आईला भेटण्यास पाठवा, असे सांगितले.

त्यावेळी जाधवांच्या घरी भाडेकरू राहत. त्यात रामचंद्र क्षीरसागर भाड्याने राहात. ते तसे आमचे पाहुणेच होते. त्यांना एकुलती एक मुलगी आणि तिचे नाव रतन होते. त्यावेळी तिचे वय अंदाजे २०-२१ वर्षाचे असावे. तिला रेणुकादेवी, श्रीस्वामी समर्थ, श्रीकुंभार स्वामी दत्ताचा संचार असे.

आमच्या आई श्री. जाधवांच्या घरी गेल्या. आक्कांना भेटल्या. रात्रीच्या आरतीनंतर रतनचे संचारात तुझ्या मुलाला अर्धी भाकरी देतो, असे सांगितले. अशा भविष्याचा नाद सर्वांनाच असतो. आपले दु:खाचे दिवस जाऊन सुखाचे दिवस यावेत असे साऱ्यांनाच वाटत असते. आश्चर्य म्हणजे मला संचारात सांगितल्या प्रमाणे महाराजांनी अर्धी भाकरी दिली होती. आईचे दर गुरुवारी जाधवांच्या घरी येणे-जाणे चालू झाले. पण मी मात्र तेथे कधीही गेलो नव्हतो. सदरची हकीगत मला माझ्या आईने नंतर सांगितलेली होती. तसे यापूर्वी मी देवभक्त होतो असे नाही. वर्षातून एक-दोन वेळा नृसिंहवाडीला जाणे, मारुतीला जाणे, मात्र गुरुवारी न चुकता मिरासाहेबांच्या दर्ग्याला मात्र जात होतो.

आमच्या एकत्र कुटुंब पद्धतीत पारंपारिक सगळ्या रूढी आणि परंपरा पाळल्या जात होत्या. सगळे सण उत्साहाने आमच्या कुवतीप्रमाणे साजरे केले जात असत. घराच्या अंगणात तुळशी वृंदावनाला आंघोळ केल्यानंतर तांब्याभर पाणी घातल्याशिवाय तोंडात पाणी घेतले जात नसे. गणपती उत्सवात सात दिवस आरती, नैवेद्य असेच. गौरी पूजनही केले जात असे. पण का कोणास ठाऊक अलीकडे मी खूप देवभक्त बनत चाललो होतो. श्रीदत्तात्रेयांवर माझी

श्रद्धा वाढतच होती. पण दत्त संप्रदायाची मला कोणतीच कल्पना नव्हती, माहिती नव्हती.

माझ्या पहिल्या पगाराची रक्कम जेव्हा २६४.५० पैसे मिळाली तेव्हा मला खूप आनंद झाला. इतका पगार मिळेल असे मला स्वप्नातही वाटले नव्हते. कारण त्या वेळी दोन रुपयात पोटभर शाकाहारी जेवण, सहाशे रुपयाला रॅली सायकल, तीनशे रुपयाला चार बॅन्डचा फिलीप्स रेडिओ, रुपये अडीचशे ते दोनशे साठ रुपयाला एक तोळा सोने मिळे अशी ती स्वस्ताई. माझा पहिला पगार देव्हाऱ्यावर ठेऊन आईकडे दिला.

मी पब्लिक हेल्थ डेव्हलपमेंट सबडिव्हीजन क्र. १ व २ या उपविभागात काम करीत होतो. अधून-मधून मिरज वॉटर वर्क्सकडेही काम करावे लागे. सबडिव्हीजन १ ला मेहबूब आब्बास शेख, डेप्युटी इंजिनिअर होते. तर सबडिव्हीजन दोनला भगवंत गजानन काळे हे डेप्युटी इंजिनिअर होते. मिरज वॉटर वर्क्सला गोविंद गणेश भडभडे हे डेप्युटी इंजिनिअर होते.

स्व. वसंतदादांनी सांगली जिल्ह्यातील दुष्काळ दूर करण्यासाठी सत्तावीस उपसा जलसिंचन योजना (Lift Irrigation Schemes) मंजूर केल्या होत्या. त्यातील मिरज-निलजी, कुपवाड, म्हैसाळ १ व २, बेडग या सबडिव्हीजन (उपविभाग) १ व २ कडे पूर्ण करण्यासाठी होत्या. तर मिरजेतील पिण्याचे पाणी पुरविणे हे मिरज वॉटर वर्क्स उपविभागाकडे काम होते. माझी नेमणूक स्टोअर क्लार्ककडे करणेत आली. त्यावेळी सिमेंट पाईप्स फॅक्टरींना सिमेंट-सळी देवून पाईप्स तयार करून घेणे, पाईप लाईन पूर्ण करणे, जॅकवेल बांधणे , संपवेल, पंप हाऊस बांधणे अशा या कामांचे स्वरूप होते. स्व. आर.जी. नागरगोजे यांचा बंद पडलेला कौलाचा कारखाना, सिमेंट व इतर साहित्य ठेवण्यासाठी- स्टॉक साठी भाड्याने घेण्यात आला होता. माझी नेमणूक या भांडारगृहाकडे करण्यात आली होती. मुख्यत: हे सिमेंटचे गोडावून होते. रेल्वेने हजारो पोती सिमेंट येई. रेल्वे स्टेशनवरून कॉन्ट्रक्टर ते ट्रकने गोडाऊनला आणत. सदरची सिमेंटची पोती उतरून घेणे, व्यवस्थित लावणे, रोजचा हिशोब ठेवणे अशा प्रकारची कामे करावी लागत. तसेच पाईप कंपनीला सिमेंट पोती देणे, पैसे भरून घेणे हे मुख्य काम असे. त्यावेळी नागरगोजे गोडाऊनला स्व.

सी. पी. दाते, पंडित गणू जाधव, हे चौकीदार व इतर कर्मचारी मात्र रोजंदारीवर होते. माझे हे सर्व सहकारी अत्यंत विश्वासू, गरीब व कष्टाळू होते. दिवस जात होते पण नोकरीत कटकटी वाढत होत्या. त्यामुळे खूप मनस्ताप होई.

कॉन्ट्रक्टर लोकांना सिमेंटची डी.आर. (पावती) फाडल्याशिवाय त्यांना सिमेंट देणे धोक्याचे होते. कधी कधी सिमेंटची रक्कम त्यांच्या बिलातून वसूल होत असे. एकतर अधिकारी असे होते कि, कॉन्ट्रॅक्टर समोर मला बोलावून त्यांना सिमेंट देऊन अॅडव्हाईस नोटवर सही घ्या, असे सांगत आणि कॉन्ट्रॅक्टर निघून गेल्यानंतर रक्कम भरून घेतल्याशिवाय सिमेंट देवू नका, असे सांगत. कॉन्ट्रॅक्टर सिमेंट नेण्यासाठी ट्रक घेऊन येई आणि मग वादाला प्रारंभ होई. त्यावेळी मोबाईलची सोय नव्हती. संपर्क साधणे अवघड जात असे. परिणामी मला बराच मानसिक ताप होत असे आणि माझी काहीही चूक नसताना बऱ्याच वेळा वाटून जायचे कि, नोकरी सोडून जावे, पण घरच्या गरीबीमुळे नोकरी सोडता येत नव्हती. मी लाच घेत नव्हतो. इतकंच काय पण कॉन्ट्रॅक्टरचा चहासुद्धा पित नसे. त्यामुळे ऑफीसमधील हितशत्रूंनी माझ्याविरूद्ध कोल्हे कुई सुरू केली. परिणामी माझ्याकडे, गोडाऊनकडे सारे संशयित नजरेने पाहू लागले.

तो काळ सिमेंट बाबत तसा टंचाईचा होता. कारण त्यावेळी बाजरात सर्वत्र सिमेंटची टंचाई होती. बंदीही होती. वरचेवर गोडाऊनची तपासणी होऊ लागली. एकदा तर माझे अन्नदाते स्व.म.ना. शेवडे कार्यकारी अभियंता गोडावून तपासणीसाठी आले. सर्व रजिस्टर, कागदपत्रे तपासली आणि माझ्या कामाबद्दल समाधान व्यक्त करून कांही सूचनाही केल्या. पुढे दोनच दिवसांनी मला होणाऱ्या त्रासाची, अवहेलनाची व्यथा श्री.काळेसाहेब, शेख साहेब यांच्या कानावर घातली आणि मला गोडावूनच्या कामामधून मुक्त करून इतर काम द्या, अशी मी विनंती केली. पण माझी ही विनंती मान्य न करता माझ्यावरच विश्वास व्यक्त करून मलाच ही जबाबदारी दिली.

यावेळी आमचे कार्यालय सुगंधा बिल्डींग, गवई बंल्यामागे, छत्रपती शिवाजी रोड, मिरज येथे होते. कार्यालयात श्री. अशोकराव शामराव जाधव हे वरिष्ठ लिपिक तर श्री मदनसिंग रजपूत, श्री.विजयकुमार यादव हे कनिष्ठ लिपिक होते. श्री. सिंग, श्री. इंगळे, श्री. कट्टी हे कनिष्ठ अभियंता होते. या कार्यालयातून

गोडावूनकडे सायकल वरून जाणे-येणे यातच बराच वेळ जाई. नोकरीत सुख असे नव्हते पण नोकरी सोडून चालणारही नव्हते. खूप कंटाळा येई मग ऑफीस सुटल्यावर सायंकाळी मार्केटला जाणे, अशोक मेडिकलमध्ये बसणे एवढाच काय तो विरंगुळा होता.

श्री. अशोक शामराव जाधव हे कोल्हापूरचे. मला ते वरिष्ठ लिपिक होते आणि बदली होऊन आले होते. ते मिरजेतील किल्ला भागात नरसोबाच्या देवळा जवळील दफ्तरदार चाळीत खोल्या घेऊन भाड्याने राहत असत. त्यामुळे ऑफीस बंद झाल्यावर कॅशच्या किल्ल्या देण्यासाठी एके दिवशी त्यांच्या घरी गेलो. किल्ल्या वगैरे देऊन कार्यालयाचा रिपोर्ट दिला. चहापान झाले, इकडच्या तिकडच्या गप्पा चालू असतांना त्यांच्या खोलीत एक छोटा ब्लॅक व्हाइट सत्पुरुषाचा फोटो दिसला. मी जाधवांना विचारले हा फोटो कोणाचा आहे? यावर ते म्हणाले, कोल्हापूरच्या दत्त महाराजांचा, एवढेच संभाषण झाले. मला तो फोटो पाहून खूप आश्चर्य वाटले. मला तो फोटो जन्मापासून पूर्व परिचयाचा असावा असे वाटले. एक प्रकारची गूढ भिती, एक प्रकारचे गूढ आश्चर्य याने माझे मन पूर्ण भारावून गेले. मी नृसिंहवाडीला कधीतरी जात असे. पण माझ्या मनाला त्रिमुखी दत्ताचे स्वरूप परिचितच होते. श्रीदत्तात्रेयांचे पुढील अवतार, सत्पुरुष याबाबत मी अज्ञानीच होतो. तो विषय तेथे संपला. पण मी ज्या ज्या वेळी जाधवांच्या घरी जात असे त्या त्या वेळी या फोटो विषयी एक अनामिक श्रद्धा निर्माण होऊन त्या फोटोचे लांबूनच दर्शन घेत असे. हे दत्त महाराज कोण? त्यांचे चरित्र वगैरे याबाबत मी जाधवांना काहीही विचारलेलं नव्हते. मात्र अधून मधून मनात एक प्रकारचे विचार येत. सर्व काही गूढ वाटून जायचं.

होता होता नोकरीत वर्ष केव्हा संपलं हे कळालं नाही. माझ्या ताठ स्वभावामुळे, कधी पैसे न खाल्यामुळे, तर कधी इतरांना काही न मिळवून दिल्यामुळे कार्यालयात माझ्याविरुद्ध वावड्या अफवा पसरवीत. मी स्थिर होतो.

पण एक असं वादळ अचानक आलं की, माझ्या डोळ्यापुढे अंधार दिसू लागला. त्याचं असं झालं. रोज रेल्वेने हजारो पोती सिमेंट मिरज रेल्वे स्टेशनला येत असे. तेथून त्या सिमेंट पोत्याची वाहतूक कार्टींग एजंट

(ट्रान्सपोर्ट)गोडावूनला ट्रकने करीत.

जसं सिमेंट आवक होई, तसं ते सिमेंट, सिमेंट पाईप्स कंपनीला व कॉन्ट्रॅक्टरना दिले जात असे. त्यामुळे रोज शिल्लक सिमेंट साठा नोंद करणे गडबडीत राहून जात असे आणि एके दिवशी मी सिमेंट साठा चेक करीत असतांना रजिस्टर प्रमाणे तपासत गेलो, तर सहाशे पोती सिमेंटचा हिशेब लागेना. सहाशे सिमेंट पोती कमी दिसू लागली. स्व. दातेमामा व मी पुन्हा पुन्हा दप्तर तपासत होतो. परंतु सहाशे सिमेंट पोती कमी दिसत होती. मी अक्षरश: घाबरून गेलो. घरची परिस्थिती गरीबीची, घर चालावे म्हणून नोकरी करावी लागत होती. माझ्यावर क्लार्क म्हणून स्टोअर्सची जबाबदारी होती. बरं स्टोअरकडे काम करताना चार पैसेही कमावलेले नव्हते आणि तो हेतूही कधी मनात आला नाही. तसे घडणे माझ्या हातून कधीच शक्य नव्हते.

माझ्या नावावर काही लोक परस्परच पैसे कमावत होते. पार्ट्या करीत होते. एवढे चांगले वागूनसुद्धा मला कोणते फळ मिळाले? मला अक्षरश: काही सूचत नव्हते. जेवण जात नव्हते. कशातच मन लागत नव्हते. एका उद्विग्न अवस्थेत मी सापडलो होतो. त्यावेळी एका सिमेंटच्या पोत्याची किंमत ५० रुपये होती. ६०० पोत्यांचे ३० हजार रुपये किंमत, तीस हजार काय पण सहाशे रुपयेसुद्धा भरायची माझी ऐपत नव्हती. विचार करीत होतो. शोध घेत होतो. काहीच शोध बोध होत नव्हता. सर्वत्र अंधार आणि अंधार, मी गप्प बसूनच कोणालाही काहीही न बोलता मार्ग शोधत होतो. माणसांवर संकट आले की, त्याला देव आठवतो. भविष्य सांगणारे आठवतात. महाराज आठवतात. अंगात संचार असणाऱ्या दैवी व्यक्ती आठवतात. भविष्याचा वेध घेत संकटे टाळण्याचे मार्ग शोधावे लागतात. आणि एका रात्री मला अचानक ज्यांच्यामुळे नोकरीला लागलो किंवा ज्यांच्या संचारातील वाणीमुळे नोकरी लागली, त्या रतनताईना भेटावे असे वाटले.

आता बरेच दिवस झाले मला नक्की आठवत नाही. वास्तविक मी नोकरी लागल्या लागल्या जाधवांच्या घरी जावून पेढे ठेवून कृतज्ञता व्यक्त करावयाला हवी होती. पण अंगातील संचार वगैरेवर माझा विश्वास नव्हता. मला नोकरी वशिला या माध्यमातून मिळाली होती असा माझा ठाम विश्वास

होता. आता मात्र माझा अहंकार गळून पडला होता. पुढील भविष्य त्रासाचे, अंधकारमय दिसू लागले. माझ्यावर आलेल्या या आपत्तीचा उल्लेख मी घरी आई-वडिलांना, कार्यालयातील मित्रांना, सहकार्यांना, कोणालाच केलेला नव्हता. एकच मार्ग होता, अपराधी मनाने जाधवांच्या घरचा रस्ता धरला. त्यांच घर हे आमच्या घरापासून पाच मिनिटाच्या अंतरावर होतं. यापूर्वी मी कधीही त्यांच्या घरी गेलो नव्हतो. भुई गल्लीच्या बोळात छोटसं अंगण, मग पडवी, सोपा, स्वयंपाक घर असं ते छोटेखानी घर. सोप्यातल्या मातीच्या भिंतीवर वेगवेगळ्या देवतांचे फोटो व्यवस्थित लावलेले होते. एका कोपऱ्यात देवघरातील फोटो व श्री. अशोकराव शामराव जाधव यांच्या घरातील फोटो एकच होता. त्या फोटो बद्दल गूढ उकलेना. आरती चालू झाली आणि रतनताईचा संचार चालू झाला. आरती संपल्यानंतर बरेच भाविक प्रश्न विचारत. रतनताई मार्गदर्शन करीत. मी प्रश्न न विचारणे पसंत केले. आता आरती संपली होती. बरेच लोक निघून गेले. माझाही जास्त परिचय नसल्यामुळे मीही थांबलो नाही. पुढे मात्र मी रोज आरतीला जाऊ लागलो.

एक दिवस मी आरतीला गेलो असताना रतनताईंना संचार झाला आणि त्या म्हणाल्या, "तुला अर्धी भाकरी दिली आहे. सांभाळून खा. काम लक्ष देऊन कर." हा संचार श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचा आहे. असं मला आक्कांनी सांगितलं. मलाही थोडे बरे वाटले व संकटातून सुटण्याचा मार्ग दिसू लागला. मला आक्का देवदूतासारख्या वाटल्या. तरीही माझ्या मनाचे पूर्ण समाधान पूर्ण होईना. आलेल्या संकटातून मला मार्ग दिसावा एवढीच माझी विनवणी होती. आलेल्या संकटातून मला मार्ग दिसावा, एवढीच माझी मागणी होती. दररोज सायंकाळच्या आरतीला जाधवांच्या घरी जात होतो. आक्काचा माझा परिचय झाला त्यांच्या प्रारंभीपासून रतनताई, आक्का, त्यांचं घराणं या विषयी एक कुतूहल निर्माण झाले होते. सात्विक भाव हे आक्कांच्या स्वभावाचे वैशिष्ट्यं होतं. त्यांच्या सृजनशील बोलण्यातून त्यांचा शेष परिचय आपोआपच होऊ लागला. संसारी जीवन व्यतीत करून प्रपंच करताना त्यांनी आध्यात्मिक दर्जा प्राप्त करून घेतला. त्यांचे जन्मगाव मिरज होते. मिरजेतील मंगल टॉकीज जवळ भंडारीबाबांच्या दर्ग्याजवळ त्यांचे जन्म घर होते. त्यांच्या वडिलांचे नाव

यशवंत निकम. कामधंदा करून पोट भरणे, परिस्थिती गरीबीची. यशवंत निकमांनी आपले दिवस कष्टात काढले होते.

आक्कांना सहा बहिणी व सहा भाऊ होते. त्यापैकी एक भाऊ व आक्का आयुष्यमान ठरल्या. त्यांचे बालपण अत्यंत साधेपणाने गेले. त्यांचे लग्न १९४० मध्ये यशवंतराव जाधवांशी झाले. यशवंतराव जाधवांचे वडिल स्व. रामचंद्र सखाराम जाधव. यांचे मूळ गाव विळेकामटी (जि. सातारा) होते. १८८७ च्या दुष्काळात त्यांचे वडिल सखाराम प्लेगच्या साथीत वारले. रामचंद्र जाधवांचे व त्यांचे लहान बंधू मारुती यांचे संगोपन त्यांच्या आई मुक्ताईने केले. विळेकामेटी गाव सोडून मुक्ताबाई पोट भरण्यासाठी रामचंद्र, मारुती व एक मुलगी असा परिवार घेऊन कोरेगाव रेल्वे स्टेशनवर राहण्यासाठी आल्या. सन १९०५ मध्ये स्व. रामचंद्र हे रेल्वेत कुली म्हणून नोकरीला लागले. सन १९१० साली स्व. रामचंद्र जाधव (नाना) हे मिरजेत असताना त्यांचा परिचय उद्योगपती चौगुले यांच्या आईचे वडील तुपारे मामा यांचेशी झाला. उद्योगपती चौगुले यांच्या आईचे वडील यल्लाप्पा तुपारे (मामा) यांनी त्यांच्या मित्रांची मुलगी गंगूबाई हिचा विवाह रामचंद्र जाधवांशी लावून दिला. जाधव, तुपारे, पाटोळे, चौगुले ही सर्व कुटुंबीय मंडळी रेल्वेत नोकरीला आणि रेल्वे चाळीत मिरज मायनर इरिगेशन ऑफीस जवळील चाळीत राहात. (आता ती चाळ पाडून टाकण्यात आली आहे) पुढे तेथेच स्व. रामचंद्र पाटील यांचा रामचंद्र जाधव यांच्याशी परिचय झाला. स्व. रामचंद्र पाटील हे त्यांच्या शेजारी चाळीतच राहत. ते रेल्वेत पोलिस होते. त्यांचे मूळ गाव केरेवाडी (ता. कवठेमहांकाळ) त्यांच्या पत्नीचे नाव धोंडूबाई होते. त्यांच्या मुलाचे नाव गोपाळराव तर मुलीचे नाव मथुरा होते. स्व.धोंडूबाई पांढरे घराण्यातील. त्यांच्या भावाचे नाव उद्धव व राम होते. हे भाऊही स्व. धोंडूबाई यांच्याकडे ते येत-राहात. त्यामुळे जाधव-पाटील पांढरे हे एकत्रित कुटुंबाप्रमाणे राहात.

त्याकाळी एकदा संध्याकाळी मिरज-पंढरपूर रेल्वे शेवटची गाडी गेल्यानंतर स्व. रामचंद्र जाधव रेल्वे चाळीतील आपल्या क्वार्टर्सकडे परतत होते. त्यावेळी त्यांना एक संन्याशी रेल्वे प्लॅटफार्मच्या एका टोकावर असलेल्या बाकड्यावर बसलेला दिसला. रामचंद्र जाधवांनी त्यांची चौकशी केली तर

त्यांची पंढरपूरला जाण्याची रेल्वे चुकली असलेने ते तेथे बसले होते. संन्याशी मराठी बोलत होते आणि तब्येत सशक्त अशी होती. भारतात संन्यस्त धर्माला प्राचीनकाळापासून मान-सन्मान प्राप्त झालेला आहे. त्यांना समाजाचा मानही मिळत आला आहे. परमेश्वराशी ऐक्य साधणे हे त्यांचे ध्येय असते. गुरूंच्या आज्ञा पालनात ते असतात. या भावूक भावनेने रामचंद्र जाधवांनी त्यांना आपल्या रेल्वे चाळीतील घरी येण्याचा आग्रह केला आणि ते या संन्याशी सत्पुरुषाने मान्य केले. त्यांचे नाव होते कृष्णबुवा.

ते कोल्हापूरच्या श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे अंतरंगातील शिष्य होते. त्यांच्या गुरुदेवांनी त्यांना श्रीक्षेत्र पंढरपूरला शुद्ध एकादशीला प्रत्येक महिन्याची वारी करण्यास करण्यास सांगितले होते.

नंतरच्या काळात कृष्णाबुवा पंढरपूरला येता-जाता  जाधव, पांढरे-पाटील-तुपारे यांच्याकडे येऊ-जाऊ लागले. स्नेह जुळत गेला. कृष्णाबुवांच्या बोलण्यातून त्यांच्या गुरुदेवांच्या भव्य दिव्य जीवनाचा उलगडा या परिवाराला होऊ लागला. गुरुशिष्याबद्दलचा चिरंतन संबंधाचा अध्याय सुरू झाला. त्यांच्या गुरुदेवाचे नाव श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज असले तरी त्यांचे वास्तव्य कुंभार गल्लीतील मातृवत्सल, अपूर्व शांती लाभलेल्या संत महिला पुण्यश्लोक ताराबाई शिर्के यांच्या घरी होते. म्हणून कुंभार गल्लीतील दत्त महाराज हेच त्यांचे नाव रूढ झाले होते. हे नाव त्यांना कुंभार गल्लीवरून पडले होते. त्यांचा जन्म नांदणी ता. शिरोळ जि. कोल्हापूर येथे शके १७५७ रविवार  माघ वद्य पंचमी दि. ७/२/१८३६ रोजी झाला होता. त्यांच्या वडिलांचे नाव आप्पा भट जोशी तर आईचे नाव अन्नपूर्णादेवी होते. त्यांच्या तपश्चर्येने नृसिंह सरस्वती दत्त महाराज यांनी त्यांच्या पोटी जन्म घेतला होता. अवतार घेतला होता. धर्मशास्त्रामध्ये अवतार याचा अर्थ परमेश्वराने हाडामासाचा देह धारण करणे. ते सिद्ध होते. जीवनमुक्त होते. हा त्यांचा अवतार म्हणजे या भूलोकावर स्वर्गीय कृपाप्रसादांचा वर्षाव करण्यासाठीच होता. त्यांना निसर्गाचे कोणतेच नियम लागू नव्हते. हा ईश्वरी दत्तात्रेयांचा अवतार असून, ते अंतस्थपणे मुक्त होते. त्यांचा वावर विश्वात भरून राहिलेला होता. ते गौरवर्णीय, मध्यम शरीरयष्टीचे, उंचीचे, सुंदर सुदृढ शरीराचे होते. डोळे काळेभोर, स्थिर आणि नाजूक होते. ते

तेजोवलय धारण करणारे होते. हे महायोगी सूक्ष्मदेहाने सर्व विश्वात स्थलांतरित होऊन भक्तांना अनुभव देत. वेगवेगळ्या स्वरूपात दर्शन देत. अक्षय अशा त्यांच्या शरीराला अन्न लागत नसे. पुण्यश्लोक ताराईने भरविलेले अन्नच खात. जरी अन्न क्वचितच खात तरी त्यांच्या चेहऱ्यावरचे तेज, तेजपुंज होते. दिव्यत्वाचे दर्शन घडविणारे, चैतन्य स्वरूपात सर्वत्र संचार करणारे अमरतत्त्वातील होते. युगानुयुगे अमर होते. नित्य जागृत संत होते.

कृष्णाबुवांचे आडनाव चव्हाण होते. सांसारिक जबाबदारीच्या जगात उतरल्यानंतर त्यांना अपस्माराची बाधा (फेफरे) झाली. ते शाहू महाराजांच्या दरबारात घोडेस्वार या पदावर नोकरी होते. घरी आई-पत्नी, संसार सुखाचा होता. परंतु त्यांना अपस्माराची (फेफरे) पिडा होती, औषधपाणी केले परंतु काही फरक पडला नाही. अशा वेळी त्यांच्या एका मित्राने कुंभार गल्लीतील दत्ताला जा, ते तुला बरे करतील, मरणातून सोडवतील असे सांगितले. त्याप्रमाणे एके दिवशी ते कुंभार गल्लीत दत्ताला दर्शनासाठी गेले. त्यांना पाहताच महाराज म्हणाले, "भस्म लाव, राख लाव," प्रश्न न टाकताच महाराजांनी दिलेले उत्तर ऐकून त्यांना आश्चर्य वाटले. ते रोज कुंभार स्वामींच्या दर्शनाला जाऊ लागले. कुंभार स्वामी कृष्णाबुवाविषयी भक्त मंडळीना म्हणत हे उत्तम आहे घोडे, कुलवान घोडे आहे. कृष्णाबुवांना आश्चर्य वाटे. त्यांचे आजोबा (आईचे वडील) हे राजदबरबारात नोकरीस होते. ते माळकरी होते. त्यांची पंढरपूर वारी होती. एकदा ते पंढरपूरला आषाढी वारी दर्शनाला गेले असताना त्यांना कोल्हापूरला कामावर हजर व्हायला काही दिवसाचा उशीर झाला. कोल्हापूरहून परत आल्यानंतर ते पुन्हा कामावर गेले. वरिष्ठांना व आपल्या सहकाऱ्यांना भेटून पंढपूरहून येण्यास उशीर झाला. त्यामुळे नोकरीवर हजर होण्यास दोन-चार दिवस उशीर झाला असे सांगितले. त्यांचे सहकारी व वरिष्ठ बुचकळ्यात पडले. तुम्ही वेळेतच कामावर हजर झाला असून, हजेरी पुस्तकात तशी नोंद आहे, असे सांगून हजेरी पुस्तक दाखवले. त्यांच्या आजोबांचे डोळे भरून आले. आपल्यासाठी विठ्ठल देव राजदरबारात आपले रूप घेऊन आले आणि त्यांना काम करावे लागले याचे वाईट वाटले. पांडुरंगाला-विठ्ठलाला आपल्यासाठी श्रमविले असे वाटून त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला. अशा थोर माळकरी

घराण्याचा वारसा कृष्णाबुवांना लाभला होता. त्यांना कुंभार स्वामी म्हणत की पंढरपूरची वारी का करीत नाहीस?

एकदा त्यांना पंढरपूरला जायचे होते. त्यांनी कुंभारस्वामींना परवानगी मागितली. कुंभारस्वामींनी त्यांना पंढरपूरला पांडुरंगाच्या दर्शनाला जाण्याची संमती दिली. कृष्णाबुवांनी पंढरपूरला जाण्याची तयारी केली. वाटखर्चासाठी पाच रुपये जमविले. उद्या जाणार इतक्यात त्यांच्या आईनं अंगावरले लुगडे जुने झाले आहे, लुगडे आण, असे सांगितले. यावर कृष्णाबुवांना काही सुचेना. प्रथम पंढरपूर करावे की, आईला लुगडे आणावे. जवळ तर फक्त पाचच रुपये होते. आणि या दोन्हीपैकी एकच कार्य करू शकत होते. ही सत्याची कसोटी होती. बुद्धीपर्यंत पोहचता येत नव्हते. एखाद्या माणसांची योग्यता आजमावण्यासाठी संत पुरुष कसोटी लावतात. अशा प्रसंगी कृष्णाबुवा अंतरंगी शांत राहिले. त्यांनी पाच रूपयाचे लुगडे आईला आणून दिले.

दुसऱ्या दिवशी कृष्णाबुवा कुंभार स्वामींच्या दर्शनाला गेले असता मेघगर्जनेहून सामर्थ्यवान पण फुलाहून कोमल मृदू आवाजात कुंभार स्वामी त्यांना म्हणाले, “बरे केलेस पोरा.” आसमंतातील व्यापक दिव्यदृष्टीने स्वामींनी बुवांनी आईला लुगडे आणून दिल्याचे ओळखले. ते पाहून कृष्णाबुवांचे डोळे भरून आले. त्याच रात्री त्यांचा एक मित्र त्यांच्या घरी आला व तो म्हणू लागला आम्ही सहकुटुंब पंढरपूरला दर्शनाला उद्या निघणार आहोत. आमच्या जाण्याची व्यवस्था झाली. सोबतीला तू चल तुझ्यासाठी घोडे तयार आहे. अशा रीतीने जरी पाच रूपये आईच्या लुगड्याला खर्च झाले असले, परिस्थिती दारिद्र्याची असली तरी त्यांच्या गुरुदेवांनी कुंभार स्वामींनी त्यांची पंढरपूरला जाण्याची सोय करून ठेवली होती. मित्राची विनवणी ऐकून कृष्णाबुवांना परमानंद झाला. ते मित्राबरोबर पंढरपूरला गेले.

श्रीक्षेत्र पंढरपूरला खूप गर्दी झाली होती. या गर्दीत त्यांना दर्शन होणे कठीण वाटले. त्यात अपस्मारीचा त्रास. काय करावे हेच कळेना. इतक्यात मंदिरातील पुजारी आला. तो त्यांना म्हणाला, “चला बुवा पांडुरंगाच्या दर्शनाला.” असे म्हणून त्या पुजाऱ्याने त्यांना दर्शनासाठी मंदिरात नेले. मंदिरात त्यांना त्या महागर्दीतून पांडुरंगाऐवजी गुरुदेव कुंभार स्वामीच दिसू लागले.

अशी दिव्य अनुभूती त्यांना येत होती. कृष्णाबुवा मला पांडुरंगाचे दर्शन घडवा, असे पुजारींना म्हणत होते. ते देहभान विसरून गेले होते. तर पुजारी व लोक कृष्णाबुवांना म्हणत होते तुला डोळे नाहीत काय? आंधळा आहेस काय? समोरच पांडुरंग उभा आहे. मग कृष्णाबुवांना विराट स्वरूपात पांडुरंगाचे दर्शन झाले. कृष्णाबुवांची खात्री झाली. आपले गुरुदेव कुंभारस्वामी व पंढरपूरचा पांडुरंग एकच आहेत.

कुंभारस्वामी कृष्णाबुवांना वरचेवर म्हणत तू अंगाला राख लाव. एकदा भक्तांसह श्रीक्षेत्र वाडी रत्नागिरीला जोतिबाच्या दर्शनाला जात असताना कृष्णाबुवा खानदानी घराण्यातील, माळकरी घराण्यातील विठ्ठल कृपापात्र घराण्यातील म्हणून त्यांना म्हणाले, कुलवान घोडे व त्यांच्या खांद्यावर बसले. परमेश्वरी इच्छा गोंधळून टाकत असे. लवकरच त्यांचे कुटुंब निवर्तले. एकुलत्या एका मुलीचे लग्न होऊन ती अर्जुनवाडला ता. शिरोळ येथे सासरी गेली.

आपल्या गुरुदेवांच्या आज्ञेने त्यांनी अंगाला राख लावली व ते संन्यास घेऊन अलाहाबादच्या कुंभमेळ्याला निघून गेले. ते नागासाधूंच्या झुंडीत सामील झाले.

भारतात फार पुरातन काळापासून कुंभमेळे भरतात. दर सहा वर्षांनी भरणाऱ्या यात्रेला अर्ध कुंभमेळा म्हणतात तर दर बारा वर्षांनी भरणाऱ्या धार्मिक यात्रेला हिंदू लोक कुंभमेळा म्हणतात. भारतातील हजारो साधू फक्त कुंभमेळ्याच्या पुण्यपर्वाला झुंडीने-गटाने बाहेर पडतात. त्यांचे दर्शन संसारातील लाखो स्त्री-पुरुष घेतात. कृष्णाबुवा बारा वर्षे नागा साधूंच्या सहवासात राहिले. नागासाधूंचे मुख्य लक्षण म्हणजे हे दिगंबर अवस्थेत असतात. अंगभर भस्म चर्चन करतात. जटादाढी हे त्यांचे बाह्यस्वरूप असते.

कृष्णाबुवाच्या गुरुदेवांनी कुंभारस्वामीनी श्रावण वद्य दशमी शके १८२२ सोमावार दि. २०/८/१९०० रोजी श्रीक्षेत्र कोल्हापूरला अवतार समाप्ती केली. गुरुदेवांच्या आज्ञेने ते पंढरपूरची वारी शुद्ध एकादशीला करीत, बारा वर्षाच्या पंढरपूर वारीनंतर विठ्ठलाचे-पांडुरंगाचे दर्शन झाले होते. त्यांना ईश्वर म्हणजे सच्चिदानंद प्राप्त झाला होता. त्या आनंदाची कधीही अंत होणार नव्हता. चंद्रभागेत त्यांनी श्रीविठ्ठलाला-पांडुरंगाला स्नान घातले होते. पांडुरंगाने त्यांना स्नान घातले

होते.

आज रेल्वे चुकल्याने त्यांच्या गुरुदेवांच्या भविष्यातील संकेतानुसार रामचंद्र जाधवांच्या घरी कृष्णाबुवा आले होते. रामचंद्र जाधव, यल्लाप्पा तुपारे, पाटोळे, पांढरे-पाटील यांचा भाग्योदय झाला होता.

हिमालयात कितीतरी साधू, संन्याशी, बैरागी, योगी, गोसावी राहतात. गिरिजन राहतात. पण या साऱ्यानाच ईश्वरप्राप्ती होते असे नाही. परंतु कृष्णाबुवांच्यामुळे या संसारी लोकांना ईश्वर प्राप्त झाला होता. श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज, कुंभारस्वामी प्राप्त झाले होते. एका अर्थाने माझ्या जीवनात भाग्योदयाची पहाट होऊ लागली होती.

श्रीक्षेत्र पंढरपूरला जाताना-येताना कृष्णाबुवा रामचंद्र जाधवांच्या घरी येऊ-जाऊ लागले. मुक्कामही करू लागले. सन १९४२ मध्ये आपल्या गुरुदेवांच्या (कुंभार स्वामींच्या) चर्मपादुका, टोप्या, (हिरव्या रंगाच्या) रूद्राक्षमणी रामचंद्र जाधवांना कृष्णाबुवांनी दिल्या. सन १९४५ मध्ये मिरजेतील नदीवेस पवार गल्लीतील एका अरूंद गल्लीत रामचंद्र जाधवांनी एक छोटेखानी घर घेतले. या घरात कृष्णाबुवांच्या हस्ते श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या तसबिरीची स्थापना होऊन नैतिक आध्यात्मिक मूल्यांच्या जोपासनेचे एक कार्य चालू झाले. आयुष्याचे ध्येय आणि आयुष्याचा मार्ग दाखविण्याचे हे कार्य होते.

भुईगल्ली-पवार गल्लीत एक पुराणप्रसिद्ध श्रीविठ्ठल मंदिर असून ते जागृत स्थान आहे. कृष्णाबुवा त्यांच्या गुरुदेवांच्या आज्ञेने शेवटी कृष्णा नदीकाठी वास करून राहिले. मिरजेत ते भुईगल्ली-पवार गल्लीतील विठ्ठल मंदिरात राहत. दोन प्रहरी ते पांढरेंच्या घरी भिक्षेला जात तर रात्री जाधवांच्या घरी भिक्षेला जात. वसतिस्थान मात्र विठ्ठल मंदिर होते. कधी कधी ते अर्जुनवाडला जात, तेथे त्यांचा मुक्काम सदाशिव महाराजांच्या मठात असे. ते स्नानाला नदीकाठी येत. जेथे ते स्नान करीत त्या जागेला बुवाचा पाठवठा असे नाव पडले. तेथे एक छोटे मंदिर आहे. त्यांच्या डोक्यावरच्या जटा दहा ते बारा फूट लांब होत्या. एकदा शिर्केच्या गुरुदेवांच्या समाधी मंदिरातील एका घुशीला कृष्णाबुवाने जटेच्या माराने मृतप्राय केले होते. कृष्णाबुवांनी श्रीविठ्ठल मंदिरात श्रीविठ्ठलासमोरील पिंपळ वृक्षाखाली पारावर दि. ६/११/१९४७ रोजी अवतार

समाप्ती केली. त्यांच्या जाधव-पांढरे-पाटील रजपूत या शिष्यांनी त्यांना कृष्णा नदीकाठी समाधी दिली. जणू एक पर्व संपले.

दरम्यानच्या काळात सिमेंटच्या पोत्यांचे येणे-जाणे नित्याप्रमाणे सुरू होते. सुदैवाने कोणीही अचानक तपासणी केली नव्हती. या गेलेल्या सिमेंटच्या पोत्यांचे काय? तपासणी झाली तर? या एकाच प्रश्नाने मी व्याकूळ झालो होतो. बेचैन झालो होतो? माझ्या संपूर्ण जीवनाचा हा प्रश्न होता. एके दिवशी एका कॉँन्ट्रॅक्टरला सिमेंट देण्यासाठी मी गोडावूनला थांबलो होतो. सिमेंट वाहतूक करणाऱ्या एका ट्रक ड्रायव्हर दुसऱ्या एका कॉँन्ट्रॅक्टरला कसा अपघात झाला हे सांगत होता. किती नुकसान झाले, त्यांच्या पायाचे ऑपरेशन होऊन दोन महिने झाले, ते दोन महिने घरात कसे आहेत, याची मलाही माहिती दिली. त्या सब कॉँन्ट्रक्टरचे नांव होते मोहन. मोहनचा माझा थोडा परिचय झाला होता. आता तो बिल्डींग कॉँन्ट्रक्टर झाला होता. तो मिरजेजवळ एका खेड्यात राहात होता. रविवारी सुट्टी असल्याने मोहनला भेटण्यासाठी त्यांच्या घरी बसने गेलो.

खेडेगावातील ते घर, समोर गोठा, मागे सोपा, त्या सोप्यात एक लोखंडी कॉट. त्या कॉटवर पाय पसरून तो पहुडला होता. मला पाहताच या रावसाहेब म्हणून उठून बसण्याचा प्रयत्न करू लागला. पण बोजड अंगामुळे तो उठून बसू शकत नव्हता. मीच म्हणालो, “ असू दे.” तो म्हणाला, “ रावसाहेब, गोडावूनमधून तीन फेऱ्या सिमेंट पोत्याच्या करून ॲडव्हाईस नोटवर सही करण्यासाठी ट्रक पुढे पाठवून मी मोटारसाईकलने तुमच्याकडे येत होतो. तेवढ्यात मिशन हॉस्पिटलच्या  बॉम्बे हॉटेल जवळच्या चौकात एका मोटर सायकलने एवढी मोठी जोरात धडक दिली की मी खाली कोसोळलो, बेशुद्ध पडलो. मला दवाख्यान्यात ॲडमिट करण्यात आले. पायाचे ऑपरेशन करण्यात आले. जवळ जवळ तीन महिने मी घरीच पडून आहे. त्यामुळे सिमेंट नेले पण माझ्या सह्या राहिल्या आहेत. ते ॲडव्हाईस नोटबुक पाठवा. मी सह्या करतो.”

मला प्रचंड मोठा धक्का बसला. मी केवळ मोहनला बघायला आलो होतो. कारण त्याला अपघात झाला होता. एक व्यावहारिक संकेत म्हणून ही भेट होती. त्याला मी सिमेंटची सहाशे पोती देऊन त्यांच्या सह्या घेणे माझ्याकडून राहून गेले होते हे माझ्या लक्षातच आले नव्हते. आज काही त्यांच्या सह्या

घेण्यासाठी त्यांच्याकडे गेलो नव्हतो. कारण तसा विषयच नव्हता.

एकीकडे माझे मन भरून आले होते. सहाशे पोती सिमेंटचा हिशेब काही केल्या लागत नव्हता. त्या काळात माझ्यासमोर, माझ्या जीवनासमोर फक्त अंधार आणि अंधारच पसरला होता. अन्न-पाणी गोड लागत नव्हते. बऱ्याचवेळा या विचारात माझा मी राहत नसे. इतके दु:खाचे ओझे बाळगून जगत होतो. पण माझ्या गुरुदेवांनी या मोठ्या संकटातून वाचवले होते. माझ्या चुका मी मनातल्या मनात सावरून म्हणालो, " अरे, मी सहीसाठी आलो नाही. तुझ्या तब्येतीच्या चौकशीसाठी आलो आहे. आता बरं वाटतंय ना!" असे विचारत इकडच्या तिकडच्या गप्पा मारून मी आनंदाच्या वाऱ्यावर परतीच्या मार्गाला लागलो. नुकताच पाऊस पडून गेला होता. हवेत गारवा होता आणि माझ्या जीवनातील एक मोठा गारवा मला मिळाला होता. आभाळ भरून आले होते. माझे मनही कधी नव्हे इतके भरून आले होते. दूरपर्यंत इंद्रधनुष्य आपले सौंदर्य दाखवीत दिमाखात दिसत होते. माझ्या मनात यशाच्या वाटचालीचे एक सप्तरंगी इंद्रधनुष्य साकारल्याचे जाणवत होते. सागराला भरती यावी तसं माझ्या मनालाही भरती आली होती. कशासाठी गेलो होतो आणि काय प्राप्त झाले होते. माझ्या आयुष्यातील हा एक अविस्मरणीय दिवस होता.

दुसऱ्या दिवशी पुन्हा मी मोहनला भेटून त्याने घेतलेल्या सहाशे पोती सिमेंटच्या ॲडव्हाइस नोटवर सही घेऊन आलो. ज्या दत्तमहाराजांनी मला एका मोठ्या संकटातून वाचवले, त्यांचे दर्शन कधी घेईन, असे मला झाले होते. आमचे रावसाहेब श्री. अशोकराव जाधव व जाधवांच्या देवघरातील असणारा दत्त महाराजांचा फोटो एकच. याचे आश्चर्य वाटत होते.

एके दिवशी श्री. अशोक शामराव जाधव मला म्हणाले, "मी गणपती उत्सवासाठी गावी कोल्हापूरला जाणार आहे. कदमवाडीला माझी सासूरवाडी असून, तुम्ही तेथे या." त्यांच्या पत्नीचे नाव सुरेखा होते. तर मुलीचे नाव राणी होते. पुढे दोन दिवसांनी मी कोल्हापूरला गेलो. कदमवाडीला श्री. अशोक जाधवांच्याकडे जाऊन त्यांच्या बरोबर पापाच्या तिकटीला जाऊन मी त्यांच्या बरोबर कुंभार गल्लीतील दत्त महाराजांच्या मंदिरात दर्शनाला गेलो. तो दिवस १९७४ गणेश चतुर्थीचा होता. प्रथमच दर्शन होते. मी, **मी राहिलो नाही.**

अवधूत कृपेचे काय वर्णन करावे.

श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या समाधीचे दर्शन घेऊन मी समाधीवरील तसबिरीकडे पाहतच राहिलो. एकटक बराचवेळ पाहत राहिलो. माझे डोळे दिपून गेले. दिपून टाकणारा प्रकाश झोत बाहेर पडू लागला. त्या प्रकाश झोताने माझे शरीर जणू व्यापूनच राहिले, असे वाटू लागले. पुन्हा पुन्हा तसबिरीकडे पाहणे व समाधीचे दर्शन घेणे हे चालूच राहिले. त्यांचे डोळे विशाल आणि काळेभोर होते. अगाध ज्ञानमय मुद्रेने ते अतिसुंदर तेजस्वी आणि दयाळू दिसत होते. ईश्वररूपी आनंदाच्या छटा त्या प्रतिमेतून दिसून येत होत्या. एक प्रकारचे गूढ स्मितही दिसत होते. बाह्य जगाकडे दयेच्या नजरेने पाहणारे त्यांचे तेजस्वी डोळे, एक अवर्णनीय असे सारे कांही होते. त्या तसबिरीचा माझा अंतर्मनावर प्रभाव वाढत चालला होता. माझ्या मनातील मौन अशी प्रार्थना सर्वज्ञ अशा गुरुदेवांनी ऐकली होती व जणू मला अभय दिले होते. माझ्या आनंदी मनातील यातनाच संपत चालल्या होत्या. मनाची व्याकूळता जणू शिथिल होत चालली होती. रात्र संपून सकाळ उजाडत होती. जगात जगण्यासारखे-पाहण्यासारखे काही उरले नाही, असे वाटत होते. श्रीदत्त महाराजच माझे सर्वस्व वाटत चालले होते. प्रेमळ मुद्रेने पुढील भविष्य दाखविणारे तसबिरीतील डोळे मला दिसत होते. निःस्तब्ध झालो. पूर्वजन्मीच्या आठवणी जागृत झाल्या. ते परमेश्वर तर होतेच शिवाय जन्मोजन्मीचे माझे ते गुरुदेव वाटत होते. पूर्व जन्मातील स्मृती जागृत होत असल्याचा भास होत होता. तर परमेश्वराने स्वर्गातून खाली येवून दर्शन देत असल्याचा भास होवू लागला होता. त्यांच्याबद्दलची भीतीही हळूहळू कमी होऊ लागली. एका समाधिस्थ अवस्थेपर्यंत पोहचतो की काय असे वाटू लागले. हे क्षण माझ्या जीवनातील बदलांचे ठरले, अविस्मरणीय ठरले.

गणेश चतुर्थीचा दिवस होता. घरीघरी सर्वांग सुंदर गणेशाच्या मूर्ती मिरवणूकीने नेल्या जात होत्या. आरतीची वेळ झाली. ऋतुजा आणि सात्त्विक भावाने तसबिरीला अनेक हार, फुले, फळे अर्पण होत होती समाधीस्थळावरही अनेक प्रकारची सुगंधीत फुले अर्पण झाली होती आदरबुद्धीने अनेक भक्त मंडळी आरतीला उभी होती. दोनप्रहरी १२.३० ते १२.४५ आरती संपवून

आम्ही मंदिराबाहेर पडलो.

बाहेर बारीक पावसाचे थेंब होते. हवेत अगरबत्तीचा, सुवासिक फुलांचा वास दरळवत होता. सत्याचा उल्हास व आवेश मनात भरून राहिला होता. पापाच्या तिकटीजवळ एका फ्रेममेकरच्या दुकानात एक रंगीत ऑईल पेंटची श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांची सुबक अशी तसवीर दिसली. श्री. अशोक जाधव साहेब आणि मी चौकशी करून ती विकत घेतली. सर्व काही पूर्व नियोजित असल्याप्रमाणे घटना घडत चालल्या होत्या.

श्री. अशोक जाधवांच्या भाड्याच्या घरात पाहिलेली श्रीदत्तमहाराजांची तसबीर आणि मी संकटात असतांना जाधव आक्कांच्या घरी देव्हाऱ्यात पाहिलेली तसबीर आणि आज शिर्केंच्या दत्त मंदिरातील गुरुदेवांच्या समाधीवरील दत्त महाराजांची तसवीर, साऱ्या एकच होत्या. श्रीदत्तमहाराजांनी मला माझ्या अनेक जन्माचे फळ दिल्याचे समाधान मनात दाटून येत होते आणि देव भक्तांच्या बरोबर काय काय नाटक खेळत असतो, याचे आश्चर्यही वाटत होते.

मिरजेला परत आल्यावर माझ्या चंद्रमौळी घरात श्रीदत्त महाराजांच्या तसबीरीची पूजा करून स्थापना केली आणि त्या दिवसापासून दिव्य जीवनाच्या वाटचालीला खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला. जाधवांच्या आक्कांमुळे मी मोठ्या संकटातून सुटलो होतो. त्यांनीच मला श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचा ठेवा मिळवून दिला होता. म्हणून त्या माझ्या पहिल्या गुरू होय. तर अशोक जाधव जे माझ्या नोकरीत वरिष्ठ होते, त्यांनी मला श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या शिर्के मंदिरात नेऊन पोहोचवले. ते त्यांचे माझ्यावरचे अनंत उपकारच होते.

माझी मनोवृत्ती आता बदलत चालली होती. मध्यंतरीचा काळ भयास्पद, चिंतातूर आणि मोठ्या कटकटीचा गेला होता. आता माझे मन शांत शांत होत चालले होते. शांत मनात चिंतन सुरू झाले. याच चिंतनातून साधना आणि नामस्मरणही चालू झाले. एक ध्यानस्थ अभ्यास सुरू झाला. ध्यानाकडे पूर्ण लक्ष देऊ लागलो. दररोज भुई गल्लतील्या जाधवांच्या घरी मी आरतीला जाऊ लागलो. रात्रीची आरती झाल्यावर कधी कधी आक्कांच्या बरोबर बोलत बसत असे. एकदा सहज बोलता बोलता मी त्यांना म्हणालो, “आक्का, दत्त महाराजांच्या पवित्र जीवनातील काही प्रसंग मला सांगा.” त्यावर त्यांनी

विनयपूर्वक मला बसायला सांगितले आणि बोलायला सुरूवात केली. श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचा जन्म नांदणी येथे माघ वद्य पंचमी शके १७५७ रविवार दि. ७/२/१८३६ रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव आप्पाभट्ट जोशी. हे दर शनिवार व पौर्णिमेला नृसिंहवाडीस जात. त्यांच्या पत्नीचे नाव अन्नपूर्णादेवी होते. त्यांच्या भक्तीला प्रसन्न होऊन नृसिंहवाडीच्या नृसिंह सरस्वती दत्त महाराजांनी त्यांच्या पोटी जन्म घेतला होता. त्यांचे पाळण्यातील नाव श्रीकृष्ण ठेवण्यात आले. बालवयात ते बोलत नसत. मौजी बंधनानंतर ते त्यांचे कुलदैवत मंगसुळीचा खंडोबाला गेले. मंगसुळीला ते जयसिंगपूर-मिरज-बेडग मार्गे गेले. बेडगला ते सरकारी विहीरीवर स्नानासाठी उतरले. विहीरीवर ठेवलेली त्यांची शिदोरी कुत्र्याने पळवली. त्यावेळी तेथे पाणी भरण्यास आलेल्या महिलेचा पदर पकडून, माझी शिदोरी कोण नेली, अशा बालभावाने त्यांनी प्रश्न विचारला.

खंडेरायाचे साक्षात दर्शन व्हावे म्हणून त्यांनी लिंबाच्या झाडाखाली ठाण मांडले. प्रथमतः देव खंडेरायांनी त्यांना ब्राह्मण स्वरूपात दर्शन दिले. परंतु बालयोग्याच्या हट्टासाठी नंदीवर बसून पार्वतीसह दर्शन श्रीशंकराने दिले. तसेच अक्कलकोटला जाण्याचे सांगून तू माझाच अंश अवतार असे सांगितले. अक्कलकोटचे स्वामी समर्थ (नृसिंहभान) हे तुझे गुरू आहेत. तेव्हा तू अक्कलकोटला त्वरित जा, असे सांगून भगवान शंकर अंतर्धान पावले. भगवान शंकराच्या दर्शनाने हे नांदणीचे बालयोगी दिव्यानंदात बुडून गेले. प्रकाशाची वलये त्यांच्या भोवती फिरू लागली. अध्यात्म मार्गातील बालयोग्याने अक्कलकोट स्वामी महाराजांच्या दर्शनाला जाणार असे आई-वडिल यांना सांगितले. त्यांचे वडील आप्पाभट्ट जोशी दररोजची नित्यकर्मे, वेदोक्त, पूजापाठ, दानधर्म, अतिथी सत्कार, शास्त्राध्ययन, यथासांग करीत. त्यांना समजून चुकले होते, आपला मुलगा हा नृसिंह सरस्वतींचा अवतार आहे.

एकदा आप्पाभट जांभळीला आबाजीपंत कुलकर्णी यांच्या घरी धार्मिक विधीसाठी गेले असताना श्रीकृष्णही त्यांच्या बरोबर होता. आबाजी पंतांच्या दूरच्या आजीला श्रीक्षेत्र पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनाला जाण्याची इच्छा निर्माण झाली. पण वयोमानामुळे ते शक्य नव्हते. परंतु श्रीकृष्णाने आपल्या हाताची मूठ पुढे करून हा घ्या प्रसाद, असे सांगितले. पण श्रीकृष्णाचा हा प्रथमतः

वेडाचार वाटला, पण खरोखरीच मूठ उघडताच मुठीतून एक बुक्क्याची पुडी तर दुसरीत लाह्या फुटाणे निघाले. तेव्हा पासून आप्पाभट जोशी त्यांना परमेश्वरी साक्षात्कार घडवून आणणारे मूल असे म्हणू लागले.

एवढ्याशा १०-११ वर्षाच्या मुलाला एकट्याला अक्कलकोटला इतक्या दूरवर पाठवायला आई-वडिलांचे मन तयार नव्हते. पण आप्पाभट जोशी यांनी जाणले होते की जगावर उपकार करण्यासाठी या जगावर बालयोगी कृष्णाने जन्म घेतला आहे त्याची पूर्तता करण्यासाठी त्या उभयतांनी श्रीकृष्ण देवांना अक्कलकोटला गुरू दर्शनाला जाण्याची अनुमती दिली. हीसुद्धा मानव जातीच्या दृष्टीने भाग्यशाली घटना घडली.

श्रीकृष्णदेव मजल दरमजल अक्कलकोटला पोहोचले. अक्कलकोटला श्रीस्वामी समर्थ सुहृदपणे, व्याकूळतापूर्वक आपल्या शिष्याची वाट पाहात होते. श्रीकृष्ण देवाने त्यांची स्तुती करताच, दर्शन घेताच म्हणाले, "कृष्णा, तू माझा अंश आहेस. तुझे माझे कार्य एकच आहे." असे म्हणून ते त्यांना दूरच्या जंगलात घेऊन गेले. पूर्वजन्मीचा कधीही न तुटणारा गुरू शिष्यामधील चिरंतन संबंध जोडला गेला. श्रीकृष्णदेव ब्रह्मसमाधीत डुंबून गेले.

उच्च स्वरूपाचा आध्यात्मिक बदल यांच्यात प्रवाहित होऊ लागला. त्यांच्या भोवती तेजोवलये फिरू लागली. काही दिवसांनी श्रीस्वामी समर्थ, श्रीकृष्ण देवांना घेवून मठात आले. आपला परमप्रिय शिष्य श्रीकृष्ण देव यांना मिष्ठान्न भोजन दिले. आशीर्वाद दिला. आपल्या या प्रिय शिष्याला आपल्याजवळ फार काळ ठेवले नाही. या जगात लोककार्य करण्यासाठी त्यांना मोकळे केले. त्यांना श्रीक्षेत्र करवीरभूमी नेमून दिली.

त्यावेळी श्रीक्षेत्र करवीरी पुण्यश्लोक ताराबाई शिर्के या कुंभार गल्लीत वास करून होत्या. दर पौर्णिमेला त्या कोल्हापूर ते नृसिंहवाडी पायी वारी करून श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराजांचे दर्शन घेत. मुक्काम करून परत येत. पुढे पुढे पोटशूळ व वयामुळे नृसिंहवाडीची पायी यात्रा कशी घडणार, याची चिंता लागून राहिली. त्यांनी ही चिंता स्वामींच्या समोर दुःखद मनाने सादर केली. त्या रात्री "श्रीक्षेत्र नृसिंहवाडीस येऊ नकोस, मीच तुझ्या घरी-दारी येईन." असा आदेश झाला. ताराबाई जाग्या झाल्या. स्वप्न

आठवू लागल्या आणि त्या परमभाग्याची प्रतीक्षा करू लागल्या. चैतन्यसागरात डुंबून गेल्या.

श्रीदत्तात्रेयांचा नृसिंह सरस्वती स्वामींचा शांत आशीर्वाद आपल्याला प्राप्त झाला आहे, असे त्यांना वाटू लागले आणि लवकरच तो दिवस उगवला.

दिव्य स्वरूप, मध्यम शरीरयष्टी, गौर वर्ण, तेजस्वी कमळाप्रमाणे विशाल डोळे, एक दिव्य शांत सुगंध, प्रकाशाची फिरणारी वलये अशा स्थितीत श्रीकृष्णदेव पुण्यश्लोक ताराबाई शिर्केंच्या घरासमोर एके दिवशी भिक्षेला उभे राहिले. पुण्यश्लोक ताराबाई शिर्के भिक्षा घेऊन आल्या. परंतु त्यावेळच्या आचारधर्म, परंपरागत चालत आलेला पंथवाद, धर्मकांड, समाजात असलेले जातीयवादाचे बंड यामुळे त्यांनी असा विचार केला की, भिक्षेला दारात उभं राहिलेलं मूल बटू ब्राह्मण आहे. त्यांना शिजवलेले अन्न न देता शिधा (कोरडी भिक्षा) द्यावी, या हेतूने त्या भिक्षा आणण्यासाठी परत घरात गेल्या. एवढ्यात श्रीकृष्ण देवांनी असा विचार केला की, सर्वव्यापी प्रभू दत्तात्रेयांनी दृष्टांत देऊनसुद्धा आपणांस ताराईने ओळखले नाही. भ्रमामुळे ध्यानात आले नाही. म्हणून भिक्षा न घेताच ते श्रीमंत केदारराव शिंदे म्हैसाळकर यांच्या बरोबर ते म्हैसाळला आले. श्रीमंत केदारराव शिंदे यांच्या वाड्यात ते चार दिवस राहिले. श्रीमंत केदारराव शिंदे हे राजश्री शाहू महाराज यांचे मावस काका-हेच ते म्हैसाळचे थोरले सरकार. खूप मोठे वैभवशाली पुण्यशील, दयाशील, धार्मिक वृत्तीचे होते. ते राजश्री शाहू महाराजांच्या दरबारात सरदार होते.

इकडे ताराबाई कोरडी भिक्षा घेऊन बाहेर येतात, तो भिक्षेला आलेली बटू मूर्ती निघून गेलेली. त्यांना खूपच वाईट वाटले. ईश्वरी साक्षात्कार होऊनसुद्धा ईश्वर निघून गेला, दिव्यस्वरूप असलेला बटू निघून गेला. हृदयावर एक दु:खद छाया भरून राहिली. शरीरातील प्राण राहतो की, जातो असे वाटू लागले. वारंवार नृसिंहवाडीला श्रीदत्तात्रेयांनी दिलेल्या स्वप्नाचे स्मरण होऊ लागले. मी एक साधारण मनुष्यजीव, पण हे दत्ता आपण मला का विसरलात? असे म्हणत त्यांनी अन्न, पाणी वर्ज्य केले. पाचव्या दिवशी पुन्हा दृष्टांत दिला. "मी आलो होतो, परंतु तू मनात किंतू आणून ओळखले नाहीस. मी म्हैसाळला आहे. न्यायला ये." असे स्वप्नात सांगितले. पाचव्या दिवशी ताराबाई शिर्के

बग्गी घेऊन म्हैसाळला गेल्या.

श्रीमंत केदारराव शिंदे, म्हैसाळकर यांच्या राजवाड्यात गेल्या. श्रीकृष्ण देवांचे त्यांनी दिव्य दर्शन घेतले व आपल्या पूर्व पुण्याईने त्यांना आपल्या घरी आणले. "ताराबाईचे घर माझे घर आहे. तेथे येत चला." असे श्रीकृष्ण देव म्हैसाळकरांना म्हणाले.

करवीर व आसपासच्या भागातून जीवनमुक्त अशा श्रीकृष्ण देवांच्या दिव्य लीलांसाठी, कृपेसाठी भक्त वर्ग जमू लागला. ताराईच्या घरी श्रीकृष्ण देव लहान मुलासारखे अवतार समाप्तीपर्यंत म्हणजे १९०० पर्यंत वास्तव्य करून राहिले.

जाधवांच्या आक्कांच्या तोंडून श्रीकृष्ण देवांची अवतार लीला ऐकताना वेळ कधी संपला, हे कळत नसे. जाधवांच्या आक्का एक मराठमोळ्या विधवा स्त्री, परंतु त्यांची गुरुनिष्ठा, श्रद्धा एका उंचीवर पोहोचलेली. त्यांच्या वागण्यात, आवाजात एक मार्दवपणा होता. खानदानीपणा होता. श्रीकृष्ण देवांचे कधी कधी स्वप्नात आक्कांना दृष्टांत होत असत हे त्यांच्या बोलण्यातून कळत असे. कृष्णा लाड, वासुदेव दळवी हे श्रीकृष्ण देवांचे शिष्य होते. कृष्णा लाड हे बाबु जमालचे भक्त होते. दररोज ते बाबू जमाल पीराचे दर्शन घेऊन कामकाजाला बाहेर पडत. एकदा ते बाबू जमालच्या दर्शनास गेले असताना त्यांना तुरबतीतून आवाज आला. "तू कृष्णाकडे जात जा. आता इकडे येऊ नकोस, ते आणि मी एकच आहे." कृष्णा लाडला तो भास वाटला. बाबू जमालचे दर्शन घेणे चालूच ठेवले. काही दिवसांनी त्यांना ताप आला. पुन्हा बाबू जमालने त्यांना दृष्टांत दिला. मग ते घाबरून श्रीकृष्णाच्या दर्शनाला ताराबाई शिर्केच्या घरी गेले. "बाबू जमाल माझा मैतर, तो मी एकच." अशी खूण कृष्णा लाडला दिली. कृष्णा लाडांची श्रद्धा श्रीकृष्ण देवावर बसली ती बसलीच. त्यांच्या मनातील, द्वैतभाव निघून गेला. ते कृष्ण देवांचे अंतरंगातील शिष्य बनले.

एकदा ते दोनप्रहरी पूजेची भांडी घासत असताना अचानक पाऊस सुरू झाला. वळीव पाऊस, मेघ गर्जना चालूच होत्या. वीजा चमकू लागल्या, तरीही कृष्णा लाड पुजेची भांडी घासतच राहिले. एवढ्यात त्यांच्या समोर विजेचा लोळ येऊन मोठा आवाज झाला. ते घाबरून महाराजांच्या विश्रांतीच्या

ठिकाणी आले. तर वीज महाराजांना प्रदक्षिणा घालून निघून गेली होती. ते गावातून भिक्षा मागून आणत आणि महाराज त्यांनी आणलेली भिक्षा स्वत: आवडीने खात श्रीकृष्ण देवांनी त्यांची कठोर परीक्षा अनेक प्रकाराने घेतली होती. कृष्णा लाड या परीक्षांमधून यशस्वी झाले होते. सर्वसंग परित्याग करून ते श्रीकृष्ण देवांजवळ राहिले. ही कथा मला जाधवांच्या आक्कांनीच सांगितली होती.

श्रीकृष्ण देवाचे दुसरे एक अंतरंगातील शिष्य वासुदेव दळवी. ते ताराबाई शिर्केंच्या घराजवळ राहात. ब्राह्मण धर्म, राजदरबाराची नोकरी, परंतु स्वभाव शीघ्रकोपी, संसारात कुटुंबाशी सातत्याने कलह आणि कलह झाला की, श्रीकृष्ण देवांच्या दर्शनाला चरणाजवळ कुटुंबाविषयी, संसाराविषयी तक्रारी सादर करीत. श्रीकृष्ण देव त्यांना " आम्हाला शेंडी दे," असं म्हणत. परंतु श्रीकृष्ण देवांच्या बोलण्याचा अर्थ लक्षात आला. न्हाव्याला बोलावून त्यांनी शेंडी काढून टाकली आणि श्रीकृष्ण देवांच्याकडून संन्यास ग्रहण केला.

श्रीकृष्ण देवांच्या आज्ञेनुसार पहिली तीन वर्षे लिंबाचा पाला खाऊन साधना केली. तर पुढील तीन वर्षे मूठभर हरभऱ्याची डाळ खाऊन तप केले. पुढे कृष्णा लाडाबरोबर भिक्षेला जाऊ लागले. अनेक प्रकारची त्यांची सत्वपरीक्षा श्रीकृष्ण देवांनी घेतली. त्यात ते उत्तीर्ण झाले, ही कथाही मला जाधवांच्या आक्कांनीच सांगितली.

दिवसेंदिवस माझी श्रीकृष्ण देवांच्यावरील भक्ती, श्रद्धा वाढतच चालली होती. त्यांनीच मला पुर्नजन्म, जगण्याची नवी दिशा दिली होती. आता दररोज रात्री मी आक्कांच्या घरी आरतीला जाऊ लागलो. सामान्यांना कल्पना नव्हती की, मिरजेच्या एका दूरच्या अरूंद गल्लीत साध्या घरात श्रीकृष्ण देवांचे कार्य चालू होते. पीडीत, आर्त अशा प्रापंचिक लोकांचे थवेच्या थवे येथे जमा होऊ लागले. मीही त्यातील एक होतो. पण निवांत होतो. शांत होतो. कारण नवी पहाट उगवणार होती.

गणेश चतुर्थीला मी कोल्हापूरला शिर्केंच्या घरी श्रीकृष्ण देवांच्या समाधीचे दर्शन करून आणलेल्या तसबिरीची सकाळी पूजापाठ करून मगच नोकरीवर जात असे. हळूहळू सायंकाळी आरती चालू केली. कालांतराने माझे

मित्र शिवाजी जाधव, जामदार, मंगल शिंदे, सावंता म्हेत्रे, विलास घोरपडे, रमेश घोरपडे, चंद्रकांत कुरणे, दत्तात्रय पवार, डॉ. सुरेश कांबळे, डॉ. म्हेत्रे, आनंदराव मंडले, तर स्व. शिवलिंग आण्णा घेवारे, स्व. शंकरराव कांबळे, स्व. मारूतराव कुरणे अशी मंडळी एकत्रित जमू लागली. नोकरी व आपापले कामकाज सांभाळून हा उपक्रम सुरू ठेवला. तर स्व. प्रभाकर गोखले, श्री. राम महाजन, श्री.बाळासाहेब कुरणे, श्रीकृष्ण गोखले, श्री. भुयेकर पाटील, डॉ. शिरढोणे, श्री.सुभाष शिंदे, श्री. मधुकर शिंदे, शिवाप्पा आण्णा येवारे, स्व. दाजी पाटील, श्री. सतिश शहा, श्री. बाबासाहेब शेख, स्व. जनार्दन तंबाखूवाले, श्री. मदन बोंगाळे, मदनसिंह रजपूत, पांडुरंग भंडारे, विठ्ठल विजापुरे असे भक्त मंडळ वृद्धिंगत होऊ लागले आणि दिव्यधामाच्या, दिव्यज्ञानाच्या पाऊलवाटा सुरू झाल्या. आता मी काही मित्रांना कोल्हापूरला श्रीकृष्ण देवाच्या दर्शनाला घेऊन जाऊ लागलो. समाधी दर्शनानंतर घटका घटका समाधी समोर बसू लागलो. हळूहळू सुहृदय स्व. बाळासाहेब शिर्के, स्व. माईसाहेब शिर्के, शिर्के वहिनी यांचा परिचय होत गेला. जीवनच बदलत चालले आणि सर्वभाव श्रीकृष्ण देवांना अर्पण केला.

स्व. बाळासाहेब शिर्के हे एक आदरणीय असे व्यक्तिमत्व होते. त्यांचा सुंदर चेहरा आखीव रेखीव होता. खानदानीपणाचे तेज होते. त्यांच्या डोक्यावर भरपूर केस होते. डोळे प्रेमळ आणि हसणे निर्मळ खुले असे होते. त्यांचा आवाज गोड, मुग्ध करणारा असा होता. ते उत्तम भजन करीत. त्यांच्या भजनाचा कार्यक्रम रेडिओवरही होत असे. शरीरयष्टी मध्यम तर उंची अनुरूप होती. ते गायक, संगीतकार, विनयशील, निगर्वी व प्रापंचिक होते. त्यावेळी ते श्रीकृष्ण देवांच्या चरित्राचे लेखन करीत होते. बोलण्यातही सदैव तोच विषय असायचा.

बारा वर्षाची रखमाई पुरेकराचा तीन वर्षांच्या कडेवरील आप्ताच्या मुलांशी लावून दिलेला विवाह, बाळकू राशिवडेकरचा पुनर्जन्म असे अनेक श्रीकृष्ण देवांचे चमत्कार त्यांच्याकडून मला ऐकायला मिळाले. त्यांच्या लेखनात साधेपणा होता. सोपेपणा होता. त्यांच्या आंतरिक आणि नाजूक शब्दांनी श्रीकृष्ण देवांचे चरित्र लिहीले जात होते. स्व. बाळासाहेब हे स्व. माईसाहेब शिर्के यांचे एकुलते एक सुपुत्र होते.

ज्या ज्या वेळी मी शिर्केंच्या मंदिरात जात असे, त्याकाळी औदुंबराच्या आतील बाजूस प्रभावळीजवळ एकदोन व्यक्ती बसतील असा एक छोटा बाक व चारपाच व्यक्ती बसू शकतील असा एक मोठा बाक ठेवलेला होता. श्रीकृष्ण देवाच्या समाधीचे दर्शन झाले की लोक पूज्यमाईसाहेबांचे दर्शन घेत. त्या छोट्या बाकड्यावर बसलेल्या असत. ज्यावेळी मी पहिल्यांदा दर्शनाला गेलो त्यावेळी त्यांचे वय झालेले होते. अंदाजे ७५ च्या पुढे त्यांचे वय असावे. चेहऱ्यावर वार्धक्याची छटा दिसत होती. पण त्यांचे दात मजबूत होते आणि उत्साह अभूतपूर्व होता.

त्यांची शरीरयष्टी मध्यम, गौर वर्ण, डोळे विशाल पण तेजस्वी,शांत पण प्रेमळ चेहरा, पांढरी शुभ्र स्वच्छ साडी, गोड बोलणे हा त्यांचा स्थायीभाव होता. त्यांच्या बोलण्यातूनही श्रीकृष्ण देवाच्या अनेक लीला ऐकायला मिळत. रोज श्रीकृष्ण देव पंचगंगे किनारी आपल्या शिष्यासह फिरायला जात. एकदा फिरायला गेल्यावर अचानक शुक्रवार पेठेतील जैनमठा शेजारील दौलत मानेच्या घरी गेले. दौलत मानेची घरची गरीबी, पण या गरीबानेही श्रीकृष्ण देवांचं स्वागत केले. दर्शन घेतलं, आपल्या परशुरामाला त्यांच्या पायावर घातलं. श्रीकृष्ण देवानं परशुरामाला न्याहाळलं आणि म्हणाले, "हा आमचा आहे, घर आमचे आहे." पुढे परशुराम मोठा पहिलवान झाला. राजश्री शाहू महाराजांच्या दरबारात सेवा करू लागला. दोन कन्या, दोन पुत्र झाले. त्यातील ज्येष्ठ कन्या हिरा. ही हिरा उपवर होताच ताराईचा नातू स्व. रामनाथ शिर्केशी तिचा विवाह होऊन त्या शिर्के घराण्यात सितामाई म्हणून वावरल्या. अशा रितीने श्रीकृष्ण देवांचे शब्द पुढे सत्य झाले. त्यांचे यजमान रामनाथ शिर्के शांत व साक्षात्कारी सत्पुरुष होते. श्रीकृष्ण देवांच्या रूपाने त्यांना दैवी संपत्तीचा ठेवा, आंतरिक संपत्तीचा खजिना मिळाला होता, अशी त्यांची गाढ श्रद्धा होती. रामनाथांनी त्यांच्या आयुष्याच्या आरंभी अनेक सुंदर पेंटींग्ज केली होती. ते एक नामांकित चित्रकार, कलावंत होते. सीतामाई रामनाथांच्या बरोबर संसार करीत असतांना त्या शिर्के घराण्याचे पावित्र्य जपत होत्या. संसारलीलेच्या जीवनपटाच्या भूमिका बजावत त्यांच्या संसारवेलीवर चार फुले उमलली. थोरल्या आक्का- ताराई, दुसऱ्या मालूताई, तिसऱ्या लीलाताई आणि नंतर बाळासाहेबांचा जन्म झाला.

लवकरच रामनाथांचे हृदय विकाराने निधन झाले. घरावर एक मोठे संकट कोसळले. सीतामाईंना खूप वाईट वाटले की, आता सारं संपलं. रामनाथांच्या जाण्यानं वियोगामुळे झालेल्या मानसिक यातना अजून कमी झाल्या नव्हत्या. पितृतुल्य राऊतमामा व माहेरच्यांची व्यापक सहानुभूती, प्रेम आणि आधार यामुळे सीतामाई लवकरच सावरल्या. सर्वांशी बंधुत्वाचे नाते जोडत श्रीकृष्ण देवाची पूजा अर्चा त्या करू लागल्या. जीवात्मा व परमात्मा साधण्याचा त्या प्रयत्न करू लागल्या. हळूहळू दिवस मागे पडू लागले. श्रीकृष्ण देवांना आपली सर्व भक्ती अर्पण केलेल्या ताराई (आक्का) यांचा शंकरराव भोसलेंशी विवाह झाला. तर मालूताईचा विवाह मुरलीधर कदमाशी तर लीलाताईचा विवाह मधुकर नाईकांशी झाला. तर बाळासाहेबांचा विवाह साताऱ्याच्या विजयादेवी घोरपडे यांच्याशी झाला. रामनाथ आणि सीताई शिर्केच्या पिढीत अति उत्तम माणसे जन्मास अली. मंदिराची सुव्यवस्था स्थित केली. समान बंधुत्व ठेवलं आणि व्यापक सहानुभूती जपली. आता बाळासाहेबांच्या वंशवेलीला बबनराव, शिवाजीराव, महेशराव ही गोड मुले जन्मली होती. सीतामाईंनी संसारी स्त्री भूमिका बजावताना प्रकाशाची प्रतिमा शिर्केच्या घराण्यात पसरली. निरनिराळ्या काळाकरिता-कामाकरिता साजेशी-शोभेशी अशी माणसं जोडली होती. मनुष्य कर्तव्ये, त्यांच्या भूमिका विधात्यानं निर्माण केलेले होते. एक आधार आणि अक्षय आनंदाची ती पेरणी होती.

दर रविवारी सुटी दिवशी मी कोल्हापूरला समाधी मंदिरात दर्शनाला जाऊ लागलो. दररोज चंद्रमोळी मातीच्या घरातील श्रीकृष्ण देवाची सकाळची आरती करून नोकरीवर जाणे.

सायंकाळी श्री. आण्णाप्पा सुतार बरोबर हिराबाग, वड्डी रस्त्याला फिरायला जाणे, फिरून आल्यावर श्रीकृष्ण देवाची आरती-जप-वाचन सुरू झाले. आता हळूहळू गर्दी वाढू लागली. आरतीला बरेच लोक येऊ लागले. श्रीकृष्ण देवाची ते श्रद्धेने पूजा-भक्ती करू लागले. यातूनच श्रीकृष्ण देवाचे छोटेसे मंदिर बांधण्याचे ठरू लागले. तसेच जाधवांच्या आक्कांच्या घरी श्रीकृष्ण देवाची जयंती (माघ वद्य पंचमी) तर पुण्यतिथी (श्रावण वद्य दशमी) हे घरगुती उत्सव होत.

आता या उत्सवांना मी सार्वजनिक स्वरूप दिले. उत्सव मोठ्या प्रमाणात होऊ लागला. भजन, किर्तन, प्रवचन, महाप्रसाद असे उत्सवाचे स्वरूप बनले. सर्वांनाच आनंद होऊ लागला. उत्साह वाढू लागला. नियतीने म्हणा किंवा श्रीकृष्ण देवांनी म्हणा मला ज्ञानाचा लाभ व ईश्वरी साक्षात्कारासाठी माझा हात एका मानवी गुरुदेवांच्याकडे सोपविण्याचे ठरवले होते. श्रीकृष्ण देवांनी या सामान्य जीव असलेल्या भक्तासाठी कसे कसे गुंतागुंतीचे नाटक-खेळ रचले हे माझ्याही लवकर लक्षात आले नाही.

आता अंधकारमय जीवन संपवून एका नव्या उदयाची, नव्या दिवसाची प्रतीक्षा करावी लागणार होती. भूत, भविष्य आणि वर्तमान या कालचक्रांचे देखावे पाहायला मिळणार असे वाटत होते. त्या पवित्र चरणांशी जवळ नेणारा दिवस फार दूर नाही असं वाटत होतं. प्रथम नोकरी-पैसा आणि नंतर परमेश्वर हे माझं काल्पनिक तत्त्वज्ञान बदलण्यास येऊ लागलेला दिवस, एक संत महात्म्याची होऊ घातलेली भेट ही श्रीकृष्ण देवाची अगाध अमर्याद अशी लीला होती.

आकाश मळभाने भरून आलं होतं. गार वारा मंद मंद वाहू लागला होता. मार्केटमधील गर्दी हळूहळू मंदावत होती. महिना जुलै १९७४ चा असावा. देवल टॉकीजला लागून असलेल्या अशोक मेडिकल स्टोअर्स मधील गर्दीही कमी होऊ लागली होती. मी ज्या वेळी दुकानात पोहोचलो त्यावेळी रात्रीचे नऊ वाजले होते. मला पाहताच श्री. सतीशभाई शहांनी मला दुकानाच्या आत बोलावले. आतील बाजूस एक छोटेसे टेबल व बाकडे होते. त्या बाकड्यावर मला बसायला सांगितले. गिऱ्हाइकाचे देणे-घेणे चालूच होते. मला ते म्हणाले, "आज आलात बरे वाटले. मी आपल्याला बोलावणारच होतो. आपण जरा येऊन जा असा निरोप देणार होतो." मी म्हणालो, "का बरे? काही महत्त्वाचे काम आहे का?" यावर ते म्हणाले, "तसे काही महत्त्वाचे काम नाही. परंतु निपाणीहून एक गुरुजी आले आहेत. त्यांची आध्यात्मिक क्षेत्रातील कीर्ती खूप मोठी आहे. ते माणसाचा चेहरा पाहून तंतोतंत भविष्य सांगतात. मला मिलिंद गोसावीचा निरोप आला होता. तेव्हा आपण दुकान बंद केल्यावर त्यांना भेटायला जाऊया."

यावर मी ‘‘ठीक आहे ’’ म्हणून दुकानात बसून राहिलो. आता रस्ते मोकळे होत होते. आकाशातून पावसाचे थेंब टपकायला सुरूवात झाली होती. हवेत थोडासा गारवा आणि मनात अनेक विचारांचे तरंग अशी माझी अवस्था झाली होती. आपण त्या गुरूजींना भेटणे आवश्यक आहे का? आपणांस त्यांना आपल्या भविष्याबद्दल काहीही विचारावयाचे नाही. पण श्री. सतिशभाई शहा यांच्याबरोबर जाणे मी पसंत केले. श्री. शहा हे हरहुन्नरी, चौकस वृत्तीचे व्यक्तित्व, क्रिकेटवेडापासून भविष्यासारख्या विषयापर्यंतचा त्यांचा छंद, एखादी गोष्ट पटली की, त्याबद्दलची शहानिशा, पूर्ण माहिती असा त्यांचा स्वभाव. परिणामी आज त्यांनी निपाणीहून आलेल्या गुरुजींची माहिती स्वाभाविकपणे दिली होती.

दुकान बंद झाल्यावर मी व श्री. सतीशभाई शहा सायकलने हिरा हॉटेलकडे निघालो. कारण गुरुजी तेथे उतरले होते. रात्री दहा वाजत आले होते. हिरा हॉटेल नुकतेच चालू झाले होते आणि त्याकाळी मिरजेतील एक उत्तम प्रवासी लॉज ठरले होते. खोलीवर पोहोचलो, दरवाजा टक, टक करताच दरवाजा उघडला गेला आणि त्या व्यक्तीनं आम्हांला, “ यावे, यावे. मी आत्ताच आलो आहे. या बसा,” असे स्वागत केले. बहुधा तेच सतीशभाईंचे गुरुजी असावेत. असा अंदाज मी केला. सर्वसाधारणपणे पाच ते साडेपाच फुटाची उंची, निमगोरा वर्ण, डोक्यावरचे आखूड केस, डोळ्यांत मात्र एक प्रकारचे तेज, त्यांच्या सासुबाई मिशन हॉस्पिटलला दाखवण्याकरिता आल्या होत्या, म्हणून ते हिरा हॉटेलवर थांबले होते.

त्यांच्या व सतिशभाईंच्या गप्पा रंगत चालल्या होत्या. मधूनच त्यांनी माझी चौकशी केली. सतिशभाईंनी ओळख करून देताना श्री. झेंडे हे आमच्याच कुटुंबियांपैकी, जवळचे मित्र आहेत. असा परिचय करून दिला. त्यांनी मानेनेच संमती होकार दिला. थोड्या वेळानंतर आम्हांला निरोप दिला. पहिल्या मजल्यावरून हॉटेलच्या प्रवेशद्वारापर्यंत आम्हास सोडायला ते आले होते. सतिशभाईंना पुन्हा भेटावयास या व येताना आवर्जून यांना घेऊन या असे सांगितले. हॉटेलमधून आम्ही बाहेर पडलो तेव्हा रात्रीचे ११ वाजले होते. रस्त्यावर वर्दळ काहीच नव्हती. गार वारा-पावसाचे थेंब अंगाला स्पर्श करून

जात होते. माझ्या मनात मात्र या गुरुजींच्याबद्दल अनेक विचारांचे आवर्तन सुरू होते.

यानंतर बरचे दिवस गेले. सतिशभाईंच्या बोलण्यातून त्यांच्याविषयी काही गोष्टी समजत. नुकताच चैत्र महिना लागला होता. उन्हाचा तडाखा सुरू झाला होता. आंब्यांना मोहोर सुटला होता. सायंकाळी कोकीळांचा मधुर आवाज कानावर पडत होता. अशाच एका सायंकाळी सतिशभाईंचा निरोप आला की, त्यांच्या वडिलांच्याबरोबर (बप्पा) मी निपाणीच्या गुरूजींच्याकडे जाणे आवश्यक आहे.

स्वर्गीय रतनचंद खेमचंद शहा (आरगकर) हे मिरजेतील प्रतिष्ठित आसामी होती. त्यांचे वैद्यकीय क्षेत्रात नाव व मोठी प्रतिष्ठा होती. मिरजेच्या पूर्वभागाला दुष्काळी भाग म्हणतात. त्या भागातील आरग हे कर्नाटक-महाराष्ट्र सीमेवरील व्यापारी खेडेगाव आहे. त्या गावचे शहा मूळचे. स्व.रत्नूभाईंची सर्व कामे ही सुमुहूर्तावर होत असत. त्यांचा ज्योतिषशास्त्रावर पूर्ण विश्वास होता. स्वर्गीय मंगसुळीकर शास्त्री यांचे मार्गदर्शन ते सदैव घेत. त्यांचा सल्ला घेत. निपाणीचे गुरूजीही ज्योतिषतज्ञ असल्याने त्यांचेकडे जाणेचे ठरले असावे म्हणून मला सतिशभाईंचा निरोप आला असावा असे वाटले.

एके रविवारी सकाळी १० वाजता स्व. रत्नूभाई व त्यांची मंडळी मी त्यांच्या नवीन घेतलेल्या गुलाबी रंगाच्या फियाटमधून निपाणीला जाणेस निघालो. बघता बघता दीड तासात इचलकरंजीला पोहोचलो. शहराच्या मध्यभागात एक उपहारगृह दिसले. मला कडाडून भूक लागली होती. दुपारी आम्ही त्या गुरुजींच्या घरी कधी पोहोचणार हेही माहीत नाही. पुन: त्यांचा परिचय फारसा नाही. त्या उपहारगृहात भजी, पाव, पुरी भाजी असा नाष्टा घेतला. सोबतीला स्वर्गीय पांडोबा मोरे ड्रायव्हर होतेच. स्वर्गीय रत्नूभाई यांनी गाडीतच बसणे पसंत केले.

इचलकरंजी-शिवनाकवाडी-शिरदवाड, चाँद शिरदवाड-बेडकिहाळ-गळतगा अशा कर्नाटकातील गावातून आमचा प्रवास सुरू झाला. बोरगावचा पुढचा रस्ता खराब होताच. रस्त्यावरील मोठ्या खड्ड्यांमुळे गाडी सावकाश जात होती. सभोवार काळीभोर जमीन. सर्वत्र तंबाखूचे पीक असावे. कारण तंबाखू कापणीनंतरचे सडे शेतकरी कुदळीने काढताना दिसत होते. कोणी ती नेत

होता तर कोणी तेथेच ठेवत होता. अधून मधून आंब्याची झाडे दिसत होती. काहींना मोहोर तर काहीना बारीक आंबे लगडलेले दिसले. मात्र सारीकडे नीरव शांतता होती. एखादे दुसरे वाहन जा-ये करीत होते. रस्त्याच्या प्रवासात लहानश्या वस्त्या, वाडी, झोपड्या, बहुतेक घरे कुडाची, कुडाच्या भिंतीवर चुन्याचे ठिपके-बोटे, दारी तुळस, गावाबाहेर नळावर घागरीच्या रांगा, विहीरीवर आंघोळीसाठी उड्या मारणारी मुलं, गाडीकडे पाहून केलेला टाटा-बायबाय. गाडी कधी उंच टेकडीवरून तर कधी ओढ्याच्या पात्रातून, कधी नागमोडी वळणावर धावत होती. साधारण तीनच्या सुमारास गाडी एक ओढा ओलांडून थांबली. त्या ओढ्याकाठी वडाची झाडे होती. अनेक पारंब्याच्या विस्तारीकरणामुळे मूळ वडाचे झाड कोणते हेच समजत नव्हते. प्रचंड गर्द अशी छाया गंभीरपणे आपलं रूप पसरून उभी होती. त्या छायेच्या परिसरातच हेमाडपंथी विशाल असे सुंदर मंदिर दिसत होते. अधून मधून ये-जा करणारे अनेक प्रवासी हातपाय धुवून दर्शनासाठी जाताना दिसत होते. आम्हीही त्या मंदिरात गेलो. बाहेरच एकाने त्या सुंदर मंदिराची माहिती दिली होती. ते मंदिर तुळजाभवानीचे असून, निपाणीचे राजे सिद्धोजीराव देसाई यांच्या भक्तीला प्रसन्न होवून त्या ठिकाणी तुळजाभवानी प्रकट झाल्या. येथे दसऱ्यात दहा दिवस मोठा उत्सव असतो. मंदिराचा आवार प्रशस्त आहे. बकुळाची-अशोकाची झाडी मंदिर आवारात आहेत. समोरच प्रशस्त सुंदर नगारखाना, दगडी ओवऱ्या आहेत. मंदिर खूप प्राचीन असून, पूर्ण दगडातून बांधलेले नक्षीकाम केलेले खांब, देवीची शाळीग्रामची सुंदर मूर्ती हे पाहून मनाला खूपच आनंद झाला. विनम्रपणे नमस्कार करून गुरवाने दिलेला प्रसाद घेऊन आम्ही मंदिरातून बाहेर पडलो.

पुढील प्रवास सुरू झाला. पुढे जाऊन गाडी थांबवून रत्नूभाईंनी गुरुजींच्या अक्कोळ या गावाविषयी माहिती विचारली. येथून जवळच ते गाव होते. अर्ध्या तासात पोहोचलो. गावाच्या शिवेवर पोहोचलो. एक रस्ता गावाच्या बाहेरून जात होता तर एक रस्ता गावातून. शिवेवर छोटेसे मंदिर होते. मंदिराच्या पार कट्ट्यावर सावलीला काही ग्रामस्थ विश्रांती घेत होते. काही मुले खेळत होती. त्यातील एकाला गुरुजींचा पत्ता विचारला. त्यांनी गावाकडे जाणाऱ्या रस्त्याने

चौकातून डावीकडे वळा असे सांगितले. खाचखळग्याच्या रस्त्याने गाडी पुढे जावू लागली. वाटेत मोठा ओढा लागला. रस्त्याच्या दुतर्फा हिरवीगार गवताची कुरणे, अधून मधून उंच उंच अशी नारळाची झाडी. ओढ्याच्या काठी जांभूळ, आंबा, पळस अशी झाडी. ओढा मध्यम स्वरूपाचा होता. ओढा ओलांडल्यावर बाजूला मातीची घरे, झोपड्या दिसत होत्या. पुढे जाऊन आम्ही बाजाराच्या चौकातून अरुंद गल्लीच्या रस्त्याने जाऊ लागलो. एक हनुमानाचे जुने दगडी मंदिर पार करून, श्रीपंत मंदिराजवळ आलो. तेथून आम्ही त्या अरूंद रस्त्याच्या शेवटच्या टोकाला आलो. तो रस्ता तेथे संपलेला होता. आमची गाडी एका जुन्या दगडी वाड्यासमोर उभी होती. बहुतेक तो वाडा सरकार वाडा असावा. तो दगडी विटांचा दुमजली वाडा होता. वाड्यासमोर पटांगण होते. तर बाहेरच्या बाजूला मोठा कट्टा होता. वाड्याची कमान दगडी होती. वाड्याच्या परिसरात सिताफळे इतर झुडुपांची व औदुंबराचा वृक्ष अभिमानाने उभा होता.

आता आम्ही मनाने सैरभैर झालो होतो. मनाची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. मनात अनामिक आनंदाच्या लाटा आवरत नव्हत्या. आम्ही त्या वाड्याच्या मधोमध असणाऱ्या दरवाज्यासमोर उभे होतो. तो वाडा थोर सत्पुरुषांच्या वास्तव्याने पावन झालेला होता.

थोड्याच वेळात दरवाजा उघडला गेला बहुधा त्या गुरुजींच्या आई असाव्यात. त्यांचे वय साधारण साठ एक वर्षाचे असावे. तरीसुद्धा त्यांचे वय सहज लक्षात येणाऱ्यासारखे नव्हते. त्यांचा वर्ण गोरा होता. काहीशा स्थूल वाटत होत्या. पण त्यांचा चेहरा पाहता एक प्रकारचा गौरव, अमर्याद पण गूढ अशा प्रकारची एक शांत प्रतिमा. सर्वाधिक शोभून दिसणारे सौभाग्याचे ठाशीव स्वरूपातले कुंकू. त्या एक रेशीमवजा नऊवारी साडीत होत्या. गळ्यात, हातात, मराठमोळ्या स्त्रीयांच्या सारखे दागिने, कानात सुवर्णफुले, एकूण आदर्शाची एक हिंदू पवित्र वाटणारी माता. त्यांना पाहता क्षणीच त्यांच्या चरणावर मस्तक ठेवून प्रणाम केला. त्या विनयपूर्वक आम्हांला म्हणाल्या, "या, या, आत या असे बाहेर का उभा राहिलात? तुम्हास येवून खूप उशीर झाला की काय? या उन्हामुळे अमळ विश्रांती घेत होते या, या."

गाडीतून रत्नूभाई-भाभी साऱ्यांना आता बोलाविले. आम्ही त्या

इमारतीच्या एका सोप्यात बसलो. तेथे भारतीय बैठक होती. एवढ्यात त्यांचा घरचा नोकर लक्ष्मण आला. वर्णाने काळा, सदृढ देहयष्टी, बोलणं अघळ पघळ, त्याने आम्हास हातपाय धुण्यास सुचवले. दिवसभराच्या उन्हातील प्रवासाने आम्हाला कंटाळा आला होता. हातपाय धूतल्यानंतर खूप बरे वाटले. थंडगार लिंबू सरबत दिले. लक्ष्मणाने जेवणाचा आग्रह केला. मी काही जेवलो नाही कारण भूक नव्हती आणि इचलकरंजीत पोटभर नाष्टा केला होता. सेठजी-भाभीजी यांनी जेवण घेतलं.

आतील बाजूस एक मोठी खोली होती. हॉलमध्ये डायनिंग टेबल आणि चार खुर्च्या होत्या. सारीकडेच खूप स्वच्छता दिसत होती. गरम भाकरी, भात-पिठलं, भाजी, पापड असा जेवणाचा बेत दिसून आला. हॉलच्या एका बाजूला दिवाण होता. त्या दिवाणावर एक वयस्कर आसामी झोपलेली होती.

एव्हाना दोन प्रहरचे दोन वाजून गेले होते. त्यांनी आग्रहाने वाढलेले जेवण, त्यांनी दाखवलेली आपुलकी, यावरून ते एक सुसंस्कृत हिंदू कुटूंब होते. हिंदू धर्माच्या रीतीरिवाजाप्रमाणे आतिथींना भोजन घालणे, अगत्य करणे हा धर्म येथे मला दिसून आला. वाड्यात एक प्रकारची निवांत शांतता नांदत होती. मागील बाजूला गोठा असावा कारण गायींच्या हंबरण्याचा आवाज अधून-मधून ऐकू येत होता.

चार वाजले होते. घरातील एक मोलकरीण एका बाजूला लहान मुलाला घेवून सोप्यात आली. तिचं नांव गंगू होतं. वय मध्यम, गौर वर्ण, बोलण्यात मराठी भाषेला कानडी स्वर. काही वेळेला मराठी मिश्र कानडी.

काखेतल्या मुलाचे नाव अनिकेत होते. ते गुरुजींचे शेवटचे अपत्य असावे. वय दोन एक वर्षाचं. इकडच्या तिकडच्या गप्पांच्या ओघात कळले की श्री.गुरुजी व त्यांच्या धर्मपत्नी सौ. गिरीजादेवी निपाणीला लग्नाला गेले होते. ते आता लवकरच परतणार आहेत असे समजले. तसेच शाळा सुटल्यानंतर गुरुजींची मुलं येणार म्हणून गंगू चहाच्या तयारीला लागल्याची दिसली. गुरुजींना चार अपत्ये कु. अपर्णा, कु. हेमांगिनी या मुली तर चि. गुरुनाथ, चि. अनिकेत ही दोन मुलं. हे छोटसं कुटुंब खेडेगावात राहत होते. हे सारं गंगूच्या बोलण्यातून समजले.

आता वाऱ्याची झड सुरू झाली होती. दिवस मावळत चालला होता. इतक्यात लक्ष्मणने चहा आणून दिला. काका तुम्हांला बोलावत आहेत, असा मला निरोप दिला. मी जाऊन त्यांना वाकून नमस्कार केला. ते एक धार्मिक गृहस्थ वाटले. मध्यम उंची, गौर वर्ण, पांढरे शुभ्र धोतर, पांढरा शुभ्र बनियन, गळ्यात चेन, तर उजव्या हाताच्या दोन्ही बोटात अंगठ्या. ते डोळे बंद करून शांतपणे विडी ओढत होते. मला पाहताच ते म्हणाले "या, या, किती वाजता आलात? रमेशला तुम्ही येणार हे माहीत आहे काय? नाहीतर तो एवढा वेळ करणार नाही. बसा बसा, नाव काय तुमचं?" मी म्हणालो, "बजरंग, गाव-मिरज." "आणखी कोण आलंय?" मी रत्नुभाईना, भाभीना बोलवायला सोप्यात गेलो. माझ्या पाठोपाठ काकाही बाहेर आले. काकाही त्यांना हात जोडून नमस्कार करीत म्हणाले, "या, शेठजी आत या. रमेश येईल लवकरच, उशीर झाला आहे. तुम्ही कोठे राहता? " शेठजींनी आपला परिचय करून दिला. मी रतनचंद खेमचंद शहा, मूळ आम्ही आरगचे परंतु आमचे मेडिकल दुकान मिरजेला आहे. त्यामुळे सर्व भावंडासह आम्ही मिरजेलाच राहतो. इतक्यात गुरुजी आल्याची बातमी लक्ष्मणने दिली आणि मधल्या घरातील जिन्याने आम्हाला वर जाण्याचे सुचविले. मधल्या घरात जिना होता. जिन्या वरून गेलो. वरच्या मजल्याचे दोन भाग दिसून येत होते. उजव्या बाजूला दवाखान्याची खोली तर डाव्या बाजूला एक बैठकीची खोली दिसून आली. तेथे काही थोर सत्पुरुषांच्या तसबिरी दिसून आल्या. आत लागून दिवाणखाना होता. तेथे एका खुर्चीवर टाकलेल्या मृगाजिनावर गुरूजी बसलेले दिसून आले. "या, या रत्नूभाई या, मला जरा यायला वेळ झाला हो, चहापाणी, जेवणखाण वगैरे झालं की नाही? आलात बरे झाले, सतिशभाईंचा मला निरोप आला होता." मला म्हणाले, "ये, ये बजरंग बैस इथे, बरं आहे ना तुझं?" रत्नूभाईंशी त्यांचे बोलणे संपल्यानंतर त्यांनी त्यांचा दवाखाना, ग्रंथालय, त्यातील तत्त्वज्ञान, साहित्य, चिकित्सा, अशा विविध विषयावरील जाडजूड ग्रंथ होते, ते दाखविले. त्यांचे बोलणे ऐकताना ते कोणीतरी पंडित, डॉक्टर-वैद्य, तत्त्वज्ञानी, समाजशास्त्रज्ञ, वैद्यक शास्त्रज्ञ आहेत असे वाटत होते. शाकुंतल ते ज्ञानेश्वरी या सर्वांची त्यांना माहिती तर होतीच, पण ते सारं तात्त्विक- सात्त्विक त्यांच्या

मुखातून अखंडपणे पाझरत होते. शेवटी त्यांचे बोलणे ऐकतच आम्ही जिना उतरत होतो. येताना प.पू. वडिलांना नमस्कार केला. ते वाड्याच्या दरवाज्यापर्यंत सोडावयास आले होते. पुन्हा या बरं. बरं-बरं असं म्हणत आम्ही गाडीत बसलो आणि त्यांचा निरोप घेतला. अंधार पसरत चालला होता. बाजारात खेडुतांची गर्दी वाढत होती. आमची गाडी आता निपाणीच्या मार्गाला लागली होती. मनात अक्कोळ भरून येत होतं. एक वादळ चालू होतं. जीवनातील भेटलेली अनेक माणसं ओळख देऊन जातात. काही विसरलीही जातात. काही माणसांच्याबद्दल ओढ निर्माण होत राहते. तर काही मनाच्या हृदयावर विराजमान होतात. अक्कोळच्या या वाड्यातील ही माणसं मला माझ्या मनातली, घरातली वाटली आणि भविष्यात हृदयातील होतील, असेही त्यावेळी वाटून गेले. अशी माणसं हाच एक गोतावळा तर नसेल ना? या विचारात- प्रवास चालू झाला........... मनातल्या मनात गुरुजींच्या त्या आई-वडिलांना मनोमन नमस्कार करीत होतो. पावित्र्याच्या त्या साक्षात मूर्ती डोळ्यासमोर .............. सतत दिसत होत्या........... पुढच्या प्रवासातही ...........

यावर्षी जूनपासून पावसाळी हवा अजूनतरी नव्हती. आली नव्हती. आमच्याकडे मृग नक्षत्रानंतर बारीक पावसाची सुरूवात होई. त्यास आम्ही चिटका पाऊस असेही म्हणतो. हा पाऊस आषाढापर्यंत वाढत असे. पण यावर्षी आषाढही बरसला नाही. कधीतरी एखादी सर येऊन जायची. माझे कार्यालय त्यावेळी अब्दुल करीम खाँ साहेबांच्या गवई बंगल्याच्या पाठीमागील सुगंधा बिल्डींगमध्ये होते. तेथील कामकाज संपवून मी सतिशभाईंच्याकडे निघालो होतो. लक्ष्मी मार्केटातील वर्दळ वाढत चालली होती. कणसं भाजून विकणारे विक्रेते, त्यांच्या पाटी वाजवण्याचा लयबद्ध आवाज, भाजीपाला विकून



कु.हेमा, कु.अनिकेत, कु.मयुर यांच्या समवेत अक्कोळ वाड्यात काढलेले श्री.रमेश महाराज कुलकर्णी यांचे छायाचित्र

निघालेल्या माळीणबाईचं एकमेकीतलं बोलावणं, रस्त्यामधून मोकाट हिंडणाऱ्या गाई या साऱ्यांच्या गर्दीतून मी अशोक मेडिकलमध्ये जाऊन पोहोचलो.

या काळात सतिशभाई आजारातून उठले होते. तब्येत आता जरा बरी होत चालली होती. सहज त्यांना भेटावे, खुशाली विचारावी, तसेच अक्कोळचे डॉक्टर येणार आहेत का याची चौकशी करावी या विचारात त्यांच्याकडे पोहोचलो. मला पाहताच सतिशभाई म्हणाले, "मी तुम्हाला आजच निरोप पाठवणार होतो. परंतु तुमच्या ऑफिसमध्ये फोन नाही. अक्कोळचे डॉक्टर त्यांच्या वडिलांना मिशन हॉस्पिटलमध्ये तब्येत दाखवायला आले आहेत. त्यांनी तुम्हाला भेटायला बोलावले आहे. ब्राह्मणपुरीत शाळा नं १ समोर देशपांडे हौदाजवळ छबूराव देशपांडे राहतात. त्यांच्या घरी ते उतरले आहेत." सतिशभाईंचे आभार मानून मी प्रथम डॉक्टरांना भेटून येतो असा निरोप देऊन निघालो. ब्राम्हणपुरी शाळा नं.१ म्हणजे समोर श्रीअंबाबाई मंदिराकडील चौक. शाळेची दोन मजली इमारत, समोर सार्वजनिक पण आता बंद असलेला पाण्याचा हौद होता. त्याला लागूनच देशपांडे वाडा होता. वाड्याचा दरवाजा सागवानी भक्कम होता. वाड्याचे प्रशस्त अंगण शहाबादी फरशी, वाड्याचे दोन समान हिस्से केलेले, डाव्या बाजूस डॉक्टरांचे दूरचे मामा छबुराव देशपांडे राहत. मी आत जाऊन चौकशी केली तो डॉक्टरांचे वडील हात धुऊन दिवाणखान्याच्या खोलीत प्रवेशकर्ते झालेले. मी त्यांना लगेच ओळखले, पांढरे शुभ्र धोतर, पांढरा शुभ्र बनियन, ही त्यांची माझी दुसरी भेट होती. त्यांना बोलताना थोडी धाप लागत होती. त्यांच्या बोलण्यातून दोन दिवसापूर्वीच तब्येत दाखविण्यासाठी ते मिरजेत आले होते आणि विश्रांतीसाठी मिरजेतच डॉक्टरांनी थांबण्यास सांगितले होते. डॉक्टर बाहेर गेलेत थोड्याच वेळात येतील बसा ते मला म्हणाले.

आषाढची गार हवा, रिमझिम पाऊस आणि रात्रही झाली होती. मी वडिलांना नमस्कार करून उद्या येतो असे सांगितले. देशपांडे वाड्यापासून आमचे घर तीन साडेतीन कि.मी. वर होते.

दुसऱ्या दिवशीही पुन्हा माझे काम उरकून अक्कोळच्या डॉक्टरांना भेटण्यास गेलो. त्यावेळी ते घरीच होते. पायाला हात लावून मी नमस्कार केला. "या, बसा." असे म्हणत ते बोलू लागले. "तुम्ही येथून गेलात व

काकांचे डॉक्टरांकडून रिपोर्ट आणायला गेलो. बाकी बरे आहे. मी चार-पाच दिवस येथे आहे. तुम्ही येत चला.'' असे म्हणत त्यांनी मला आत नेले. तेथे मधल्या खोलीत डायनिंग टेबल होते. तेथे डॉक्टरांच्या आई काहीशा स्वयंपाकाची तयारी करीत होत्या. तर त्यांच्या वयाच्याच एक पोक्त महिला किचन कट्ट्यावर चहा करीत होत्या. डॉक्टरांनी मला चहा दिला. परिचयही करून दिला. ज्यांच्याकडे उतरले होते, ते छबूराव देशपांडे हे बृहन् महाराष्ट्र शुगर फॅक्टरी माळेगावला शेतकी ऑफिसर होते. त्यांच्या धर्मपत्नी माई देशपांडे, त्यांची एक नात कु. अंजलीताई होत्या. हे सारे जवळचे नातेवाईक होते म्हणून डॉक्टर येथे राहायला आले होते. आम्ही बाहेरच्या दिवाणखान्यात येऊन बसलो. माझी नोकरी, घरची परिस्थिती, शिक्षण आदी विषयाची चर्चा झाली. तशी ही प्रथमचीच निवांत भेट होती आणि परिचयात्मक होती. डॉक्टरांचा स्वभाव बोलका होता. त्यांची मुद्रा गंभीर होती पण चेहऱ्यावर उदासीनता नव्हती. त्यांच्या बद्दल एक प्रकारची ओढ माझ्या मनी होती. तुम्ही उद्या सकाळी या, असे म्हणून त्यांनी मला निरोप दिला. मीही माझ्या ऑफिसकडे सायकलने निघालो.

मला वाटते त्या दिवशी माझे मन ऑफिसमध्ये रमले नाही. अक्कोळचे डॉक्टर हे माझे गुरू असतील का? ते मला दीक्षा देतील का? आदी विचाराने मन गोंधळून गेले. सुमारे चार वाजले असतील एवढ्यात एक रिक्षा माझ्या ऑफिससमोर येऊन थांबली. पाहतो तो काय आश्चर्य, डॉक्टरच मला भेटण्यासाठी आले होते. मी माडीवरून खाली येऊन त्यांचे स्वागत केले. नमस्कार केला. मला ते म्हणाले, ''मी कामानिमित्त गावी अक्कोळला जाणार आहे. रोज काकांच्याकडे जाऊन येत चल.'' मी त्यास होकार दिला. येथूनच आमच्या अंतरंगातील स्नेह धागा जुळत गेला असावा.

आता मी दररोज सकाळी व संध्याकाळी देशपांडे वाड्यात जावू लागलो. त्यांच्या आई-वडिलांना मी मातृदेवो-पितृदेवो असे मानू लागलो. डॉक्टर वतनदार कुलकर्णी असल्याने भरपूर जमीन जुमला, नोकर-चाकर यामुळे या घराला सरकार घराणेच म्हटले जायचे. मूळचे घराणे सात्त्विक, धार्मिक, तात्त्विक आणि पापभिरू असे होते.

या घराण्यातील दत्त जयंतीची हकीगत मोठी गंमतीशीर आहे. स्व. दत्तात्रेय पंत कुलकर्णी व स्व. रमाबाई कुलकर्णी (रमेशमहाराजांचे पणजोबा व पणजी) यांना बरेच दिवस मुल नव्हते. भाऊबंदातील काही ज्येष्ठांनी भावकीतीलच मुल दत्तक घेण्याचा घाट घातला. ही बातमी स्व.रमाबाईंना समजली. त्या नवऱ्याला म्हणजे स्व.दत्तोपंतांना घेवून तडक नृसिंहवाडीला पोहचल्या व महाराजांसमोर त्यांना काहीही झाले तरी मुल दत्तक घेणार नाही अशी शपथ घेण्यास सांगितली. अक्कोळचे कुलकर्णी कुटुंब पुर्वापार दत्तभक्तच होते. स्व.रमाबाई व त्यांच्या सासू दर पौर्णिमेला वाडीला चालत जात असत. सदरचा नियम पुढील पिढीने चालविला होता/आहे.एकदा नृसिंहवाडीला मुक्काम असताना स्व.रमाबाईंना स्वप्नात वाडीच्या नृसिंह सरस्वती दत्तमहाराजांनी स्वप्नात दृष्टांत दिला. त्या जागे होवून पाहतात तर त्यांच्या ओट्यात नारळ व फुले होती. सदरची गोष्ट त्यांनी सोबतच्या स्त्रियांना व पुजांराना सांगितली. पुजाऱ्यांनी स्व.रमाबई व स्व.दत्तोपंतांना सदरचा नारळ प्रसाद म्हणून ग्रहण करण्यास सांगितला. यथाअवकाश स्व.रमाबाईंना दिवस गेले व दत्तजयंती दिवशी त्यांना रात्री १२ वाजून ३२ मि. पुत्ररत्न प्राप्त झाले. सदरचे पुत्ररत्न म्हणजे स्व.नारायणराव. म्हणून अक्कोळला श्री दत्तजयंती रात्री १२ वाजून ३२ मि. होते.

तान्हे बाळ दीड महिन्याचे असताना स्व.रमाबाई त्याला घेवून सद्गुरू वासुदेवानंद सरस्वती (टेंबे स्वामी) यांच्या दर्शनाला गेल्या. ते अक्कोळ जवळील भिमापूरवाडीच्या पांढरओढ्याच्या झऱ्याजवळ मुक्कामाला होते. रमाबाईंनी तान्ह्याबाळाला टेंबे स्वामींच्या चरणावर घातले.टेंबे स्वामींनी आपल्याजवळील छाटी बाळाच्या अंगावर टाकून ''नारायण'' असा उच्चार केला म्हणून मुलाचे नाव नारायण ठेवण्यात आले. तेव्हापासून अक्कोळला दत्त जयंती रात्री १२ वाजून ३२ मि. साजरी करण्यात येते. अशा प्रकारे सद्गुरू वासुदेवानंद सरस्वती( टेंबे स्वामी) यांच्या आज्ञेनुसार सदरची दत्त जयंती सुरू झाली. दुसऱ्यादिवशी दोनप्रहरी महाप्रसाद होतो. सन १९७४ ते सन २०१२ पर्यंत मी निवांतपणे या उत्सवात भाग घेतला आहे. सन १९९० पर्यंत या उत्सवाला घरगुती स्वरूप होते. आता या उत्सवाला प.पू. रमेश महाराजांच्यामुळे सार्वजनिक स्वरूप

प्राप्त झाले आहे.

स्व. आईसाहेबांचे घराणेसुद्धा सात्त्विक, दानशूर, धार्मिक व क्रांतीकारकांचे होते. आईसाहेबांचं नाव होतं सोनूताई, बेळगावला देशपांडे गल्लीत त्यांच्या माहेरचा मोठा वाडा आजही आहे. त्यांच्या वडिलांचे नाव होते हणमंतराव देशपांडे. ते मजगावचे वतनदार देशपांडे होते. त्यांना तीन मुले व तीन मुली. सर्वात थोरले मल्हारराव, क्रमांक दोनचे कृष्णराव (किट्टाण्णा) सर्वात छोटे रंगराव (रंगाण्णा) देशपांडे वकील, तर बहिणींमध्ये सर्वांत मोठ्या सोनुताई क्रमांक दोनच्या सरोजिनी, तर सर्वात लहान स्व. मंजुळा. या सर्वांना मी पाहिले आहे. खरोखरच ही सारी देवगुणाची माणसं, अशी देवमाणसं आजच्या काळात भेटणं अवघड आणि दुर्मिळच.

सन १९७७ ते १९८० मी कोल्हापूर येथे पाटबंधारे खात्यात नोकरी करीत असताना स्व. सरोजिनीदेवी वसंतराव कुंभोजकर यांच्या घरी दररोज जात असे. कारण कार्यालय जवळ होते आणि माणसं मायेची होती. त्यामुळे कुंभोजकर घराण्याशी संबंध वृद्धिंगत होत गेला होता. स्व. वसंतराव व दत्तात्रय कुंभोजकर यांच्या कुटुंबाविषयी माझ्या मनात एक आदर निर्माण झाला होता. एक शिक्षित आणि कुलीन परिवार मला भेटला होता. अरुणदादा, बाळूदादा, गिरीषदादा व त्यांच्या भगिनी यांच्या विषयी मला नेहमीच आदर वाटत आला.

आईसाहेबांचे दूरचे नातेवाईक म्हणजे कर्नाटक केसरी गंगाधरराव देशपांडे होय . ते थोर क्रांतिकारक होते. आई साहेबांच्या मातुल घराण्याने १९४२ च्या चळवळीत भाग घेतला होता. थोर देशभक्त बाळ गंगाधर टिळक, लाला लजपतराय अशा मोठ्या असामींचे वास्तव्य त्यांच्या वाड्यात असे. अनेक जहाल आणि मवाळ क्रांतिकारकांचे, देशभक्तांचे ते माहेरघर होते. बेळगावला कॉंग्रेस विहीर परिसरात जे राष्ट्रीय अधिवेशन झाले होते त्यावेळी आईसाहेब त्यामध्ये स्वयंसेवक म्हणून सहभागी झाल्या होत्या. अशा देशभक्तीचा वारसाही आईसाहेबांना होता.

तर त्यांच्या आध्यात्माचा वारसाही खूप मोठा होता. सन १७५८ ते १८१५ या कालावधीत मुरगोड (ता. बैलहोंगल जि. बेळगाव) येथे शिवचिदंबरम् स्वामीजी म्हणून शंकराचे अवतारी पुरुष होऊन गेले. त्यांच्या सानिध्यात

आईसाहेबांचे एक पूर्वज त्यांच्या सेवेत होते. त्यामुळे या देशपांडे घराण्यात शिवचिदंबर महास्वामींचा आशीर्वाद असून त्यांनी दिलेली साडी लग्नात नेसवून देवघरात प्रथम अक्षता म्हटल्या जातात. तसेच या घराण्यात भोपळ्याची भाजी कधीही खाल्ली जात नाही. अशाप्रकारे शिव अवतार श्रीशिव चिदंबर स्वामीजींची आराधना वर्षानुवर्षे या घराण्यात चालत आलेली आहे.

तर वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराज हे माणगावहून सावंतवाडी- चंदगड-बेळगाव-निपाणी-बोरगाव मार्गे त्यांचे आराध्य दैवत श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराज यांच्या दर्शनास नृसिंहवाडीला येत. त्यावेळी देशपांडे घराण्याची बेळगावपासून जवळ असलेल्या हिंडलगा रोड वरील सुळगे गावी आंब्याची बाग आहे. त्या बागेत प.पू. टेंबेस्वामी उतरत. त्या बागेत आजही टेंबे स्वामी महाराजांनी लावलेला औदुंबर वृक्ष आहे. तर टेंबेस्वामी महाराजांनी दिलेल्या छाट्या (देवांची वस्त्रे) देशपांडे घराण्यात आहेत. आता ही सुळग्याची बाग श्री. अतुल व उदय कालकुंद्री घराण्यात आहे.

स्व. काकांची आत्या ही बेळगावातील स्व. हरिनाना कालकुंद्री यांना दिली होती. तर काकांचे थोरले बंधू स्व. गुरुनाथ कुलकर्णी यांना श्रीदत्त अवतार पंत महाराज बाळेकुंद्रीकर यांचे लहान बंधु स्व. गोपाळराव यांची मुलगी दिलेली होती. तसे अक्कोळ हे गाव श्रीपंत महाराज बाळेकुंद्रीकर महाराजांच्यावर श्रद्धा ठेवणारे होते. काकांच्या वाड्यात श्रीपंत महाराज बाळेकुंद्रीकर टिपऱ्या खेळलेले आहेत. येथील भजनात रमलेले आहेत. श्रीपंत महाराजांचे अक्कोळ गावी नेहमी जाणे येणे होते. या गावाशी त्यांचा प्रेमाचा सहवास होता. त्यामुळे स्व. काकांची श्रीपंत महाराज बाळेकुंद्रीकर दत्त संप्रदायाची आराधना, उपासना होती. अशा प्रकारे स्व. आईसाहेबांच्या शिव अवतार श्रीशिव चिदंबर महास्वामीजी (मुरगोड-केंगेरी) श्रीपंत महाराज बाळेकुंद्री (बेळगाव) आणि वासुदेवानंद सरस्वती (टेंबे स्वामी) यांची आराधना डॉक्टरांच्या/महाराजांच्या घरी पुण्याईने चालत आलेली होती. हा प्रवाह अखंड वाहत होता. स्व. आईसाहेबांचे माहेरकडील देशपांडे घराणे, तर सासरकडील कुलकर्णी घराणे देशस्थ ब्राह्मण परिवारातले होते.

स्व. काकांचा व स्व. आईसाहेबांचा विवाह सन १९२३ मध्ये बेळगाव

येथे झाला. स्व. काका व आईसाहेब उभयंता सात्त्विक वृत्तीचे होते. त्यांचा संसार प्रेमाचा, शांतशीलतेचा, उदात्त असा झाला. गोरगरीब, शेतातील वाटेकरी यांना आईसाहेब नेहमीच मदत करीत. त्या अडचणीच्या काळी सदैव मदतीला तयार असत. तर काकांचा स्वभाव भोळाभाबडा अत्यंत कनवाळू, परोपकारी असा होता. घरातील कोणतीही वस्तू गोरगरीबांच्या गरजेनुसार आईसाहेबांना न कळवताच देऊन टाकत.

असाच एक कलह प्रसंग काका आणि आईसाहेबांच्या जीवनातील आहे. जुन्या वाड्यामध्ये (श्री लक्ष्मीनारायण कृपा) अंगण, सोपा, जिन्याची खोली, त्या पाठीमागे कोठीची खोली, पुन्हा हॉल व स्वयंपाक घर व शेवटी जनावरांचा गोठा, परसबाग अशी रचना होती. काका जिन्याच्या खोलीत एका आडव्या तिजोरी लगतच्या तक्याला टेकून विडी ओढत बसत असत. त्यांची शिस्त मोठी कडक होती. तसेच त्यांचे स्वत:चे आचरणसुद्धा कडक पण साधेपणाचे होते. दररोज गावकरी मंडळी त्यांना भेटण्यासाठी सकाळी-संध्याकाळी येत. सर्वांनाच विड्या देणे, चहा देणे हा त्याचा जणू स्थायी धर्मच बनला होता. सन १९९० पर्यंत त्या भागातील शेतीला पाणी नसलेने तो भाग आजच्या सारखा बागायती व श्रीमंत नव्हता. वर्षातून एकदाच येणाऱ्या तंबाखूच्या पिकावर वर्षभर काढावे लागे. त्यामुळे साऱ्यांचीच सांसारिक परिस्थिती बेताची होती. गरीब माणसं सकाळी किंवा सायंकाळी येऊन गूळ, मिरची, जोंधळे, डाळ असं काहीना काही तरी मागत असत. त्यांची ही मागणी काका हळूच पूर्ण करीत. आई कोठे आहेत, लक्ष्मण स्वयंपाकगडी कोठे आहे याची पाहणी करीत आणि कोठीच्या खोलीतून गूळ, मिरची, डाळ, जोंधळे तर कधी कधी साखर, तांदूळही गुपचूप देत. या हाताने दिलेले कोणाला समजू नये, अशी त्यांची धडपड असे.

एका नागपंचमीच्या दिवशी मी अक्कोळला होतो. नागपंचमीच्या दिवशी पोळ्या करण्यासाठी कोठी घरातील डाळ, गूळ आदी साहित्य आणण्यासाठी आई गेल्या. पाहतात तर कोठीतले बरेचसे साहित्य कमी झालेले दिसले. त्यांच्या लक्षात वस्तुस्थिती आली. त्या न रागावता काकांना एवढंच म्हणाल्या, "मी स्वयंपाक घरात कामात असताना तुम्ही कोठी खोलीतल्या बऱ्याच वस्तू लोकांना न विचारता देऊन टाकल्या. मला जर विचारलं असतं तर बरं झालं असतं.

दानधर्माला काही मर्यादा व सीमा असावी. तुम्ही द्या, पण जरा बघून.'' काका त्यावेळी काहीच बोलले नाहीत. मुळातच त्यांचा स्वभाव गंभीर पण दयाळू आणि परोपकारी. ते सदैव डोळे मिटून चिंतनात मग्न असत.

अक्कोळचे काका म्हणजे एक कर्तबगार व्यक्ती आणि सर्वसुखी माणूस म्हणून ओळखले जात. परिसरातील खेड्यात एक मातबर असामी अशी त्यांची गणना होती. सरकार दरबारीही त्यांना मानमरातब होता. मामलेदार व इतर सरकारी अधिकारी प्रथम काकांच्या वाड्यात येत. तेथेच राहात, जेवत मग भेटीसाठी गावात जात. आपुलकीचा एक दरारा आणि धार्मिक कुळातील सदाचारी देव माणूस, असाच त्यांचा नावलौकिक होता.

दोन प्रहरीची जेवणं झाली. दोन प्रहर नंतरच्या चहापानापर्यंत वाड्यातील वातावरण थोडं शांतच होतं. चहा झाल्यानंतर काका आईना म्हणाले, ''मी गरीबीचा सर्व प्रथम अनुभव घेतला आहे. आज आपली परिस्थिती तशी बरी आहे. काही गरीब-अभागी लोक मला थोडे पैसे, सांसारिक गरजेसाठी, पोटासाठी काही वस्तू मागायला येतात, त्यांना नड आहे, असते त्यांची परिस्थिती चांगली असती तर आपल्याकडे त्यांनी काही मागितलं नसतं. अशाना नकार देणं, माघारी रिकाम्या हाती पाठवणं मला जमणार नाही. मी या गावचा वतनदार कुलकर्णी आहे. माझ्या भाकरीतील अर्धी भाकरी, जमेल तेवढी मदत मला या सगळ्या गरीबांना करावी लागणार आहे. आणि मी ती करणार आहे.'' त्यावर आई म्हणाल्या, ''त्या दिवशी त्या अभागी बाई आल्या. तिच्या मुलीच्या लग्नासाठी काही रक्कम व बैलगाडी पाठवली नाही का? मी नको म्हणत नाही. पण हे गृहस्थीचं घर आहे. जरा बघून दानधर्म करा एवढीच विनंती आहे.'' हे आईचं व्यवहारात्मक पण चातुर्यपूर्ण बोलणं खूप काही माझ्या सारख्याला सांगून गेलं. भारतीय नारी संस्कृतीचा पूर्वापार चालत आलेला आदर्श असा आहे. हा कलह प्रसंगही इथेच संपला होता. थांबला होता. घराला घरपण असं प्राप्त होत असावं, असं वाटून गेलं.

काकांचा पोषाख पांढरा शुभ्र सदरा, पांढरे धोतर, थोडा तपकिरी रंगाचा कोट आणि डोक्यावर काळी टोपी, स्वच्छ राहणीमान हा त्यांचा स्वभावधर्म दर्शन देऊन जायचा. सकाळी सहा वाजता उठणे, जनावरांच्या गोठ्याकडे

चक्कर टाकून त्यांना वैरण टाकणे, चहा घेणे आणि नंतर ट्रान्झीस्टरवर मराठी बातम्या, संगीत ऐकणे. सकाळी अकरा पर्यंत गावकऱ्यांच्या भेटी-गाठी. त्यानंतर अंघोळ, बारा वाजता जेवण आणि पुन्हा रेडिओ, विश्रांती, पुन्हा एक गोठ्याकडे फेरी, चारा-वैरण, रात्री ८.३० च्या रेडिओवरील बातम्या. त्यांच्याकडे लोक भेटायला येत. घरच्या समस्या ते शेरी पर्यंतची चर्चा ते मनमोकळेपणानं करीत. पुन्हा रात्री ११ पर्यंत संगीत-संगीत सभा ऐकणे हा त्यांचा नित्याचा दिनक्रम.

आज नागपंचमीचा दिवस. सकाळपासूनच घरोघरी सणाची धामधूम त्या गावात दिसत होती. लग्नानंतर माहेरी आलेल्या मुली, पोरी, सायंकाळी काकांच्या वाड्यात येऊन पंचमीची गाणी म्हणत होत्या. फुगड्यांचा फेर धरला जात होता. नंतर झिम्मा, या सगळ्या आवाजानं वाड्याचा आवार-सोपा अंगण दुमदूमन गेलं होतं. काका वाड्याच्या भिंतीला पाठ टेकून हे सारं आनंदानं पाहत होते. आई लाडू, लाह्या, खाद्यपदार्थ कट्ट्यावर आणून ठेवत होत्या. काका हा खाऊ मुलींना-पोरींना वाटत होते.

काकांना गाण्याची, संगीताची आवड, रेडिओवर रात्री अकराची संगीत सभा ऐकूनच ते झोपी जात. मनापासून ऐकताना त्यांचे डोळे मिटलेले असत आणि ते जणू संगीतात विलीन होऊन जात.

त्यांच्या वाड्यात दिग्गज गायकांनी हजेरी लावलेली होती. स्व.पंडित भीमसेन जोशी यांचे गायन असो की, बालगंधर्वाची नाटकं. ते मिरजेला, कोल्हापूरला जाऊन पाहत. सरकार वाड्यावर पाहुणी व्यक्ती आली की ती त्या वाड्याची अविभाज्य घटक बनून जाई. गंगू, लक्ष्मण, वसंता ही मंडळी जणू वाड्यातीलच बनली होती. गोरगरीबांना मदत हा काकांचा धर्म, त्याचबरोबर काका आयुर्वेदिक औषधही देत. विंचू, दंश, खोकला, ताप अशा किरकोळ आजारांवर औषध देत. हे सारं दृश्य एखाद्या चित्रपटासारखे डोळ्यासमोरून जातांना आजचे वर्तमान मला भानावर आणत होते.

श्रावण सुरू झाला होता. निसर्ग बहरला होता. वृक्ष वेलींनी हिरवा मंच सुरू केला होता. सारीकडे हिरवेगारपणा- रस्त्याच्या कडेला गर्दपणाची मार्दवता- या वातावरणात आमची गाडी आता महाराष्ट्र हद्द संपवून कर्नाटकातील बेडकीहाळ शिवारात शिरू लागली. काका मागील सिटवर डोळे बंद करून

शांतपणे बसले होते. तर आईची जपमाळ सुरू होती. इतक्यात काकांनी गाडी थांबवायला सांगितली. मी त्यांचा हात धरून लघुशंकेला घेऊन गेलो. लघुशंकेनंतर धोतर सावरून माझा हात हातात घेऊन म्हणाले, "झेंडेबाबा, कुणाचा कोण तू! एवढी आमची सेवा करतोस, जसं आज मला अक्कोळला पोहोचविण्यास येत आहेस, तसंच शेवटपर्यंत मला तू पोहोचवावं," मी फक्त होकारार्थी हं म्हणून थांबलो. पण त्यांच्या बोलण्याचा भविष्य कालीन अर्थ त्यावेळी माझ्या लक्षातच आला नाही. दिवस जात होते. ते कोणाची वाट पाहत नाहीत.

हळूहळू दिवस सुरू झाले. मीही आठवड्याच्या सुट्टीत अक्कोळला जाऊ लागलो. त्यादिवशी मी अक्कोळला गेलो होतो. आकाशात ढगांनी गर्दी केली होती. वातावरण कुंद होतं. जोराचा वारा होता. सायंकाळची वेळ पाखरं घरट्याकडे परतत होती. त्यांचा किलबिलाट चालू होता. मी आईबरोबर बोलत बसलो होतो. काही जुन्या आठवणी निघाल्या होत्या. त्या आठवणीने त्यांचे डोळे भरून आले होते.

त्या म्हणाल्या, या वाड्यातलं काम कधीच संपल नाही. गडी माणसं–राबता–यातच रमेशचा जन्म झाला. लग्नानंतर बरेच दिवस मूल नाही. गावात एकत्रित राहणं, दिवसभर वर्दळ, दिवसभर चूल पेटलेली असायची, घरात लक्ष्मणला मदतीला घेऊन स्वयंपाकापासून सर्व कामे करावी लागत. मुलासाठी नृसिंहवाडीला जाणे चालूच होते.

श्री. बडु पुजारी यांच्या घरी राहून श्रीदत्त दर्शन घेऊन परत येत असे. बारा वर्षानंतर शालन म्हणून पहिली मुलगी झाली. ते साल होते १९३५. त्यानंतर माणिक जन्माला आली. तिचा जन्म ६/१०/१९३७ तर दत्त कृपेने रमेश १७/११/१९४० रोजी जन्माला आला.

घरामध्ये सर्वांना आनंद झाला. वाडा आनंदाने भरून गेला. नामकरणादिवशी गोरगरीबांना अन्नदान–कापड–चोपड वाटण्यात आले. तो पाच सहा वर्षाचा झाला आणि गावातल्याच शाळेत जाऊ लागला. तो घरी येईपर्यंत काळजी वाटे. सारखी रुखरुख लागून राही. कधी खेळता खेळता पडून येई. सायकलवरून जाऊ लागला तर सायकल चालविताना बोट चिमटून जखम करून घेऊ लागला. रोज काही ना काही तरी अकस्मात घडतच असे आणि

त्याचा त्रास घरात सर्वांना होई. त्यासाठी त्याला नृसिंहवाडीला दर पौर्णिमेला घेऊन जाणे सुरू झाले. त्याचबरोबर सांगवडे- नृसिंहालाही जाणे सुरू झाले. रमेशचे प्राथमिक शिक्षण कागवाड येथील वसतीगृहात शेडबाळकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. पुढील शिक्षण विद्यामंदीर हायस्कूल निपाणी येथे झाले. सन १९५८ मध्ये रमेश मॅट्रीक परीक्षा उत्तीर्ण झाला.

यानंतर पुढील शिक्षणाचा विचार चालू झाला. त्यावेळी आम्ही निपाणीत साखरवाडीत मुलांच्यासाठी भाड्याने घर घेऊन राहात होतो. सायकल घेऊन निपाणीत बाहेर गेलेला रमेश मुलगा व्यवस्थित घरी कसा परतेल याची हुरहुर लागे. सायकलीवरून पडणे, चालता चालता काही तरी घडणे, अशा गोष्टी रोजच घडत होत्या. त्यातून मनस्ताप, त्याचं आजारी पडणं, अमावस्या-पौर्णिमेला त्याला वृत्तिक्षोभ होत असे. गच्चीवरून उडी मारतो म्हणे, रूसणे, फुगणे, अबोला धरणे यामुळे मी कंटाळून गेले होते. म्हणून रमेशसाठी वाडीला जाणे, अनेक संतांचे दर्शन घेणे, आशीर्वाद मागणे, असं बरंच काही चालू होतं. एकदा नृसिंहवाडीहून परतताना कागवाडला मरीस्वामी यांचेकडे रमेशला घेऊन गेले. त्याला त्यांच्या पायावर घातले. याला स्थिर करा, याचा वृत्तिक्षोभ कमी करा, याचं कल्याण करा, असं मागणं मागितलं. श्रीमरीस्वामी हे लिंगायत स्वामी कागवाड बाहेरच्या चौकात चिंचेच्या झाडाखाली बसलेले असत. ती वामनमूर्ती तपस्वी होती. ते एवढंच म्हणाले, "जा, तुझा मुलगा बँक आहे." श्रीमरीस्वामीचं बोलणं मला काही समजून आलं नाही, पण इतक्या दिवसांनी रमेशकडे साधक, साधू, संन्याशी भविष्याचा ओढा असणारी, गांजलेली गोरगरीबांची ही गर्दी पाहून रमेशची ही ती अध्यात्माची बँक वाटते.

गावात डॉ. हिरेमठ म्हणून सद्गृहस्थ होते. त्यांच्या सल्ल्यानुसार हुबळी येथील स्व. दामोदर हलशीकर या नामांकित वैद्याकडे आयुर्वेदाचे त्यांचे शिक्षण चालू झाले. सन १९६४-६५ साली रमेश आयुर्वेद विशारद घेऊन डॉक्टर झाला आणि वाड्यातच दामोदर क्लिनिक म्हणून दवाखाना सुरू केला. आता रमेश हळूहळू स्थिर होत चालला होता आणि त्याला प्रपंचात गुंतवणं आवश्यक आहे असं वाटू लागलं.

निपाणी येथील स्व. बाबण्णा कुलकर्णी (संकेश्वर-सोलापूर) यांची

मुलगी गिरीजा हिचेशी १९६७ साली धुमधडाक्यात लग्न झाले.

गिरीजा चांगली सून म्हणून आम्हांला प्राप्त झाली. उच्च पदवीधर, घरची सर्व कामे, बाजारहाट, शेतीकडच्या गड्या माणसांचा पगार, हिशेब हे सारं काही ती पाहू लागली. त्यामुळे माझी चिंता मिटली होती. कु. अपर्णा, गुरुनाथ, अनिकेत, हेमा फिरून वैभव प्राप्त झाले आहे. दर अमावस्येला रमेशला भेटायला येणारी सर्व थरातील माणसं बघितली की मला मरीस्वामींच्या बोलण्याची आठवण होते. तुझा मुलगा बँक आहे.

रमेशसाठी स्व. मामा देशपांडे , स्व. हरिकाका गोसावी (यमकनमर्डी) यांनीसुद्धा तुम्ही दत्त उपासना सुरू ठेवा असे सांगितले होते. स्व. रघुनाथ जोशी सरांनी रमेशला प्रेमळ वागणूक देऊन गुरुचरित्र १४ अध्याय वाचण्यास सांगितला. मी दत्त जयंती नंतर मार्गशीर्ष ते चैत्र पौर्णिमेला श्रीनृसिंहवाडीला जाऊ लागले. सोबत कोणाला तरी घेऊन जाणे, बड्डु पुजारी यांच्या घरी राहणे, पौर्णिमेदिवशी संगमावर स्नान करून भगवान दत्तात्रयांचे दर्शन घेऊन १०८ प्रदक्षिणा घालणे, रात्री पालखी सेवा करून तिसऱ्या दिवशी अक्कोळला परत येणे. तर मधून मधून श्रीक्षेत्र बाळेकुंद्रीकर उत्सवात जाणे, श्रीक्षेत्र मुरगोड शिव चिदंबर स्वामींच्याकडे दर्शनासाठी जाणे चालू केले. कोणते कोणते देव पुजले, उपासना केली हे माझ्याच मनाला माहीत. आज रमेश मोठा झाला आहे, नाव आहे, अनेकांना प्रगतीच्या मार्गावर घेऊन गेला, त्यात मी जिंकले आहे.

आता रात्र झाली होती. भैरोबाच्या मंदिरातील आरतीची घंटा ऐकू येत होती. आकाशातील ढगांच्या अंधारानं चांदण्यांना लपवून टाकलं होतं. गार वारा आणि माझ्या मनात आईचे शब्दांची बरसात, अनेक चित्रं नजरेसमोरून एखाद्या चित्रपटासारखी सरकत होती. त्या चित्रपटाचे नायक होते आमचे गुरुदेव.

अक्कोळचा बाजार शनिवारी भरत असे. आजूबाजूच्या खेड्यातील खेडूत भाजीपाल्याची ओझी घेऊन बाजारात येत. काही बैलगाडीतून बाजारात माल आणत. जाताना किराणामाल, कापड, मिठमसाला इत्यादी माल विकत घेत. चुरमुरे, मिठाई, असेही पदार्थ घेत आणि आपापल्या गावाकडे वस्तीकडे परतत. सायंकाळ झाली की, बाजारातील गोंगाट वाढे आणि रात्र होऊ लागली की, बाजार सामसूम होई. अशा या शनिवारच्या बाजारात महाराजांच्या बरोबर

किती वेळा तर गेलो आहे.

सुगीचा काळ संपत आला की, तमाशाचे फड चालू होत. एन.जी. बाळाप्पा यांच्या कानडी नाटकांच्या पाटलांच्या वाड्याशेजारी पटांगणात कनाती उभ्या ठाकत. शेतकरी वर्गाची ही त्या काळातील करमणुकीची साधने होती.

अक्कोळची भैरोबादेवाची यात्रा प्रसिद्ध आहे. भैरोबा हे ग्रामदैवत, देव नवसाला पावतो असा लौकिक आहे. यात्रेला परिसरातील अनेक खेड्यातून खेडूत मोठ्या संख्येने जमत. देवाला आपल्या ऐपतीप्रमाणे धान्य, वस्त्र, चांदीचे दागिने अर्पण करीत. यात्रेत कुस्त्यांचा फड असे. महाराजांना-काकांना बैलं जनावरं फार आवडत. त्यांच्या गोठ्यातही चांगली जनावरं होती. शेतकऱ्यांना गोठ्यातील जनावरे हीच त्यांची संपत्ती असे. शेतकऱ्यांकडे जनावरे किती आहेत यावरच त्यांची ऐपत ठरत असे, असा तो काळ होता.

भल्या पहाटे उठून त्यांना गोठ्याची साफ सफाई करताना मी अनेकदा पाहिलं आहे. बैलांची, जनावरांची अवकळा, आबाळ झालेली त्यांना खपत नसे. वसंत व ते स्वत: रात्री वेळी-अवेळी चारा घालत. बेंदरादिवशी त्यांची सजवून मिरवणूक काढत आणि मिरवणूकीनंतर वाड्यावर बैलं आली की, त्या बैलांना वहिनी ओवाळत असत.

गावापासून निपाणी रस्त्यावर दोन मैलाच्या अंतरावर महाराजांचा मळा होता, त्याला कोडी म्हणत. कडुलिंब, बाभळीची झाडे तर खालच्या बाजूला कळकीची मोठी बेटं होती. आंब्याची काही झाडंही डौलदार अशी होती. सिताफळाची झाडे-लांबवर पसरलेले गवत जानवरांच्यासाठी राखून ठेवलेलं असे. समोर दूरवर पसरलेला बाळोबाचा माळ, त्या पलीकडे डोंगरावर, माळावरून मळलेल्या लाल मातीच्या नागमोडी वाटा. या कोडीतही मी किती तरी वेळा महाराजांच्या बरोबर फिरलो आहे.

असाच मी एकदा त्यांच्या बरोबर जंगलीला गेलो होतो. तेथे एका ओढ्याकाठी जंगली बाबांची समाधी होती. ती एकांत अशी जागा होती. महाराज हे संसारी होते. शेतकरी होते, डॉक्टर होते. अध्यात्म मार्गातील एक सामाजिक नागरिक होते. ज्ञानी होते. श्रीमंत खानदानीतील वतनदार होते. पतवान होते, पण ते मात्र दिव्य गुरु वाटत. प्रथम परिचयात ते म्हणाले, माझे नाव रमेश

कृष्णाजी कुलकर्णी, तरुणपणात संसाराची जबाबदारी आम्हा पती–पत्नीवर पडली. शेतीवाडी, गडी माणसं, प्रपंच, दत्त जयंती हे सारं चालू आहे–असते.

गुरुदेव पूर्व पहाटेलाच उठत. पडल्या पडल्याच अंथरुणावर ते ध्यान लावीत असत. मी जेव्हा जेव्हा जागा होऊन त्यांना पाहत असे, तेव्हा ते झोपलेले नसत. त्यामुळे ते जागे आहेत की, झोपलेले आहेत हे समजत नसे. एकदा उठले की जोरजोराने जांभया देणे ही त्यांची सवय होती. मग ते गोठ्यात जाऊन सफाईला लागत. गोठा निम्मा अर्धा साफ करून झाला की, लक्ष्मणकडून फुलपात्र भरून चहा घेत. एक विडी ओढत. नंतर वाड्याचे सर्व अंगण ते झाडून काढत. थोडा दिवस वर आला की, गावकरी त्यांच्याकडे यायला लागत. त्यांची बोलणी, अडचणी, सल्ला, मार्गदर्शन, चर्चा सुरू असे. मग गडी माणसांना कामाची यादी, पुन्हा एकदा चहा असा सकाळचा कार्यक्रम.

लहान मुलासारखे इकडून–तिकडे फिरणे, लहर आली की, गुणगुणणे हा त्यांचा स्वभाव होता. सकाळी त्यांच्या इच्छेनुसार ११–१२ च्या सुमारास ते दोनप्रहरीचे जेवण घेत. जेवणात एक दीड भाकरी, थोडा भात, ताक असा त्यांचा आहार थोडाच असे. गाडी घेऊन निपाणीतील त्यांच्या घरी, कधी सांगली, कधी मिरज, तर कधी कोल्हापूरास जात. रात्री खूप उशिरा येत. चुरमुरे, खारे शेंगदाणे, चहा त्यांना विशेष प्रिय होता. अक्कोळात कधी दुपारीही त्यांच्याकडे लोकांचा ओघ असे. श्रीमंत, गरीब असा भेद न करता आपल्या परीने मार्गदर्शन करीत. घरी येणाऱ्या लोकांची जेवणाच्या वेळी जेवणाची व्यवस्था करीत. दर अमावस्येला कधी कधी गर्दी चारशे–पाचशे माणसापर्यंत असे. पण ते कधी कंटाळा करीत नसत. काही दूरगावचे लोक मुक्कामही करीत. ते कधी प्रवचन करीत नसत. पण ते सतत बोलत राहत. त्यांचे बोलणे उदात्त, कधी गंभीर तर कधी पूर्व सूचना देणारे असे. रात्री झोपताना डोकीपर्यंत पांघरूण घेऊन झोपी जात. गुरुदेव कधी भविष्यवाणीवर प्रौढी मिरवत नसत. पण त्यांच्या सूचक शब्दात बरेच काही भविष्य दडलेले असे. ते भिडस्त स्वभावाचे होते. पण बरेचसे मोकळे वागायचे. परिणामी त्यांच्यातील अतीद्रिंय शक्ती किंवा चमत्कार या गोष्टी लोकांच्या लक्षात त्वरित येत नसत. त्यांचे स्वरूप साधे होते. आचरणही साधे होते. घरातील त्यांच्या वापरण्याची अंतर्वस्त्रे

साधारण हिरव्या रंगाची अंडर पॅन्ट, अंगात बंडी, नेहमी आनंदी, गप्पा गोष्टी आणि विनोदवृत्ती हा त्यांचा स्थायी भाव होता. ते उत्तम मराठी, कानडी, इंग्रजी, हिंदी बोलत. अधून मधून संस्कृत, तुळु भाषाही ऐकायला मिळत. भाषांचा योग्य ठिकाणी सुयोग्य वापर हे त्यांचे वैशिष्ट्य होते.

त्यांची शरीर प्रकृती उत्तम होती. घरातील सर्व मंडळी अधून-मधून आजारी असत. परंतु ते कधी आजारी पडल्याचे जाणवले नाही. दिसलं नाही. मात्र तब्येतीच्या बहाण्याने मिरजेला डॉ. म्हेत्रे यांच्याकडे ते वारंवार येत. त्यांच्या शिष्य मंडळीत अनेक डॉक्टर होते फक्त ते आपली प्रकृती तपासून घेत.

बाहेर जाताना विजार-नेहरू शर्ट असा त्यांचा पेहराव असे. पण लहर आली तर पाश्चिमात्य पद्धतीचे कपडे पँट-मॅनेला, बूट वापरत असत. या सर्वातच त्यांची वागण्याची पद्धत अतिशय सरळ होती. त्यांना पाहता क्षणी कोणीही नम्र व्हावे असे ते होते.

माझ्या आई-वडिलांविषयी ते आदराने आणि प्रशंसनीय बोलत. पूर्वीच्या तीन खोल्यांच्या मठीत ते त्यांच्या बरोबर बोलत बसत. माझ्या आध्यात्मिक प्रगतीवर ते खूष दिसत. पण ते कधी उघडपणे माझ्यासमोर बोलत नसत. माझ्या आईवडिलांसमोर, इतरांसमोर माझ्या आध्यात्मिक प्रगतीची प्रशंसा करीत. माझा प्रमुख दोष म्हणजे अहंकार, मीपणा, लक्ष न देणे, गैरशिस्त व मधून-मधून येणारी नैराश्यवृत्ती, तर काही वेळेला येणारी अनामिक भिती. पण या माझ्या दोषांबद्दल, अवगुणांबद्दल त्यांनी कधीही चकार शब्द काढला नाही.

काही वेळा गुरुदेव अतिशय क्षोभ वृत्तीने, स्पष्टपणे, निर्भिडपणे बोलून जात. तेव्हा त्यांचे अंतरंग कळे, ज्ञानाचा विस्तार लक्षात येई. त्यांचे ज्ञानीपण सहजासहजी समजत नसे. बरेच लोक त्यांचा ज्ञानीपणा समजून-उमजून न घेताच त्यांच्या वागणूकीबद्दल निष्फळ चर्चा करीत. पण अशी चर्चा आणि विरोधात्मक बोलणारी माणसं त्यांचेच शिष्य बनत.

तो प्रारंभीचा काळ आठवतो. मी जेव्हा त्यांच्याकडे गेलो, तेव्हा त्यांच्या बरोबर नि:संकोच बोलणे मला जमत नव्हते. मी भक्तीमार्गाकडे वाटचाल करीत होतो, तेव्हा ते ज्ञानमार्गी होते. जसजसा मी भक्तीमार्गात रमू लागलो, गढून जावू लागलो, तसतसे त्यांनी माझी मात्र वाखाणणीच केली. त्यांच्या नैसर्गिक

विचारसरणीनुसार त्यांनी मार्गदर्शन केले. इतर शिष्य मंडळीत मिरज-सांगलीत आले की, हास्य, विनोद, गप्पा, चर्चा होत असे आणि त्यात ते एखाद्या लहान निरागस मुलांप्रमाणे रमून जात. अशा वेळी मी गेलो तर त्यांची हास्य मैफल, आनंदाची मैफल स्तब्ध होत असे. त्यांच्या शेजारी बसून त्यांनी मला अनुग्रह दिला नाही. परंतु माझ्या जीवनाला उच्च दर्जाची विविध संपन्नता मात्र दिली. माझे गुरुदेव कोणत्याही मोहाला बळी पडत नसत. सर्वांशी मनमोकळेपणाने वागत. त्यांची वागणूकच नम्र व प्रेमळ अशा पायावर स्थिरावलेली होती. धर्मग्रंथाचा त्यांनी कधी अभ्यास केला होता, हे मला माहीत नाही, पण धर्मग्रंथातील अनेक दाखले ते देत आणि माझ्यासारख्याला ती अनुभूती वाटत असे. न संपणारा शाब्दिक वाद ते कधीही घालत नसत. पण स्वत:च्या आईबरोबर एखाद्या लहान मुलांप्रमाणे कधी कधी वाद घालत. सुपुत्राचा संवाद हा आगळा-वेगळा असावा आणि तो परस्परांचा हक्क असावा. या हक्कात त्या नात्याची वीण अधिक घट्ट होत असावी.

ते विवाहित होते. ते मनुष्य मात्राची निरपेक्ष सेवा करीत होते. सांसारिक पाया बंधनाचा आणि आकांक्षाचा त्याग करणारी हिकमत त्यांच्या ठायी होती. शुष्क वादविवादापासून सदैव अंतर राखून ते विरक्त असत. मात्र त्यांचे हे वैशिष्ट्य की ते विशिष्ट अशा साधन पद्धतीचा अवलंब करीत नसत. आग्रही नसत. तात्त्विक उपदेशाच्या भूमिकेत ते कधी आढळले नाहीत. मात्र एक नियत कर्म करणारे ते खरे योगी वाटत. वासना आणि अहंकार यापासून अनासक्त होते. त्यांच्या मनाच्या कक्षा व्यापक आणि झेप विलक्षण होती. ते मोह, माया यांच्यातून मुक्त असे गृहस्थ होते.

पूर्णावस्थेला पोहोचलेले योगी असलेने ते एक वेळी अचाट चमत्काराचे दर्शन घडवीत. साक्षात्कारी असल्याने चमत्काराचे सामर्थ्य, इच्छा सामर्थ्य त्यांच्या ठायी होते. त्यांच्या सर्व मार्गाचा प्रपंच आदर्श आणि शांतपणे व्यतीत झालेला होता.

अनेक आर्त, दु:खी, संकटग्रस्त माणसं आपल्या भविष्याविषयी त्यांना भेटत होती. आपल्या व्यथा मांडत होती. मन मोकळी करीत होती. ते शिस्तबद्ध असले तरी येणाऱ्या भक्त मंडळींची आपुलकीने चौकशी, सर्वसामान्यांचा

अडचणींवर उपाय, त्यांना जेवण आल्पोपहार प्रसंगी आर्थिक मदत देऊन आनंदाने निरोप देत.

अमावस्येच्या दिवशी कोणीही भेटायला मोकळे असत. इतर दिवशी मात्र स्वत:ची शेती, दवाखाना ही घरकर्तव्ये पार पाडत. त्यांच्याकडे सर्वांना सारखाच मानसन्मान असे. वारकरी-माळकऱ्यांचे दर्शन त्यांच्या पायाला हात लावूनच होत असे.

त्यांच्या जीवनाचं वैशिष्ट्य असं की, त्यांच्या भक्त मंडळीत-हिंदू-मुस्लीम, ख्रिश्चन या साऱ्यांचा समावेश होताच, पण हरिजन, दीन-दलित, गरीबांचाही भक्त म्हणून समावेश होता. त्यांचा मायेचा ओलावा विनोदी स्वभावातून सहजच डोकावून जाई.

व्यक्ती कर्तव्यदक्ष असेल, समर्थ असेल, विवेकी असेल, अंतर्मुख होणारी आणि त्यागप्रवण असेल तर अशा व्यक्ती हृदयावर विराजमान होतात. मला माझे गुरुजी या पवित्र पातळीवर पोहचले होते असे मनापासून वाटते.

त्यांच्यापासूनच प्रार्थना, उपासना, मंत्रजप, अंतरंगाचे शुद्धिकरण अशा अनेक पाऊलवाटावर मला पावलं टाकता आली.

या नोकरीमुळे अनेक लोकांच्या ओळखी होत होत्या. तर अनेकांना रोजगार, नोकरी मिळवून देण्याचा मी प्रयत्न करीत होतो. त्यातच एम.पी.एस.सी. एल.एल.बी. पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत होतो. आमच्या खात्यातही लोकप्रियता वाढत होती. परिणामी काहींच्या नजरेला ते मानवत नव्हते. माझ्यावर वेगवेगळ्या प्रकारचेही आरोप करीत. पण नोकरीला होतो. नोकरीतूनच मला श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचा गुरुमार्ग सापडला. परंतु नोकरीत समाधान नव्हते आणि त्या शिवाय दुसरा पर्यायही नव्हता. मनाच्या समाधानासाठी आणि नोकरीतील कटकटीमधून थोडी मुक्तता मिळावी म्हणून मी दर रविवारी सुट्टीला कोल्हापूरला रेल्वेने जात असे. श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या समाधीचे दर्शन घेत असे. तर अक्कोळलाही श्रीरमेश महाराज यांच्या दर्शनालाही जात असे.

आमच्या कार्यालयातील उपसा जलसिंचन योजनांची मुख्य पाईप लाईनची कामे पूर्ण झाल्याने असो किंवा माझ्या विरोधकांच्या प्रयत्नाला यश आल्याने म्हणा किंवा या विभागात अतिरिक्त कर्मचारी ठरलो किंवा मतलबी

ठेकेदारांमुळे असेल, सर्वश्रेष्ठ परमात्मा श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज यांची कृपा असेल, माझी बदली कार्यकारी अभियंता वारणा यांत्रिकी विभागामध्ये क्रमांक दोन कोल्हापूरला झाली. या कार्यालयात मी दि. १/६/१९७७ रोजी हजर झालो. या कार्यालयाचे कार्यक्षेत्र चांदोली धरण होते. कार्यालय मात्र कोल्हापूर येथे होते. स्व. गोविंद माधव देशपांडे हे कार्यकारी अभियंता म्हणून सहृदयी प्रवृत्तीचे अधिकारी होते. वि. व्यं. जोशी म्हणून चांगले हेडक्लार्क भेटले होते. ते श्रीधर स्वामींचे शिष्य होते. वरदहळ्ळीला ते नेहमी जात. मला नेहमी सांभाळून घेत. सकाळी मिरजेतून ८.३० वा. रेल्वेने कोल्हापूरला येणे, १०.३० वाजता कार्यालयात, दोन प्रहरी २.३० ते ३ ची चहाची वेळ. या सुट्टीत मी श्री. जयंतराव साळोखेंच्या सायकल दुकानातून सायकल घेऊन श्री. शिर्के मंदिरात जाऊन दर्शन घेत असे. सायंकाळी ६.३० च्या रेल्वेने मिरजेला परत, असा दिनक्रम चालू होता. त्यावेळी रेल्वे तिकीट मिरज-कोल्हापूर दोन रूपये तर महिन्याचा पास १९ रूपये २० पैसे इतका होता.

दिवसेंदिवस कोल्हापूरला ओळखी वाढत चालल्या होत्या. आमच्या कार्यालयाशेजारीच श्रीरमेश महाराजांच्या मावशी स्व. सरोजिनी कुंभोजकर राहत होत्या. त्यांच्या पतीचे नाव होते वसतंराव, तर थोरल्या दिरांचे स्व.दत्तात्रय कुंभोजकर असे होते. ते कोल्हापूर छत्रपतींचे खाजगी कारभारी होते. स्व.दत्तात्रय कुंभोजकर हे साई भक्त होते. श्रीसाई बाबांची दर गुरुवारी आरती करीत. त्यांना बळवंतराव व गिरीश ही दोन मुले, तर पप्पूताई, मीनाताई, जयाताई, लताताई या मुली. वसंतराव कुंभोजकरांना श्री.अरुणदादा हे एकच सुपुत्र होते. ते एम. एस. ई. बीत इंजिनिअर होते. हे सर्व कुंभोजकर बंधू-भगिनी थोड्या फार फरकाने माझ्याच वयाचे असल्याने चांगलीच मैत्री जमली.

स्व. सरोजिनी मावशी व त्यांच्या थोरल्या जाऊबाई मंदाताई या अतिशय प्रेमळ होत्या. धार्मिक वातावरण, दररोजची नित्य कर्मे, दानधर्म, अतिथिसत्कार, आल्यागेल्यांचा पाहुणचार, संसारातील सारी कामे कुंभोजकर कुटुंबीय आनंदाने पार पडत होती. हे एकत्र कुटुंब होते. ऑफीसला येताना जाताना मी दररोज कुंभोजकरांच्या घरी जाई. श्री. अरुणदादांना स्व. आण्णासाहेब पंत बाळेकुंद्रीकर यांची कन्या सुमित्रा दिली होती. श्री. बाळूदादा राहुरी कृषि

विद्यापीठात लेक्चरर होते. तर गिरीशदादा वकिली करत होते. कोल्हापूरला मुक्काम करायचा प्रसंग आल्यास काही वेळेला मी कुंभोजकरांच्या घरी मुक्काम करीत असे. कुंभोजकरांच्या घरीच सौ. छाया कुलकर्णी, डॉ. बापू खोत, श्री. सदाशिव खोत, सौ. रत्नावहिनी, सौ. निर्मलावहिनी यांचा परिचय झाला होता. अक्कोळला रमेश महाराजांच्याकडे येणाऱ्या स्व. अरुण स्वार श्री. मोहन शेटे यांचाही परिचय झाला.

नोकरीत असताना रविवारीसुद्धा मी कोल्हापूरला श्रीदर्शनाला जात असे. रेल्वे सकाळी दहा वाजता पोहोचत असे. ११ पर्यंत श्री. शिर्के यांच्या मंदिरात जात असे. आता माझा आणि शिर्के परिवारांचा परिचय वाढत चालला होता.

परमपूज्य माईसाहेबांचा परिचय तर पूर्वीच झाला होता. आता तर त्यांच्या रोजच्या दर्शनाने आनंद मिळत होता. दीर्घकालाच्या उदरात गडप झालेल्या गुरुदेवांच्या अनेक गोष्टी मला माईसाहेबांनीच सांगितल्या. त्यांचा परिचयही झाला. श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या अंतरंगातील अनेक शिष्यांच्या गोष्टी, चमत्कार त्या सांगत. रामभाऊ फारीख यांच्या घरातील सोन्याची बांगडी जाणे, ती पुन्हा सापडणे, रामा मांगाचा सेवाभाव, गुरुद्वादशीला पालखी निघणे, एका वृद्धेचे पडवळाचे वेल उपटून टाकणे, बाळकू राशिवडेकरांचा पुनर्जन्म, श्रीहरिपंत सिद्धनेर्लीकर यांचा अहभांव नष्ट करणे, रुक्मिणी पुरेकर या बारा वर्षाच्या मुलीचा विवाह तीन वर्षाच्या मुलाबरोबर होणे, अशा विविध लीला ऐकायला मिळाल्या.

कलियुगातील महातपस्विनी ताराबाई शिर्केंच्याकडून श्रीकृष्णदेवांचा लहान मुलाप्रमाणे सांभाळ होणं व राऊत मामा, ताईंच्याकडून गुरुदेवांच्या समाधीनंतरही पूजा सेवा घडणे, असे एक ना अनेक प्रसंग ऐकून मला आनंद वाटत असे. आश्चर्यही वाटत असे. साऱ्या मानवजातीच्या दृष्टीनेसुद्धा एक भाग्यशाली घटना घडली. ती घटना म्हणजे माईसाहेबांनी सांगितलेल्या काळाच्या उदरात गडप होत चाललेल्या गुरुदेवांच्या अनेक कथा, चमत्कार, स्व. बाळासाहेब शिर्केंनी लिहून पुनरुज्जीवन केले. गुरुदेवांची श्रीकृष्ण लीलामृत पोथी लिहून श्रीकृष्णदेवांच्या लीलेचा प्रसाद गंगेप्रमाणे सर्वसाधारणपणे माणसांच्या घरापर्यंत

पोहोचविला.

सन २००५ पर्यंत मी फक्त जाधवांच्या आक्का, माईसाहेब शिर्के यांच्या मुखातूनच श्रीकृष्णदेवांचे अमृततुल्य, असाधारण, पवित्र, मोक्षदायी, भाग्यशाली चरित्र ऐकत होतो. या श्रीकृष्णदेवांनी, महापुरुषाने त्यांच्या जिवंत वास्तव्याने करवीर नगरी, माईसाहेब शिर्के यांचे घर पुनीत केले होते. या भूलोकावर स्वर्गिय कृपाप्रसादाचा वर्षाव करण्यासाठी अवतार देह धारण केला होता. त्यांच्या अवतार देहाला निसर्गाचे कोणतेच नियम लागू नव्हते. त्यांच्या अवतार कार्यात अनेक चमत्कार त्यांनी करून दाखविले आहेत. अशा या अवतारावर माझी एक आत्यंतिक श्रद्धा, विश्वास, परमेश्वर म्हणून दृढ भक्ती वाढतच चालली.

कोल्हापूरात नोकरीवर असताना दररोज शिर्के दत्त मंदिरात दर्शन घेणे तर शनिवारी कार्यालय सुटल्यानंतर अक्कोळला जाणे हा नित्यक्रम होता. शनिवारी मी अक्कोळला मुक्काम करीत असे. रमेश महाराजांची अपर्णा, हेमा, गुरु, अनिकेत ही मुले लहान होती. अनिकेतला खांद्यावर घेऊन फिरविणे, इतरांशी खेळणे, गप्पा मारणे, झोपाळ्यावर बसणे, मुलांना झोपाळ्यावर बसवून झोके देणे, असा माझा वेळ जाई.

दिवसभर रमेश महाराजांच्याबरोबर शेताकडे जाणे किंवा आसपासच्या गावी जाणे असे. त्याकाळी शेतात फक्त तंबाखूचे पीक घेतले जाई. सर्व शेती कोरडवाहू होती. साधारण: ऑगस्टमध्ये तंबाखूची लागवड तर फेब्रुवारी महिन्यात तंबाखूची काढणी होऊन, चाकी करून, भोद भरून ठेवले जात असत. त्यानंतर दर येताच कावळे-भारमलच्या वखारीतून तंबाखू विकली जात असे. येणाऱ्या रक्कमेतून वर्षभराचा खर्च चालवला जाई.

शंकर, वसंत, इंदुराव, मधु अशी रयत मंडळी शेती करीत. हे सर्व लोक प्रामाणिक होते. समाधानी होते. मी कधी कधी आई काकांशी बोलत बसायचा तर कधी वहिनींच्याबरोबर बाजारालाही खरेदीसाठी जात असे. त्याकाळी अक्कोळ-निप्पाणी-अक्कोळ एस. टी. प्रवास दिव्य असे. पण त्यातही एक प्रकारचा आनंद होता. जीवन शिक्षणाचा जणू तो गृहपाठच होता. रमेश महाराजांचे घर- त्याला सरकार वाडा म्हणत. त्या वाड्यात तीन भाग होते.

वाड्याच्या मध्यवर्ती भाग **लक्ष्मीनारायण.** येथे महाराज राहात. सोपा, कोठीची खोली, दिवाणखाना, स्वयंपाक घर असा घराचा विस्तार होता. काका सोप्यात तक्याला टेकून बसत. गुरांचा मोठा गोठा व एक आड होते. राबता मोठा होता. काका ज्या सोप्यात तक्याला टेकून बसत त्यांच्या उजव्या बाजूला लाकडी कपाट होते. त्यात वेगवेगळ्या जुन्या प्रकारची फौंटनपेन्स होती. त्यात पार्करपासून पेपर क्वीनपर्यंत शाईची सुस्थितीत फौंटन पेन्स होती. विडी बंडल, काडीपेटी, सुटी नाणी, औषधे, रोजनिशी यांनी ते कपाट भरले होते.

मिरजेला ते उपचारासाठी आले की, मला बोलावून घेत. या काळात माझ्याकडून जी सेवा करता येईल तेवढे करीत होतो. लक्ष्मी मार्केटला फिरायला नेणे ही माझ्यासाठी भाग्याची गोष्ट होती. ते मिरजेला आले की छबूराव देशपांडे यांच्या घरी राहात.

श्रीदत्त जयंती आली म्हणजे काकांची लगबग सुरू होई. घरच्या नोकरा-चाकरापासून पै-पाहुणे मान्यवर मंडळी या सर्वांना श्रीदत्त जयंतीची आमंत्रणे जात. गावाबाहेर अक्कोळचे बस स्टॅंड असलेने आलेल्या पै-पाहुण्यांचे साहित्य आणण्यासाठी मी जात असे. शामा आचारी, लक्ष्मण मस्त जेवण बनवत. श्रीदत्त जयंतीला गावातील काही लोकही हजर असत. श्रीपाद भटजी भजन वगैरे करून पाळणा म्हणत आणि रात्री बारा वाजता श्रीदत्त जयंती साजरी होई. दुसऱ्या दिवशी महाप्रसाद असे. खीर, भात, भाजी, लाडू हे सारे शामा आचारी करे. नंतरच्या काळात मी कोल्हापूरचे भजनी मंडळ, भक्तीगीते, भावगीते, नाट्यगीते सादर करणाऱ्या मंडळींना घेऊन अक्कोळच्या श्रीदत्त जयंतीला जाऊ लागलो. सुरूवातीला निपाणीचे अंध गायक गागू यांची गीत रामायण, भक्तीगीते सादर होत.

एका वर्षी तंबाखूची लावण झाल्यावर महाराजांच्या आईसाहेब म्हणाल्या- यावर्षी गिरीच्या व्यंकोबाला जाऊ. यावर मीही होकार दिला. त्यांचे कुलदैवत तिरुपती होते. बरीच वर्षे घरातील कोणीही तिरुपतीला गेले नव्हते. महाराज दर महिन्याला सांगवड्याला मात्र जात. तेही त्यांचं कुलदैवत होते.

दसऱ्यानंतर आम्ही तिरुपतीच्या दर्शनाला निघालो. आईसाहेब,

माईसाहेब देशपांडे, नलिनीताई पुराणिक, चार मुले, महाराज, माणिकताई, शालूताई असे सर्वजण होतो. कोल्हापूरचे श्री.कदम यांची मेटॅडोर गाडी नवी होती. त्या गाडीने प्रवास सुरू झाला. सुरुवातीला राघवेंद्र स्वामीचे दर्शन, श्रीशैल्य येथे मुक्काम घेऊन तिरुपतीला निघालो. तिरुपतीला खालीच मुक्काम करावा लागला. हल्लीप्रमाणे वरच्या ठिकाणी सोय नव्हती. तेथील साध्या बसने व्यंकोबाच्या दर्शनाला गेलो. एकपदरी रस्ता, छोटा होता. अवघड घाट, डोंगराची चढण, त्यामुळे अंगावर शहारे येत. तिकीट फक्त २५ पैसे होते. सरळ श्रीव्यंकोबाचे दर्शन घेतले. त्याकाळी एवढी गर्दी नव्हती. गोंधळ नव्हता आणि लोकवस्तीही नव्हती. सायंकाळी खाली आलो. तेथून बेंगलोर, म्हैसूर गार्डन पाहायला गेलो. बेंगलोरला आईसाहेबांची भाची सुलुताई देसाई वास्तव्य करून होत्या. त्यांचे पती जेलर होते. त्यांच्या घरी मुक्काम करून आम्ही रामेश्वरला दर्शनासाठी जाणार होतो. पण चक्रीवादळ आल्याने मद्रास रामेश्वर भागात मोठा पाऊस सुरू झाला. म्हणून आम्ही परत फिरण्याचा निर्णय घेतला. आम्ही लवकरच परतीच्या मार्गाला लागलो. साल होते १९७७.

कोल्हापूर–अक्कोळ अशी वारी सुरू होतीच. नोकरी व्यवस्थित होती रेल्वेने रोज येणे जाणे होतेच. दरम्यानच्या काळात नवीनच एक संकट उद्भवले. वडिलांना म्हणजे माझ्या दादांना डायबेटीस होताच पण त्यांना किडनीचा त्रास होऊन त्यांच्या पोटात दुखायला लागले होते. त्यामुळे त्यांना मिशन हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागले. बरे वाटताच त्यांना डॉ. पी. के. प्रधान यांचे औषध चालू केले. पण आता ते घरीच पडून राहत. सलूनचा धंदा बंद झाला होता. भावाची मदत नाही. शेतीचेउत्पन्न नाही. धाकटी बहीण भामाबाई, तिच्या लग्नाची जबाबदारी, थोरली बहीण जनाबाईची जबाबदारी, सगळा गोंधळ होता. माझा मूळ पगार ३००+१०४ महागाई भत्ता + ३० प्रोजेक्ट अलौन्स, ९.३० घरभाडे, एकूण पगार ४४३.६० (२० रुपये प्रा. फंड + २५ रु. फंडातील उचल, १९.६० विमा, २ रु. व्यवसायकर) असे ६६.६० पैसे वजा जाता माझ्या हाती ३७७ रुपये पगार पडे. संकटाची परंपरा चालू होती. मात्र माझ्या आई लक्ष्मीबाई व गुरुदेवांच्या कृपेने मन आणि बुद्धी स्थिर ठेऊन वाटचाल चालू होती. मी अतिशय निराश होत होतो. अस्थिर मन मला वादळासमान वाटे. तरीही मी स्थिर होतो.

दिवस भराभर जात होते. माझा आध्यात्मिक उत्साह जबरदस्त वाढला होता. माझ्या पूर्वायुष्याला आता पूर्णविराम मिळत चालल्याचा भास होत होता.

काही वेळेला मी स्व. बाळासाहेब शिर्केंच्या भजनी मंडळाला आग्रहाचं निमंत्रण देवून मिरजेला आणत असे. जाधव आक्कांच्या घरी सायंकाळी ५ ते ७ भजन करून रात्री आठच्या पॅसेंजरनी हे भजनी मंडळ कोल्हापूरला परतत असे. या प्रसंगी आम्ही बाळासाहेबांचे आशीर्वाद घेत असू, तर गप्पा, गोष्टी, विनोद, चुटके यांचाही आनंद लुटत असू. अधून मधून स्व. माईसाहेब शिर्के, स्व. शिवाजीराव शिर्के, स्व. वहिनीसाहेब मिरजेला येत असत. सर्व जुन्या भक्तांच्या घरी जाणे-येणे होई. स्व. मथुराबाई पांढरे, खाडे, जाधव, यांच्याकडे येत-जात. मुक्काम जाधवांच्या किंवा राजाराम घाटगेंच्या घरी असे.

श्रावण वद्य दशमी (पुण्यतिथी) माघ वद्य पंचमी (जयंती) गुरुद्वादशी या श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या उत्सवाला मी जात असे. प्रसाद घेऊन रात्री जाधवांच्या घरी प्रसादाला जाई. सुरूवातीला जाधवांच्या घरी उत्सव मोठ्या प्रमाणात होई. सर्वांना सहभागी होता यावे म्हणून रात्री प्रसादाचे आयोजन केले जात असे. या सात दिवसात भजन, कीर्तन, प्रवचन, गायन असे उपक्रमही सुरू केले. भक्त गणांची संख्या वाढत चालली. श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या तसबिरीची स्थापना, पूजापाठ अनेकांच्या घरी चालू झाली.

एके दिवशी नेहमी प्रमाणे शिर्केंच्या दत्त मंदिरात दर्शन घेतले आणि बाळासाहेबांच्याबरोबर बोलत बसलो. पावसाळ्याचे दिवस होते. बाहेर जोराचा पाऊस होता. आम्ही जेथे बसलो तेथे पावसाचे पाणी गळू लागले होते. ते पाहून बाळासाहेब मला म्हणाले, "इमारत आता जुनी झाली आहे. मंदिरातही गळते, इथेही गळते. तेव्हा यावर्षी वासे बदलून कडेपाट करावे असे वाटते. बघूया दिवाळीनंतर." यावर मी म्हणालो, "दादा, जर कडेपाट करावयाचे असेल तर लाकूड आपण मिरजेला घेऊया. आपण मला सांगा."

त्यानंतर काही दिवस गेले आणि एक दिवस रविवारी बाळासाहेब, शिवाजीराव, रघु सुतार मिरजेला अकस्मात रेल्वेने आले. दोनप्रहरी विलासराव घोरपडे यांच्याकडे जेवण झाले. श्री. आनंदराव मंडलेंच्या वखारीत जाऊन रघु

सुतारने कडेपाटाची मापे दिली आणि सायंकाळच्या रेल्वेने बाळासाहेब कोल्हापूरला गेले. अधून–मधून मी मंडलेंना भेटत होतो. लाकूड कापले होते. काम चालू होते.

नोकरीचा व्याप चालू होता आणि नोकरीत तापही वाढत चालला होता. श्री. सतीशभाई शहा यांच्या अशोक मेडिकल स्टोअर्समध्ये बसणे, श्री. विलास घोरपडे यांच्या मेडिकल दुकानात बसणे तर कधी आनंदराव मंडलेंच्या वखारीत बसणे, हिरा बागेत फिरायला जाणे, तेथून आल्यानंतर आरती करणे, मग गप्पा मारत बसणे असा क्रम चाले.

कोल्हापूरात असताना शक्यतो मी दुसऱ्या, चौथ्या शनिवारी, रविवारी अक्कोळला जात असे. शुक्रवारीच शक्यतो मुक्कामाला जात असे. एकदा स्व. निवृत्ती काटकर (तात्या) माझ्याबरोबर अक्कोळला आले होते. शनिवारी दिवसभर रमेश महाराजांच्या बरोबर शेताकडे जाणे, इतर ठिकाणी जाणे असा दिवस गेला. रात्री जेवण करून विश्रांतीसाठी माडीवरील हॉलमध्ये गेलो. अंथरुणावर पडूनच गप्पा मारत होतो. रमेश महाराजांचे प्रत्यक्ष दर्शन, काही वेगळ्याच कल्पना काटकर तात्यांनी बांधलेल्या होत्या. तात्यांच्या कल्पनेवरून रमेश महाराजांचे वागण्याचे, कृतीचे मोजमाप करता येणे अशक्य होते. त्यांच्या गूढ वागण्याचे, वास्तव स्वरूपाचे वर्णन करता येणे अशक्य होते, परंतु त्यांचा अध्यात्म मार्ग सोपा होता हे निश्चित. ज्यांचे अंतरंगच जबरदस्त आत्मविश्वासाच्या अहंकाराने भरलेले होते अशा शिष्यांचे संपूर्ण परिवर्तन करण्याचे महाकठीण काम सोप्या आध्यात्मिक मार्गांनी त्यांनी केले होते.

माझी स्वत:ची मनोवृत्ती प्रामुख्याने भक्ती मार्गाची होती. पण त्यांच्या मनोवृत्तीचा ठावठिकाणा कधीच लागला नाही. तसा मी शोधण्याचा प्रयत्न केला नाही. पण ते साक्षात्कारी संत असावेत असा तर्क होता. रात्र झाली की, रमेश महाराज आपले अंथरूण आपणच पसरत. सर्वप्रथम ते जमखाना अंथरत त्यावर गोधडी किंवा घोंगडी, त्यावर बेडशीट अशा घड्या घालत. एखाद्या लहान मुलासारखे डुलक्या घेत तर कधी कधी विडी ओढत बसत. मी मात्र अंथरूणावर अंग टाकले की झोपी जाई, घोरत असे पण मी अधून मधून जागा होई त्यावेळी ते अंथरूणावर विडी ओढत बसलेले दिसत. रमेश महाज झोपले

कधी, कधी जागे झाले, हे समजत नसे.

काटकर तात्या, मी झोपी गेलो ती वेळ होती अंदाजे रात्री साडे अकराची. पण स्वप्नातून जागा झालो ती वेळ १२.३० ते १. स्वप्न असे पडले होते, मी, काटकर तात्या अक्कोळलाच होतो. स्वप्नात मी काटकर तात्यांना म्हणालो, "तात्या, तुम्ही १३५ रुपये देणं लागता, ते द्या." त्यातच स्वप्नात काटकर तात्या मला म्हणाले, "या गावात माझे पाहुणे आहेत. त्यांच्याकडून १३५ रुपये घेऊन ते तुम्हाला देतो." हे पहिलं स्वप्न संपलं. दुसरं स्वप्न. आता उजाडलं आहे. सकाळ झाली आहे. मी व काटकर तात्या जागे झालो आहोत. आता आम्ही कोल्हापूरला परतणार आहोत. म्हणून मी रमेश महाराजांना स्वप्नातच म्हणत आहे, "महाराज, आम्ही आता येतो, कामावर गेले पाहिजे," माझ्या मनात भीती होती की, महाराज नेहमी प्रमाणे दुपारी जा म्हणतील. पण स्वप्नातच ते शांतपणे म्हणाले, "जातोस तर जा कोल्हापूरला, परंतु संकष्टी सोडून जा." मी स्वप्नातून उठून जागा होऊन अंथरुणावर उठून बसलो. रात्रीचा एक वाजला होता. एवढ्यात रमेश महाराजांचा आवाज आला, "का उठलास बजू?" ते विडी ओढत बसले होते. मी त्यांना "काही नाही" म्हणून पुन्हा झोपी गेलो.

सकाळी जागा झालो. नानांनी नाष्टा दिला. आई, काका, वहिनींना नमस्कार करून मी माडीवर गेलो. रमेश महाराज शांतपणे विडी ओढत बसले होते. कोल्हापूरला कामावर जाणे आवश्यक आहे, असे महाराजांना सांगितले. त्यांनीही मला ये म्हणून निरोप दिला. एवढ्यात मला रात्रीचे स्वप्न आठवले व मी त्यांना म्हणालो, "महाराज मी संकष्टीचा उपवास करू का?" त्यावर ते म्हणाले, "संकष्टी करून कशाला संकटात पडतोस? संकष्टी करू नकोस." "बरं" म्हणून मी व काटकर तात्यांनी त्यांचा निरोप घेतला.

दिवसभर येणारे विचार हेच अंतर्मनामुळे स्वप्न सृष्टीत येतात. स्वप्न आणि स्वप्नसृष्टी आपोआपच नाहीशी होत असते. स्वप्नातील आपल्या कल्पना, इच्छा मनाने निर्माण केलेली सृष्टी हा एक आभासच असतो. स्वप्न, स्वर्ग, मृत्यु, पाताळ जोडू शकतात. ती मायेपासून निर्माण झालेली असतात. परंतु जागृत जीवन व स्वप्नावस्थेमधील विषमता ही संत पुरुषच जाणू शकतात आणि त्यावर हुकमत गाजवत असतात. गोंधळून गेलेल्या, व्याकूळ झालेल्या,

परमेश्वर दर्शनासाठी धावत असलेल्या अशा साधकांना संत हे दीपस्तंभ असतात.

वास्तविक आता चार पाच वर्षाच्या पूर्वपरिचयानंतरही रमेश महाराजांचे अनेक चमत्कार समजूनही त्यांचे विस्मयकारी जीवन मला स्थिर ठेऊ शकले नव्हते. ना मला त्यांनी दीक्षा दिली होती, ना मंत्र, ना नाम. त्यामुळे लौकिकदृष्ट्या मी त्यांचा शिष्य नव्हतो. अधून मधून हा विषय माझ्याही मनात येई, पण माझी मात्र त्यांच्यावरील श्रद्धा देवापेक्षा जास्त होती. कधी ते म्हणत तू माझा भाऊ आहेस. तर कधी कधी माझ्या आध्यात्मिक साधनेसाठी विचार रत्ने पेरत. तर कधी कधी बरं का बजू. अमूक अमूक घटना अगोदर घडणार बघ असे बोलत. त्यांच्या साध्या भाषेत भविष्यवाणी दडलेली असे. याचा प्रत्यय मला लवकरच दोन महिन्यात आला.

प्रसंग असा श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज, शिर्के यांच्या दत्त मंदिरात कडेपाट करण्याचे ठरले. एक दिवस अचानक श्री. आनंदराव मंडले यांचेकडून बाळासाहेब शिर्के, रघु सुतार यांनी दिलेल्या मोजमापाप्रमाणे लाकूड तयार आहे, असा निरोप मला आला. मी आता मिरजेहून कोल्हापूरला श्रीदत्त मठीत लाकूड पोहोच करण्याच्या तयारीला लागलो. परंतु आर्थिक परिस्थिती अत्यंत प्रतिकूल. मग मी सद्‌भक्त श्री. तानाजीराव घोरपडेंना भेटलो. त्यांचे ट्रॅक्टर ठरवले. एका रविवारी दोन प्रहरी सर्व लाकूड सामान, बरगे वगैरे ट्रॅक्टरमध्ये भरले.

कवठेमहांकाळचे माजी आमदार स्व. विठ्ठल दाजी पाटील यांचे चिरंजीव स्व. संभाजी पाटील यांना मोटर सायकल घेऊन बोलावले. मिरजेतून ट्रॅक्टर तीन वाजता सोडले. आम्ही सहा वाजता जावा मोटर सायकलवरून कोल्हापूरला श्रीदत्त मठीत पोहोचलो.

मे महिना उन्हाळ्याचे दिवस. ट्रॅक्टरमधील सर्व लाकूड, साहित्य, बरगे रघु सुतारना घेऊन मठात व्यवस्थित लावून घेतले. सूर्यास्ताची आरती केली. स्व. बाळासाहेबांनी आम्हांला खडी साखर, पेढे प्रसाद दिला. चहा घेतला आणि परतीच्या प्रवासाला लागलो. ऊसाच्या फडातून कोल्हेकुई ऐकू येत होती. काजवे चमकत होते. कोल्हापूर आता बरेच मागे पडले होते. चांदणेही पडू लागले होते. आमची जावा मोटर सायकल रस्त्याच्या मध्यभागाने चालली

होती. एवढ्यात पाठीमागून पांढऱ्या रंगाची एक ॲम्बॅसिडर आली. संभाजी पाटील यांनी मोटर सायकल बाजूला घेतली व ती गाडी पुढे निघून गेली. पण पॅचवर्क चालल्याने कडेला ठेवलेल्या मोठ्या दगडाला मोटार सायकलचे चाक जोराने थटले व अपघात झाला. रात्र असल्याने नेमके काय झाले हे कळेना. मोठ्या आवाजाने आसपासच्या वस्तीवरील लोक गोळा झाले. मी पडलो. संभाजीही पडला. काही कळत नव्हते. माझा श्वास थांबला होता. शरीर दगडासारखे बधिर झाले होते. घाबरल्यामुळे हात-पाय थंड झालेले. कितीएक मिनिटे माझे डोळे बंद होते. मी घाबरलो होतो. इतक्यात आमच्या दोघांच्या तोंडावर त्या खेडूतांनी पाणी मारून उठवून बसवले. मला मुक्का मार जास्तच लागला होता. दात ओठात घुसले होते. पण माझ्यापेक्षा संभाजीला जास्त लागल्याची भीती वाटत होती. तो आमदारांचा मुलगा होता. पण तो लागलीच उठून बसला. त्याला विशेष काही लागले नव्हते. मोटार सायकलचे पुढील चाक दगडाला थटताच व पुढे पूल दिसल्याने संभाजीने मोटर सायकलच हातातून सोडून दिली होती. मोटर सायकल पुलावरून खाली कोसळल्याने मोठा आवाज झाला होता.

वस्तीवरील त्या बिचाऱ्या लोकांनी पुलाखालून मोटार साइकल वर आणून ठेवली. आम्हाला आधार दिला. धीर दिला. इतक्यात तानाजी घोरपडे ट्रॅक्टर घेऊन मागावून आला. तोही घाबरलेला. सर्वांनी मिळून मोटर सायकल ट्रॅक्टरच्या ट्रॉलीत ठेवली. त्या खेडूतांचे मनापासून आभार मानून आम्ही निघालो. मिरजेत रात्रीचे अकरा वाजता पोहोचलो. एकमेकांची चौकशी झाली. संभाजी पाटील पुन्हा मोटर सायकलनेच त्यांच्या घराकडे निघाले. तानाजी घोरपडे ट्रॅक्टर घेऊन म्हैशाळला निघून गेले. मी मिरज मठीत आलो. माझ्या आयुष्यातील हा पहिलाच अपघात. मन घाबरून गेले होते. विषण्ण झाले होते. पण आता पहाट होणार होती. दिवस उगवणार होता. हे मात्र माझ्या व्याकूळ मनाला समजत नव्हते.

दुसऱ्या दिवशी विश्रांती घेतली. मुका मार लागल्याने अंग ठणकत होते. सायंकाळी स्व.आमदार दाजी पाटील यांच्या घरी जाऊन आलो. संभाजी पाटील यांची चौकशी केली. तेही गावाकडे गेले होते. म्हणजे मला जे भय

वाटत होते ते निरर्थक होते. त्यांना किरकोळच मार लागला होता. इतक्यात संभाजी पाटील आले. मी त्यांना विचारले, "संभा, विशेष काही मार लागला काय?" त्याने उत्तर दिले. "मार तर लागलाच नाही, परंतु मोटर सायकल माझ्या हातून सुटली हे समजूनच आले नाही. मोटर सायकल हातातून सोडून देऊन मी उभा राहिलो एवढंच आठवतं. गाडीचेही फारसे नुकसान नाही. फक्त मोटर सायकलचा हेड लाईट फुटला आहे. बाकी काही नाही," हे सारं संभानं हसतमुखानं सांगितलं, मी सुखावलो. मनातल्या श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे आभार मानले. यासाठी की आयुष्यातील पहिल्याच अपघात प्रसंगातून त्यांनी आम्हांला बाहेर काढले होते. तरीही माझे एक मन म्हणत होते, महाराजांच्या मठीचे काम. एकाचे ट्रॅक्टर, एकाची मोटरसायकल, बरं मठीत आरतीही चुकवली नाही, असे असताना अपघात झालाच कसा? आमची चूक? खरं तर अपघात व्हायलाच नको होता. असा उलट सुलट विचार करीतच गेलो. त्या दिवशी रात्री मला गाढ झोप लागली. आणि माझ्या कानावर शब्द आदळायला लागले. कुणावर रुसतोस? तुझे लक्ष आहे काय? तुला संकष्टी सोडून जायला सांगितलं होतं. कुठल्या भ्रमात आहेस? हा धीर गंभीर आवाज फुटला होता. काय करावे हेच मला सुचेना. कसले स्वप्न, काय तो आवाज, घाबरलेल्या अवस्थेत अंथरुणावर उठून बसलो. पूर्ण जागा झालो. मी उठून कॅलेंडर पाहिले आणि काय आश्चर्य मी ज्या दिवशी कोल्हापूरला लाकूड, बरगे आदी साहित्य घेऊन गेलो होतो आणि अपघात झाला होता तो दिवस अंगारकी संकष्टीचा होता. मला आता अक्कोळला मुक्कामाला असतानाचे स्वप्न आठवले. स्वप्नातच मला रमेश महाराजांनी सांगितले होते, "जातोस तर जा, संकष्टी सोडून जा कोल्हापूरला.'' परंतु मी हे विसरून गेलो आणि ''संकष्टी सोडून जा." याचा अर्थ संकष्टीचा उपवास सोडून (जेवण करून) जा, असा घेतला होता. परंतु माझेच मन स्थिर नसलेने, लक्ष नसलेने, विसरल्याने हा अपघात घडून आला होता.

आता माझ्या डोळ्यांत आसवं गोळा झाली होती. माझ्या मनाला तीव्र वेदना झाल्या होत्या. मन भरून आलं होतं. अध्यात्म मार्गात मी पूर्ण स्थिर नसल्याने हा अपघात घडून आला होता. अंथरूणावरून उठून मी श्रीकृष्ण

सरस्वती दत्त महाराजांच्या तसबिरीपुढे हात जोडून उभा राहिलो. त्या जागी डोळे दिपवून टाकणारा प्रकाश पडला होता. मनोमन मी महाराजांची क्षमा याचना केली. तसेच रमेश महाराजांची क्षमा याचना केली. रात्रीचे दोन वाजले होते. पुन्हा अंथरुणावर पडून राहिलो. रमेश महाराजांनी यापूर्वी चमत्कार करून दाखवले होते. त्यात त्यांनी याबाबत कधीही अहंकार दाखवला नव्हता. अनेक माणसांना चमत्कार दाखवून व्याधी मुक्त केले होते. शाश्वत स्वरूपाचे चमत्कारही त्यांनी बरेच केले होते.

मला आठवले, अक्कोळला त्यांच्या शेजारी स्व. आण्णासाहेब कुलकर्णी (चिटणीस )यांचा वाडा आहे. स्व. आण्णा हे श्रीक्षेत्र पंत बाळेकुंद्री येथे चिटणीस होते. त्यांचे बंधू श्री. कृष्णाजी कुलकर्णी (आप्पा डॉक्टर) हे अक्कोळ वाड्यातच राहत. अक्कोळला आले की, श्रीपंत महाराज बाळेकुंद्रीकरांचे वास्तव्य याच वाड्यात होते. एकदा त्यांना रमेश महाराजांनी सांगितले, “आज तुझ्या घरी पंत महाराज बाळेकुंद्रीकर जेवायला येणार आहेत?” यावर श्री. कृष्णाजी कुलकर्णी यांना रमेश महाराज काय बोलताहेत हेच कळेना. हे साल अंदाजे १९७५-७६ असावे. अजून रमेश महाराजांचा नावलौकिक झाला नव्हता. तरीही रमेश महाराज पुन्हा एकदा कृष्णाजी कुलकर्णींना म्हणाले, “श्रीपंत आज तुझ्याकडे भिक्षेला येणार आहेत. देवघरात पाटावर चांदीच्या वाटीत दूध ठेव. रात्रभर जागा राहा. झोपू नको.” श्री. कृष्णाजी कुलकर्णी यांनी त्या दिवशी तसेच केले. लाकडी पाट स्वच्छ धुवून घेऊन, चांदीच्या वाटीत दूध ठेऊन ते जागत बसले.

मध्यरात्र झाली. श्री.कृष्णाजी कुलकर्णींना झोप येऊ लागली. तरी ते बळे बळेच जागे राहू लागले. शेवटी त्यांना झोप लागलीच. काही वेळाने त्यांना अचानक जाग आली आणि त्यांनी पाहिले. लख्ख प्रकाश पडला होता. एक प्रकारचा सुगंध दरवळत होता. श्रीपंत महाराजांनी त्या दुधाच्या वाटीला स्पर्श केला होता. दुधाच्या वाटीला स्पर्श करणारा हात व अंगावरील करवत काठी धोतराचा काठ स्पष्टपणे श्री.कृष्णाजी कुलकर्णींनी पाहिले. ते स्तब्धच राहिले. घाबरून गोंधळून गेले. काय करावे हे त्यांना सुचेना. नि:शब्द वातावरण, कधी एकदा रमेश महाराजांना भेटेन असे झाले होते.

सकाळ होताच श्री. कृष्णाजी कुलकर्णी रमेश महाराजांना भेटले. रमेश महाराजांनी त्यांच्याकडून त्या पाटाची यथासांग पूजा करून घेतली. अभिषेक करून घेतला आणि काय आश्चर्य त्या लाकडी पाटावर सुरेख अशी श्रीपंतांची-दत्ताची पावले उमटली होती. सर्वांना आनंद झाला. हा चमत्कार बघायला गावकरी येऊ लागले. जमू लागले. अगदी साधे दिसणारे, वाटणारे रमेश महाराज सर्वांना अत्युच्च असे नित्य, संत महात्मे वाटू लागले. मीसुद्धा हा पाट पाहिला होता. त्यावरील गुरु पावले पाहिली होती.

तथापि, माझी या मार्गावरील वाटचाल मंद आणि शंकेने चालू होती. त्यांच्या ईश्वरी स्वरूपाचे मला आकलन झाले नव्हते. त्यांच्या अगाध ज्ञानाची माहिती, गूढ स्वभावाचे आकलन झाले नव्हते. अनेक विस्मयकारी चमत्कार पाहिले होते. परंतु पूर्णपणे मी अजून त्यांच्या पायांशी शरणागत नव्हतो. पण या स्वप्नाच्या अनुभवाने मी त्यांचा गुलाम झालो होतो. या प्रसंगाने मला त्यांच्या अपरिमित ज्ञानाची, आंतरिक स्वानुभवाची प्रचिती आली होती. एकदा प्रगल्भ ईश्वरीदूताचा सुगम मार्ग मला दिसून येत होता.

आता रात्र संपली होती. दिवस उजाडला होता. मी श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या तसबिरीची मनोमन पूजा करीत होतो. रात्रीचे स्वप्नही आठवत होतो. पण मनाचा गोंधळ संपलेला नव्हता. रमेश महाराजांनी स्वप्नात संकष्टी सोडून जा याचा अर्थ मी वेगळाच घेतला होता. माझ्या या अस्थिर विचारामुळे अपघात घडला. मी महाराजांवर रुसू पाहत होतो. एवढेच नव्हे तर दुसरे स्वप्न मी काटकर तात्यांचे १३५ रूपये येणे होते. त्याचासुद्धा नंतर उलगडा झाला. संभाजी पाटलांच्या मोटर सायकलच्या हेडलाईटचा खर्च १३५ रुपयेच आला. आश्चर्यच तसे होते. रमेश महाराजांच्यासारखे नित्य जागृत संत सहवास होता. म्हणून मी माझ्या जीवनशक्तीवर आघात होवूनसुद्धा माझे मन पूर्ण साक्षात्काराकडे परमतत्त्वाकडे वळत राहिले. स्वप्नातूनसुद्धा आपल्या माणसांची काळजी घेणारे, भविष्य वर्तवणारे, भविष्य घडविणारे रमेश महाराज हे मोठ्या मनाचे थोर संत होते. ते कायम दुसऱ्यांना मोठेपणा देत असत. आध्यात्मिक क्षेत्रात हा गुण दुर्मिळ होत चालला आहे. या अनुभवापासून मी श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज व रमेश महाराजांना एकच मानू लागलो. माझी त्यांचेवरील श्रद्धा वाढतच चालली.

महिन्याच्या दुसऱ्या, चौथ्या शनिवारी आणि रविवारी अशा सुट्ट्यांना अक्कोळला जाणे, कोल्हापूर कार्यालयात असताना दररोज २ ते २.३० च्या सुटीत शिर्के मंदिरातील दर्शन असा आखीव कार्यक्रम असे.

जरी माझे कार्यालय कोल्हापूरला असले तरी कार्यालयाची कामे मात्र चांदोली धरणावर होती. त्यामुळे अधून मधून स्व. वि. व्यं. जोशी या आमच्या वरिष्ठांबरोबर चांदोलीला दप्तर तपासणीला जाणे, तसा कामाचा व्याप प्रचंड होता.

आता १९७८ साल उजाडले. माझ्या खात्याच्या परीक्षेचा **( L.G.C.)** विषय आला. या परीक्षेचे म्हणजे लोअर ग्रेड क्लार्क परीक्षेचे ट्रेनिंग ताराबाई पार्कला कार्यालयीन वेळेत जलसिंचन भवनात चालू झाले. ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पुढती बढती असे. होता होता परीक्षा आली. प्रशिक्षण संपले. परीक्षेसाठी मी, माझे मित्र श्री. मोहन रेमणे, नाडगौंडा वारणा कॉलनीतच राहिलो.

एक दिवस नेहमी प्रमाणे श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या समाधी दर्शन घेऊन पुढारी कार्यालयाजवळील स्वामींच्या खानावळीत जेवायला निघालो होतो. एवढ्यात एका रिक्षातून शिव्यांचा भडिमार, बोलण्याचा मोठा आवाज ऐकू येऊ लागला. रिक्षा जोरात होती. रस्त्यावर वर्दळही कमी होती. आम्ही खानावळीजवळ आलो. एवढ्यात रिक्षा फिरून आमच्याजवळ आली आणि काय आश्चर्य, या रिक्षात परमहंस चिले महाराज होते. त्यांचे मी दर्शन घेतले. माझ्या मित्रांनीही घेतले. शिव्यांचा भडिमार, जोराचे बोलणे, मोठ्याने बोलणे नव्हते. त्यांनी मला शांतपणे विचारले, "काय दादांच्याकडे गेला होतास काय?" मी "होय" म्हणून पुन्हा एकदा दर्शन घेतले. रिक्षा सुरू झाली. पुन्हा शिव्यांचा भडिमार चालू झाला. श्री. रेमणे व श्री. नाडगौंडांना हा प्रकार नवा होता. मी त्यांना चिले देवांच्या विषयी सर्व काही सांगितले. स्वामींच्या खानावळीत दहा रुपयात पोटभर जेवण करून आम्ही कॉलनीत परतलो. श्रीचिले देवांनी आम्हांला आदल्या दिवशीच प्रसाद दिला होता. त्यांच्या आशीर्वादाने आम्ही तिघेही उत्तम गुणांनी उत्तीर्ण झालो.

आता मला कोल्हापूरात कंटाळा येत चालला होता. त्यातच माझ्या

वडिलांची तब्येत बिघडत चालली होती. त्यांना किडनीचा त्रास चालूच होता. माझ्या पगारात घरखर्च भागत होता, पण दवाखान्याचा खर्च वाढत होता. यातच  दि. १४/१२/१९७७ ते ५/२/७८ या कालावधीत राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचा संप झाला. एकूण ५४ दिवस संप झाला. या संपाच्या काळात रमेश महाराजांच्या बरोबर त्यांचे एक शिष्य श्री. बाळ कोरगावकर यांच्या सावंतवाडीच्या घरी गेलो. मुक्काम केला. ते नुकतेच शेगावला जाऊन श्रीगजानन महाराजांचे दर्शन घेऊन आले होते. तेथील सगळी माहिती त्यांनी आम्हाला दिली.

दुसऱ्या दिवशी आम्ही माणगावला जावून श्रीटेंबे स्वामींच्या मंदिराचे दर्शन घेतले. त्यांचे जन्मस्थान व त्यांच्या तपाची गुहा पाहिली. दानोलीला साटम महाराजांचे दर्शन घेऊन दुसऱ्या दिवशी अक्कोळला मुक्कामाला आलो.

संप काळात मी अक्कोळहून बेळगावला गेलो. तेथे रमेश महाराजांच्या बहिणी माणिकताई, शालुताई कालकुंद्री या रामदेव गल्लीत राहात होत्या. त्यांची मुले मिलिंद, मनीषा, संगीता, संतोष, श्रृंगार तर मेहुणे बोधराव, राजाभाऊ हे होते. ही सर्व मंडळी प्रेमळ माणसं होती. बेळगावला गेलो की, याच परिवारात मुक्काम करीत असे. बोधरावांची सराफी पेढी होती. तर राजाभाऊंचे कापड दुकान होते.

श्रीक्षेत्र मुरगोडला (केंगरी) श्रीशिव चिदंबर स्वामींचे दर्शन घेऊन, श्रीपंत बाळेकुंद्रीला दर्शन घेऊन तेथेच मुक्काम केला. आईसाहेबांनी मार्ग दाखवल्यापासून पौर्णिमा ते पंचमीपर्यंत मी प्रत्येक महिन्याला श्रीक्षेत्र बाळेकुंद्री, श्रीक्षेत्र मुरगोड येथे जात असे. बारा वर्षे हा नियम पाळला अर्थात या स्थानाचे आशीर्वाद माझ्या पाठीशी होते म्हणून तर हे शक्य झाले. माझी परिस्थिती वेगळी, बिकट अडचणीची असूनही हे घडले.

बेळगावात मुक्काम असला की बोधराव काळकुंद्रींचे आतेभाऊ स्व. वसंतराव कुलकर्णी कणबर्गीकर यांच्या घरीही भेट देत असे. स्व. वसंतराव त्यांच्या धर्मपत्नी स्व. छाया काकू, अरुण, सुरेश, मीरा असा तो परिवार होता. सारी मायेची माणसं आणि श्रीचिदंबर महास्वामींचे भक्त, स्वामींची आराधना ही त्या परिवाराची वैशिष्ट्ये होती. ते वैष्णव होते. त्यांच्या घरी श्रीशिव चिदंबर

स्वामींची तसबीर होती. त्या तसबिरीतून भस्म येत असे. तसेच राघवेंद्र स्वामींच्या तसबिरीतूनही भस्म येत असे, हा एक विस्मयकारक चमत्कार होता.

स्व. वसंतराव हे त्यावेळी विजापूरला आर.टी.ओ. ऑफीसमध्ये वरिष्ठ अधिकारी होते. तर स्व. छायाकाकू त्याकाळी महिन्यातून एकदा बेळगाव ते मुरगोड पायी चालत वारी करीत असत. त्यावेळी बेळगावला श्रीशिव चिदंबर भक्त मंडळ स्थापन झाले होते. हे मंडळ श्रीशिवचिदंबर महास्वामींचे शिष्य दास राजाराम महाराज यांच्या मूळ गावी बाभूळगाव गंगाला (जि. नाशिक) जाणार होते. तेथून शिर्डी, शिखर शिंगणापूर, गोंदवले, नाशिक, त्र्यंबकेश्वर असा प्रवास-दर्शनासाठी आखण्यात आला होता. स्व. छायाकाकूंना मी भेटण्यास गेलो, तेव्हा त्यानीच मला ही माहिती दिली. त्यासाठी माणशी दोनशे रुपये खर्च आहे, तुम्हीही यावे अशी विनंती मला केली. पण एवढा खर्च करण्याची ऐपत नव्हती. तरी पण मी यात सामील झालो. प्रवास सुरू झाला.

श्रीदास राजाराम महाराजांचे बांभूळगावगंगा हे श्रीरामपूरापासून ३० मैल अंतरावर गोदावरी नदीकाठी आहे. गढीवजा आहे. तेथे श्रीशिव चिदंबर महास्वामींचे मंदिर आहे. त्या मंदिराची देखरेख व्यवस्था दास राजाराम महाराजांचे वंशज रजपूत परदेशी करत. तेथे मुक्काम केला. भजन, दर्शन करून शिर्डी, नाशिक, शिखर शिंगणापूर, गोंदवले, गाणगापूर अशा तीर्थक्षेत्रांचे दर्शन घेऊन आठ दिवसांनी बेळगावला परतलो.

संपाला पंधरा दिवस झाले होते. अजून संप मिटलेला नव्हता. पुढे पंधरा दिवसात स्व. वसंतकाका, स्व. छायाकाकू या मदिहाळ (धारवाड) येथील श्रीशिव चिदंबर स्वामींचे वंशज स्व. बापू दीक्षित यांना घेऊन मिरजेला आल्या. येताना बापू दीक्षितांनी श्रीशिव चिदंबर महास्वामींच्या पादुका व गिंडी (स्वामींनी वापरलेले अक्षय पात्र) आणले होते. दीक्षितांची माझ्या चंद्रमौळी घरात राहण्याची सोय करणे योग्य नव्हते. श्री.सतिशभाई शहा यांच्या बंगल्यावर त्यांच्या राहण्याची सोय केली. महाप्रसाद करण्यात आला. मिरजेतील सर्व भक्तांनी या पूजेचा, दर्शनाचा, महाप्रसादाचा लाभ घेतला. तिसऱ्या दिवशी स्व.वसंतकाका, स्व.छायाकाकू, बापू दीक्षित यांना घेऊन नृसिंहवाडीला गेलो. तेथे श्रीदर्शन घेऊन वर येताच श्रीचिले महाराजांचे दर्शन झाले. हा आनंदाचा

क्षण होता.

संप ५४ दिवस चालला. या संप काळात मी रोज एका क्षेत्री जात असे. माझे पूर्व भाग्य उजाडण्याचा तो काळ होता. दरम्यानच्या काळात मी पुन्हा बेळगावला गेलो. नेहमीप्रमाणे श्रीपंत दर्शन, श्रीशिव चिदंबर दर्शन घेऊन केळकर बागेतील स्व. छायाकाकूंच्या घरी गेलो. पण घर बंद होते. चौकशी करता हे कुटुंब पंढरपूरला विठ्ठल दर्शनाला गेले होते. त्या दिवशी कालकुंद्रीच्या घरी मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी सकाळी अकरा वाजता ही मंडळी पंढरपूरहून परत आली. घरातील नित्यकर्मे आटोपून बैठकीच्या खोलीत ते बसले होते. मी श्रीशिव चिदंबर महास्वामीजी व राघवेंद्र स्वामी यांच्या तसबिरीचे दर्शन घेऊन त्यांच्या बरोबर बोलत बसलो. कांदा पोहे, चहा वगैरे झाला. मी सहज स्व. छायाकाकूंना बोलता बोलता विचारले "काकू, माझ्यासाठी पंढरपूरहून काय आणले?" त्यावर हसत हसत त्या म्हणाल्या, "महाराज पंढरपूराहून मी काय आणणार! ही तुळशीची माळ आणली आहे. ही घ्या तुम्हांला." असं म्हणाल्या. त्यांनी तुळशीची माळच माझ्या हाती दिली. क्षणभर काय घडले हे कळेना आणि काय करावे हेसुद्धा कळेना.

आध्यात्मिक क्षेत्रात ज्या अष्टसिद्धीची चर्चा होते त्या मला पूर्वीच, पूर्वभाग्याने श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे कृपेने मिळाल्या होत्या. भूत, भविष्य आणि वर्तमान मला काहीसं समजू लागलं होतं. परंतु आता मला या सर्वांचा त्याग करावा लागणार होता. पंढरपूरची तुळशीची माळ गळ्यात घालणं हे वैष्णवाचं मुख्य लेणं. माळकरी-वारकरी संप्रदायात शुद्ध भक्तीलाच महत्त्व आहे. मी ही न विचार करता स्व. छायाकाकूंनी स्वहस्ते दिलेली तुळशीची माळ गळ्यात घातली आणि पंढरीच्या पांडुरंगाच्या आनंदवारीला लागलो. माझ्या घराण्यात माझी आजी, आई वारकरी नव्हत्या पण वडील मात्र माळकरीच होते.

माझ्या आजीचे लोक जेव्हा केकल्याहून पंढरपूरला जात, तेव्हा ते आमच्या घरी मुक्काम करीत. या सर्वांचे जेवण-राहण्याची व्यवस्था माझे वडील आनंदभावाने करीत. आमच्या घराण्याचे दैवतच पंढरपूरचे श्रीविठ्ठल होते आणि आज मीही माळ घातली होती. ती स्व. छायाकाकूंच्या हातची.

ना कोणत्या फडावर, ना गुरूंकडून, ना महाराजांच्याकडून, ना माऊलीकडून, माझ्या आजीने किंवा आईने माळ घातली नव्हती. वडिलांनी कोणत्या फडावर माळ घातली होती, हे माहीत नाही. दर पंधरावड्याच्या एकादशीचे व्रत आमच्या घरी होते. एकंदरीत संपाच्या ५४ दिवसात माझ्या हातून बराच देवधर्म झाला. संत-सज्जन संगती घडली हे माझे सर्व पूर्वभाग्य होते.

सुट्टीच्या दिवशी मी डॉ. आर. बी. कुलकर्णी (येडूरकर) यांच्या घरी जात असे. मी न्यू अशोक मेडिकलमध्ये कामाला असल्यापासूनचा त्यांचा परिचय होता. ब्राह्मणपूरीत खाडीलकर बोळात त्यांचा वाडा होता. वाड्यात श्रीदत्तात्रेयांचे स्थान होते. प्रेमळ कुटुंब, डॉक्टरांच्या आई, मंडळी पुष्पाताई, मुलगा डॉ. रवी कुलकर्णी, मुलगी डॉ. शुभांगी असा हा कुलकर्णी परिवार. स्व. आजी या चिमड संप्रदायातील थोर सत्पुरुष अंबूराव महाराजांच्या दीक्षित शिष्या होत्या. मी जेव्हा त्यांच्या घरी जाई, तेव्हा त्या ओट्यावर जप करीत बसलेल्या दिसत. त्यांची कटाची साधना होती. एके दिवशी आजी मला म्हणाल्या, "महाराज, तुम्ही एकादशी का करत नाही." त्यावर मी त्यांना म्हणालो "आजी, मी रोज एक गाव फिरणार, नोकरीमुळे बाहेरगावी जावे लागणार, फराळाचं मला कोण करून देणार?" यावर त्या म्हणाल्या, "आज एकादशी आहे. हात धुवून फराळाला बसाच." विशेष म्हणजे मी त्या दिवशी सकाळपासून काहीच खाल्ले नव्हते. तेव्हापासून मी आजींच्यामुळे एकादशीव्रत करू लागलो आणि एकेक पाऊल विठ्ठल भक्तीकडे वळू लागले. स्व. पुष्पावहिनी त्रिपुरा पौर्णिमा १९८५ रोजी अल्पशा आजाराने स्वर्गवासी झाल्या, तर आजी वैकुंठ चतुर्दशी दि. १९/११/१९९८ रोजी वयाच्या ८५ व्या वर्षी स्वर्गवासी झाल्या. आजही या घराण्याशी माझे ऋणानुबंध रेशीम धाग्यासारखे आहेत. डॉ. आर. बी. कुलकर्णी यांचे सर्व कुटुंब गुळवणी महाराज यांचे दीक्षित शिष्य आहे. त्यांच्या घरी श्रीगुळवणी महाराज, अवधूत स्वामी आदी सत्पुरुष येत असत.

दि. ५/२/१९७८ रोजी ५४ दिवसांचा संप मिटला होता. आता मी कामावर हजर झालो होतो. संपाच्या ५४ दिवसाच्या कालावधीत बरीच कामे प्रलंबीत होती. प्रत्येक विभाग कामाला लागला. दोन महिन्याचे अकौंट तयार करून महालेखापाल नागपूर यांच्या कार्यालयात देण्याची जबाबदारी माझ्यावर

टाकण्यात आली. अकौंट घेऊन मी नागपूर एक्सप्रेसने कोल्हापूरहून नागपूरला निघालो. गाडीला गर्दी नव्हती. दौंड-मनमाडच्या पुढे आमच्या डब्यात एक गृहस्थ चढले. त्यांचे नाव होते नाईक. मी वाचत असलेले गोंदवलेकर महाराजांचे पुस्तक त्यांनी मागून घेतले. त्यांचा माझा परिचयही झाला. दुसऱ्या दिवशी नागपूरातील त्यांच्या नाईक गल्लीतील घरात गेलो. स्नान वगैरे आटोपून त्यांच्या शेजारच्या श्रीसंत गुलाबबाबांच्या आश्रमात गेलो. योगायोगाने श्रीसंत गुलाबबाबांचे मला दर्शन लाभले. मी धन्य झालो. श्री. नाईक मला महालेखपाल कार्यालयात घेऊन गेले. तेथे अकौंट देऊन पोहोच घेतली आणि नाईकांनी श्रीक्षेत्र कारंजा (लाडाचं) येथे जाण्यासाठी बसमध्ये बसवलं. श्री. नाईकांचे आभार मानले. श्रीक्षेत्र कारंजाला मी सायंकाळी पोहोचलो. श्रीनृसिंह सरस्वतीचे जन्मस्थान घुडेवाडा पाहिला. गुरु मंदिर पाहिले. मंदिरात नुकतेच सुधारणेचे काम सुरू होते. गर्दी नव्हती. वातावरण शांत होते. अकोला, कारंजा करून श्रीक्षेत्र शेगावला श्रीगजानन महाराजांच्या दर्शनाला निघालो. बाळापूरला आलो. रात्रीचे नऊ वाजले होते. श्रीक्षेत्र शेगावची गाडी चुकली होती. बाळापूरला एका लॉजवर मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून श्रीक्षेत्र शेगाव गाठले. गर्दी नसलेने श्रीगजानन महाराजांचे डोळ्याचे पारणे फिटेपर्यंत दर्शन झाले. मन प्रसन्न आणि शांत झाले. दोन प्रहरी पिठलं भाकरीचा प्रसाद घेतला आणि पुन्हा श्रीदर्शन घेतले. आशीर्वाद घेऊन माहूरगडला जायचे ठरवले पण श्रीगजानन महाराजांच्या कृपेने मी नागपूर-कोल्हापूर एक्सप्रेस पकडली. शेगावहून दोनप्रहरी दोनला महाराष्ट्र एक्सप्रेस निघाली. दुसऱ्या दिवशी एक वाजता मिरजेला पोहोचली. या प्रवासात मला कणकण वाटली. तब्येत बिघडली. नेमकं काय होतंय हे कळले नाही. मी घरी पोहोचलो.

मी दिसताच घरातील सर्वांना आनंद वाटला. ते फार घाबरलेले दिसत होते. मी ज्या दिवशी शेगावला पोहोचलो, त्या दिवशी सकाळी आमच्या चंद्रमौळी घराच्या एका भागाला आग लागली होती. ज्या गादीवर श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांची तसबीर पुजली जात असे, ती गादी, लोड, लाकडी, टीपॉय जळून गेले होते. इतर देवतांच्या तसबिरीही जळून गेल्या होत्या. हे दुचिन्ह होते. त्यामुळे माझ्या जीवाला काही तरी धोका झाला असावा, अशा

विचाराने माझे आई-वडील घाबरून गेले होते. दोन दिवस ते जेवलेही नव्हते. मी सुखरूप पोहोचलो हे पाहताच त्यांना हायसे वाटले. त्यांच्या तोंडून सगळी हकीगत ऐकली. माडीवर गेलो. श्रींची गादी, तक्क्या, पूजेची वस्त्रे, धार्मिक पुस्तके जळून गेली होती. श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांची रंगीत तसबीर जी मी पहिल्यांदा चार वर्षापूर्वी स्थापन केली होती तिला आगीची झळ लागून खराब झाली होती. काय करावे हे सुचेना. अश्रू दाटून आले. डोळ्यांतून ते पडू लागले. थोडा वेळ तेथेच शांत बसून राहिलो. स्नान वगैरे करून आगीच्या झळीने खराब झालेली तसबीर, अर्धवट जळालेली धार्मिक पुस्तके, पुजेची वस्त्रे हे सारे कृष्णानदीच्या पात्रात जड अंत:करणाने विसर्जित केले. जड अंत:करणाने घरी आलो. बराच वेळ जागा होतो. माझा जीव की प्राण असलेली श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांची तसबीर का जळाली? गादी का जळाली असेल? आपली कोणती चूक असेल? श्री सेवेत तर मी कमी पडत नाही ना? असे अनेक प्रश्न आवर्जून माझ्यासमोर उभे होते. श्रीक्षेत्र शेगावला श्रीगजानन महाराजांच्या दर्शनाला गेलो असल्यामुळेच मी वाचलो असेन का? असे प्रश्नांचे वादळ मनात आले होते. मन स्थिर नव्हते. मला तापही आला आणि कणकण वाढली. भीतीने चिंताग्रस्त होऊन रात्र त्याच विचारात काढली.

दुसऱ्या दिवशी उठून कोल्हापूर कार्यालय गाठले. महालेखापाल नागपूर यांना अकौंट दिल्याचे पोहोच पत्र देऊन मी शिर्के दत्त मंदिर गाठले. साश्रू नयनाने श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे दर्शन घेतले. झालेल्या घटनेतून वाचविल्याबद्दल लोटांगण घालून ऋण मानले. दुपारची आरती सुरू झाली.

आरतीनंतर पुण्यश्लोक माईसाहेब शिर्के, बाळासाहेब शिर्के यांना भेटून श्रींची तसबीर जळाल्याची घटना कानावर घातली. त्यांनी मोलाचा आधार, अभय आणि प्रेमाने सल्ला दिला. नवीन श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांची तसबीर, अंगारा, खडीसाखरेचा प्रसाद दिला. त्याचदिवशी पुन्हा श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या तसबिरीची माझ्या चंद्रमौळी घरात स्थापना झाली. पुन्हा एकदा मला जीवनाची नव्याने उभारी न जाणे, हा न दिसणारा मार्ग काय आहे? आणि कोठे पोहचवणार आहे? असं वाटलं.

आता तब्येत बिघडली होती, तरी अक्कलकोटला सकाळी गेलो.

आतासारखी तेव्हा गर्दी नव्हती. श्रीस्वामी समर्थांचे दर्शन घेऊन रात्री परत आलो. दुसऱ्या दिवशी डॉ. मधुकर म्हेत्रेंना तब्येत दाखवून औषध घेतली. दोन दिवस विश्रांती घेतली. अशक्तपणा खूप आला होता.

रमेश महाराज मिरजेला येऊन शिवाजी क्रीडांगणाजवळील श्री.देशपांडे यांच्या भाग्यश्री लॉजवर उतरल्याचे कळले. सायंकाळी भेटायला गेलो. तर रमेश महाराज दोन प्रहरीच अक्कोळला परतले होते. तेथेच शेजारी श्री. वसंतराव भोसले राहत होते. म्हणून त्यांना भेटायला गेलो. सौ वहिनी, आशा, निना, परसबागेत असल्याने हाक दिली. एवढ्यात एका कुत्र्याने माझा चावा घेतला. कुत्र्याच्या या जबरदस्त हल्ल्याने मी जोरात ओरडलो. सौ. वहिनी व मुले बाहेर आली. त्यांनी कुत्र्याला हाकलून दिले. माझे कपडे रक्ताने भिजले होते. कुत्र्याने मांडीचा लचकाच काढला होता. मला चक्कर येऊन भोवळ येऊ लागली. मला थोडा वेळ बसवून, आधार देऊन, चहा देऊन, श्री.वसंतराव भोसल्यांचे जावई श्री.कुमार देसाईंनी मला घरी आणून सोडले. सायंकाळी डॉ. मधुकर म्हेत्रेंना भेटलो. इंजक्शने घेतली. त्याकाळच्या पद्धतीनुसार नगरपालिकेच्या सरकारी दवाखान्यात पुढे तीन दिवस इंजक्शने देण्यात आली. आता माझी तब्येत बिघडत चालली होती. ताप कमी होत नव्हता. जेवण जात नव्हते आणि थकवाही येत चालला होता. पुन्हा डॉ. म्हेत्रेंनी तपासणी केली. मला कावीळ झाल्याचे दिसून आले. मग कावीळीवर औषधं सुरू झाले. गल्लीतूनच एकाकडून बाराक्षारांचे देशी औषध घेतले. विश्रांती चालू होती, पण उत्साह नव्हता.

मी पंधरा एक दिवसांत कोल्हापूरला श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या समाधी दर्शनाला तब्येतीच्या कारणास्तव जाऊ शकलो नव्हतो. माई शिर्केंनी दिलेल्या तसबिरीची पूजा मात्र नियमितपणे मी करीत होतो.

त्यादिवशी सकाळीच माझे एक मित्र स्व. गणपतराव शिरसाट हे तब्येतीची विचारपूस करणेसाठी आले होते. आम्ही तब्येतीची चर्चा करीत गप्पा मारत बसलो असतानाच श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या तसबिरीची काच खळकन फुटली. आम्हा दोघांना थोडं भय आणि आश्चर्य वाटले. मला हि घटनाही दुचिन्हच वाटली. सायंकाळी तसबिरीला नवी काच बसवून आणली आणि पुन्हा पूजा सुरू झाली. परत दोन दिवसांनी तसबिरीची काच पुन्हा

फुटली काय करावे सुचेना. परंतु आपल्यावर मोठे संकट येण्याची चाहूल मला लागून राहिली. रात्री जाधव आक्कांच्या घरी मी आरतीला गेलो. सौ. रतनताईंच्या अंगात श्रीस्वामी समर्थांचा संचार झाला. संचारात त्यांनी माझ्यावरील संकटाची कल्पना दिली. श्रीगोरक्ष किमयागिरी प्रवाह ग्रंथ वाचून नामस्मरण करण्यास सांगितले. फोटो जळाला पण मी नाही जळालो. **भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे** असा आशीर्वाद दिला.

पुढे मी दीड महिना अंथरुणावर पडून होतो. कावीळ अंगात भिनल्यामुळे लवकर बरा होत नव्हतो. औषधे, देशी औषधे उपचार चालूच होते. पण प्रकृतीत फारसा फरक पडणार नव्हता. माझी मित्र मंडळी, गुरुबंधू येत होते. आधार देत होते. रमेश महाराज, वहिनीही येऊन चौकशी विचारपूस केली. काही दिवसांनंतर सर्वांच्या सदिच्छेने, आशीर्वादाने हळूहळू बरा होऊ लागलो होतो. या दीड महिन्याच्या कालावधीत मी बरीच संत चरित्रे वाचून काढली. वाचन एवढाच काय तो विरंगुळा होता. ऑफिस कडूनही वारंवार कामावर येण्याबाबत चौकशी सुरू होती. शेवटी दोन महिन्यानंतर कोल्हापूरला जाऊन शिर्केंच्या दत्त मंदिरातील श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. श्रीफळ, फुले, हार अर्पण करून दर्शन घेतले. त्यांच्यामुळेच माझा पुनर्जन्म झाला होता. डोळे भरून आले. उपकार न संपणारे असेच होते. आज दोन महिन्याच्या सातत्याच्या जपाने त्यांच्या समाधीसमोर नतमस्तक अवस्थेत उभा होतो. माझ्या जीवनाचे तेच आता स्वामी होते. माझं जीवन मी आता त्यांच्या चरणी सेवेला वाहिलं होतं. मी आता त्यांचा गुलाम झालो होतो. वैयक्तिक जीवनाची अभिलाषा, संसार हा विषय मी संपवला होता. पुण्यश्लोक माईसाहेबांचं दर्शन घेतलं. बाळासाहेबांचं घेतलं. मी एका वैराग्य मठीतून वैराग्य घेऊन बाहेर पडत होतो.

दिवस उन्हाळ्याचे होते पण वळवासारखे वातावरण झाले होते. आकाशात ढग जमू लागले होते. जोराचा वारा सुटला होता. ढगांचा गडगडाट ऐकू येत होता. माझ्या जीवनाचा एक नवा प्रवाह सुरू झाला होता. एखाद दुसरा पावसाचा थेंब सुरू झाला.

तीन चार महिन्याच्या प्रदीर्घ विश्रांतीनंतर सुट्टी दिवशी श्री.विलास घोरपडे, श्री. रमेश घोरपडे, श्री. आनंदराव मंडले, श्री.चंद्रकांत कुरणे,

श्री.राजाराम घाटगे यांच्या घरी जाऊ लागलो. पुण्यश्लोक माईसाहेब शिर्केंच्या अमृत हस्ते श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या तसबीरीची स्थापना अनेकांच्या घरी होऊ लागली. अनेक परिवार या आध्यात्मिक गंगापर्वात न्हाऊन निघाली. उदगाव, म्हैसाळ, कृष्णाघाट मिरज, सांगली ही गावं भक्तीमार्गानं दत्तसंप्रदायात पावन झाली. स्व. माईसाहेब शिर्केंना म्हैसाळला यायचे होते. म्हैसाळकर हे श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे भक्त होते. पुण्यश्लोक ताराबाई शिर्केंनी मधुकरी मागण्याच्या निमित्ताने श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज यांच्या घरासमोर बटू स्वरूपात उभे असताना त्यांना ओळखले नव्हते. हा प्रसंग यापूर्वीच उल्लेखला आहे.

लेखक मुजूमदार यांच्या पोथीमध्ये म्हैसाळकरांच्या घराण्याचा उल्लेख पाचव्या अध्यायात करण्यात आला आहे. हे म्हैसाळकर घराणे म्हणजे श्रीमंत केदारराव शिंदे-म्हैसाळकर. ते छत्रपती शाहू महाराजांचे सख्खे मावसकाका होते. शाहू महाराजांच्या अत्यंत जवळचे, पराक्रमी, मुत्सद्दी, शूर, न्यायी आणि देवधर्मी सरदार होते. कोल्हापूर दरबारी त्यांना मान सन्मान, राहणेसाठी राजवाडा, अधून- मधून ते म्हैसाळला येत. त्यांच्यासाठी इंग्रज शासनाने कोल्हापूरहून रेल्वेने निघाल्यानंतर म्हैसाळला उतरता यावे म्हणून खास म्हैसाळला रेल्वे स्टेशन उभे केले होते. त्यावरून त्यांचे मोठेपण लक्षात येते. म्हैसाळला त्यांचा राजवाडा असून, हजार ते दोन हजार एकर जमीन होती. गडी-माणसं, प्रजा, शेतीवर केदारराव सरकारांचे खूप प्रेम. त्यांची कारकीर्द छत्रपती शाहू महाराजांच्या समकालीन अशी होती.

दृष्टांताप्रमाणे पुण्यश्लोक ताराबाई शिर्के श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांना आपल्या घरी नेण्यासाठी म्हैसाळला आल्या होत्या. त्यांनी म्हैसाळच्या वाड्यावर दोन दिवस मुक्कामही केला होता. शिर्केंचं घर आपलं आहे, असं महाराज म्हैसाळकरांना सांगत. म्हैसाळला भेट देऊन म्हैसाळकरांचा वाडा पुन्हा एकदा पाहावा, स्नेहाचा धागा जुळवावा अशी माईसाहेबांची खूप इच्छा होती. माईसाहेबांनी याबद्दल मला विचारणाही केली होती. पण माझ्या नोकरीमुळे तसा योग जुळून येत नव्हता.

मिरजेत आता श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांची भक्त मंडळी वाढतच

होती. श्री. शिवाजी जाधव, श्री. मुन्ना भोजमालपाणी, श्री. सुभाष शिंदे, श्री. तातोबा लांडगे, लक्ष्मणराव पवार, श्री. दत्तात्रय पवार, डॉ. म्हेत्रे, श्री. आनंदराव मंडले, श्री. मंगल शिंदे, श्री. चंद्रकांत होमकर, श्री. मदन बोंगाळे, श्री. दत्ता उडपी, श्री. शैलेश सिंदगी इत्यादी तर शंकरराव कांबळे, स्व. शिवलिंग आण्णा घेवारी, किटवाडकर पवार, माजी आमदार दाजी पाटील, बापूसाहेब जामदार ही मंडळी या भक्त मंडळात आवर्जून आली. यातील काही लोक आता पौर्णिमेला श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या समाधी दर्शनाला जाऊ लागली. जयसिंगपूर-उदगावहून श्री. बाळासाहेब परीट, श्री. कुबेर मगदूम, भूपाल सूर्यवंशी, श्री. करवडे सर्वश्री कुलकर्णी बंधू, नारायणराव वरेकर व त्यांचे बंधू, वसंतराव भोसले, ही मंडळी तर सांगलीमधून सर्वश्री रघुनाथराव घोडके, श्री. भानुदास पडळकर, निवृत्ती काटकर, भिमराव काटकर, बाबूराव सूर्यवंशी ही सर्व मंडळी कोल्हापूरला दर्शनाला जाऊ लागली. ही भक्तिमार्गाची पाऊलवाट अखंडतेने पुढच्या पिढीपर्यंत जाऊ लागली. याचे आज तरी मला समाधान वाटते. एक इवलेसे समाज कार्य, धार्मिक कार्य म्हणून मी या कार्याकडे पाहत आलो. ही सर्व कार्ये विना संकोच करीत आलो. करीत राहणार आहे, ही माझी मनोधारणा आहे.

सांगलीतील भक्त मंडळी एकत्रित येण्यासाठी स्व. बाबूराव सूर्यवंशी यांच्या घरी स्व. पुण्यश्लोक माईसाहेब शिर्के यांच्या अमृतहस्ते श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज, श्रीस्वामी समर्थ, श्रीशिव चिदंबर स्वामी, श्रीपंत महाराज बाळेकुंद्री यांच्या तसबिरीची प्रतिष्ठापना करून मठी स्थापन करण्यात आली. स्व. बाबूराव सूर्यवंशी व पुण्यश्लोक लक्ष्मीबाई सूर्यवंशी हे माझे मित्र श्री. राजाराम घाटगे यांचे सासरे व सासूबाई होत. हा परिवार अत्यंत साध्या राहणीमानातला, कष्ट करून प्रपंच करणारा, सांगलीत त्यांचे पटेल चौकात हॉटेल व पानपट्टीचे दुकान होते.

स्व. बाबूराव सूर्यवंशी हे श्री. वसंतदादा यांचे जवळचे कार्यकर्ते होते. तीन-चार वेळेस नगरसेवक म्हणूनही ते निवडून आले होते. दुर्दैवाने काही कारणाने त्यांची आर्थिक घडी विस्कटली. त्यांचा दोन क्रमांकाचा मुलगा राजाराम यांच्या मृत्यूने परिवारावर संकट कोसळले.



स्व.बाळासाहेब भारदे (सभापती विधान परीषद महा.राज्य)
सोबत स्व.बापूसाहेब जामदार इ. स्व.चंद्रकांत जाधव यांच्या घरी

श्री. राजाराम घाटगे यांच्या सहवासात ते माझ्याकडे येऊ लागले. बाबूराव सूर्यवंशी यांची कालांतराने परिस्थितीही बदलू लागली. वाईट दिवस निघून गेले, त्यांचा आमचा ऋणानुबंध दृढ होत गेला. एक स्नेह जुळला. आठवड्याला ते कोल्हापूरला शिर्के मंदिरात जाऊ लागले. मला ते आपला मुलगा मानू लागले. मी त्यांचा कधी झालो, हे माझे मलाच कळले नाही. मी त्यांना आई-वडील मानून त्यांनाच दादा-आई म्हणू लागलो. सांगलीत आता सूर्यवंशी मठीतून श्रींचे कार्य चालू झाले. दर मंगळवारी श्रींची भक्तमंडळी रात्री एकत्रित येऊन आरती, जप, वाचन, महाप्रसाद सुरू झाला. मीही दर मंगळवारी सांगलीला जाऊ लागलो. सांगलीच्या मठाची स्थापना १९८० साली एका साध्या राहत्या घरात झाली.



श्रीमंत केदारराव शिंदे म्हैसाळकर

१९७७ ते १९७९ ही तीन वर्षे मी वारणा मेकॅनिकल डिव्हिजन नं. २ मध्ये नोकरीस होतो. कोल्हापूरातील बदलीने कोल्हापूर येथील शिर्केच्या समाधी मंदिरात रोज दर्शनाचा लाभ घेता आला. तथापि, माझे वडील आजारी पडल्याने, आर्थिक अडचणी, शिवाय रोज मिरज-कोल्हापूर येणे-जाणे याचा मलाही कंटाळा येऊ लागला होता.

नोकरी लागताना आमचे पब्लिक हेल्थ व इरिगेशन खाते एकत्रित होते. या खात्याचे नाव इरिगेशन पॉवर (आय अँन्ड. पी.) असे होते. १९७९ मध्ये शेती पाणीपुरवठा खाते (Irrigation ) व महाराष्ट्र जलनि:सारण मंडळ (पिण्याचे पाणी पुरवठा) असे दोन विभाग आमच्या खात्याचे झाले. श्री. म. ना. शेवडे सांगली मंडळ व श्री. गं. श्री. घाणेकर, पाटबंधारे मंडळ कोल्हापूर

यांच्या कृपेने मी कार्यकारी अभियंता, इनव्हायर मेंटल इंजिनिअरींग वर्कर्स डिव्हीजन मिरज अधिपत्याखाली गोठण गल्लीतील उपविभाग क्रमांक दोनमध्ये बदलून आलो. मी हजर झालो तो दि.१/६/१९७९ असा होता. या काळी वजावट होऊन माझ्या हाती ४५०/- रुपये पगार येत असे. मूळ पगार ३२० रुपये अधिक महागाई भत्ता १६७/- रुपये, घरभाडे ३२/-रुपये, एकूण ५१९/ रुपये. त्यामधून प्रा. फंड २०/- रुपये, प्रा. फंड उचल २५/- रुपये, दीपावली उचल २०/- रु., व्यवसाय कर रु. ४/- असे एकूण ६९/- रुपये वजा होत असत. ही आकडेवारी देण्याचे कारण त्यावेळचा पगार आणि स्वस्ताई एवढ्या तुटपुंज्या पगारावर माझी याबाबत कोणतीही तक्रार अथवा कुरकुर नव्हती. महाराजांच्यावर श्रद्धा ठेवून, भार ठेवून आलेल्या प्रसंगाना तोंड देत माझा प्रवास चालू होता. त्यातच माझी धाकटी बहीण भामाबाई हिच्या लग्नाचा विषय चालू होता. चंद्रमौळी घरही पडायला झाले होते. वडिलांचे आजारपण चालूच होतेच. आर्थिक बाजू फारच कमकुवत होती. भावाकडून मदतीची अपेक्षा करणे चुकच ठरले असते. त्यातच अत्यंत ओढाताणीत धाकटी बहीण भामाबाईचे लग्न कवठेपिरान येथील सुभाष सकपाळ यांचेशी २८/४/१९७७ रोजी झाले. अद्याप थोरले भाऊ वसंतराव यांचे लग्न झाले नव्हते, त्याची काळजी आई-वडिलांना सतत असे. वसंतराव तर १९६६ पासून मुंबईला निघून गेलेले. त्यांच्या घराशी संपर्क नव्हता. त्यांचेशी संपर्क साधून त्याला घरी आणण्याविषयी मला सतत आई वडिल सांगत असत.

१९७४-७५ सालापासून मी कृष्णाघाटावर नेहमी जात असे. मला पडलेल्या स्वप्नातील दृष्टांताप्रमाणे श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे अंतरंगातील शिष्य श्रीकृष्ण बुवा यांची समाधी मी शोधून काढली होती. ती वॉटर वर्क्सच्या कंपाऊंडच्या अलीकडे होती. त्या समाधीवर किमान दगडी कट्टा तरी बांधावा म्हणून २००/- प्रमाणे एक ट्रक दगड असे चार ट्रक दगड आणून टाकले होते. समाधीची पुजाही चालू होती. श्री. सुरेश गोरे, श्री. मारुती आलदर, श्री. आण्णाप्पा आंबी, श्री. शंकर आंबी असं एक भक्त मंडळच तयार झालं होतं.

मी सुट्टीत पूजा वगैरे करून येई. या कृष्णा बुवांचा उल्लेख श्रीकृष्ण

सरस्वती दत्त महाराज चरित्रात बाळ शिर्के लिखित ग्रंथात अध्याय १०, १४ मध्ये आहे. माईसाहेब शिर्केंनी सांगितल्या प्रमाणे पद्माराजे गर्ल्स हायस्कूल जवळील आमते मावशीच्याकडून श्रीकृष्ण बुवांची तसबीर मागून त्या तसबिरीवरून दुसरी तसबीर तयार करून घेतली. तो पर्यंत श्रीकृष्ण बुवांची दुसरी तसबीर नव्हती.

आर्थिक अडचणीमुळे श्रीकृष्णबुवा समाधीचा कट्टा अगर छोटे मंदिर बांधणे मला शक्य झाले नाही. त्यातच माझी बदली कोल्हापूरला झालेली. आता मिरजेला बदलून आल्यामुळे मी पुन्हा कृष्णा घाटावर जाऊ लागलो. मंदिर बांधण्याचे स्वप्न रंगवू लागलो. तसेच महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या शनिवारी म्हैसाळला श्री.विलासराव घोरपडे यांचे सासरे बाळू तुका घोरपडे यांच्या घरी येणे-जाणे चालू झाले. त्यांच्याही घरी शिवाजीराव शिर्के यांच्या हस्ते श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज यांच्या तसबिरीची स्थापना झाली. सौ. सुनंदा घोरपडेचे भाऊ श्री. तानाजी घोरपडे, श्री. दत्ता घोरपडे यासर्व कुटुंबाचा सर्व स्नेहभाग जुळत गेला. कधी कधी मी श्री. विलासराव घोरपडे, मंगल शिंदेंसह म्हैसाळला मुक्काम करू लागलो.

मुक्कामात महाराजांचे अनुभव, प्रसंग यावर बोलू लागलो. कधी कधी तानाजीच्या मळ्यात मुक्कामाला जाऊ लागलो. घोरपडे कुटुंबाचा प्रेमळपणा, आदरातिथ्य वाढतच जाऊ लागले. आम्ही एका कुटुंबाप्रमाणे वागू लागलो. माझी मिरजेतील बदली आणि शेजारी विलासराव घोरपडे यांचे घर असलेने येणे-जाणे वाढले. माईसाहेब शिर्के, बाळासाहेब शिर्के, वहिनीसाहेब शिर्के, शिवाजीराव शिर्के मिरजेला आले की, त्यांच्या राहण्याची, जेवण खाण्याची, चहापानाची व्यवस्था श्री. विलासराव घोरपडे, सौ. सुनंदा वहिनी, श्री. रमेश घोरपडे, सौ. सुमित्रा घोरपडे ही सारी मंडळी प्रेमळपणे करीत. माझे म्हैसाळला अलीकडे येणे-जाणे वाढले. मला ते आवडतही असे. वास्तविक म्हैसाळला श्री. विलासराव घोरपडे यांच्यामुळेच त्यांच्या सासुरवाडीच्या घरी जाऊ लागलो. रस्त्याच्या दुतर्फा हिरवागार ऊस, हिरवीगार पिके, चिंच, वड या झाडांच्या रांगा, निरव शांतता, मधूनच डोकावणारी नारळाची झाडे, पिसारा फुलवून नाचणारे मोर, या साऱ्यामुळे म्हैशाळला येणे-जाणे आवडत असे.

मुख्य रस्त्याच्या डाव्या बाजूस शिंदे सरकारांचे बंगले, वाडे, नरवाड रस्त्याला रयतचे हायस्कूल, दुसऱ्या बाजूला छोटी घरे, इंग्रजी कौलांच्या माड्या, मंदिराची शिखरे, बाजारपेठ, चौक, जागोजागी काबाडकष्ट करणारी प्रामाणिक माणसं, असं म्हैसाळ मला आवडत होतं. एका अरुंद बोळात बाळू तुका घोरपडेचं साधं कौलारू घर, भगले, थोरात अशी त्यांची मित्र मंडळी व त्यांचा राबता परिवार.

गावात रेणुका देवीचा मोठ्या प्रमाणात महाप्रसाद होई. किशोर बाबा शिंदे-म्हैसाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न होई. बाळू तुका घोरपडे, स्व. किशोरबाबा शिंदे, डॉ. शशिबाबा शिंदे, डॉ. जयसिंगराव शिंदे, श्री. दीपकबाबा, श्री. मनोजबाबा, श्री. रतनबाबा, श्री. परशुबाबा, स्व. केदारराव शिंदे गावातील प्रतिष्ठीत गावकामगार पाटील, कबुरे यांचा व इतर अनेकांचा परिचय जुळून येत होता.

अधून मधून अक्कोळला जाणं चालू होतं. दर रविवारी कोल्हापूरला श्रींच्या दर्शनाला जाणं चालू होतं. दिवस आनंदात जात होते. गुरुबंधू वाढत होते. प्रेम मिळत होते. पण आर्थिक बाजू मात्र कर्जबाजारी होत होती. महाराजांच्या वरील माझी निष्ठा, भक्ती आणि श्रद्धा कमी झालेली नव्हती. त्यांच्या आशीर्वादाने चांगले दिवस येणार याची खात्री होती.

असाच एक दिवस मी अक्कोळला होतो. श्रीरमेश महाराज, गिरीजा वहिनी, एन. जी. बाळाप्पा यांच्या कित्तुर राणी चन्नमा नाटक बघायला शाळे-जवळच्या तंबूत रात्री गेले होते. काका, आई, लक्ष्मण घरी झोपी गेले. मी सोप्यातच झोपलो होतो. मध्यरात्री अचानक जागा झालो. तो खडावांच्या आवाजाने. खडावा घालून माडीवरून कोणीतरी खाड खाड असा आवाज करीत आले. हळूहळू आवाज वाढू लागला. मी घाबरून गेलो. मला काही सुचेना. खडावा घालून माझ्यासमोर कोण उभं होतं? हे समजत नव्हतं. खोलीभर प्रकाश पसरला होता. सुगंध दरवळत होता. श्रीदत्त महाराजांची स्वारी असावी किंवा सत्पुरुषाची पवित्र फेरी असावी. पांघरुणातून खूप मोठा प्रकाशाचा झोत दिसत होता. पण मी उठून त्यांचे चरण धरावेत, शरण जावे, हे मला कळले नाही. मी घाबरून गेलो होतो, म्हणून असेल किंवा माझे कमनशिबी असेल

म्हणा, मी अभागी ठरलो. तोंडावरचे पांघरुण मी काढलेच नाही. उठलोच नाही. काही क्षणात दत्त महाराजांची स्वारी खडावांचा आवाज करीत दिवाणखान्यातून परसदारी निघून गेली. मी खडावांचा आवाज ऐकत पडून राहिलो. तसा बराच वेळ पडून होतो. मला उठवेना. मग दरवाजा ठोठावण्याचा आवाज आला. कसाबसा उठून दाराची कडी काढली तर रमेश महाराज, गिरीजा वहिनी. रमेश महाराज आत येताक्षणीच मी त्यांचे पाय धरले. माझा घाम पाहून ते मला म्हणाले, "एवढा का घाबरला आहेस? भिला आहेस का? काय झालं?" मी त्यांना सविस्तर हकीगत सांगितली. यावर ते म्हणाले "स्वारी येऊन गेली. दर्शन घेशील की नाही?" यावर मी काहीच बोललो नाही. मी अंथरुणावर तसाच पडून राहिलो. झोप लागली नाही.

सकाळी उठून रमेश महाराजांना भेटलो. त्यांच्या बोलण्यातून मला दत्त दर्शनाचा योग होता. परंतु माझे दुर्दैव म्हणूया. अधून-मधून आसपासच्या तीर्थक्षेत्रांना मी जात असे. परंतु एवढ्या लहान वयात मला श्रीक्षेत्र काशीला जाण्याचा योग आला. काळाच्या प्रवाहापासून हिंदूंचे साथ करणारे काशीतील अनेक संत, सत्पुरुष, संन्याशी, दंडी स्वामी, चैतन्याची तरंग असणारी गंगा नदी, श्रद्धाळू हिंदू लोकांची गंगा नदी, या मातारूपी नदीवर असणारी निस्सीम भक्ती, या साऱ्या विषयी मी ऐकून होतो. श्रीक्षेत्र काशीला जाण्याचा योग आला तो छाया काकू कुलकर्णींचा मोठा मुलगा अरुणच्या लग्नामुळे.

श्री. अरुण कुलकर्णींचे लग्न डेहराडून येथील मेजर बासुरी यांच्या मुलीशी ठरले. या लग्नाला स्व. वसंतराव कुलकर्णी (काका)यांनी आग्रहाचे निमंत्रण दिले होते. सोमवार दिनांक १४ एप्रिल १९८० रोजी रात्री मी, रमेश महाराज, गिरीजा वहिनी, श्रीमती माणिकताई कालकुंद्री रात्री सह्याद्री एक्सप्रेसने निघालो. सकाळी मांडकेंच्या (पुणे) घरी दिवसभर थांबून सायं. ४.५० वाजता जम्मू तावी एक्सप्रेसने पुढचा प्रवास सुरू झाला. दौंड, मनमाड, इटारसी, भोपाळ, रांची मार्गे बुधवार दि. १६/४/१९८० रेजी सायंकाळी साडेसहा वाजता दिल्लीला पोहोचलो. दिल्लीत अरुण कुलकर्णी यांच्या घरी मुक्काम केला. गुरुवार दि.१७/४/१९८० रोजी सकाळी ८.३० च्या दिल्ली डेहराडून रेल्वेने डेहराडूनला पोहोचलो. पुस्तकात वाचून होतो की, डेहराडून हे थंड हवेचे

ठिकाण आहे. पण तेथे अतिशय उन्हाळा होता. शुक्रवार दि.१८/४/१९८० या दिवशी सकाळी उठून डेहराडून पासून ४०-५० कि.मी. अंतरावर असलेल्या हिमालयाच्या रांगेच्या पायथ्याशी वसलेल्या खरोखरच थंड असलेल्या मसुरी शहराला भेट दिली. हे स्थळ खरोखरच प्रेक्षणीय स्थळ असून, थंड हवेचे ठिकाण आहे. समोर बर्फाच्छादित हिमालयाची उत्तुंग शिखरे दिसत होती. परमेश्वराने स्वत:च्या भिन्न भिन्न, सुंदर कल्पना या हिमालयाच्या सोनेरी सौंदर्यात मनसोक्त रेखाटल्या असाव्यात. हिमालयाची शिखरे मला, माझ्या मनाला खुणावत होती. पण मला परतणे भाग होते.

सायंकाळी अरुणचा लग्न समारंभ आटोपून रात्री ऋषिकेशला मुक्काम केला. दि. १९/४/१९८० रोजी आयुष्यातील पहिले गंगा स्नान केले. गंगेचे पाणी अतिशय थंड. ऋषिकेश म्हणजे धरतीवरचे स्वर्ग वाटले. दूरवर वाहणारी गंगा, तिच्या काठचे घाट, घाटावरील छोटी छोटी मंदिरे, एका बाजूला दिसणारे डोंगर कडे, दाट झाडी, ऋषिकेशचे साक्षात परमेश्वरी स्वरूप, असंख्य श्रद्धाळू भक्तांची गर्दी, मावळणारा सूर्य आणि मावळत्या सूर्याची गंगेवर पडणारी सोनेरी किरणे. हे दृश्य अत्यंत विलोभनीय. नदीच्या पलीकडून जाणारा बद्रीनाथ-केदारनाथ वळणाचा रस्ता, मुनींच्या रेतीवर स्वामी शिवानंद यांचा आश्रम, लक्ष्मण झुला, पहाडच्या अंतरावर वसलेल्या छोट्या छोट्या पण देखण्या वस्त्या, त्यामधून दिसणारे धुम्रवलये, धुके, शांत आणि अवखळ मिश्रित वाटणारा गंगेचा प्रवाह ही सारी विधात्याची स्वप्नसृष्टी होती. गंगेच्या काठावर थवेच्या थवे रूपात फिरणारी माणसं.

कोणी एक बाबा काली कमलेवाला यांनी बांधलेल्या धर्मशाळेत आम्ही मुक्काम केला. रविवार दि.२०/४/१९८० रोजी सकाळी दहा वाजता निघालो आणि अकरा वाजता हरिद्वारला आलो. हे जिल्ह्याचे आणि भरपूर वस्तीचे ठिकाण. येथे गंगेवर पूल असून, साखळ्या सोडल्या आहेत. गंगेच्या दोन्ही बाजूस लांबवर पसरलेला घाट, आणि तितक्याच लांबवर रेलिंग-कठडे आणि साखळ्या. हरिद्वार येथे गंगेला वेग असल्याने साखळीला धरूनच स्नान करावे लागते. दोन प्रहरी हरिच्या पायरीवर गंगा स्नान केले. लवकरच येथे कुंभमेळा भरणार होता. आणि त्यापूर्वीच अनेक साधू, संत, संन्याशी, योगी, आत्मज्ञानीच्या

झुंडीच्या झुंडी दर्शन घेण्यासाठी आधीपासूनच येऊ लागल्या. अध्यात्मातील उत्साही लोकांची ही प्रचंड गर्दी होती. अनेकजण आपल्या पापमुक्तीसाठी गंगेत स्नान करीत होते. पंडे, पूजा आणि धार्मिक विधी पार पाडत होते. तर भाविक लोक साधू संन्याशापुढे फुले, फळे, खाद्य पदार्थ ठेऊन आपली श्रद्धा आणि भक्ती व्यक्त करीत होते.

जागोजागी शृंगारलेले उंट आणि हत्ती यांचे दर्शन होत होते. सोन्याचे, चांदीचे दंड धारण करून वावरणाऱ्या नग्न साधूंच्या झुंडी तर अंगावर फक्त लंगोटी धारण करणारे, अंगाला राख फासलेले, मुंडण केलेले, भगवी वस्त्रं धारण केलेले, कोणाच्या हाती दंड तर कोणाच्या हाती ध्वज अशा असंख्य साधू-संन्याशांची गर्दी पाहायला मिळत होती. तर बऱ्याच ठिकाणी धुनी पेटवून लांब जटाधारी साधू दिसत होते.

विनयशील साधू, ब्रह्मचारी, मुद्रा धारण केलेले साधू अशा अनेक रूपातली ही मंडळी आणि त्यांच्या मनातील एक प्रकारचा पसरलेला दिव्यानंद वाटत होता. हरी पायरीवर स्नानासाठी मोठी गर्दी. या गर्दीत वाढलेला कोलाहल, मंदिरातून वाजणाऱ्या घंटांचे नाद, निनाद. सारा आसमंत या निनादाने भरून गेला होता. अशा वातावरणात आमचे स्नान आटपले. सायंकाळी सात वाजता हरिघाटावरील मंदिरातील व गंगेची आरती झाली. विविध रंगाच्या पोशाखातील स्त्री-पुरुष आणि नानाविध प्रकारचे साधू, बैरागी, संन्यासी, ब्रह्मचारी, हठयोगी, नंगे साधू देशभरातील सर्व प्रकारच्या साधूंचे दर्शन आरतीच्या वेळी झाले. या आरती नंतर हरिद्वार सोडले.

आमचा पुढचा प्रवास सुरू झाला. दि. २१/४/१९८० आम्ही देशाची राजधानी दिल्ली येथे पोहोचलो. दुसऱ्या दिवशी येथील प्रेक्षणीय स्थळे पाहिली. त्यासाठी फक्त पंचवीस रुपये खर्च आला. दिनांक २३/४/१९८० सकाळी ७.३० वाजता बसने जगप्रसिद्ध ताजमहल पाहण्यासाठी गेलो. बसभाडे तीस रुपये होते. फत्तेपूर-शिक्री तेथील शेख सलिम चिस्ती यांची समाधी, दर्गा आणि कृष्णभूमी, मथुरा बाजार केला. सायंकाळी बनारस एक्सप्रेसने काशीकडे रवाना झालो. त्याकाळी रेल्वे तिकीट ३६/- रूपये इतके होते. अलिगड कानपूर मार्गे शनिवार दि. २६/४/१९८० रोजी सकाळी ९ वाजता अलाहाबाद-प्रयाग

जेथे गंगा–यमुना आणि गुप्त रूपाने सरस्वती त्या संगमावर स्नान केले. पूजा केली. गंगा पूजन केले. सायंकाळी नेहरूंचं जन्मस्थान आनंदभवन पाहिले. सम्राट चक्रवर्ती अशोकचा किल्ला, किल्ल्यातील अक्षय वटवृक्ष आणि मुक्काम अलाहाबादला. उन्हाळा वाढतच होता. रविवार २७/४/१९८० पहाटे पाच वाजता रेल्वेने निघून अकरा वाजता श्रीक्षेत्र काशीला पोहोचलो. हिंदूंचे पवित्र स्थळ, धर्मग्रंथात, शास्त्र पुराणात श्रीक्षेत्र काशी व गंगा स्नानाचे महत्त्व वर्णिले आहे. या क्षेत्री स्नान केल्याने मानवी जीवनाची पापे नाहीशी होतात आणि मनुष्याला सुखी जीवन प्राप्त होते. तर या क्षेत्री मरण आल्यास त्यास स्वर्गलोक प्राप्त होतो, अशा हिंदूंच्या श्रद्धा आहेत.

जुन्या काशीत गल्ली, बोळ खूप आहेत. दुतर्फा छोटी छोटी मिठाईची दुकाने, तळल्या जाणाऱ्या जिलेबीचा वास, सरसूच्या तेलाचा एक प्रकारचा कुबट वास, तळल्या जाणाऱ्या पुऱ्या, भजी, विविध दुधाचे पदार्थ, चहा, भांग विक्रीची दुकान सर्व प्रकारची दुकाने वर्षानुवर्षे थाटलेली दिसून येत होती.

ज्या महाराष्ट्र भवनात आम्ही उतरलो होतो, तेथील व्यवस्था देव गुरुजी आणि पित्रे गुरुजी ही महाराष्ट्रीयन मंडळी पाहत होती. दोनप्रहरी गंगा स्नान केले. कडक उन्हाने घाटाच्या पायऱ्या प्रचंड तापल्या होत्या. इथे असंख्य घाट. त्या घाटावर गंगास्नान करून पुण्य प्राप्तीसाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेले असंख्य भाविक, साधूंच्या झुंडी, घाटावरील गवताच्या छत्र्या, कापडाच्या छत्र्या, नावेतून चाललेले धार्मिक विधी, गंगापात्रात चाललेली स्नाने, असं ते सर्वव्यापक चैतन्यमय वातावरण होतं. गंगा स्नान एक पवित्र विधी मानला जातो. युगानुयुगे या गंगेचे महात्म्य भारतीय संस्कृतीत विराजमान झालेले आहे. भारतातील खेडे–वस्ती ते शहरवासीयांना या गंगा स्नानाचे पावित्र्य व महत्त्व आणि भूत, भविष्य, वर्तमान या मानवी जीवनाच्या क्रमात जगत असताना सर्व फलद्रूप होण्यासाठी या तीर्थक्षेत्रांचे दर्शन असते. आपल्या सर्व इच्छा साध्य करण्याचा मानवी प्रयत्न चालूच असतो. पण सर्वच इच्छा फलद्रूप होतील असे नाही. मनात मात्र पाप पुण्याचा संघर्ष सदैव चालूच असतो. मृत्यू आणि त्याचा स्पर्श, त्याचे भय, तो येऊ नये यासाठी भयालाही स्पर्श करीत जीवन चालू असते. या सर्वातून मुक्त होण्यासाठी मानवी जीवनाची उन्नती साधता यावी,

यासाठी गंगा स्नान करावे, श्रीकाशी विश्वनाथाचे दर्शन घ्यावे आणि दिव्य आयुष्याची वाटचाल करावी, अशी हिंदूची एक परंपरा आहे.

आम्ही गंगा स्नानानंतर श्रीकाशी विश्वेश्वराचे दर्शन घेतले. धार्मिक विधीही केला. सायंकाळी काशी-बनारस व इतर धार्मिक स्थळे पाहिली. बनारस विश्वविद्यालय पाहिले. श्रीकाशीक्षेत्री मुक्काम केला. मंगळवार दि.२९/४/१९८० रोजी सकाळी ११ वाजता रेल्वेने अयोध्येला निघालो. सायंकाळी श्रीक्षेत्र रामजन्मभूमी अयोध्येला पोहोचलो. तेथेही महाराष्ट्र भवनात मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी शरयू नदीत स्नान झाले. या नदीचे पात्र खूप रूंद आणि उथळ आहे. पाण्याला विलक्षण वेग. नेपाळला जाणारा राजरस्ता शरयू नदीच्या पुलावरून जातो. हा पूल दोन मैल लांबीचा आहे. रामजन्मभूमी व बाबरी मशिद लगतच आहेत. रामजन्मभूमीचे दर्शन घेतले. हनुमान गढी हनुमानाचे दर्शन घेतले. येथे घरोघरी असणारी राम मंदिरे, त्यांची छोटी छोटी शिखरे, आरती समयी ऐकू येणारा घंटानाद हे सारे अविस्मरणीय होते. अयोध्येत हिंदू-मुस्लीम गुण्यागोविंदाने राहत होते. हनुमान गढी, रेल्वे स्टेशन परिसर तांबड्या तोंडाच्या वानरांनी व्यापून राहिलेला दिसला.

अयोध्येत मुक्काम करून दि. ३०/४/१९८० रोजी सकाळी १२.३० वाजता श्रीक्षेत्र अयोध्येचा निरोप घेतला आणि परतीच्या श्रीक्षेत्र काशीच्या प्रवासाला लागलो. सायंकाळी चार वाजता श्रीक्षेत्र काशी-बनारसला पोहोचलो. पुन्हा एकदा गंगा स्नान करून श्रीकाशी विश्वनाथाचे दर्शन घेतले. गंगेच्या पाण्याचे बंद केलेले छोटे छोटे गडू, काळसर रंगाचे गंडेदोरे, प्रसाद आदि वस्तू खरेदी केल्या. सायंकाळी आम्ही सर्वजण चंद्रशेखर स्वामी यांच्या लालबहादूर शास्त्री नगरातील फ्लॅटवर राहायला आलो.

डॉ. चंद्रशेखर स्वामी हे निपाणी जवळील अडिमल्लयांच्या श्रीक्षेत्राचे लिंगायत पीठाचार्य होते. सन १९७२ च्या दरम्यान त्यांचा माझा परिचय निपाणीचे त्यांचे शिष्य चंद्रकुडेच्या घरी झाला होता. डॉ. चंद्रशेखर स्वामी हे बनारस विद्यापीठात प्राध्यापक होते. ते पं. गोपीनाथ कविराज यांचे दीक्षित शिष्य होते. ते ब्रह्मचारी होते. बेळगाव जिल्ह्यातील एका खेडेगावातील संन्यासग्रस्त असे व्यक्तिमत्त्व. बऱ्याच दिवसानंतर त्यांची माझी भेट होणार होती. या भेटीची

मला उत्सुकताही होती. डॉ. चंद्रशेखर स्वामी हे रमेश महाराजांचे किट्टाण्णामामा (कृष्णराव) देशपांडेंचे गुरु होते. ते आडी मठाला आले की, बेळगावला देशपांडे गल्लीतील किट्टाण्णामामांच्या घरी मुक्काम करीत. त्यांचे उपासना दैवत राजराजेश्वरी देवी असल्याचे मी केवळ ऐकून होतो. किट्टाण्णामामांनी अनेकांना दीक्षा दिली होती. त्यातच रमेश महाराजांच्या पुण्यश्लोक आईसाहेबांचा समावेश होता. स्वामींच्या अलिशान फ्लॅटवर आम्ही गेलो, तेव्हा आम्हाला बरे वाटले. दिवसभराच्या उन्हाने आम्ही अक्षरश: भाजून निघालो होतो.

आम्हा सर्वांना त्यांच्या नोकराने दिवाणखान्यात निवांत बसवले. पंखा लावून दिला. थोडासा आराम वाटला. दिवाखान्यातील भिंतीवर बऱ्याच तसबीरी होत्या. त्यात अनेक तसबीरी पं. गोपीनाथ कविराज यांच्या होत्या. त्यांच्या शिष्यांच्याही तसबिरी होत्या. थोड्याच वेळाने स्वामीजी येत असल्याची बातमी त्यांच्या नोकराने आमच्या कानावर घातली. काही वेळातच ते आले. भगवी वस्त्रे, डोक्यावर दाट काळे केस, मध्यम उंची, सावळा रंग, स्वामीजींना आम्ही सर्वांनी वाकून नमस्कार केला. त्यांनी स्मितपणे आमची सर्वांची विचारपूस केली.

जुन्या आठवणींना मी उजाळा दिला. आज माझा माझ्यावरच विश्वास बसत नव्हता. स्वामींची भेट स्वप्नात की प्रत्यक्षात? इतक्या वर्षानंतरही त्यांची भेट, त्यांची मूर्ती माझ्या दृष्टी समोरून दूर झालेली नाही. त्यांच्या शेजारीच गुरुबंधू सीतारामदादा पांडे, दीदी वगैरे या सर्वांशी बोलत बसलो. गिरीजा वहिनी, श्रीमती माणिकताई दिवसभराच्या दगदगीने लवकरच झोपी गेल्या. मी व रमेश महाराजांनी स्वामींच्या दालनात प्रवेश केला. तेथे गोपीनाथ कविराज यांची तसबीर व पादुका ठेवण्यात आल्या होत्या. आम्ही नतमस्तक होऊन पादुकांचे दर्शन घेतले. सीतारामदादा पांडे व स्वामीजी पं. गोपीनाथ कविराज यांचे अंतरंगातील शिष्य होते. मला प्रथम भेटीत स्वामीजी हे एक सामान्य मनुष्यच आहेत असे वाटले. परंतु जेव्हा त्यांच्या संभाषणातून विशेष परिचय होत गेला तसतशी त्यांच्या दैवी सामर्थ्याची पकड माझ्या मनावर बसत गेली. त्यांच्याविषयी आश्चर्ययुक्त आदर, श्रद्धा निर्माण होत गेली. भारतीय संस्कृती प्राचीन आहे. सर्वश्रेष्ठ आहे. या संस्कृतीवर युगानुयुगे इतके आघात होऊनसुद्धा

ही संस्कृती टिकून राहिली. भारताच्या अनेक पिढ्यांत अनेक उत्तम संत, महात्मे अशी अनेक नररत्ने जन्माला आल्याने ही पुरातन संस्कृती टिकून राहिली. जिवात्मा, परमात्मा, परमेश्वर, साक्षात्कार या महात्म्यांच्यामुळे हा देश घडला, संपन्न झाला.

पं. गोपीनाथ कविराज पद्मभूषण, पद्मश्री, महामहोपाध्याय, डॉक्टरेट आदी अनेकविध पदव्यांनी सन्मानित होते. ते स्वभावाने प्रेमळ, विनयशील असे होते. त्यांना अनेक भाषा अवगत होत्या. त्यांच्या गुरुदेवांचे नाव स्वामी विशुद्धानंद होते. ते बंगाली होते. त्यांच्या गुरुचे नाव परमअवतार बाबाजी होते. हा एक योग संप्रदायातील तांत्रिक संप्रदाय होता. परमअवतार बाबाजी, स्वामी विशुद्धानंद, पं. गोपीनाथ कविराज यांच्या जीवनाबद्दल कोणतेही पुस्तक त्यावेळी उपलब्ध नव्हते किंवा तशी माहिती मला त्यावेळी नव्हती. या भेटीत परमेश्वराच्या उक्तीचा अर्थ, भक्तीभाव, जिवात्मा, परमात्मा, जीवनाचे परमोच्च ध्येय, देहाचे जड स्वरूप, योगसाधना, राजराजेश्वरी देवीची उपासना, माणसाची विचारबुद्धी, विश्वरचना, ध्यान धारणा वगैरे विषयावर स्वामीजी व सीतारामदादा पांडे बोलत राहिले. मी फक्त ऐकत होतो.

आता मध्यरात्र होऊन गेली होती. आम्ही झोपण्यासाठी स्वामींजींचा निरोप घेतला. बालसदृश्य निरागस देहयष्टी. सौम्य मुद्रा, प्रेमळ व गूढ साधना यांनी जीवन भारलेल्या स्वामींजींच्या दिव्य जीवनाचा विचार करीत मी झोपी गेलो. एका सत्पुरुषाच्या व त्यांच्यामुळे एक अधिकारी पुरुष, विख्यात विद्वान पं. गोपीनाथ कविराजांचा परिचय माझ्या पूर्वभाग्यामुळेच घडून आला होता.

पुढे काही वर्षानंतर म्हणजे सन २००० नंतर सिद्ध योग्यांच्या सान्निध्यात, स्वामी योगानंदांचे कथामृत, दिव्यस्पर्शी-डॉ. राम भोसले या ग्रंथांमधून परमअवतारी बाबाजींच्या योगमार्गाचा मला परिचय होत गेला.

गुरुवार दि. १/५/१९८० रोगी प.पू. चंद्रशेखर स्वामीजींना आम्ही वंदन करून सकाळी ११.३० वाजता वाराणशी दादर एक्सप्रेसने परतीच्या प्रवासाला लागलो. वाराणसी-पुणे त्याकाळी फक्त ६३/- रुपये असे तिकीट होते. शुक्रवार दि. २/५/१९८० रोजी सकाळी ११ वाजता भुसावळ येथे परतलो. महाराष्ट्राच्या भूमीत आलो. रात्री नागपूर-कोल्हापूर महाराष्ट्र एक्सप्रेस

बोगी नागपूर–कोल्हापूर या गाडीला जोडण्यात आली. रात्री नागपूर–कोल्हापूर महाराष्ट्र एक्सप्रेस ७.३० वाजता सुटली. शनिवार दि. ३/५/१९८० रोजी सकाळी ७ वाजता आम्ही पुणे येथे तर दुपारी ३.३० वाजता कोल्हापूरला पोहोचलो. कोल्हापूरला रमेश महाराजांच्या मावशी सरोजिनी वसंतराव कुलकर्णी रेल्वे स्टेशन जवळील साईक्स एक्सटेंशनला राहात होत्या. त्यांच्या घरी स्नान करून श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या समाधीचे दर्शन घेऊन आमच्या तीन आठवड्याच्या प्रवासाची सांगता झाली. आमचा सर्व प्रवास श्रीक्षेत्र दर्शन, सत्पुरुषांच्या गाठी–भेटी अशा स्वरूपात घडला. ही सर्व रमेश महाराजांच्या कृपेने घडले होते. त्यांच्या आशीर्वादाने घडले होते. त्या दिवशी कुंभोजकर मावशीकडे कोल्हापूर मुक्काम करून रविवार दि. ४/५/१९८० रोजी सकाळी रमेश महाराज, गिरीजावहिनी, श्रीमती माणिकताई अक्कोळला गेल्या. तर मी रेल्वेने मिरजेला आलो.

मिरजेत थोडे दिवस विश्रांती घेतली. प्रवासाची दगदग, त्यात उन्हाळ्यातील प्रवास त्यामुळे तब्येत बिघडली होती. श्रीक्षेत्र काशी यात्रेसाठी काढलेली एका महिन्याची अर्जित रजा आता संपली होती.

गुरुवार दि. १५/५/१९८० रोजी कामावर हजर झालो. वरचेवर कोल्हापूर, अक्कोळ, श्रीपंत बाळेकुंद्री आदी ठिकाणी श्रीदर्शनाला जायचे चालूच होते. प्रत्येक पौर्णिमेला नृसिंहवाडीला श्रीदर्शनाला जाणेचा नियम चालूच होता. त्या काळात मंगळवार १५/७/१९८० रोजी प. पू. डॉ. चंद्रशेखर स्वामी आडी मठाला काशीहून आले होते. मी त्यांच्या दर्शनाला गेलो पण त्यांची भेट झाली नाही. काही कार्यक्रमासाठी ते अन्यत्र गेले होते.

नोकरीत बराच वेळ जात होता. आरतीला भक्त मंडळींची संख्या वाढतच होती. गर्दीमुळे लोक आरतीसाठी रस्त्यावरही उभे राहत. श्रींची आरतीची सोय व्हावी. गुरुबंधूंना, भक्तांना बसण्याची, उठण्याची सोय व्हावी आणि माझा जीवन प्रवास कमी करून स्थिर होण्यासाठी नवी मठी बांधणेची ठरवले. त्यावेळी माझा मूळ पगार रु. ३३०+ महागाई २२२.८० व घरभाडे रु. ३३ असा एकूण पगार ५८५.८० पैसे होता. त्यामधून प्रा. फंड रु. २०/–+ व्यवसायकर ४/–रु. एकूण वजा २४ रु. जाता हाती केवळ ५६१.८० पैसे

पडत असत. नवे बांधकाम करणे अवघड दिसत होते. तथापि, आमच्या शेजारचे बेडगे यांच्या घरामधील भिंत पडायला झाली होती. म्हणून मंगळवार दि. ५/८/१९८० रोजी जुने घर पाडून नवी मठी बांधण्याचा मुहूर्त केला.

शुक्रवार १५/८/१९८० ते सोमवार १८/८/१९८० या कालावधीत आमचे कुलदैवत शिखर शिंगणापूर, श्रीशंभू महादेव, श्रीगोंदवलेकर महाराज दर्शन, श्रीसाईबाबांचे दर्शन घेऊन शिर्डी येथे मुक्काम केला. २७/८/१९८० रोजी नाशिकला कुंभमेळ्यात पर्वकाळाचे पुण्यस्नान करून रात्री आळंदीला श्रीज्ञानेश्वरांचे दर्शन घेऊन मुक्काम केला. सोमवार दि. १८/८/१९८० मिरजेला परतलो.

बघता बघता श्रावणधारा आणि श्रावणही संपला. भाद्रपदाला प्रारंभ झाला. पाऊस जोराचा होता. शेती कामाची सर्वत्र धांदल सुरू झाली. शुक्रवार दि. २६/९/१९८० नृसिंहवाडीला कन्यागत पर्व सुरू झाले. स्नानासाठी लाख ते दीड लाख भाविकांनी गर्दी केली होती. पुढेही गर्दी महिनाभर वाढणारच होती. कन्यागत पर्वात स्नान करून मी तसाच अक्कोळला गेलो आणि आई-काकांना भेटून मिरजेला परतलो.

भाद्रपद अर्धा संपला. काळ्या ढगांची आकाशात गर्दी जमत होती. जोराचा गार वारा आणि सरीवर सरी कोसळणारा पाऊस यामुळे वातावरण कुंद झाले होते. तब्येत बरी नव्हती. घरीच होतो. रमेश महाराज काकांना घेऊन डॉ. मुधोळकरांच्या दवाखान्यात आले होते. काकांना अशक्तपणा आला होता. धापही लागली होती. त्यांना मुधोळकरांच्या दवाखान्यात ॲडमीट करण्यात आले. सोबत आईही होत्या. सकाळी मी लवकरच दवाखान्यात गेलो. काका उठून बसले होते. मी त्यांना नमस्कार करून तब्येतीची चौकशी केली. तेव्हा ते "बरी आहे." असे म्हणाले. पुढे "गोठ्यातला पांढरा बैल विकला काय? लाकडं फोडून झाली काय?" असे त्यांनी विचारले. मला या बोलण्याचा उलगडा काही झाला नाही. मी फक्त बसून राहिलो. रमेश महाराज औषधे आणण्यासाठी बाहेर गेले होते. आई काकांच्यासाठी जेवण तयार करीत होत्या. काकांची विधाने, बोलणे मात्र मला दुचिन्ह वाटत होते. डॉ. मुधोळकरांना तब्येत दाखवून श्रीक्षेत्र पंत बाळेकुंद्रीला अमृतमहोत्सव उत्सवाला जायचे असे

काकांनी व आईनी ठरवले होते. त्या दृष्टीने त्यांनी कपडे, दागदागिने, पैसे आणले होते. तथापि, काकांना ॲडमीट व्हावे लागल्याने त्यांनी माझ्याजवळ काही रक्कम व दागिने ठेवण्यासाठी दिले. सुरुवातीला ते घेण्याचे माझे धाडस होत नव्हते. माझे घरही चंद्रमौळी होते. तरीही दिलेलं सर्व काही घरी ठेवून रजा काढून मी काकांच्या सेवेस राहिलो. काकांच्या तब्येतीला फारसा आराम नव्हता. डॉ. आर.व्ही. मुधोळकरांच्या मार्गदर्शनाखाली सायंकाळी चार वाजता मिशन हॉस्पिटल, मिरज येथे काकांना दाखल करणेत आले. पुढील तपासणी डॉ. लोमटेंच्या मार्गदर्शनाखाली चालू झाली. काका स्वत: जिना चढून ॲडमीट झाले. डॉ. लोमटेनी तपासणी औषध करून लिहून दिली. रमेश महाराज औषध आणण्यास खाली मेडिकल दुकानात गेले. आईने चहा करून दिलेला चहा काका स्वत:च्या हाताने घेऊन प्याले. तर आईंना कॉफी करून पिण्यास सांगितले. आई कॉफी घेऊन भांडं विसळून ठेवत होत्या. मी काकांच्या पायाजवळ बसून होतो. एवढ्यात काकांनी आपला देह शांतपणे ठेवला.

मंगळवार दि. ७/१०/१९८० (भाद्रपद कृ. १४) रात्रीचे आठ वाजून वीस मिनिटे झाली होती. मी एकदम हंबरडा फोडला. आई मूर्च्छित होऊन पडल्या. इतक्यात रमेश महाराज आले. काय करावे हेच कुणाला कळत नव्हते. कोणी कुणाला आवरायचे? सावरायचे? पण रडत बसणे हे योग्य नव्हते. ती वेळही नव्हती. मी आता सावरलो. अश्रू ढाळत पुढच्या तयारीला लागलो. रात्री ११ वाजता सर्वांना दु: खाची बातमी देऊन, काकांचा पार्थिव देह घेऊन, रमेश महाराज आईंना घेऊन, कोल्हापूरच्या कुंभोजकर मावशींना घेऊन रात्री दोन वाजता अक्कोळला आलो. पहाटे चार वाजता काकांच्या पार्थिव देहाला मंत्राग्नी देण्यात आला. सकाळी सात वाजता घरी आलो.

काळाने प्रेमळ असे एक पितृछत्र हिरावले होते. जुन्या जमान्यातील एक प्रामाणिक, परोपकारी, दयाळू, भोळे-भाबडे, श्रद्धाळू काका आम्हाला सोडून अनंतात विलीन झाले होते. घर साऱ्या नातेवाईकांनी, रयतांनी, ग्रामस्थानी भरून गेले होते. सरकार वाडा माणसांच्या गर्दीने अपुरा पडू लागला. रमेश महाराजांच्या भगिनी माणिकताई, शालूताई, कालकुंद्री आईंना धीर देत होत्या. रमेश महाराज सुन्नपणे बसून होते. त्यांचे छायाछत्र निघून गेले होते. सांत्वनाकरीता

आलेल्यांच्या समोर ते लहान मुलासारखे ओक्साबोक्सी रडत. दिवस पुढे सरकू लागले. मंगळवार दि.२१/१०/१९८० काकांचे दिवस झाले. हजार दीड हजार लोकांचा प्रसाद झाला. पै-पाहुणे परतू लागले. सरकार वाडा हळूहळू रिकामा होऊ लागला. काकांनी माझ्याकडे दिलेली रक्कम, आईचे दागिने ही अनामत रमेश महाराजांच्याकडे सोपवून काकांचे जोडे (कातडी चप्पल) मी अनामत म्हणून घेतले आणि भरल्या डोळ्यांनी मी बाहेर पडलो. आजही काकांचे जोडे ही माझी सर्वात मोठी अनामत म्हणून मिरज मठीत पूजत आहे.

अक्कोळचे काका गेल्यानंतर मनाला एक प्रकारची उदासीनता आली होती. पूर्वजन्मातील काहीतरी ऋणानुबंधाचे या परमेश्वरी गुणांच्या काकांनी माझी भेट झाली होती. ते श्रीपंत महाराज बाळेकुंद्रीकरांचे सद्भक्त होते. त्यांचे थोरले बंधू गुरुनाथ कुलकर्णी यांना पंत महाराज बाळेकुंद्रीकरांची पुतणी (गोपाळरावांची मुलगी रमा) विवाह करून दिली होती. श्रीपंत महाराज बाळेकुंद्रीकरांचे या सरकार वाड्यात येणे-जाणे होते. या वाड्यात ते भजन म्हणत, टिपऱ्या खेळत. अक्कोळ गाव ते आपले माहेर मानत. या गावावर त्यांची कृपा, माया, स्नेह होता. या गावातील अनेक लोक त्यांचे दीक्षित शिष्य होते. आता शनिवार दि. २५/१०/१९८० ते सोमवार दि. २७/१०/१९८० श्रीपंत बाळेकुंद्रीला महाराजांचा अमृत महोत्सवी उत्सव होता. श्रीपंत महाराज बाळेकुंद्रीकर यांच्या वडिलांचे नाव रामचंद्र बाळकृष्ण कुलकर्णी तर आईचे नाव गोदाक्का ऊर्फ सीताई होते. श्रीपंत महाराजांचा जन्म त्यांचे आजोळ दड्डी येथे श्रावण वद्य गोकुळ अष्टमी दि. ३/९/१८५५ रोजी दोनप्रहरी तीन वाजता झाला. त्यावेळी बाळेकुंद्रीला शाळा नसल्याने श्रीपंत महाराजांचे प्राथमिक शिक्षण १८६४ ते १८७२ वा काळात दड्डी येथे कन्नड भाषेत झाले. त्यांचे इंग्रजी शिक्षण बेळगाव येथील लंडन मिशन स्कूलमध्ये झाले. शिक्षण चालू असतांनाच श्रीपंत महाराज लंडन मिशन स्कूलमध्ये शिक्षकाचे काम करू लागले. सन १८७५ साली त्यांना पूर्व भाग्याने विस्मयाने हुच्च बाळाप्पा (बालमुकुंद बालावधूत) या पूर्णाद्वैती परमहंस सिद्ध पुरुषाचा लाभ होऊन अनुग्रह मिळाला.

बालावधूतामुळे त्यांच्या आध्यात्मिक जीवनाची उन्नत्तीची वाटचाल चालू झाली. एकोणीसाव्या शतकाच्या प्रारंभी सन १८१८ साली पेशवाई बुडाली.

मराठी साम्राज्य बुडाले. भारत वर्षात इंग्रजांचा एकछत्री अंमल सुरू झाला. हिंदू धर्माची अवहेलना झाली. सगळीकडे अधर्माची चिन्हे दिसू लागली. सगळीकडे द्वैतवाद, विषय भावना, अनिष्ठ चालीरीती, कर्मकांड, सोवळं-जातिभेद यांनी धर्माला मरगळ आली होती. अशा काळात बालावधूतांचा जन्म झाला. त्यांचे नाव बाळाजी अनंत कुलकर्णी असून, त्यांचा जन्म पार्श्ववाड जि. बेळगाव येथे झाला होता. त्यांची सांपत्तिक परिस्थिती बऱ्यापैकी होती. त्यांचा प्रपंच होता. त्यांना गोपाळप्पा, रंगप्पा, तुंगव्वा ही अपत्ये होती.

पण ते पूर्व भाग्याने संसारात रमले नाहीत. ते बुवा, बैरागी, संताच्या संगतीत काळ घालवू लागले. तपाचरण, खडतर योगसाधना, संत संगती यामुळे त्यांच्यावर रामावधूतांचा अनुग्रह झाला. श्रीरामावधूतावर श्रीदेव दत्तात्रेयांचा अनुग्रह होता. रामाधूतांनी श्रीबाळाप्पांना अनादी सिद्ध अवधूत पंथाची दीक्षा देऊन जग उद्धाराचे, लोककल्याणाचे मार्ग दाखवले. बालावधूत (बाळाप्पा) हे आता आत्मानंदात नमू लागले. संसार त्यागून ते रानोमाळ डोंगर दऱ्यांतून फिरू लागले. त्यांच्याजटा, दाढी, अशा बाह्य वेषावरून लोक त्यांना हुच्च बाळाप्पा (खुळा बाळाप्पा) म्हणू लागले. कबरी-बन, कर्देगूडी, दड्डी, बेळगाव, मलप्रभेच्या परिसरात ते फिरू लागले.

एकदा दड्डीला बालावधूत श्रीपंत महाराजांच्या मामांच्या घरी गेले होते. तेथे शाप आणि उ:शापाच्या बोलण्यातून बालावधूतांनी श्रीपंतमहाराजांना विधिवत अवधूत पंथाची दीक्षा देऊन अवधूत संप्रदायाचे कार्य सोपावले. तो दिवस होता आश्विन वद्य द्वादशी म्हणजेच गुरुद्वादशी. श्रीपंतमहाराजांनी पुढे पंचवीस वर्षे हा अवधूत संप्रदाय श्रीसद्गुरु बालावधूतांच्या आज्ञेप्रमाणे चालवून अवधूतरूपी झेंडा फडकवत ठेवला. त्यांचे बंधू गोविंदपंत, गोपाळपंत, वामनराव, नृसिंहराव व त्यांच्या अनेक शिष्यांनी हा ध्वज खांद्यावर घेऊन साऱ्यांवर अवधूत कृपेचा वर्षाव केला. श्रीपंतमहाराजांचे मामा श्रीपादपंत कुलकर्णी यांची कन्या यमनाकाशी दि. १८/४/१८८२ रोजी रायबाग येथे लग्न झाले. संसारात राहूनही त्यांनी विविध प्रकारचे अनुभव घेत सन १८८१ ते सन १९०३ पर्यंत २२ वर्षांच्या कालावधीत लंडन मिशन स्कूलला शिक्षकाची नोकरी केली. इ.स. १८७७ कार्तिक महिन्यात बाळाप्पांनी श्रीशैल्य गमन केले आणि

श्रीपंतमहाराज बाळेकुंद्रीकरांनी श्रीदत्तप्रेम लहरी (पदसंख्या २७५७) तून भजन लालसा, गुरुप्रीत, अद्वैत असे अनुभव सांगून भजनाला सर्वव्यापी स्वरुप दिले. जग अवधूतमय केले.

श्रीपंतमहाराजांनी आपले अवतार कार्य अश्विन वद्य ३ शके १८२७ सोमवारी पहाटे ३.३० वाजता (दि. १६/१०/१९०५) रोजी श्रीक्षेत्र पंतबाळेकुंद्री येथे संपविले. अशा थोर संत श्रीदत्तावतार, श्रीपंतमहाराज यांचा अमृत महोत्सव बाळेकुंद्रीला मोठ्या प्रमाणात साजरा होणार होता. आप्पासाहेब पंत बाळेकुंद्रीकर, आण्णासाहेब पंत बाळेकुंद्रीकर यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा होणार होता. आप्पासाहेब पंत बाळेकुंद्रीकर, आण्णासाहेब पंत बाळेकुंद्रीकर यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणातील उत्सव समर्थपणे पार पाडण्यासाठी वर्षभर या घराण्यातील मंडळी, भक्त मंडळी झटत होती. श्रम करीत होती.

शनिवार दि. २५/१०/१९८० रोजी सकाळी ८ वाजता बेळगावातील श्रीपंत वाड्यातून भक्त मंडळींनी श्रीपंत महाराजांच्या तसबिरीची भव्य मिरवणूक काढली, हत्ती, घोडे, उंट, वाजंत्री, भजनी मंडळाचे ताफे, हलगी, तुतारीने बेळगाव दुमदूमून गेले. रात्री नऊ वाजता प्रेमध्वज उभा करून मोठ्या प्रमाणात आतीषबाजी करण्यात आली. रविवार २६/१०/१९८० उत्सवाचा मुख्य दिवस होता. या दिवशी पालखी सेवा ही अत्यंत महत्त्वाची सेवा. त्यासाठी खूपच गर्दी झाली. भजनी मंडळी, फटाक्याची आतिषबाजी, आंबराईचा सारा परिसर प्रकाशाने आणि आवाजाने भरून गेला. सोमवार दि. २७/१०/१९८० या दिवशी शिस्तबद्ध प्रसाद वाटप करणेत आले. दोन प्रहरी बारा वाजता तोफ उडविल्यानंतर प्रसाद घेण्यास सुरुवात झाली. सुमारे दोन ते तीन लाख लोकांनी प्रसाद घेतला. हा माझ्या जीवनातील अविस्मरणीय सोहळा होता. देवदुर्लभ असा हा सोहळा. आयुष्यात एकदा तरी हा उत्सव, पालखी सोहळा लुटावा, तृप्त व्हावे असे माझे मत आहे. स्व. काकांना या उत्सवास यायचे होते पण ते घडले नाही याचे मला व रमेश महाराजांना दुःख होते.

१९८० साल कधी संपले हे कळले नाही. नोकरी, रोजचा प्रवास, गुरुबंधूंच्या घरी येणे-जाणे, कोल्हापूरात श्री. शिर्के दत्त मंदिर, श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज जयंती, पुण्यतिथी, गुरुद्वादशी असे उत्सव, महाप्रसाद, तर कधी

दर्शन असा वेळ भरगच्च जात होता.

साऱ्या गुरुबंधूंना, भक्त मंडळींना कोल्हापूरला नेणे शक्य नव्हते म्हणून जाधवांच्या खाजगी उत्सवालाच आम्ही सार्वजनिक स्वरूप देऊन महाप्रसाद केला. जयंती-पुण्यतिथीतील उत्सव अशा सर्व कार्यक्रमांची सूत्रे शिवलिंग आण्णा घेवारे, शंकरराव सखाराम कांबळे, शिवाजीराव जाधव यांचेकडे सोपविली. जयंती पुण्यतिथीला सात दिवसांचा कार्यक्रम, या सप्ताहात गायन, भजन, कीर्तन असे कार्यक्रम सुरू झाले. गुरुबंधू व अगणित भक्त मंडळी यांच्या संख्येमुळे जाधवांचे घर अपुरे पडू लागले. श्रावण वद्य दशमी श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या पुण्यतिथीला व गोकुळ अष्टमीला पाऊस बरसू लागला, म्हणजे प्रसादाच्या कार्यक्रमास अडचण येत असे. जाधवांच्या घरासमोरील पवारांच्या खुल्या जागेत मंडप घालून महाप्रसाद केला तरी जागा अपुरी पडू लागली. जागेच्या अडचणी सुटतच नव्हत्या. दरम्यानच्या काळात जुनी मठी पाडून मी मातीच्या बांधकामात भाजीव विटांचा वापर करून नवी मठी बांधली आणि पुण्यश्लोक माईसाहेब शिर्के, बाळासाहेब शिर्के यांच्या अमृतहस्ते त्यांनीच आणलेल्या ४X३ फुटाच्या तसबिरीची स्थापना केली. महाप्रसाद सुरू केला पण तरीही जागा अपुरी पडू लागली.

भविष्यकालीन पुढील पंचवीस वर्षाचा विचार करून गुरुबंधू व भक्त मंडळींशी विचार विनिमय करून मालगाव रस्त्याला मधूकर खाडे यांची अर्धा एकर शेतीच या कार्यासाठी विकत घेण्याचे ठरले. ते घराणे माझ्याही पूर्वी श्रींचे भक्त घराणे होते. करार केला, पैसे दिले पण बांधकाम परवाना, मोजणी व इतर अनेक अडचणी आल्याने तो विषयच बंद झाला.

तशी दोन-वर्षे पुन: घाईगर्दीतच गेली. कृष्णा घाटावरही मला फार मोठी जागा मिळाली नव्हती. अधून-मधून मी कृष्णाबुवांच्या समाधीची पूजा करून येत असे. या दरम्यान आमच्या मिरज मठीतील रंगकाम निघाले. या रंगाची खरेदी श्रीशैल्य शिंदगी यांच्या दुकानात करण्यात आली. तर त्यांनीच हे रंगकाम श्री. शंकर ढवळे या पेंटरला ठरवून दिले होते. या रंगकामामुळे माझा व पेंटर ढवळे यांचा परिचय वाढला. मी त्यांना सहज विचारले, "पेंटर तुम्ही कोठून येताय?" तेव्हा ते म्हणाले, "म्हैसाळ स्टेशनहून." मग उत्सुकता म्हणून

म्हैसाळ स्टेशन परिसर कसा आहे असे विचारता पेंटर ढवळे म्हणाले, "स्टेशनवर सर्व वस्ती शेतकऱ्यांची आहे. गरीब लोक आहेत. शेतीवर अवलंबून आहेत. शांत परिसर आहे. म्हैसाळहून आणि मिरजेहूनही जवळ आहे. सायकलवरून मी अर्ध्या तासात मिरजेला येतो." मलाही अशी शांत निवांत जागा दत्त मठीसाठी हवी होती. पण हे सारे दत्त महाराजांच्या कृपेवर अवलंबून होते. मी पेंटरना म्हणालो, "मला श्रीदत्त मठीसाठी एखादी जागा तेथे बघा." पेंटर "बरं बघतो," असे म्हणाले. असेच काही दिवस गेले आणि एके दिवशी पेंटर सकाळीच मिरज मठीत आले. पूजा-आरती संपताच मला म्हणाले, "माझ्या चुलत सासऱ्याची साडेसहा गुंठे जागा विकायला निघाली आहे. मठीला घेणार असाल तर बघा." यावर मी त्यांना "त्या जागेचा सातबारा उतारा नकाशा आणून द्या व दरही विचारून घ्या," असे सांगितले.

पुढील दोन महिन्यात श्री. ढवळे पेंटरनी जागेचा ७/ १२, नकाशा आणून दिला व गुंठ्याला दोन हजार रूपये दर सांगितला. मठीला जागा मिळणार म्हणून मला खूप आनंद झाला. काही तजवीज करून, जुळणी करून ही जागा विकत घ्यावी असे वाटू लागले. पण त्यावेळेचा माझा पगार रु. ८९९.६० पैसे होता व हाती ८५१रु.६० पैसे पडत होते. यात घरखर्च, वडिलांचा दवाखाना हे सारं अवघड गणित होते. मात्र एक मन म्हणत होते म्हैसाळ स्टेशनला मठीला जागा घेणे अवघड आहे. तर दुसरे मन, जागा बघून घ्या असं म्हणंत होते. पैशाची जुळणी होत नसल्याने श्री. ढवळे पेंटरनी मला जागा बघायला कधी येता असा निरोप देऊनही मी टाळाटाळ करीत होतो. पण त्यांचा आग्रह तळमळ बघून मी माझे मित्र इंजिनियर श्री. अजय भोकरे यांच्या स्कूटरवरून म्हैसाळ स्टेशनकडे निघालो. ते साल होते १९८३. स्कूटर जाण्यासाठी रस्ता नव्हता. ती बैलगाडी वाट होती. धुळीने भरलेली, खाचखळग्याची, कोठे रुंद तर कोठे अरुंद वाट होती. बाजूला पिवळ्या करड्या रंगाचा लांबलचक माळ पसरला होता. बऱ्याच लांबपर्यंत पसरलेले ते उघडे-बोडके माळ होते. बाभळ, लिंब, बोरीटीने व्याप्त असा तो माळ. खोलगट भागात हिरवी झुडपं, उन्हामुळे माळ तांबडाभोर दिसत होता. बराच वेळ चालल्यानंतर थोडी बहुत शेती दिसू लागली. थोडी वस्ती, खेटून उभी राहिलेली पालं, खोपट्या, अंगणात खेळणारी

पोरं. जळणाचे ढिगारे, पालासमोर मांडलेल्या दगडाच्या चुली, पाण्यासाठी पत्र्याच्या घागरी घेऊन जाणाऱ्या महिला, रडणारी पोरं, त्यांची समजूत काढणारी वयस्कर माणसं. पालासमोरच पोरांचा डाव. रस्त्याच्या कडेलाच बैलगाड्या सोडलेल्या. अधून मधून एकमेकांच्या अंगावर ओरडणारी कुत्री, पिकं तशी फारशी दिसत नव्हती. तीस पस्तीस खोपटांची वस्ती. रानात कामाला जाणे, हेच याचे उदर निर्वाहाचे साधन. बहुतेक खोपटांना भिंती नव्हत्याच. उसाच्या पाल्यानं शेकारलेली छप्परं, पालाच्या मागच्या बाजूला ना दरवाजा, ना कूलुप, आता खोपटं ओलांडून म्हैसाळ स्टेशनवर पोहोचलो. निर्मनुष्य असं हे रेल्वे स्टेशन. येथे गाड्या थांबत-निघून जात. प्रवासी मात्र अपवादालाच.

श्री. शंकर ढवळे पेंटर आम्हास नेण्यासाठी स्टेशनजवळ आला होता. त्याने त्यांच्या घराकडे आम्हास नेले. घर कसलं एक साधं खोपाट होतं ते. उन्हाचा तडाखा मोठा होता. चालून दमलो होतो. तहान लागली होती आणि भूकही लागली होती. पण तेथे हॉटेल वगैरे नव्हते. श्री. ढवळे पेंटरच्या दारासमोरच तो जमिनीचा तुकडा होता. न नांगरलेला, न लागवडी खालचा. पडीक तुकडा असल्याने तेथे मळणीसाठी खळं करून शेजाराचे शेतकरी आपली मळणी येथेच करीत. एक गोल दगडी रुळ पडलेला दिसत होता. अंदाजे साडे सहा गुंठ्याची जागा. समोर कच्चा रस्ता, ढवळे पेंटरनी जागा दाखवली, माहिती दिली. त्यांचा चहा पोहे घेऊन आम्ही बाहेर पडलो. आसपास वीस पंचवीस खोपटं दिसत होती. काही कच्च्या मातीची घरं, काही कुंभारी कौलानं शाकारलेली घरं. पण प्रत्येकाच्या अंगणात मातीचं तुळशी वृंदावन दिसत होतं. घरालगतच गोठा-गायी, म्हशी, घरालगतच काही बैलगाड्या, बाभळ, लिंब, आंब्याचा आसरा-झाडोरा, गावातला रस्ता नव्हताच. फक्त एक कच्ची सडक म्हैसाळकडे जाणारी. रस्त्याच्या पलीकडे एक छोटी प्राथमिक शाळा दिसत होती.

आता आम्ही माघारी परतत होतो. श्री. ढवळे पेंटर आम्हांला हरोटीच्या माळापर्यंत पोहोचवायला आला होता. सूर्य मावळतीला चालला होता. क्षितिज तांबडे होत होते. पूर्वेकडचा वारा सुरू झाला. मी आणि श्री. भोकरे साहेब मिरजेकडे येऊ लागलो. आम्हा दोघांनाही जागा पसंत पडली होती.

रात्री झोपताना जागेचा विषय आलाच. मिरज शहरापासून थोड्या

अंतरावर एक निवांत, शांत जागा आपण शोधत आहोत. यापूर्वी मालगाव रोडवरची मधुकर खाडेंची जागा पाहिली होती. हरोटीच्या माळाला पाण्याच्या टाकीजवळील गायकवाडाची जागा पाहिली. पण त्यांनी किंमत जास्त सांगितली होती. म्हैसाळ गावातही डॉ. जयसिंगराव शिंदे (म्हैसाळकर) यांनी जागा शोधण्याचा प्रयत्न केला होता. परंतु योग जुळत नव्हता. आता ही तर जागा मिळणार का? असे अनेक प्रश्न मनात येऊन जात होते. तर शंकेने अनेक प्रश्नांची भरच पडत होती. आपल्या नंतर हे चालणार काय? अशा प्रश्नांची भरच पडत होती. कारण ओळखीचे येथे कोणीच नव्हते. श्री. ढवळे पेंटर हेही इथे येऊन राहिलेले. तर माझे परिचित श्री.विलासराव घोरपडेंचे सासरे बाळू तुका घोरपडे (आण्णा) हे म्हैसाळला राहत. रात्री बराच वेळ विचार करीत होतो. दिवसभराची दगदग, चालणं, यामुळे गाढ झोप केव्हा लागली हे कळालंच नाही. जाग आली, अद्याप पडून राहावं, असं वाटत होते. दिवस बराच वर आला होता. इतक्यात ढवळे पेंटर हजर.

श्री. ढवळे पेंटरच्या बोलण्यात पुन्हा तोच विषय आला. ती जागा रामू शिंदे, गुंडा शिंदे, बंडा शिंदे या तिघा बंधूंची असून, दोन हजार रुपये गुंठा या दराने मंदिरासाठी ही जागा द्यायला तयार आहेत, असे सांगितले. मी विचार करून सांगतो, असे सांगून कार्यालय गाठले.

काही दिवस गेले. श्री. अजय भोकरे याबाबत विचारणा करीत होते. श्री. ढवळे पेंटरही विचारणा करीत होते. मलाही जागा आवडली होती, पण पैशाची व्यवस्था होत नव्हती.

एक दिवस पुन्हा ही जागा पाहण्यासाठी मी सायकलने गेलो. ते दिवस पावसाळ्याचे होते. आभाळ भरून आलेले, सारीकडे हिरवेगार गवत पसरलेले. रानात सर्वत्र चिखल, काही शेतकरी पेरण्या करीत होते. बाजरी, कडधान्याची पेरणी करण्यास सुयोग्य वेळ होती. आता माळावरच्या पालात शांतता होती. बैलगाड्या दिसत नव्हत्या, की मोकळ्या जागेवर मुलांचा खेळ नव्हता. रुळ ओलांडून पलीकडे जाऊन बसलो. समोर रस्त्याच्या पलीकडे शाळा, आजूबाजूला खोपट्या, दूरवर दिसणारी आंब्याची झाडं, लिंब, साध्या घरात राहणारी साधी भोळी माणसं. समोरच्या रस्त्यावर रहदारी नव्हती. सारं शांत शांत आणि निस्तब्ध.

गार वारा अंगाला झोंबत होता. श्री. ढवळे पेंटर घरी नसल्याने त्यांची भेट झाली नव्हती. मी शाळेकडे गेलो. रविवार असलेने शाळेला सुटी होती. पांढऱ्या मातीने बांधलेल्या शाळेच्या चार खोल्या. काही वर्गांना दरवाजे नव्हते. शाळेला लिंबाऱ्याच्या तुळ्या होत्या. तुळ्यावरच काही म्हणी खडूने लिहिलेल्या होत्या. सर्व दिशांची नावे, त्या त्या दिशेला कौलारु खोल्यात चिमण्यांची घरटी, चिमण्या चिवचिव करीत ये-जा करीत होत्या. शाळेसमोर भव्य पटांगण होते. पटांगणाच्या एका बाजूला वडाचं झाड होतं.

पेंटरची वाट पाहून परतीच्या मार्गाला लागलो. सूर्य मावळतीला लागला होता. मेंढरांचा कळप जात होता. त्यांचा विशिष्ट प्रकारचा आवाज, आणि त्यांना राखणारा याचा लांबवर ऐकू येणाऱ्या आरोळ्या, मेंढरं खाली मान घालून जात होती. कुत्री भुंकत होती. ओढ्याजवळ एक दोन पालं दिसली. ओढ्याला बरीच वर्षे पाणी न आल्याचे दिसले. ओढ्यावर निवडुंग, केंजाळ, निरगुंडी वाढलेली दिसत होती. रात्री मी मिरजेला पोहोचलो.

मिरज-म्हैसाळ स्टेशन हे अंतर अतिशय जवळचे. आडव्या रस्त्याने आठ किलोमीटर, हारोटीच्या माळाने सात किलोमीटर तर रेल्वेने पाच किलोमीटर. गाव शांत. रानातच अधिक वस्ती. माझ्या या दुसऱ्या फेरीत या गावच्या प्रेमात मी पडलो. मला जागा मला मनापासून आवडली.

त्या दिवशी मला बराच उशिरा झोप आली नाही. मनात अनेक विचार येत होते. जागा कधी घ्यावी? तेथे श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे मंदिर बांधावे, मंदिर बांधल्यानंतर त्याची व्यवस्था कोण पाहणार? माझी नोकरी फिरस्तीची, शिवाय जागा खरेदीसाठी पैशाची व्यवस्था कशी करावयाची हा विषय सर्वात महत्त्वाचा होता. आमच्यापैकी तेथे कोणीही नाही, तेथे मी अगदी एकाकी, तेथे मला आपुलकी दाखविणारी माणसं नाहीत, अशा विचार चक्रात मला कधी झोप लागली कळलेच नाही.

त्या रात्री मला एक विस्मयकारी स्वप्न पडले. स्वप्नात जागेवर श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज उभे आहेत आणि म्हणताहेत, "तानाजी आहे, काळजी करू नको." क्षणार्धात मी जागा झालो. अंगभर घाम सुटला. अंथरुणावर बसून, त्या स्वप्नाचा विचार करू लागलो. महाराजांनी मला म्हैसाळ स्टेशनवरील

जागेची, त्यावरील मंदिराची व पुढील व्यवस्थेची दिव्य दिशा दाखवली होती. मनात आनंदाची एक उर्मी घेऊन पुन्हा झोपी गेलो. भल्या पहाटे उठून नेहमीची पूजा आवरून ऑफिसला गेलो. त्या दिवशीच श्री. ढवळे पेंटरना भेटून जागेचा विषय निश्चित केला.

त्यावेळी माझा एकूण पगार १०८५ रुपये ४० पैसे होता. फंडातून काही रक्कम घ्यायचे मी ठरवले. तर कमी पडणारी रक्कम भिशीतून घ्यायची ठरवली. त्याचा व्याज दर दरमहा दर शेकडा पाच टक्के इतका होता.

दि. २१/१०/१९८५ रोजी जिल्हा भूमापन कार्यालय, सांगली यांचेकडून गट नं. २७९ ची सरकारी मोजणी करून घेतली आणि रामा गणू शिंदे, गुंडा गणू शिंदे, बंडा गणू शिंदे, म्हैसाळ यांचेकडून साडेसहा गुंठे जमीन २१/११/१९८५ रोजी १३,०००/- रु.स खरेदीपत्र करून घेतले. दि. १८/१२/१९८५ रोजी सकाळी प.पू. गोविंद महाराज कुलकर्णी सांगली, स्व. केशवराव गोखले, मिरज यांच्या शुभहस्ते जागेचे पूजन करून घेतले. मंदिराचा प्लॅन माझे मित्र श्री. अजय भोकरे साहेब यांनी केला होता. हा दिवस गोंदवलेकर महाराज यांच्या जयंतीचा होता. मंदिराचे बजेट तीस हजार रुपये होते. मंदिरासाठी पुढीलप्रमाणे साहित्य जमा केले. श्री. रामभाऊ पवार यांनी पाच ट्रक दगड २४० रु. ब्रास प्रमाणे दहा ब्रासचे चोवीसशे रु., निवृत्ती खाडे यांनी वीस पोती एसीसी सिमेंट ६५ रु. पोते याप्रमाणे १३००/- रु., वाळू दर ३५० रु. ट्रक असे तीन ब्रास वाळू १०५०/- रु., स्टील रु. २५००/- डी. जी. सेल्स, मिरज यांचेकडून, पाया खुदाई दर मजुरास दररोज दहा रुपये त्याचे एकुण ८०/- रु., मोहन सुतार यांची मजुरी चारशे रु., असा एकुण खर्च डिसेंबर अखेर सातहजार सहाशे पंचेचाळीस येणार होता.

पायाभरणीसाठी प्रमुख उपस्थिती म्हणून गुरुबंधू स्व.शिवलिंग आण्णा घेवारी, शंकरराव कांबळे, बाळकू मामा हंडीफोड, संगाप्पा माळी, आण्णा बाळू शिंदे, बाबूराव सूर्यवंशी, श्री. शिवाजीराव जाधव, श्री. चंद्रकांत कुरणे, श्री. रमेश घोरपडे, मंगल शिंदे, श्री. मधु पवार, डॉ. बाबूराव शिरढोणे, श्री. पांडुरंग रामचंद्र शिंदे आणि इंजिनिअर श्री. अजय भोकरे साहेब होते.

मी हाती घेतलेले हे काम पुढे सरकू लागले. बांधकामाचा मला कसलाच

अनुभव नव्हता. पाया नुकताच काढून झाला होता. श्री. बिसलाप्पा नाईक, श्री. आनंदा भोसले ही मंडळी कामाला झपाटून लागली होती. स्व. संगाप्पा मामा माळी, आण्णा शिंदे ही मंडळी येऊन कामाची चौकशी करत. श्री. अजय भोकरे साहेब, स्व. बापू मोरे या गवंड्याला बांधकामाबाबत रोज सूचना देत असत. मी ऑफीसचे काम संपल्यावर श्री. चंद्रकांत कुरणेंच्या बरोबर रॉयल इनफिल्ड क्र. ६३६ ने कामावर येत असे. मिरजेत येऊन बांधकामाला लागणारी वीट, सिमेंट,वाळू, खिळे, मोळे, सळी त्वरित पाठवून देत असे.या कार्यात मी झोप विसरलो, तहान-भूक विसरलो. आठ-आठ दिवस मी मिरजेतल्या घरीसुद्धा जायचे विसरलो. बांधकामाशिवाय दुसरा विषय डोक्यात येतच नव्हता. बांधकामावर पाणी मारायला धोंडिबा शिंदे हे असत. त्यांना सर्वजण देव म्हणत. दिवसभर ते इरिगेशन चेंबरवरून तपेल्या, घागरीनं पाणी आणून बांधकामावर मारत. त्यावेळी त्यांचा पगार दिवसाला दहा रुपये असा होता. बघता बघता इमारत पूर्ण झाली. आता श्री. यल्लाप्पा गवंडी, श्री. मल्लू गवंडी, श्री. विलास गवंडी, श्री. परसू गवंडी, श्री. बसवंत गवंडी, श्री. मल्लाप्पा गवंडी यांनी गिलाव्याचे काम संपविले आणि श्री. शंकर ढवळे पेंटरनी रंगकाम सुरू केले. श्रावण उजाडत होता. माळ हिरवा दिसू लागला होता. बाजरी, मूग, मटकी रानात दिसू लागली होती. निसर्गानं साऱ्या बाजूंनी आपलं वैभव पसरलेलं होतं. वातावरणात प्रसन्नता होती. मी मुद्दामच सवड काढून रानातल्या वस्तीवर गेलो. मंदिराच्या उद्घाटनाची माहिती दिली. स्व. संगाप्पा मामा माळी आणि स्व.आण्णा शिंदे यांनी वस्तीवरच्या सर्वांची बैठक बोलावली. कोणी काय काय करावयाचे ते ठरवले. वस्ती कामाला लागली. तर श्री. चंदर कुरणे, श्री. मंगल शिंदे, श्री. विलास घोरपडे, श्री. रमेश घोरपडे, श्री. तानाजी घोरपडे ही मंडळी कामासाठी झटू लागली. स्व. शिवलिंग आण्णा घेवारी, शंकरराव कांबळे, श्री. शिवाजी जाधव, श्री. मुन्ना भोजमालपाणी, श्री. सुभाष शिंदे, श्री. डॉ. मधुकर म्हेत्रे, श्री. आनंदराव मंडले, श्री. श्रीकांत जाधव, स्व. किसन गोखले या मंडळींनी मिरजेतला व्याप सांभाळला.

तर भजन, कीर्तन, उत्सवाची सर्व प्रकारची जबाबदारी स्व. प्रभाकर गोखले, श्री. सुरेश कांबळे, श्री. सावंता म्हेत्रे, श्री. राम महाजन, श्री. विलास

शिंदे आदींनी उचलली. मंदिरासमोरील कच्च्या रस्त्याची डागडुजी करण्यात आली. वस्तीवरील मंदिर परिसरातील उकिरडे एकजुटीने हलवले. केरकचरा बाजूला केला. सर्वत्र स्वच्छता करून घरासमोरील अंगणे झाडून, लोटून स्वच्छता केली. उत्सवाचा वीणा दि. १४/८/१९८६ रोजी उभा करण्यात आला. दररोज भजन, कीर्तन ठेवण्यात आले होते. दि.२०/८/१९८६ श्रावण वद्य दशमी श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज, श्रीपंत महाराज बाळेकुंद्रीकर, श्रीस्वामी समर्थ अक्कलकोट, श्रीशिव चिदंबर महास्वामीजी, मुरगोड यांच्या तैलचित्राची स्थापना करणेत आली. वास्तुशांत करणेत आली. जवळ जवळ पाच ते सात हजार भक्तांना महाप्रसाद झाला. अनेक महापुरुषांनी हजेरी लावली. त्यामध्ये प्रामुख्याने रमेश महाराज अक्कोळकर, केशवराव गोखले, मिरज, गोविंद महाराज कुलकर्णी यांचा समावेश होता. तर डॉ. जयसिंगराव शिंदे म्हैसाळकर, श्री. मनोजबाबा शिंदे म्हैसाळकर, श्री. रतनसिंगबाबा शिंदे म्हैसाळकर, श्री. बाळासाहेब कुरणे, शंकरराव माळी आदी स्थानिक मंडळी उपस्थित होती. नेहमीची भक्त मंडळी, गुरुबंधू, तर आण्णा बाळू शिंदे, संगप्पा कृष्णा माळी ही सर्व मंडळी मंदिरासाठी झटणारी, तर एकेक दिवस बैलगाडीने बांधकामासाठी पाणी आणण्यापासून मुरुम आणण्यापर्यंत सर्व प्रकारचे सहाय्य करणारी मंडळी उपस्थित होती. हे सारे अविस्मरणीय होते. श्री. चंदर कुरणे सारखा माणुसही मंदिरासाठी झिजला. रात्रंदिवस माझ्या सोबतीला राहून काम उरकले आहे. म्हैसाळमध्ये मी श्री. विलासराव घोरपडे यांच्यामुळेच आलो, तर म्हैसाळ स्टेशनला श्री. शंकर ढवळे पेंटरमुळे आलो होतो. त्यांच्यामुळेच श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज मठीसाठी– मंदिरासाठी साडेसहा गुंठे जमीन मिळाली होती. श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांनी स्वप्नात दिलेल्या आदेशानुसार– वचनानुसार मी म्हैसाळ स्टेशनला आलो होतो.

त्यांच्या वचनानुसार थोड्याच अवधीत श्रीदत्त मठी उभी राहिली होती. त्यांचे जीवनाचे दिव्य कार्य सुरु झाले होते. मानव जातीचे कल्याण, त्यांच्या दर्शनाने व्हावे एवढीच माझी इच्छा व आशा होती. कारण माझे जीवन त्यांनीच तारले होते. ते माझे तारणहार, देव, सारे काही होते. या मंदिर पूर्ततेनंतर मला खूप आनंद झाला होता. आता येथून पुढे हेच माझे गाव होते. इथेच मला राहावे लागणार होते. मला अशी मनं जोडावी लागणार होती की, त्यांची

माझी ओळख अनेक दिवसांची, अनेक वर्षांची, नव्हे अनेक जन्माची, असे नाते निर्माण करावयाचे होते.

दिवस जात होते. नोकरीचा व्याप वाढला होता. यावेळी मी मिरज वॉटर वर्क्सला कनिष्ठ लिपिक म्हणून काम करीत होतो. दर शनिवारी मी म्हैसाळला मठीत मुक्कामाला जाई. मुक्काम करून सोमवारी सकाळी मी कामावर येत असे. सायकलने ये-जा करीत असे. मंदिराची व्यवस्था सुरुवातीला श्री. शहाजी पवार हे पाहत. ते मिरजेहून ये-जा करीत. लवकरच ते मिरज मठीत परत आले. श्री. बिसलाप्पा नाईक हे मंदिरात काम करू लागले. त्यावेळी त्यांना मी दोनशे रुपये महिना पगार देत होतो. लोकांना एक उत्सुकता होती ती ही की हे मंदिर कशाचे होणार? सुरुवातीला काही लोक म्हणत कोण कशाला मंदिर बांधतंय? बहुधा एखादे हॉटेल, किराणा दुकान, पिठाची गिरण वगैरे होणार असेल पण लोकांचा गैरसमज दूर झालेला होता. श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज, श्रीपंत महाराज बाळेकुंद्रीकर, श्रीशिवचिदंबर महास्वामीजी, श्रीस्वामी समर्थ यांच्या अवतार कार्याविषयी लोक अनभिज्ञ होते.

केवळ त्यांना नृसिंहवाडीत दत्ताचे स्थान आहे एवढेच माहीत होते. मी शनिवारी मुक्कामाला आलो की, रात्री धार्मिक ग्रंथातील सत्पुरुषाची चरित्रे वाचून दाखवू लागलो. ते ऐकण्यासाठी लोक जमू लागले. माझी इथं फारशी ओळख नसलेने भाकरी बांधूनच इकडे येत असे. सकाळी पूजा-आरती आवरत असे. हळू हळू येथील काही मंडळीचा जवळून-दाट परिचय होऊ लागला. त्यात संगाप्पा मामा माळी, आण्णा शिंदे यांचा परिचय महत्त्वाचा होता. मोलाचा होता. माझ्या माघारीही ही मंडळी मंदिराकडे फेरी मारून चौकशी करीत. अडी-नडी काढत. पुढे पुढे मी शुक्रवार, शनिवार मुक्कामाला येऊ लागलो. या काळात आण्णा शिंदेही मुक्कामाला येऊ लागले. चंदर कुरणेही मुक्काम करू लागले. रविवारी मात्र मिरजेहून भक्त मंडळी, गुरुबंधू जेवण घेऊन येत आणि दिवसभर थांबत. त्यांनाही इथला परिसर, मोकळी हवा, साधी माणसं आवडू लागली. पूर्वी रस्ता असा नव्हताच, म्हैसाळच्या बाजूने आमदार मोहनराव शिंदे-म्हैसाळकर यांनी तर बेडगच्या बाजूने आमदार विठ्ठल दाजी पाटील यांनी दोन्ही बाजूला गटारी आणि मुरुमाचा कच्चा रस्ता करून दिला. पूर्वीचा हा

बेळगाव–तासगाव लष्करी रस्ता असून, तो विटा–दहीवडी–नातेपुते–भिगवण–पुणे असा ऐंशी फुटी रस्ता आहे. तसेच त्याकाळी म्हैसाळ स्टेशनला बस नव्हती. मिरजेहून पॅसेंजर रेल्वेने अथवा मोटर सायकल, सायकलने म्हैसाळ स्टेशन परिसरात यावे लागे. रेल्वेच्या अलीकडे पूर्वेला शेतकऱ्यांची खोपटं, मातीची घरे होती. या भागात धडक योजनेचे पाणी आलेने द्राक्षबागा आणि ऊसासारखी बागायती पिके होऊ लागली होती. तर टेकाडावर सातवीपर्यंत शाळा होती. सुखी आणि समाधानी असा एक परिसर आकाराला येत होता. रेल्वेच्या पलीकडे हरोटीच्या माळावर खोपटं, कुडाच्या घराची वस्ती होती. ती बाहेरच्या भागातून आलेल्या शेतमजुरांची वस्ती होती. शिक्षणाचे प्रमाणही अत्यंत कमी होते.

अधून मधून मी म्हैसाळलाही जात असे. श्री. तानाजी घोरपडे येत. त्यांच्या बरोबर हट्टी लक्ष्मी जवळच्या मळ्यात चालत जात असे. या हट्टी लक्ष्मीची जत्रा असे. आंबील वाजवत नेऊन ही जत्रा या भागातील लोक साजरी करीत. माझ्याही आधी येथे भगवान महाराज येऊन गेले होते. संगाप्पा मामा माळी यांच्या वस्ती जवळील खोपटात ते राहत असत. ते भागवत भक्त होते, त्यांनी येथील काही भक्तांना पंढरीची माळ व नाम दिले होते. पुढे ते परांडा तालुक्यात गोवर्धनवाडी येथे समाधीस्थ झाले.

दिवस जात होते. मानवी जीवनाच्या सुखाचे, कल्याणाचे कार्य म्हैसाळ स्टेशनवर सुरू झाले.

मिरज कृष्णा घाटावरील कृष्णाबुवांची समाधी दृष्टांतानुसार शोधून काढली होती. हे यापूर्वी कथन केले आहे. पण येथे समाधीचे बांधकाम मात्र लवकर होत नव्हते. समाधीची पूजा मात्र श्री. सुरेश गोरे, शंकर आंबी वगैरे भक्त मंडळी करीत होते. मला कामाच्या व्यापात महिना–महिना तिकडे जाता येईना. पण लवकरच त्या जागेत व परिसरात जागेचे गुंठेवारी प्लॉट पडले. त्याकाळी चार हजार रुपये गुंठा असा भाव होता. येथे कृष्णाबुवांचे मंदिर होत आहे, या भावनेने आणि गावात एक चांगले कार्य होत आहे, या हेतूने श्री. कृष्णा दत्तू गोरे, स्व. मुकुंद गोरे, शंकर दत्तू गोरे, प्रकाश दत्तू गोरे, विलास दत्तू गोरे या गोरे बंधूंनी आणि स्व. धोंडीराम दादू आंबी यांनी प्रत्येकी दोन दोन गुंठे जमीन मला खरेदी करून

दिली. शेजारीच वॉटर वर्क्सचे हेडवर्क्स होते. जेथून मिरजेला पाणी पुरविण्याकरिता कृष्णा नदीतून पाणी उचलले जात होते. या हेडवर्क्सच्या हद्दीत राऊळबुवा, रघुनाथ निरंजन व अनेक संतांच्या समाधी होत्या.

कृष्णा घाट ही कृष्णा नदीकाठी राहणाऱ्या शेतकऱ्यांची वस्ती होती. या कृष्णाकाठी बांधलेला घाट हा महाराष्ट्रातील एक अप्रतिम घाट आहे. येथे मार्कंडेश्वराचे मंदिर, अनेक लहान मोठ्या मंदिरानी व्यापलेला हा कृष्णाघाट. श्रावणातल्या प्रत्येक सोमवारी मिरजेहून बरेच लोक येथे स्नानाला येत. पूजापाठ करीत. श्रावणातील शेवटच्या सोमवारी यात्रा भरे. आण्णाबुवांचा खीर-भाताचा प्रसाद गावकरी भक्तीभावाने करीत. गोरे, पाटील, मोरे, शिष्टे, कुरणे, येवारे, आंबी या लोकांची वस्ती तेथे प्रामुख्याने आहे. कृष्णाघाटावरील हे लोक कष्टाळू, श्रद्धाळू असे आहेत. अशा या कृष्णाघाटावर श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे धाकटे बंधू मल्लंमभटजी राहत होते. त्यांना भेटण्यासाठी तसेच श्रीदत्तावतार आण्णाबुवांच्या मंदिरात दर्शनासाठी महाराज येऊन गेल्याचा संदर्भ माझ्या वाचनात आला होता. म्हणून कृष्णाघाटावर श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे गुरूदेव श्रीस्वामी समर्थ अक्कलकोट यांचे मंदिर-मठी बांधण्याचे मी ठरवले होते. त्यासाठी जागा स्वच्छ करून कंपाऊंड मारून घेतले. नदीकाठ असल्याने तेथे पाया लागत नव्हता. मग पाईल फौंडेशन घेऊन बारा बाय बाराचा आणि आठ फूट उंचीचा चबुतरा करून, तेथे श्रीस्वामी समर्थ मठ बांधण्यात आला. या मठात अक्कलकोट स्वामी समर्थांची व श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या तसबिरीची स्थापना करुन मठाचे उद्‌घाटन व प्रसाद वाटप श्रीकृष्णा दत्तू गोरे, स्व. धोंडीराम आंबी यांचे हस्ते करण्यात आले. मठातील दोन्ही स्वामी महाराजांच्या तसबिरी या मारुती दळवी या मुंबईच्या पेंटरनी तयार केल्या होत्या. सर्वश्री सुरेश गोरे, श्री. शंकर आंबी, श्री. गोरे मालक, श्री. दिनकर कांबळे, श्री. मारुती पाटील, श्री. मारुती अलदार, स्व. गजानन मोरे आदी मंडळी मठातील पूजा अर्चा, आरती यांची व्यवस्था पाहू लागले. हा योग माझ्या जीवनातील कसोटीचा होता. गुरुदेवांच्या सेवेचा महत्त्वपूर्ण असा ठरला.

सर्वश्री सुरेश गोरे, श्री. शंकर आंबी, श्री. गोरे मालक, श्री. दिनकर कांबळे, श्री. मारुती पाटील, श्री. मारुती अलदर, स्व. गजानन मोरे इत्यादी

मंडळी श्रीस्वामी समर्थ मठाच्या स्थापनेला उपस्थित होती. सदर मठाच्या बांधकामाचा एकूण खर्च रुपये ३५,०००/- आला. म्हैसाळ स्टेशनवरील मठाची स्थापना दि, २०/८/१९८६ रोजी झाली तर कृष्णाघाटावरील मठाची स्थापना आक्टोबर १९८८ रोजी झाली. या पाठोपाठच्या बांधकामामुळे कर्जाचा बोजा वाढतच चालला. पण स्वप्नातला दृष्टांत सत्यात आणणाऱ्या श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्यावर माझी अत्यंत निष्ठा होती. कमालीची श्रद्धा होती. विश्वास होता. हाच माझा भक्तिभाव होता. मी माझे आयुष्यच त्यांच्या चरणी वाहिले होते.

त्यावेळी माझा एकूण पगार १५०३ रुपये वजा २१० रुपये होऊन १२९३ रुपये इतका होता. माझी अखेरची शिल्लक जरी कर्जाची असली तरी सुरुवातीची शिल्लक श्रींचा कृपाशीर्वाद आणि माझी टोकाची श्रद्धा होती.

नोकरीतल्या कटकटी वाढतच होत्या. कर्जही वाढतच होते. एकेकदा कर्जाचा विचार आला की, मन घाबरून जात असे. धास्ती वाटायची. बापूसाहेब जामदारांचा माझ्यावर विश्वास होता. एक कर्ज फिटले की, मी दुसऱ्या कर्जासाठी अर्ज करून श्री. बाळासाहेब कुरणे यांना भेटत असे. कारण ते आमचे ज्येष्ठ ट्रस्टी होते. माझ्यावर विश्वास व्यक्त करणारी, माझ्यावर प्रेम करणारी ती माणसं होती. एकदा तर बापूसाहेब जामदार मला म्हणाले, "महाराज, तुमचे कर्ज तरी किती आहे ते सांगा. काहीतरी व्यवस्था करून ते फेडून टाकू." यावर मी त्यांना म्हणालो, "बापूसाहेब आपण मला बँकेतून कर्ज देता हेच आपले अनंत उपकार आहेत. मी घेतलेले कर्ज निश्चित फेडणार यात शंका नाही." खरोखर ते मिरज अर्बन बँकेचे चेअरमन असताना आणि नसतानाही त्यांनी मला कर्ज मंजूर केले आणि मी कर्जाची परतफेड करीत आलो.

म्हैसाळ स्टेशनवरील बांधकाम, कृष्णाघाट वरील बांधकाम, वडिलांचे आजारपण या कारणांमुळे काही वेळेला मला कर्जाचे भय वाटत असे. पण श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या वरील श्रद्धा मला चांगलाच आधार देत असे. धीर देत असे. मला त्यांनी मरणातून जगण्यापर्यंतचे अनेक अनुभव दिले होते. माझी त्यांच्यावरील दृढ श्रद्धा हिच काही तरी मार्ग काढेल, असा माझा ठाम विश्वास होता आणि झालेही तसेच.

सुमारे १९७५-७७ साली आमचे एक परिचित स्व. बाबूराव चौगुले आणि मी निमजगा माळ, खणीच्या अलीकडे, मिरज मेडिकल कॉलेजच्या पाठीमागे, शांतिसागर हौसिंग सोसायटी काढली होती. ती स्व. बाबूराव चौगुले यांची शेतजमीन होती. त्या शेत जमिनीची मोजणी झाली होती. प्लॉट पडले होते. पण बिगर शेतीला (एन. ए.) मंजूरी मिळाली नव्हती. या शांतिसागर सोसायटीत मला स्व. बाबूराव चौगुलेंनी एक प्लॉट एक रुपया चौरस फूट या दराने दिला होता. जशी अडचण येईल तसे बाबूराव माझ्याकडून पाचशे-हजार रुपये नेत असे. होता होता पाच सात वर्षे होऊन गेली होती. बिगर शेतीसाठी स्व. बाबूराव चौगुले प्रयत्न करीत होते. पण त्यांना यश येत नव्हते. मी मिरजेला बदलून आल्यावर बिगर शेतीच्या कामात लक्ष घालून, स्व. गुलाबराव पाटील मंत्रीमंडळात राज्यमंत्री असताना बिगर शेतीचे काम करून घेतले. प्लॉटचे दर वाढले. पुढे बाबूराव चौगुलेनी मला ठरलेला प्लॉट न देता दुसराच प्लॉट दिला. तरीही मी समाधान मानले. समाधान एवढ्यासाठी की, हा प्लॉट विकून मला जे कर्ज झाले आहे ते फेडता येईल? हा आधार श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांनीच मला दिला होता.

दरम्यानच्या काळात डॉ. मधुकर म्हेत्रेंनी साधना शिक्षण संस्था स्थापन करून त्या मिरजेतील माळावरील भटक्या-विमुक्त जातीच्या मुलांना शिक्षण प्रवाहात आणण्याचे ठरवले होते. त्यासाठी डॉ. म्हेत्रे व त्यांची मित्र मंडळी झटत होती. तेथे त्यांनी एक भाड्याची इमारत घेऊन आठवी ते अकरावीचे वर्ग सुरू केले होते. तथापि, जागा मालक त्यांना शाळेची इमारत मोकळी करण्यास सांगत होते. डॉक्टरही त्या कटकटीस वैतागले होते. तेथे माझा प्लॉट असल्याचे डॉ. म्हेत्रेंना समजले. म्हेत्रेंची व माझी चर्चा झाली आणि माझा प्लॉट डॉ. म्हेत्रेंनी त्यांच्या ज्ञानसाधना शिक्षण संस्थेच्या हायस्कूलसाठी घेणेचा ठरवला. ज्ञानसाधना शिक्षण संस्था व मी असे दोघांनी मिळून हायस्कूलची इमारत बांधायची व संस्थेची रक्कम भाडेपट्टीतून वजा करावयाची असे ठरले. हळूहळू इमारत तयार होऊ लागली. अडचणी खूप होत्या. सिमेंट मिळत नव्हते. मुख्य अडचण ती होती. सांगलीतील पिंपळे यांच्याकडून दोन ट्रक घाणीचा चुना घेऊन काम चालू केले. या कामाचे इंजिनियर श्री. अजय भोकरेसाहेब आणि

गवंडी काम करणारे स्व. बापू मोरे यांनी ही इमारत पूर्ण केली. हायस्कूल चालू झाले. पाच सात वर्षे हायस्कूल व्यवस्थित चालले. पण पुढे काही अडचणी निर्माण होऊ लागल्याने ज्ञानसाधना शिक्षण संस्थेचे हे हायस्कूल डॉ. म्हेत्रेंनी बंद करणेचा निर्णय घेतला. त्यामुळे एक दोन वर्षे ही इमारत पडूनच राहिली. पुढे ते हायस्कूल स्व. सौ. मालतीदेवी पाटील बी. एड. कॉलेजकडे हस्तांतर झाले. डॉ. मधुकर म्हेत्रे यांना बराच त्रास होऊन, आर्थिक तोटा होऊनही मोठ्या मनाने मी दिलेली भाड्याची इमारत त्यांनी मोकळी करून विना अट माझ्या ताब्यात दिली. त्याबद्दल डॉ. म्हेत्रेंचे आभार मानावेत तेवढेच आहेत.

आता माझी पावले कर्ज फेडण्याच्या दिशेने पडू लागली होती. ज्या कर्जाची मला वारंवार भीती वाटत होती ती भीती अनाठायी ठरत चालली होती. मला माझ्या स्वप्नातही शांतिसागर सोसायटीत प्लॉट मिळेल, असे वाटले नव्हते. प्लॉट मिळाला, पण बिगरशेती होईल याची निश्चिती नव्हती. बिगर शेती प्लॉट झाला. त्यावर बांधकाम झाले. त्यावर चार पैसे मिळतील याचीही खात्री नव्हती. या सर्व गोष्टी स्वप्नातल्या वचनाप्रमाणे श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या कृपेने घडून आलेल्या होत्या. जो प्लॉट मी चार-पाच हजारात घेतला होता त्या प्लॉटला इमारतीसह तीन लाखापर्यंत मागणी आली होती. त्यावेळी नित्य नियमाने येणारी जी मंडळी होती त्यात श्री. श्रीकांत जाधव यांचा उल्लेख करावा लागेल.

वास्तविक ते त्यांचे बंधू स्व. चंद्रकांत जाधव यांच्या कामासाठी येत असत. स्व. चंद्रकात जाधव बरे झाले. नोकरीला लागले. त्यांचे लग्न झाले. संसारात रमले आणि यायचे बंद झाले. परंतु श्री. श्रीकांत जाधव हे नियमितपणे रात्री मिरजेतील आरतीला येत असत. ते सांगली बँकेत चांगल्या पोस्टवर कार्यरत होते. अत्यंत प्रामाणिक, विश्वासू , आपले काम निष्ठेने करत. गोड, मनमिळाऊ स्वभाव ही त्यांची वैशिष्ट्ये होती. त्यांची माझी ओळख माझे मित्र श्री.कुमार शंकरराव देसाई यांच्यामुळे झाली होती. माझ्या कामी मला कोणी किती देणगी दिली यापेक्षा ज्यांनी चांगली माणसं जोडून दिली, त्यांचा मी ऋणी राहिलो. त्यात कुमार देसाई यांचा समावेश करावा लागेल.

श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज सेवा मंडळ या नावाचा ट्रस्ट ई.

५४३/१९८९ साली स्थापन करण्यात आला. या ट्रस्टचे ट्रस्टी म्हणून–

अध्यक्ष – श्री. बजरंग भिमराव झेंडे

उपाध्यक्ष – स्व. दादासाहेब रामचंद्र तथा बापूसाहेब जामदार

कार्यवाह – स्व. विठ्ठल कृष्णाजी गोखले

सदस्य – स्व. शिवलिंग आण्णा घेवारी

स्व. शंकरराव सखाराम कांबळे

स्व. प्रभाकर महादेव गोखले.

स्व. मधुकर यशवंत खाडे

स्व. बाबूराव जोतिबा सूर्यवंशी

श्री. रमेश घोरपडे.

श्री. मंगल नारायण शिंदे

डॉ. महादेव गणपती म्हेत्रे

श्री. आनंदराव महादेव मंडले.

या ट्रस्टच्या सर्व आर्थिक बाबी, लेखन, कीर्द, खतावणी हिशेब सादरीकरण या सर्व बाबी श्री. श्रीकांत जाधव यांच्याकडे विश्वासाने सोपवल्या. त्या त्यांनी पार पाडल्या होत्या. ते माझे अत्यंत विश्वासू मित्र बनत चालले. त्यांनाही त्याकाळी प्लॉटची गरज होती आणि त्या शोधात ते होते. हे मला समजताच त्यांना माझ्या शांतिसागर हौसिंग सोसायटीतील प्लॉट–इमारतीची कल्पना दिली. आजपर्यंतच्या माझ्या आयुष्यात मी माणसं आणि माणूसकी यांना महत्त्व देत आलो. माणसं उभी केली. माणसंच माझा आधार, श्वास होता. या माणसांच्या प्रेमानं मला माझ्या मार्गाचं बळ दिलं. या माणसांनीच मला माया, प्रेम, जगण्याची दिशा दाखवली. ही माणसं माझी ताकत, माझे हात. श्री. शांतिसागर हौसिंग सोसायटीमधील इमारतीसह प्लॉट चांगल्या रकमेची मागणी असूनसुद्धा श्री. श्रीकांत जाधव या चांगल्या मित्राला मी दोन लाखाला देऊ केला. देताना एक अट घातली ती अशी की श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या तसबिरीची स्थापना या घरात करण्यात येऊन पूजा–अर्चा चालवावी. श्री.श्रीकांत जाधवानाही या गोष्टीचा आनंद झाला. मलाही अशितय आनंद झाला. हा दोन मनाचा हा व्यवहार लवकरच पूर्ण झाला.

श्री. श्रीकांत जाधवांनी मला केलेल्या मदतीमुळे मी कर्जातून बाहेर आलो. हात उसने व बँकेची रक्कम मिरज अर्बन बँकेत दामदुप्पट योजनेत ठेवले. कर्जाच्या विवंचनेतून मोकळा झालो. माझी श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्यावरील श्रद्धा अधिकच दृढ होत चालली. मिरजेतील श्रीदत्त मठीत गर्दी वाढत होती. विशेषत: रात्री आठच्या आरतीला मोठ्या प्रमाणात गर्दी असे. लोक रस्त्यावरही आरतीसाठी उभे राहत. दर शनिवार-रविवार माझा मुक्काम म्हैसाळ स्टेशनवरील दत्त मठीत असे. तर इतर दिवसांचा मुक्काम मिरजेला असे.

स्व. शिवलिंग आण्णा घेवारी, स्व. शंकरराव कांबळे, स्व. किटवाडकर (पवार), स्व. राम हरी खराडे, (तात्या)स्व. महादेव गावकर, स्व. विद्या वड्ड, श्री. दत्तात्रय पवार, शिवाजी जाधव, रमेश घोरपडे, चंद्रकांत कुरणे, डॉ.श्री. मधुकर म्हेत्रे, श्री. आनंदराव मंडले, श्री. शशिकांत कुरणे ही आरतीसाठी येत. तर डॉ.श्री. सुरेश कांबळे, स्व. मारुती कुरणे (काका), स्व. कोरे ही मंडळी श्रीदत्त मंदिरात मुक्कामाला असत. सकाळच्या काकड आरतीला स्व. जामदार (मामा) श्री. गोविंद बरगाले हजर असत. श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांची जयंती-पुण्यतिथी स्व. चंद्रकांत जाधवांच्या घरी साजरी केली जात असे. दर रविवार व पौर्णिमेला कोल्हापूर, नृसिंहवाडी दत्ताचे दर्शन असा उपक्रम होता. अधून-मधून श्रीक्षेत्र बाळेकुंद्री, श्रीक्षेत्र मुरगोड, श्रीक्षेत्र अक्कलकोट, श्रीशिखर शिंगणापूर, श्रीक्षेत्र गोंदवले, श्रीक्षेत्र शिर्डी, श्रीक्षेत्र देहू, श्रीक्षेत्र आळंदी, पंढरपूर, गाणगापूर असाही दर्शनाच्या निमित्ताने माझ्या भक्त मंडळीसह प्रवास असे.

यामुळे बाहेर गावाहून मला भेटण्यासाठी येणाऱ्या मंडळींची मिरजेत सोय करणे अगत्याचे होते. तसेच श्रीदत्त मठीत आरतीसाठी जमणाऱ्यांना उन्हा-पावसात उभं राहून सेवा करण्याची वेळ येऊ नये, यासाठी मठीची नवी इमारत बांधणे आवश्यक होते. त्याष्टीने आम्हा सर्वांचा विचार चालू झाला होता. आमच्या शेजारी बेडगे कुटुंब राहत होते. स्व. मारुती बेडगे, किसन बेडगे व त्यांचे कुटुंब यांचा वाटणीवरून कोर्टात दावा सुरू होता. त्यावेळी या पडीक मातीच्या इमारतीत कोणी राहत नव्हते. केवळ स्व. मारुती बेडगे आणि स्व. किसन बेडगे यांचे कुटुंब हयातीत होते. श्री. धोंडीबा केशव म्हेत्रे, श्री. सावंत

केशव म्हेत्रे हे बेडगे कुटुंबियांच्या जवळचे नातेवाईक होते. त्यांच्या मध्यस्थीमुळे बेडगे कुटुंबियांनी वाटणीचा दावा काढून घेतला व सदरची जागा ही स्व.किसन बेडगे, स्व. मारुती बेडगे, स्व. आकाशी माळी, सिद्राम कुंभोजे यांचेकडून खरेदी करण्यात आली.

सदरची जागा दि. ३०/४/१९९० रोजी दस्ताने रु. ३२०००/- एवढ्याला खरेदी करण्यात आली. सर्वांनाच आनंद झाला. आता जागा उपलब्ध झाली. पण नव्या श्रीदत्त मठीची उभारणी करण्याची आवश्यकता भासू लागली. श्रीदत्त मठीत या विषयीची बैठक घेणेत येऊन सर्व भक्त मंडळींनी दर महिन्याला ठराविक रक्कम देणेचे ठरले. त्यासाठी मिरज अर्बन बँकेत खातेही काढण्यात आले. महिन्याला हळूहळू रक्कम जमा होऊ लागली. परगावहून येणारी भक्त मंडळी, बाहेरगावहून येणारे विद्यार्थी यांचीही राहण्याची सोय येथे व्हावी अशी सर्वांची इच्छा होती. योगायोगाने डॉ. बाबूराव शिरढोणे यांच्यामुळे त्यांचे एक इंजिनिअर मित्र श्री. जयसिंगराव मोरेसाहेब यांचा परिचय झाला. परिचयाचे रूपांतर मैत्रीत झाले. त्यांच्याकडेच या नव्या दत्त मठीची रचना, देखरेख ही सर्व कामे सोपविण्यात आली. दि. २०/२/१९९३ रोजी भूमिपूजन झाले. या कार्यक्रमास खालील मान्यवर उपस्थित होते.

स्व. गोविंद महाराज कुलकर्णी, स्व.केशवराव गोखले, स्व. बाबूराव सूर्यवंशी, स्व. बापूसाहेब जामदार, स्व. चंद्रकांत जाधव, स्व. शंकरराव कांबळे, स्व. घेवारी आण्णा, स्व. बाळकू हंडीफोड, श्री. लक्ष्मणराव पवार, श्री. शिवाजीराव जाधव, श्री. मधुकर पवार, श्री. प्रमोद बसरगे, श्री.चंद्रकांत कुरणे, श्री. सावंता म्हेत्रे.

श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज मठी ही मिरजेतील मध्यवर्ती इमारत झाली. आम्ही सर्वजण त्यासाठी राबत होतो. या इमारतीसाठी त्याकाळी अकरा लाख रुपये खर्च आला होता. लोकवर्गणी, माझ्या फंडातील रक्कम, शिवाय माझी मिरज अर्बन बँकेत दामदुप्पटीने ठेवलेली रक्कम व उर्वरित कर्ज अशा प्रकारे पैसे उभे करून इमारत पूर्ण झाली. श्री. बाळासाहेब शिर्के मिरजेत भजनाला आले की, या मठीत विश्रांतीला येत. तेव्हा ते वरचेवर म्हणत, "महाराजांना अडचण झाली की, तेच मोठी इमारत करून देतील." माझी महाराजांच्यावरील

निष्ठा, श्रद्धा या दुसऱ्या इमारतीच्याही कामी आली होती. ही इमारत बांधताना श्री. जयसिंगराव मोरेसाहेब, श्री. चंदू सावंत, श्री. गणपती सावंत यांनी सेंट्रींग काम, तर विलास लाड (गवंडी), श्री. भाऊ रेडेकर (गवंडी), श्री. मल्लाप्पा नावगेकर (गवंडी), श्री. मोहन सुतार यांनी इमारतीचे काम पूर्णत्वास नेले.

या मंडळींनी परिश्रम केले म्हणूनच ही इमारत फळास आली. आकारली, साकारली, संपन्न झाली. या साऱ्यांविषयी मनापासून कृतज्ञता व्यक्त करावी, असे वाटते.या मठीची वास्तुशांत व उद्घाटन समारंभ शुक्रवार दि. २८/७/१९९५ ते गुरुवार दि. ३/८/१९९५ अखेर संपन्न झाला. गुरुवर्य हरेरामपंत बोडस, गोविंद महाराज कुलकर्णी, रमेश महाराज कुलकर्णी, विठ्ठलराव भोसले बुवा, शंकरराव सातपुते(मास्तर), पुंडलिकसिंग रजपूत, चंद्रकांत जाधव, सितारामबुवा कुमठेकर, बाबूलाल शेख इत्यादी मंडळी उपस्थित होती.

तर या उत्सवात ह. भ. प. श्री. बंडा महाराज कराडकर, श्री. रमाकांत बोंगाळे, श्री. विश्वेश बोडस, श्री. बाळकृष्ण मुळे, श्री. रमेश महाराज शिवापूरकर यांची कीर्तने झाली. तर गायन सेवा कु. मंगल जोशी, श्री. ऋषिकेश बोडस, सौ. मंजुषा कुलकर्णी-पाटील यांनी केली. प्रवचन सेवा श्री. रुद्रपशुपती विजयकुमार कोळेकर स्वामीजी, ह. भ. प. गुरुनाथ कोटणीस महाराज यांची झाली. गुरुवार दि. ३/८/१९९५ रोजी वास्तुशांत व मंदिर प्रवेश झाला. या कार्यक्रमाला स्व. रमेश महाराज अक्कोळकर, सुरेशपंत बाळेकुंद्रीकर, सखाराम महाराज, श्री. चंद्रशेखर केळकर महाराज, श्री. गुरुनाथ कोटणीस महाराज, श्री. प्रदीपपंत बाळेकुंद्रीकर, श्री. महेश शिर्के ही मंडळी हजर होती. मंदिर कलशारोहणाचा कार्यक्रम स्व. गोविंद महाराज कुलकर्णी, स्व. केशवराव गोखले यांच्या शुभ हस्ते झाला. पालखी सेवा होऊन महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. दहा ते अकरा हजार भक्तगणांची महाप्रसादाला उपस्थिती होती.

आता मिरजेतील मठीतून गुरुदेवांचे कार्य सुरू झाले होते. दिवस जात होते. रोजची नोकरी चालू होती. दर शनिवार-रविवार म्हैसाळ स्टेशनला मुक्काम असे. माझा बराच काळ म्हैसाळ स्टेशनवरील दत्त मठीत जाऊ लागला. आता बऱ्याच लोकांच्या ओळखी झाल्या. ओळखीचे रूपांतर मैत्रीत होऊ लागले. स्व. संगाप्पा मामा माळी, स्व. आण्णा शिंदे, इतर काही मंडळी रोज मंदिरात

येऊन जात. ह. भ. प. आप्पासाहेब शिंदे (मोकाशी) हे म्हैसाळहून मुक्कामाला येऊ लागले. भजन करू लागले. भजनाला सर्वश्री सदू शिंदे, श्री पांडुरंग शिंदे, श्री. विष्णू शिंदे, श्री. वसंत शिंदे यांची साथ मिळू लागली. तर चातुर्मासात स्व.आण्णाप्पा मामा कुंभार ग्रंथ वाचन, प्रवचन करू लागले. श्री. बिसलाप्पा नाईक, श्री. तुकाराम धोंडीबा शिंदे आरती, पूजापाठ करू लागले.

मंदिर परिसरात नीरव शांतता होती. निलगिरी, सुरु, रेनट्री आणि नारळाची काही झाडे लावली होती. कर्नाटकातून श्रीक्षेत्र पंढरीच्या वारीला पायी जाणाऱ्या दिंडीला आता ही श्रीदत्त मठी विसावा देऊ लागली. या दिंड्या दत्त मंदिरात मुक्काम करू लागल्या. या भगवद्भक्तांना निवारा, पाण्याची सोय महत्त्वाची होती. जागा अपुरी पडत होती. म्हणून स्व. बापूसाहेब जामदार यांची भेट घेतली व मिरज अर्बन बँकेतून कर्ज देण्यास विनंती केली. त्यांनी मला कर्जासाठी वेळोवेळी मदत केलीच होती. परंतु यावेळी पगारावर जास्त कर्जाची रक्कम मिळणे अवघड होते. तरीही स्व. बापूसाहेब जामदारांच्यामुळे मिरज अर्बन बँकेने मला कर्ज दिले. याच कर्जाच्या रकमेतून व काही रक्कम हात उसनी घेऊन श्री. रमेश घोरपडेंच्या प्रयत्नाने यश येऊन सखुबाई टाकवडे यांची ८३ आर गट क्र. २११५ (दोन एकर दोन गुंठे) जागा दि. १७/५/१९९१ रोजी ट्रस्टच्या नावे घेतली आणि लोकसेवेचे पुढचे पाऊल टाकण्यात आले.

आता माझं काम वाढत चाललं होतं. म्हैसाळ मठीत माझा वेळ आनंदात चालला होता. ट्रस्टचे कायद्याचे सल्लागार, माझे मित्र श्री. अल्लाबक्ष कोतवालसाहेब होते. त्यांच्या सल्ल्यानेच सर्व कागदपत्रांची पूर्तता करून गट क्र. २११५ मधील ८३ आर जमीन श्रीमती सखुबाई टाकवडे यांचेकडून घेतली होती. या कामी श्री. रमेश घोरपडे, श्री. तांबवेकर, श्री. बाळू हिंगमिरे, पै.नदाफ दिवाणजी यांची बहुमोल मदत झाली होती. या सर्वांची कृतज्ञता व्यक्त करून या जमिनीत बोअर मारून पुढील कार्याला सुरूवात केली.

म्हैसाळ स्टेशनला असलो की, एकेकदा माझ्या मनात येई आपण हे जे कार्य करीत आहोत ते कडेला जाईल का? माझ्यानंतर हे चालणार का? असे विचार उगीचच मनात येत. पण श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांवरील माझी श्रद्धा निश्चयाची होती. माझ्या जीवन नौकेचे ते रक्षणकर्ते होते.

म्हैसाळ स्टेशनपर्यंत रस्ता नव्हता, कच्चा रस्ता. त्या रस्त्याला दिवे नव्हते. रानातली वस्ती, रात्री लोक झोपी जात. टी.व्ही. नव्हता. बसची सोय नव्हती. म्हैसाळ गावची ही रानातील वस्ती. पावसाळ्यात येथल्या लोकांचे खूप हाल होत असत. लोकांच्या सोयीसाठी बोअर झाली, पिण्याच्या पाण्याची सोय झाली. शाळेजवळील झोपडीत राहणारी मोरे मंडळी व इतर लोक आता पाण्यासाठी मठीत येऊ लागले. मठीत आता वर्दळ वाढू लागली.

एके दिवशी आण्णा शिंदे हे एका लग्न कार्यासाठी बाहेर गावी गेले होते. ते त्या रात्री परत न आल्याने त्यांचा पुतण्या श्री. तानाजी हा माझ्या सोबतीला मुक्कामाला आला होता. स्व. शंकरराव बाळू शिंदे, स्व. आण्णा शिंदे, श्री.यशवंत शिंदे, स्व. जयंत शिंदे असं हे चार भावांचं आदर्श शेतकरी कुटुंब. म्हैसाळ स्टेशनला राहत. सर्वांच्या उपयोगी पडणारं, अडनड काढणारे परोपकारी असे हे शेतकरी कुटुंब होते. तानाजी हा श्री. यशवंत बाळू शिंदे यांचा मोठा मुलगा. तो मुक्कामाला आल्यापासून त्याचा माझा परिचय वाढत गेला. उठबस वाढत गेली. आता तो मंदिरातील आरती-पूजापाठ करू लागला. मठीच्या सर्व कामात भाग घेऊ लागला. मठीसाठी झटू लागला. कालांतराने तानाजी हा श्रीदत्त मठीचा सेवक म्हणून एक अविभाज्य भागच होऊन गेला.

मागे एकदा निवांत बसलो असता म्हैसाळ मठी बांधावी की नको? मंदिर बांधावे की नको ? बांधली तर पुढची व्यवस्था काय? अशा वारंवार निर्माण होणाऱ्या प्रश्नांना श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांनी मला स्वप्नात येऊ सांगितले होते. मठी बांध, तानाजी आहे. या स्वप्नावर विश्वास ठेऊन मी मठी बांधली.

श्रीश्रीकृष्ण सरस्वती महाराजांच्या जयंती-पुण्यतिथीला मिरजेतील जागा अपुरी पडू लागल्याने वरील उत्सव म्हैसाळ स्टेशनच्या दत्त मठीत करण्याचे ठरले व तसे चालूही झाले. सन १९८६ पासून हे उत्सव स्टेशनवरील दत्त मठीत होऊ लागले. पण त्याचे स्वरूप मर्यादित होते. कालांतराने उत्सवाला व्यापक स्वरूप प्राप्त झाले. गट न. २११५ मध्ये मिरज येथील बांधकामात शिल्लक असलेले दगड, विटा यांचा वापर म्हैसाळ येथे करून दोन कट्टे व हॉल बांधला.

यामुळे उत्सवाच्या प्रसादाची,कर्नाटकातून श्रीक्षेत्र पंढरपूरला जाणाऱ्या

वैष्णवांच्या दिंड्यांची, त्यांच्या अंघोळी व जेवणाची सोय झाली. दत्त मठीसाठी जी जागा विकत घेतली होती त्यावेळी सुरुवातीला म्हैसाळ स्टेशनला जायला वाट नव्हती. एक पायवाट शाळेच्या पलीकडून जात होती. दत्त मंदिराच्या उत्तरेला श्री. कुटवाडे जमीन होती. या जमिनीतून स्टेशनकडे ये-जा करणेस श्री. कुटवाडे प्रतिबंध करीत. श्रीदत्त मठीच्या आसपास एकही घर नव्हते. वस्ती नव्हती. आमचे मालगावचे मित्र श्री. आप्पासाहेब पुजारी व श्री. शिवगौंडा पाटील (टाकळी) यांनी कुटवाडे यांच्या जमिनीवर प्लॉट पाडले. माझे मित्र श्री. चंद्रकांत कुरणे हे श्री. आप्पासाहेब पुजारी यांचे नातेवाईक होते. श्री. चंद्रकांत कुरणे यांनी १९ गुंठे जागा श्रीदत्त मठीसाठी दि. २२/९/१९९२ रोजी खरेदी केली. सदरची जागा ही सार्वजनिक कामासाठी घेण्यात आली.

श्रीदत्त मठीसमोरील बेळगाव-तासगाव रस्ता या रस्त्याकडून पूर्व-पश्चिम स्टेशनकडे जाणारा रस्ता स्व. केदारराव शिंदे, म्हैसाळकर यांच्या प्रयत्नाने झाला. गावकऱ्यांची रस्त्याची सोय झाली. श्रीदत्त मठी, पूर्व-पश्चिम स्टेशनकडे जाणारा रस्ता व  रस्त्यालगतच आमचे प्लॉट अशी स्थिती होती. त्यावेळी प्लॉटचा दर तीन ते चार हजार गुंठा असा होता. श्रीदत्त मठीमुळे प्लॉटची मागणी वाढली होती.

सदरची आम्ही ट्रस्टसाठी घेतलेली जागा शेत जमिनीची पण पडीक अशी होती. ग्रामस्थ ही जागा अस्वच्छ ठेवत. म्हणून गावासाठी, गाव शिक्षणासाठी व चांगल्या संस्कारासाठी एक वाचनालय बांधण्याचे ठरवून एका नव्या समाजकार्याला सुरुवात केली. ही जागा श्रीदत्तमठी, श्रीदत्त मंदिरासमोरच होती. तरीही बहुसंख्य श्रद्धा असणाऱ्यांच्यासाठी श्रीगणेश मंदिर बांधायचे ठरले. याच मंदिरात श्रीहनुमान व श्रीशिवलिंग स्थापन करण्याचे ठरले. आमचे मित्र श्री.एस. एम. सन्नके, इंजिनिअर हे अत्यंत धार्मिक व श्रद्धाळू, त्यांनी श्रीगणेश मंदिराचा प्लॅन तयार केला व ज्या जागेवर ग्रामस्थ प्रात: विधीला जात, घाण करीत, कचरा टाकीत तेथे गणेश मंदिराचे काम सुरू झाले. बघता बघता  हे मंदिर सर्व मंडळींच्या सहाय्याने उभारले. परिसरात आंबा, नारळाची रोपे लावण्यात आली. धबधबा तयार करण्यात आला. अस्वच्छ जागेचा कायापालट एका पवित्र स्थानात झाला.  मंगळवार दि. १६/६/१९९८ ते

गुरुवार दि. १८/६/१९९८ या कालावधीत श्रीगणेश मंदिराचे उद्‌घाटन कार्यक्रम संपन्न झाला. ह. भ.प. बापूसाहेब पुजारी, श्री. गुरुनाथ कोटणीस महाराज, श्री. प्रदीपपंत बाळेकुंद्रीकर, स्व. रमेश सेठ अग्रवाल, श्री.बाळासाहेब नरगुंदे, स्व. बापूसाहेब जामदार यांच्या हस्ते कार्यक्रमाची सुरुवात झाली. तर विठ्ठलराव भोसले, सिताराम कुमठेकर बुवा, नानाबुवा जोगळेकर रमेशबुवा सोलापूरकर, विठ्ठलराव सूर्यवंशी, विश्वेश बोडस, चंद्रकांत कुंभार यांची कीर्तने तर सौ. मंजुषा कुलकर्णी-पाटील, श्रीराम शिर्के-अडूळकर, पाटण कु. मंगला जोशी, अंजनाताई जाधव, घोगलेबुवा यांचा गायन-भजन-भावगीत-भक्तीगीतांचा कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने मी समाज ऋण मानून श्रीसाने गुरुजी व्याख्यान मालेची मुहूर्तमेढ रोवली. या साने गुरुजी व्याख्यान मालेचे उद्‌घाटन मा. उद्योगपती प्रवीणशेठ लुंकड (चाकण ऑईल मिल, कुपवाड, सांगली) व श्री. दीपकबाबा शिंदे-म्हैसाळकर यांच्या अमृतहस्ते करण्यात आले. श्री. बापू जाधव, म्हैसाळ, व श्री.विलास अष्टपुत्रे, कोल्हापूर या व्याख्यात्यांची सुंदर अशी व्याख्याने झाली. गुरुवार दि.१८/६/१९९८ श्रीगणेश मंदिराची वास्तुशांत, रमेश महाराज अक्कोळकर, केशवराव गोखले, सुरेशपंत बाळेकुंद्रीकर, सखाराम महाराज यांचे हस्ते झाली. तर कलशारोहण गोविंद महाराज कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. बाबूराव सूर्यवंशी, बापूसाहेब जामदार, प्रभाकर गोखले, श्री. व सौ. मानधना, श्री. व सौ. बाळासाहेब कुरणे, श्री. व सौ. बाळासाहेब नरगुंदे, श्री. व सौ. संभाजी कुंभार, श्री. व सौ. कबुरे, श्री. व सौ. विठ्ठल विजापुरे, श्री. व सौ. मधुकर म्हेत्रे , श्री. व सौ. तानाजी शिंदे, श्री. व सौ. चंद्रकांत कुरणे, श्री. व सौ. आनंदराव शेलार यांच्या अमृतहस्ते महाप्रसाद वाटप करण्यात झाले. हजारो लोकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. आम्हा सर्वांना एक प्रकारचा आनंद झाला होता. सर्व समावेशक असा हा कार्यक्रम झाला. श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या कृपेने आता श्रीगणेश, श्रीहनुमान, श्रीशिव मंदिर भक्त मंडळींच्या श्रमातून उभारले होते. तर या कार्यक्रमातूनच साने गुरुजी व्याख्यानमाला चालू होती. सदर व्याख्यानमाला पुढे दरवर्षी चालू राहिली.

हिमालयापासून दक्षिणेकडे रामेश्वरपर्यंत अनेक तीर्थक्षेत्रे आहेत.

भाविकांनी ती गेली हजारो वर्षे श्रद्धेने जपली आहेत. प्रत्येक तीर्थक्षेत्राचे माहात्म्य जरी वेगळे असले तरी आणि कथा वेगळी असली तरी, हिंदूची श्रद्धा मात्र अपार आहे. अगाध आहे अपरंपार आहे.

सन १९८० साली श्री. अरुण कुलकर्णी यांच्या लग्नाच्या निमित्ताने श्रीक्षेत्र काशी, प्रयाग, अयोध्या इत्यादी पवित्र स्थळे, शिवाय दिल्ली, आग्रा ऐतिहासिक स्थळे बघितली. तर डेहराडून, मसुरी ही थंड हवेची ठिकाणेही पाहून झाली होती. मसुरीला गेलो असतानाच मला उत्तरेकडील हिमालयाच्या रांगा खुणावत होत्या. पिवळी सोनेरी शिखरे, तो गार वारा, जंगल, विविध पक्षी, लोक संस्कृती, जंगलात वास्तव्य राहणारे पहाडी आदिवासी पण हे सारे वेळे अभावी धावते दर्शन झाले होते. यावेळी ठरविले होते की, पुन्हा एकदा हिमालयाचे दर्शन घ्यायचे. त्याचं असं झालं होतं की, रमेश महाराजांच्या आईनी सन १९५०-५५ च्या दरम्यान हिमालयातील बद्रीनाथ-केदारनाथ यात्रा पूर्ण केली होती. त्यांचे भाऊ व इतर मंडळींनी हा ४० दिवसांचा खडतर प्रवास पूर्ण केला होता. परंतु आईच्या मनात पुन्हा एकदा उत्तरेकडील सर्व मुख्य तीर्थक्षेत्रांचे दर्शन घ्यावे अशी इच्छा होती, मानस होता.

रमेश महाराजांनी या बाबतची कल्पना दिली. मीही त्यांच्या बरोबर केदारनाथ, बद्रीनाथ काशी यात्रेला जायचे ठरवले. मात्र हा प्रवास वैयक्तिक न जाता, श्रीदत्त दिगंबर यात्रा कंपनी, पुणे यांनी योजलेल्या प्रवास यात्रेतून जावयाचे ठरले.

दि. १४/६/१९८२ रोजी रमेश महाराज नि स्व. आईसाहेब व मी सह्याद्री एक्सप्रेसने मिरजेहून रात्री १२ वाजता निघालो. मंगळवारी १५/६/१९८२ रोजी सकाळी सात वाजता पुण्यात पोहोचलो. रजनीताई मांडकेंच्या घरी दिवसभर थांबलो. भोजन केले. रात्री दहा वाजता पुणे रेल्वे स्टेशनवर पोहोचलो. रात्री अकरा वाजता श्रीदत्त दिगंबर यात्रा कंपनीचा रेल्वे डबा क्रमांक ८७९७ हा मुंबई पॅसेंजरला जोडण्यात आला. बुधवार दि. १६/६/१९८२ रोजी सकाळी ९ वाजता मुंबईला व्ही. टी. रेल्वे स्टेशनला पोहोचलो. दिवसभर थांबलो, रात्री नऊ वाजता आमचा प्रवासी रेल्वे डबा मुंबई-हावडा एक्सप्रेसला जोडण्यात आला. गुरुवार दि. १७/६/१९८२ रोजीसकाळी ७ वाजता भुसावळ रेल्वे

जंक्शनला पोहोचलो. संध्याकाळी ४ वाजता भोपाळ, रात्री नऊ वाजता झांशी रेल्वे स्टेशन करीत शुक्रवार दि. १८/६/१९८२ रोजी सकाळी आठ वाजता राजधानी दिल्लीत पोहोचलो. अंघोळ-चहा-नाष्टा वगैरे आटपून दिल्ली दर्शन बसने प्रवास सुरू झाला.

सन १९८० साली हे दिल्ली दर्शन झाले होते. पण त्यावेळी खूप उन्हाळा होता. आता मात्र वादळी पाऊस होऊन गेल्याने हवेत गारवा होता. कुतुबमिनार, लालकिल्ला, राजघाट, विजयघाट, गांधीघाट,(शांतीघाट), बिर्ला मंदिर,भारतीय संसद ही सर्व स्थळे पाहून दिल्लीत मुक्काम केला.

शनिवार दि. १९/६/१९८२ रोजी सकाळी आठ वाजता दिल्ली रेल्वे स्टेशन वरून आम्ही हरिद्वारकडे सायंकाळी चार वाजता पोहोचलो. हरीच्या पायरीला पाहिले. गंगा स्नान केले. रात्रीची गंगेची विलोभनीय आरती केली. जेवण करून, हरिद्वार क्षेत्री मुक्काम केला. रविवार दि. २०/६/१९८२ पुन्हा गंगा स्नान करून, जेवण, विश्रांती नंतर ४.३० वाजता रेल्वे स्टेशन सोडले व ऋषिकेश रेल्वे स्टेशनवर पोहोचलो. हरिद्वार-ऋषिकेश ही दोन महान तीर्थक्षेत्रे असल्याने भक्त मंडळींची गर्दी होती. सारीकडे भक्तांचे थवेच्या थवे दिसत होते. रात्री ऋषिकेशला मुक्काम झाला. हवेत खूपच गारवा होता. थंडी जाणवत होती.

सोमवार दि. २१/ ६/१९८२ रोजी सकाळी सहा वाजता श्रीक्षेत्र बद्रीनाथ -केदारनाथ दर्शनाला छोट्या बसने हिमालयात निघालो. पूर्ण रस्ता अवघड घाटांचा, अरुंद, नागमोडी वळणाचा आणि डोळे फिरवणारा असा होता. एका बाजूला खोलच खोल दरी आणि दुसऱ्या बाजूला उंचच उंच डोंगर, समोर डोंगराच्या प्रचंड रांगा पाहून डोळे मिटून मी गत आयुष्यातील काही क्षण आठवू लागलो.

माझा जन्म साध्या शेतकरी कुटुंबातला. खाऊन पिऊन सुखी होतो. मिरज शहरात राहात होतो. तसे हे तालुक्याचे ठिकाण असले तरी धड शहर नव्हते आणि धड खेडे. मिरजेला कृष्णा नदी लाभलेली. दरवर्षी तिला पूर येत असे. बालवयात शाळेला जाणे, सुट्टीला शेताकडे जाणे, गावात फिरणे, अधून मधून दंडोबाला जाणे, रामलिंगाच्या डोंगरात जाणे, एवढेच डोंगर मला माहीत

होते. मसुरीला मागे मला हिमालयाचे दूरवरूनच दर्शन झाले होते.

पण आता छोट्याशा वीस सीटच्या बस प्रवासाने बद्रीनाथ-केदारनाथ, हिमालयात निघालो होतो. सोनेरी पिवळी धमक दिसणारी बर्फाच्छादित हिमालयाची सोनेरी शिखरे मला भुरळ घालत होती. हिमालयातील निसर्ग कधी प्रेमळ तर कधी मायेचा,अक्राळ-विक्राळ रुप धारण करणारा असा वाटत होता. तेथील पहाडी लोकांचा प्रेमळपणा, सचोटी, विश्वासार्हता मला आवडली. हिमालयाचा प्रचंड विस्तार, विविध वनस्पतींनी, झाडांनी, वृक्ष, वेली आणि फुलांनी फूललेली ही निसर्ग संपदा आणि नद्यांनी आपला प्रवास विखरून टाकलेला. या साऱ्या दृश्यांनी मला अक्षरश: वेड लावलेले होते.

हिमालय तर वेड लावणारा, भुरळ घालणारा, अचानक आपलं रूप-स्वरूप पालटणारा, निरभ्र आकाश, क्षणात काळ्याकुट्ट ढगांनी भरलेले, अतिशय गारवा, क्षणात मुसळधार पावसाची सुरूवात, वातावरण थंड-बोचरे, विजा आपलं रुद्र धारण करू लागतात. त्यांचा आवाज पर्वत रांगात घुमून जातो. भीती वाटण्यासारखा तो आवाज, क्षणभरात डोंगर कपारीतून पाण्याचे धावणे, धबधबे साकारतात. भरून वाहतात. धो-धो पडणाऱ्या पावसाला थांबावेसे वाटते आणि तेथे उमटायला लागते इंद्रधनुष्य, हिमालय स्थिर नसावाच असे वाटते. हे सर्व पहात रुद्रप्रयाग मार्गे गौरीकुंडावर आम्ही सायंकाळी चार वाजता पोहोचलो. साहित्य घेऊन यात्रा कंपनीने दिलेल्या लाकडी धर्मशाळेत आम्ही उतरलो. चहा वगैरे घेऊन आम्ही गौरीकुंडावर स्नानास गेलो. गौरीकुंड हे सुमारे पंधरा फूट लांब वीस फूट रूंदीचे दगडी असे कुंड होते. हिमालय हा अनेक आश्चर्यकारक कथारूपांनी विस्मयकारक क्षेत्रांनी भरलेला आहे. श्रीदेवी पार्वतीने या कुंडात स्नान केल्याने या कुंडाला गौरीकुंड असे नाव पडले. श्रीगणेशाचा येथेच जन्म झाला असल्याने या गौरीकुंडाच्या स्नानाला धार्मिक महत्त्व आहे.

समोर दूरवर बर्फाच्छादित हिमालयाच्या रांगा, प्रचंड वेगाचा गार वारा, मात्र गौरीकुंडातील पाणी पिवळे असून त्यातून वाफा निघतात. या गौरीकुंडाच्या चारी कोपऱ्यापैकी एका कोपऱ्यात कडक गरम पाणी, दुसऱ्या कोपऱ्यात त्यापेक्षा कमी गरम पाणी, तिसऱ्या कोपऱ्यात कोमट पाणी आणि

चौथ्या कोपऱ्यात गरम-थंड पाणी. जे पाणी सोसेल, मानवेल त्या पाण्यात भक्तांनी अंघोळ करावी.

मी, रमेश महाराज आणि आईनी या गौरीकुंडात पुण्य स्नान केले. दिवसभराच्या प्रवासाने कंटाळा आला होता. आता रात्र झाली होती. अतिशय गार वारा, थंड वारा सुटला होता. उद्याचा प्रवास श्रीक्षेत्र केदारनाथाचा होता. गौरीकुंड ते श्रीक्षेत्र हे अंतर चौदा कि. मी. चे होते. हा प्रवास पायीच करावा लागणार होता. येथून पुढे कोणतेही वाहन जात नव्हते. ऋषिकेश ते केदारनाथ हा एकूण प्रवास २९८ कि.मी. चा होता. गौरीकुंडावर केवळ आमच्या यात्रा कंपनीचेच प्रवासी मुक्कामाला होते.

मंगळवार दि. २६/६/१९८२ रोजी भल्या पहाटे गार वाऱ्याने जाग आली. गरम गरम चहा झाला. आता खऱ्या अर्थाने केदारनाथ यात्रेला प्रारंभ झाला. श्रीदत्त दिगंबर यात्रा कंपनीचे गाईड श्री. काळे व कुलकर्णी यांनी प्रवासाबाबत सूचना दिल्या. प्रवासात खाण्यासाठी काजू, खारिक, बदाम, ड्रायफ्रूटस् हे प्लॅस्टिक पिशवीत घेतले. अंगावर हलके कपडे पँट, शर्ट, गॉगल, रेनकोट, स्वेटर, बर्फात कमी वजनाचे साहित्य घेतले होते. सामानाची शबनम बॅग, खांद्याला अडकवली. यात्रा कमेटीकडून भाड्याने काठ्या घेतल्या. मी आणि रमेश महाराज पायी तर आईना इतके अंतर चालता येणार नाही म्हणून दंडी. दंडी म्हणजे एक प्रकारची पालखी. प्रवासी मध्यावर बसवतात आणि त्या व्यक्तीचा भार अलगद वाहून नेतात. प्रवासी व्यक्तीच्या वजनावर दंडीचा दर अवलंबून असतो. तरी सर्वसाधारण दंडीचा दर तीनशे पन्नास रूपये इतका होतो. दुसरा प्रकार कंडीचा. हा दर माणशी शंभर रूपये होता. या प्रकारात प्रवाशास पाठकुळीवरून नेणे. तर खेचर किंवा घोड्यावर बसून जाणेचा दर ऐंशी ते नव्वद रूपये असा होता.

ही देवभूमी, हिमालयाच्या उत्तुंग शिखरांचे साक्षात दर्शन, वनश्रीने नटलेल्या पर्वत रांगा, ढगांचा लपंडाव, गार वारा, आमचा प्रवास सुरू झाला. साध्या रस्त्याने चालणे आणि डोंगर कपारीतून चालणे यात खूप फरक आहे. जसजसे वर जाऊ लागलो तसतसे अंगातून घाम येऊ लागला. दमही लागू

लागला. मधूनच पावसाची सर येई. त्यामुळे मधूनच एकदम थंडी वाजे. रस्ता अरूंद होता. एका बाजूला प्रचंड खोल दरी. एका बाजूला उंचच्या उंच डोंगर, समोर गगनाशी स्पर्धा करणारी हिमालयाची शिखरे, शिखराकडे जाणारी नागमोडी वाट कधी दिसत असे, तर कधी दिसत नसे. सारीकडे हिरवी वनश्री मात्र दिसत होती. निसर्ग नयनमनोहर होता. त्या अरूंद रस्त्यावर आम्ही चालत होतो. तर काही प्रवाश्यांचा दंडी, कंडी, घोड्यावर बसून प्रवास चालू होता.

श्रीकेदारनाथाचे दर्शन घेऊन परतणारे प्रवासी-यात्रेकरू जय केदारनाथ बाबा की जय, जय भोलेनाथ असा घोष करीत होते. आम्हीही त्यांना साद देत होतो. त्यांच्या चेहऱ्यावर श्रीकेदारनाथ यात्रा सफल झाल्याचा आनंद दिसून येत होता. एका बाजूला खोल दरीतून मंदाकिनी नदी वाहत होती. आम्ही उंचावरून चालत असलेने ती अंगठ्या एवढी दिसत होती. चढ खूप लागत होता. वाटेत रामबाडा, गरुडचट्टी, या लहानशा वस्त्या लागल्या. यावरील माणसंही साधी दिसत होती. लहान मुले बिस्कीटाचे पुडे, खाण्याच्या वस्तू विकत होती. त्या लोकांचा व्यवसाय यात्रेकरूंची ने-आण करणे. हेच त्यांचे उपजीविकेचे साधन होते. त्या कष्टमय जीवनातही ते सुखाने आणि शांततेने जगत होते. रस्त्याच्या बाजूला छोटी छोटी मंदिरे होती. खोलगट भागात त्यांची लाकडी घरे तर काही पक्की कौलारू घरे दिसत होती.



दिल्ली दर्शन दि.१८-०६-१९८२
श्रीमती इंदिरा गांधी यांच्या समवेत घेतलेले छायचित्र

समोरचा अक्राळ विक्राळ उंचीचे डोंगर शिखरे पार करीत आम्ही श्रीकेदारनाथजवळ पोहोचलो. दूरवर छोटी छोटी निवासस्थाने दिसू लागली. आता चालण्याचा कंटाळा आणि दुखरे पाय घेऊन वैतागलेल्या अवस्थेत श्रीकेदारनाथच्या मुक्कामाला पोहोचलो. तेव्हा दुपारचे दोन वाजले होते. सरबत वगैरे घेऊन बाकीच्या यात्रेकरूंची वाट पाहत आम्ही यात्रा निवासात थांबलो. मंदिरापासून थोड्या अंतरावर खाजगी

पुजाऱ्यांची लाकडी घरे होती. निवासस्थाने होती. तेथेच यात्रेकरू राहात.

श्रीकेदारनाथाच्या दर्शनाला आलेली गर्दी खूप होती. पण ना तेथे हॉटेल, ना लॉजिंग, बोर्डिंग. तेथे केदारनाथ आणि त्यांचे भक्त, एवढेच होते. श्रीकेदारनाथाचे पुजारी हे अक्षयतृतीयेला केदारनाथला पूजेसाठी येऊन राहात. दर दसऱ्याला खाली म्हणजे गौरीकुंडावर मुक्कामाला दरवाजा बंद करून जात. म्हणजे अक्षय तृतीया ते दसरा या काळातच केदारनाथ मंदिर भक्तांच्या दर्शनासाठी खुले असते. यानंतर बर्फ पडू लागतो. येथील पुजारी अत्यंत प्रामाणिक आणि येथे येणाऱ्या भक्तांवरच येथील लोकांचे उपजीविकेचे साधन. आता दोन प्रहरीचे तीन वाजत आले होते. आभाळ काळ्या ढगांनी भरून गेले. जोराचा वारा सुरू झाला. मेघ गर्जनेसह जोराचा पाऊस सुरू झाला. हिमालयाची उंच उंच शिखरे ढगात दडून गेली होती. खोल दरीतून मंदाकिनी नदी अवखळपणे वळणावळणाने वाहताना दिसत होती. लहान मोठे धबधबे रस्त्यावर कोसळतांना दिसत होते. पावसाच्या आवाजात आमचे एकमेकांचे बोलणेही ऐकू येत नव्हते. आम्ही सर्व यात्रेकरू व पुजारी यात्रा निवासासमोर उभे होतो. समोर-मागे उंच उंच पर्वत उभे होते. मंदिरासमोर सपाट असे मोकळे पटांगण होते. पाऊस उघडण्याची वाट सर्वजण पाहत होते. सायंकाळचे सात वाजत आले होते. पाऊस थांबला, सायंकाळी सूर्याची किरणे लांबवर दिसू लागली. बर्फाच्छादित शिखरे आता सोनेरी- पिवळी दिसू लागली. मंदिराजवळ सर्व यात्रेकरू मंडळी आता थांबली होती. नेहमीप्रमाणे श्रीकेदारनाथ मंदिरात भजन चालू होते. आम्ही सर्व यात्रेकरू ओम नम: शिवाय म्हणत होतो. जप चालू होता. आरती झाली, शेंगदाणे व खडीसाखरेचा प्रसाद वाटण्यात आला.

श्रीकेदारनाथ हे हिमालयातील भगवान शंकराचे स्थान. येथील शिवलिंग आपल्यासारखे नसून तिन्ही बाजूंनी खाली अरूंद व वर निमुळते होत गेलेले अंदाजे चार-पाच फुटाचे शिवलिंग आहे.

नेपाळमधील पशुपतीनाथ येथे मुख व श्रीकेदारनाथ येथे पाठीचा भाग अशी येथील शिवलिंगाबाबत श्रद्धा आहे. दर्शन व्यवस्थित झाले. ज्या दर्शनासाठी आम्ही आलो, कष्ट घेतले, परिणामी केदारनाथाचे दर्शन सुलभ झाले. मन आनंदाने भरून गेले. दर्शन घेऊन आम्ही यात्रेकरू निवासस्थानी

आलो. भोजन केले. भोजनात फुलक्या, बटाट्याची भाजी, उसळ, भात, शेंगदाणे असे पदार्थ होते. खळखळत वाहणाऱ्या मंदाकिनी नदीचा आवाज ऐकत आम्ही झोपी गेलो. दिवसभराच्या श्रमाने आम्हाला कधीच गाढ झोप लागली.

मी पहाटे जागा झालो ते तेथील थंडगार वाऱ्याने. तेथील पुजाऱ्याकडून आम्ही दोन रजई भाड्याने घेऊन पांघरल्या होत्या. सर्व अंथरुण गार झाले होते. त्यामुळे आम्हाला लवकरच जाग आली. पहाटे चार वाजले असावेत.

वेगवेगळ्या पक्ष्यांचे आवाज, मंदिरातील घंटा नाद, आरतीची तयारी, लाऊड स्पीकरवर लावलेली भक्ती गीते यामुळे आम्ही लवकर उठलो.

बुधवार दि.२३/६/१९८२. सकाळची हवा स्वच्छ होती. थंड वारे होतेच. मंदाकिनी नदीचे उगमस्थान येथून दहा पंधरा किलोमीटरवर आहे ते पाहून केदारनाथास अभिषेक करून पुन्हा पुन्हा श्रीकेदारनाथाचे दर्शन घेऊन सकाळी दहा वाजता जेवण करून- घोड्यावरचा प्रवास सुरू झाला. श्रीकेदारनाथ हे भगवान शंकराचे रम्यस्थान. वस्ती अशी नाही. पुजाऱ्यांची यात्रा काळातील वस्ती आणि मुक्त हस्ते निसर्गाचे नटवलेले ऐश्वर्यसंपन्न भूनंदन म्हणजे केदारनाथ. दोन प्रहरी दोन वाजता गौरीकुंडाजवळ परतलो. रात्री गौरीकुंडावर मुक्काम, यात्रा सफल झाली.

१७ जून २०१३ रोजी श्रीकेदारनाथ प्रलय हाहाकार पाहिला तो दूरदर्शनवर. इमारतीच्या इमारती पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळल्याचे ते दृश्य आणि मानवाने तेथील निसर्गनियमावर केलेले ते आक्रमण, निर्सगाचे अक्राळ-विक्राळ स्वरूप चिरंतन लक्षात राहण्यासारखे. श्रीकेदारनाथ सोडून बाकी सर्व महाप्रलयात वाहून गेले.

२३ जून १९८२ साली श्रीकेदारनाथ एक रम्य, सुंदर, शिवलिंग स्थान होते. पवित्र आणि सुंदर अशी वनश्री होती. तर बरोबर तीस वर्षांनी मानवाच्या चुकीच्या वागण्याने निसर्गाचा किती वाईट ऱ्हास होतो हे १७ जून २०१३ रोजी पाहायला मिळाले. सारे वाहून गेलेले, जणू भगवान शंकराने रुद्र अवतार धारण करून हे घडवले असावे. साऱ्या वस्त्या वाहून गेल्या. हजारो लोक प्राणाला मुकले. त्यांचे सारे सारे गेले. श्रीकेदारनाथ मंदिरात वरून येणारा पाण्याचा

लोंढारूपी प्रवाह घुसला. भक्तगण भयभीत झालेले. वरच्या डोंगराच्या बाजूने एक भलीमोठी शिळा घसरत घसरत मंदिराच्या पाठीमागे येऊन थांबली. वरून येणारा पुराचा लोंढा दुभंगला गेला आणि ईश्वरी संकटातही श्रीकेदारनाथ मंदिर वाचले. अक्षय तृतीया २०१४ केदारनाथ यात्रा सुरू झाली, पण गर्दी नव्हती. सर्वत्र भयच. आता काही काळासाठी यात्रा बंद आहे. श्रीदत्तकृपेने आमची श्रीकेदारनाथ यात्रा सफल झाली. या यात्रेत जगणं वाचणं हे देवाच्या हाती. येथील विचित्र हवामान, लहरी निसर्ग, एकूण अवघड यात्रा पार झाली असेच म्हणावे लागेल. गुरूवार दि. २४/ ६/१९८२ रोजी पहाटे पाच वाजता आम्ही श्रीकेदारनाथ यात्रा संपवून श्रीबद्रीनाथ यात्रेसाठी छोट्या छोट्या बसमधून निघालो. सकाळी रूद्रप्रयागला पोहोचलो. येथून जवळच पाच किलोमीटर अंतरावर अलकनंदा नदीचे उगमस्थान आहे. सभोवताली सारा पहाडी प्रदेश आहे. श्रीकेदारनाथ ते रूद्रप्रयाग अंतर ७४ कि. मी. चे आहे. तर ऋषिकेश ते बद्रीनाथ सुमारे ३१५ कि.मी. आहे. रस्ता एकेरी आहे. संपूर्ण घाट रस्ता. उंच अथांग परसलेला हिमालय व त्याच्या रांगा, तर उंचावरून खाली बोटाएवढया दिसणाऱ्या नद्या.

रूद्रप्रयागपासून थोड्या अंतरावर असलेल्या पिपलचट्टीला आम्ही दोन प्रहरचे जेवण घेतले आणि पुढचा प्रवास सुरू झाला. हा प्रवास श्रीकेदारनाथ प्रवासापेक्षा अधिक धोकादायक, जगणं-वाचणं ईश्वर स्वाधीन असा. रस्त्यात जोशी मठ लागला. जोशी मठ ते श्रीबद्रीनाथ हा रस्ता एकेरी तर आहेच शिवाय वाहनांचा एक जथा आल्याशिवाय दुसऱ्या जथ्याला पुढे जाता येत नाही. जोशी मठाजवळ वाहन चालकाची तपासणी होऊन पुढील प्रवास चालू झाला. सायंकाळच्या सातच्या सुमारास श्रीबद्रीनारायणला पोहोचलो. दिवसभराच्या प्रवासाने आम्ही दमलो होतो. हिमालयात सूर्य लवकर मावळत नाही. मावळणारी किरणे सात ते आठपर्यंत असतात. अंधार रात्री आठ वाजता पसरायला लागतो. आता डोंगर दऱ्यातील वस्तीवरचे मिणमिणारे दिवे दिसू लागले. रात्री जेवण करून लवकरच झोपी गेलो. येथे निवासस्थानाची घरे पक्क्या दगडाची होती. थंडी मात्र प्रचंड होती. येथून ४ कि. मी. अंतरावर भारत-चीन सीमेवर सैन्याची मानसा छावणी आहे. चीनची हद्द जवळच आहे. मुक्काम श्रीबद्रीनाथला

झाला.

शुक्रवार दि. २५/६/१९८२ च्या दिवशी श्रीबद्रीनाथ मंदिरातून सनईचे सूर, हिंदी भक्तीगीते ऐकायला येत होती. या आवाजातच श्रीबद्रीनाथ यात्रेत तप्तकुंडात स्नान करणे हे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. हिमालयाची श्रीबद्रीनाथ येथील समुद्र सपाटीपासून उंची अंदाजे १२००० फूट इतकी आहे. या विशालमय प्रदेशात खोल दऱ्यातून वाहत येणारी अलकनंदा नदी, त्यामुळे या भागाला विशालबद्री असे म्हटले जाते.

श्रीबद्रीनाथ हे चार धामापैकी एक असून श्रीविष्णूचे श्रीतीर्थक्षेत्र मानले जाते. येथील मंदिर विशाल असून, दगडी बांधकामाचे आहे. तर आतील बराच भाग लाकडी असून, तो विविध रंगाने रंगविलेला दिसतो. सर्वत्र सदैव पताका फडकत असतात. हा बर्फाच्छादित भाग असूनही तप्तकुंडांमुळे गरम पाण्याची उपलब्धता आहे. या तप्तपाण्याची एकूण पाच कुंडे आहेत. या पाच कुंडात स्नान करावे म्हणजे मानवी जीवनाला मुक्ती मिळते. जसे हवे तसे गरम पाणी एका कुंडात, गुरुजींनी एका कापडात तांदूळ बांधून त्या तप्तकुंडात धरला आणि दहा मिनिटात तांदळाचा भात झाल्याचे दाखविले. अशा या कुंडांपैकी एका कुंडात अंघोळ करून, विधी आटोपून श्रीविशाल बद्री म्हणजे भगवान विष्णूंची मूर्ती जरी लहान असली तरी, ती अतिशय मोहक आहे. श्रीबद्रीनाथ मंदिर फिरून पाहिले, प्रसाद घेतला. आसपासचा परिसर पाहिला. नयनरम्य बद्रीगाव जरी लहान असले तरी ते महान असे पवित्र क्षेत्र आहे, याची जाणीव झाली. येथे यात्रेकरूंसाठी चांगल्या सोयी-सुविधा असलेल्या धर्मशाळा आहेत. आम्ही गीताभवन धर्मशाळेत उतरलो होतो. मन आनंदाने तृप्त झाले होते. आसपास अनेक छोटी मंदिरे आहेत. त्यांचे दर्शन घेतले. श्रीपार्वतीमातेचे दर्शन घेतले. अलकनंदा नदीवरील पूल पायी पार करीत आम्ही मुक्कामस्थळी पोहोचलो. मुक्काम बद्रीनाथला गीताभवनात होता. श्रीबद्रीनाथ देवस्थानापासून २५-३० कि.मी.अंतरावर धर्मराज स्वर्गाकडे गेले ते ठिकाण, स्वर्गारोहण येथे आहे. अतिशय बिकट असा येथील प्रवास आहे.

शनिवार दि. २६/६/१९८२ सकाळी चहा-नाष्टा घेऊन छोट्या बस मधून परतीच्या प्रवासाला निघालो. आज आईसाहेबांची तब्येत नरम होती.

खूप लांबवरचा प्रवास, दगदग, थंडी तरी त्या कणखर होत्या आणि प्रवास चालू होता.

श्रीकेदारनाथ बाबा की जय, बद्रीनारायण की जय असा घोषनाद चालूच होता. कारण कृपेशिवाय हा प्रवास सुखरूप होत नव्हता. रात्री दहा वाजता हरिद्वारला पोहोचलो. सारेच प्रवासी दमलेले. जवळ जवळ ३१५ ते ३३० कि मी अंतराचा तोही घाटाचा प्रवास झाला होता. रात्री अकरा वाजता गरम भात-डाळीची खिचडी, कढी, पापड, पोटभर जेवण करून आम्ही झोपी गेलो.

रविवार दि. २७/६/१९८२ दिवसभर हरिद्वार मधील धार्मिक प्रेक्षणीय स्थळे पाहिली. गंगा स्नान केले. यात्रेकरूंची गर्दी होतीच. हरिद्वार हे जिल्ह्याचे ठिकाण असून, भारतातल्या सर्व प्रांतियांनी आपल्या प्रांताच्या धर्मशाळा येथे बांधल्या आहेत. रात्री मुक्काम हरिद्वारलाच झाला.

सोमवार दि. २७/६/१९८२ सकाळी ऋषिकेशला जाऊन आलो. लक्ष्मण झुला, मुनी की  रेती, श्रीशिवानंद स्वामींचा आश्रम पाहिला. दर्शन घेतले. हरिद्वारला सायंकाळी परतलो. हरिद्वार-ऋषिकेश ही जोड शहरे असली तरी ऋषिकेशला निसर्गाचे देणे आहे. ऋषिकेश हा हिमालयाच्या प्रवासाचा पायथा आहे. या गोड धर्मस्थळाची आठवण काढीतच रेल्वेत झोपी गेलो.

मंगळवार दि. २९/६/१९८२ दोन प्रहरी एक वाजता आम्ही लखनऊला पोहोचलो. येथे इमामबाडा सारखी प्रेक्षणीय व ऐतिहासिक स्थळे पाहून फैजाबादला पोहोचलो.

बुधवार दि. ३०/६/१९८२ सकाळी सर्व काही आटोपून अयोध्येकडे निघालो. फैजाबाद-अयोध्या हे अंतर केवळ दहा किलोमिटरचे आहे. ही दोन जुळी शहरे आहेत. सकाळी शरयू नदीत स्नान केले. येथे पाण्याचा विलक्षण वेग होता. श्रीकाळाराम मंदिर, हनुमान गडी, कनक भवन, राजगादी, श्रीराम जन्मभूमी आदींचे दर्शन घेतले. यावेळी अयोध्या एक शांत आणि आपापल्या कामात, प्रवाशांची सोय करण्यात मग्न असे शहर वाटले. या शहारात लाल तोंडाची खूप वानरं आहेत. हनुमान गडीला तर त्यांची संख्या खूप असून, ती माणसाळलेली आहेत. प्रवाशांच्या हातून मोतीचूर लाडू, फुटाणे, फळे असे पदार्थ हात पुढे

करून घेत होती. दोन प्रहरी परत फैजाबादला आलो. जेवणानंतर दोन वाजता अलाहाबादकडे निघालो. रात्री आठला अलाहाबाद तेथेच मुक्काम झाला.

गुरूवार दि. १/७/१९८२ सकाळी लवकरच प्रयागला (दारागंज) गेलो. येथे गंगा-यमुना-सरस्वती (गुप्त) असा नद्यांचा संगम आहे. या संगमावर स्नान विधी करून विश्रांती घेतली. येथे सम्राट अशोकाचा किल्ला पाहिला. अक्षय वट, झोपी गेलेला मारूती यांचे दर्शन घेतले. देशासाठी सर्वस्व अर्पण करणारे पं. मोतीलाल नेहरू, पं. जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी यांचे आनंदभुवन पाहिले. अतिशय उत्कृष्ट बांधकामात बांधलेले हे भुवन आहे. अलाहाबादला खूप उष्मा वाटत होता. रात्रीचा मुक्काम येथेच झाला.

शुक्रवार दि.२/७/१९८२ पहाटे पाच वाजता अलाहबाद सोडले आणि दहा वाजता वाराणसी स्टेशनला पोहोचलो. श्रीक्षेत्र वाराणसी, काशी हे हिंदूंचे मुख्य धर्मस्थळ. पार्वती, काली, दुर्गा, उमा, अंबा ही गंगामातेचीच नावे आहेत. पार्वती हिमालय राजाची सुकन्या. भगवान शंकराने पार्वतीस आपली शक्ती, चैतन्य, प्रेरणा सर्व काही देऊन टाकले. ही नारीशक्ती जगन्माता आहे. गंगा मातेचा उगम हिमालयातील बर्फाच्छादित गुहेतून झाला आहे आणि तो चिरंतन असा आहे अशी श्रद्धा आहे. गेली हजारो वर्षे साधू, संन्यासी, बैरागी, योग्यांनी गंगेचा किनारा पवित्र मोक्षदायी मानूनच जीवन व्यतीत केले आहे. तिच्या तीरावर, किनाऱ्यावर वास्तव्य केले आहे. गंगेच्या पाण्याचे वैशिष्ट्य की, ते कधीच दूषित होत नाही. तिचे पाणी बाधित नाही. आज हजारो वर्षे भारतीय गंगेचे पाणी पितात, गंगा स्नान करतात. आज गंगा नदी हिंदू भारतीयांची श्रद्धा आहे. जीवन आहे, माता आहे. अशा या गंगामातेची हरिद्वारला सायंकाळी आरती होते. या आरतीसाठी हरीच्या पायरीला देवगंगेच्या किनारी हजारो भाविक श्रद्धेने उभे राहतात.

श्रीगंगा स्नान आटपून श्रीविश्वेश्वराचे दर्शन घेतले. धार्मिक विधी केले. आमचा मुक्काम येथील महाराष्ट्र भवनात होता. तेथे देव गुरूजी, पित्रे गुरूजी व्यवस्था पाहत होते. उन्हाळा मात्र असह्य होता.

शनिवार दि. ३/७/१९८२ सकाळी पुन्हा गंगा स्नान, धार्मिक विधी केले. पित्रे गुरूजींबरोबर श्रीविश्वनाथ मंदिरात आलो. अभिषेक केला. दर्शन

घेतले. दोनप्रहरी भोजन, विश्रांती झाली. सायंकाळी काशीतील ऐतिहासिक, धार्मिक स्थळे पाहिली. गंगा काठचे घाट फिरून पाहिले. जुनी काशी अरूंद गल्लीच्या बोळांनी व्यापली आहे. तर नवी काशी सुधारित वस्तीत वाढते आहे.

रविवार दि.४/७/१९८२ रोजी बौद्धगयेला आलो. दोन प्रहर झाले होते. अतिशय उन्हामुळे बाहेर पडणे मुश्किल होते. जेवण करून विश्रांतीचा निर्णय घेतला. सायंकाळी ज्या बोध पिंपळवृक्षाखाली भगवान बुद्धांना ज्ञानप्राप्ती झाली त्या बोधी वृक्षाचे दर्शन घेतले. भव्य आकाराच्या भगवान बुद्धाच्या मूर्तीचे दर्शनही घेतले. तसा हा परिसर शांत आणि रम्य आहे. कमळाची छोटी छोटी तळी आहेत. बौद्ध विहारही पाहिला. आजचा मुक्काम बौद्धगया येथेच होता.

मंगळवार दि. ६/७/१९८२ सकाळी विष्णुपाद दर्शन, दोन प्रहरी १२ वाजता गयेहून पुढच्या प्रवासासाठी रवाना. सायंकाळी सहा वाजता पाटण्याला पोहोचलो. बौद्धगयेपेक्षा इथला उन्हाळा कमी वाटला. पाटण्यात मुक्काम केला.

बुधवार दि. ७/७/१९८२ सकाळी सर्व काही आवरून पाटणा विमानतळावर आलो. दोन प्रहरी तीन वाजता विमानाचे उड्डाण, काठमांडू विमान तळावर दोन वाजता पोहोचलो. माझ्या आयुष्यातील हा पहिलाच विमान प्रवास. उत्सुकता, भय,आनंद, कुतुहलपूर्ण प्रवास. एक अविस्मरणीय प्रवास ठरला. काठमांडू हे नेपाळच्या राजधानीचे शहर. नेपाळी लोक शिस्तबद्ध, शांत आणि आपल्या कामात गर्क. लोक गोरेपान, देखणे आणि समंजस. आमचा मुक्काम काठमांडूला लोत्से हॉटेलात होता. हॉटेलच्या खिडकीतून हिमालयाची सोनेरी पिवळी गगनचुंबी शिखरे दिसत होती.

गुरूवार दि. ८/७/१९८२ सकाळी श्रीपशुपतीनाथ दर्शनासाठी गेलो. श्रीपशुपतिनाथ व श्रीकेदारनाथ हे दोन्ही मिळून एक धाम यात्रा मानली जाते. श्रीपशुपतिनाथांचे मंदिर पुरातन, दगडी असून ते भव्य आहे. मंदिराचा आवार खूपचमोठा आहे. मंदिर गंडकी नदीच्या काठी आहे. गंडकी नदीच्या दोन्ही बाजूला रुद्राक्षांचे उंचच्या उंच वृक्ष आहेत. या श्रीमंदिरात कबुतरांची खूपच गर्दी आहे. श्रीपशुपतीनाथाचे दर्शन फारच सुरेख झाले. या मंदिरात केवळ

हिंदूनाच प्रवेश होता. या दर्शनानंतर आम्ही श्रीभक्तपूर, पाटणा, ललितपूर ही ऐतिहासिक व धार्मिक स्थळे पाहिली. कोकणासारखा हिरव्यागर्द वनराईने नटलेला हा प्रदेश, धबधबे आणि नयनरम्य  निसर्ग मनाला भारावून गेला. काठमांडूची लोकसंख्या दीड एक लाख. हे राजधानीचे शहर असून, ते खूप मोठे वाटले नाही. खूप सुधारणाही तेथे आढळल्या नाहीत. हवा मात्र स्वच्छ आणि गार होती. आजचा मुक्काम काठमांडूला झाला.

शुक्रवार दि. ९/७/१९८२ रोजी सकाळी स्नान वगैरे आटोपून श्रीपशुपतीनाथला अभिषेक केला. दर्शन घेतले. बुढा नीळकंठचे दर्शन घेतले. दिवसभर काठमांडू शहर पाहिले. सन २०१५ मधील भूकंपाने काठमांडू आता उध्वस्त झाले आहे.

शनिवार दि. १०/७/१९८२ रोजी पहाटे पुन्हा एकदा पशुपतीनाथ दर्शन घेतले. सकाळी दहा वाजता काठमांडू विमानतळावर आलो. दोन प्रहरी २.३० वाजता पाटण्यात आलो. पाटणा शहरात फेरी मारली. पाटणा बिहारची राजधानी. शहर खूप मोठे. खाण्याचे पदार्थ, दूध वगैरे अतिशय स्वस्त. पाटणा येथे मुक्काम केला.

रविवार दि. ११/७/१९८२ रोजी पहाटे ३.३० वाजता वाराणशी एक्सप्रेसला आमचा प्रवासी डबा जोडण्यात आला. सकाळी दहा वाजता वाराणशीला पोहोचलो. पुन्हा गंगा स्नान आणि काशी विश्वेश्वराचे दर्शन घेतले. गंगेच्या पाण्याची छोटी छोटी भांडी घेतली. काळे गंडे, दोरे घेतले. सायंकाळपर्यंत काशीचे सर्व घाट पाहिले. रात्री श्रीक्षेत्र काशी येथेच मुक्काम केला.

सोमवार दि.१२/७/१९८२ सकाळी १० वाजता वाराणशी दादर एक्सप्रेसने निघालो. सायंकाळी पाच वाजता अलाहाबादला आलो. रात्री १२ वाजता जबलपूर स्टेशनवर आलो.  आता पावसाला सुरुवात झाली होती. रात्रभर रेल्वे प्रवास सुरू होता.

मंगळवार दि. १३/७/१९८२ पहाटे पाचला खांडवा, सकाळी सातला इटारसी, तर ११ वाजता भुसावळला आलो. आता जरा बरे वाटू लागले. मागील सर्व प्रवास भर उन्हात होता. श्रीक्षेत्र काशी, अलाहाबाद, गया येथील उन्हाळा, उकाडा होता. उन्हाचा आम्हाला खूप त्रास झाला. दोन प्रहरी स्नान करून, भोजन

घेतले आणि विश्रांती घेतली. सायंकाळी सात वाजता आमचा प्रवासी डबा नागपूर-कोल्हापूर एक्सप्रेसला जोडण्यात आला. आता पुढचा प्रवास रात्रभर सुरू चालू होता.

बुधवार दि. १४/७/१९८२ रोजी सकाळी सात वाजता आम्ही पुण्यात पोहोचलो. चारीधाम यात्रा, काशी यात्रा चांगल्या प्रकारे पार पडल्याचा आनंद आम्हांला झाला होता. सर्वच प्रवाशांनी श्री. अशोक कुलकर्णी, श्रीदत्त दिगंबर यात्रा कंपनीचे मनापासून आभार मानले व निरोप घेतला. एक महिन्याचा सातत्याने प्रवास, उन्हाळा यामुळे आम्ही बरेच कंटाळलो होतो. गुरूवारी पुण्यातच विश्रांती घेतली.

शुक्रवार दि. १६/७/१९८२ रोजी सकाळी नागपूर एक्सप्रेसने निघून दोन प्रहरी दोन वाजता मिरजेला पोहोचलो. अशा प्रकारे आमची चारीधाम यात्रा पूर्ण झाली. श्रीक्षेत्र काशी यात्रा दुसऱ्यांदा पार पडली. ही यात्रा केवळ श्रीरमेश महाराजांच्या कृपेनेच पार पडली. अत्यंत अवघड यात्रा होती. यात्रा कंपनीचा खर्च रूपये तीन हजार सहाशे रूपये तर इतर खर्च एक हजार चारशे रूपये असे एकूण पाच हजार रूपये खर्च झाले होते.

दि. १४/६/१९८२ ते दि. १४/७/१९८२ हा महिना भराचा आमचा चारीधाम व हिंदूंच्या पवित्र तीर्थक्षेत्रांचा प्रवास. आज हजारो वर्ष झाली या भारत वर्षातील लोकांची तीर्थक्षेत्रावरील व या तीर्थक्षेत्रांवर वास करणाऱ्या साधू संन्याशांच्याबद्दल श्रद्धा टिकून आहे. या आध्यात्मिक सामर्थ्यांचा ओघ भारतीयांच्या मनात सतत उत्साहाने ओसंडून वाहत आहे. पाप घालविण्याकरिता हजारो यात्रेकरू गंगा स्नान करीत होते. पंडे शास्त्रोक्त पद्धतीने पूजा-पाठ करीत होते. त्यातील आम्हीही एक होतो. जागोजागी गंगेकाठी संन्याशी दिसत होते. नग्न साधू होते. फक्त लंगोटी धारण करणारे बैरागी-काही फिरस्ते, तर काही झाडाखाली ठाण मांडलेले, तर काही धुनी पेटवून-भस्म लावून चर्चा करणारे. काही संन्याशांचे आश्रम होते. भगवे कपडे धारण केलेले, दंड धारण केलेले, संन्याशांचे थवेच्या थवे. श्रीक्षेत्र बद्रीनाथचे दर्शन झाल्यानंतर मी सोबतीला वाटाड्यांना घेऊन अनेक साधू-संन्याशांची भेट घेतली. केसांच्या जटा झालेल्या, लांबलचक दाढ्या वाढवलेल्या अशा बऱ्याच साधू संन्याशांचा मला सत्संग

झाला. काही बैरागी तर कित्येक वर्षाचा अन्नत्याग केलेले ब्रह्मचारी, तर काही साधू गंभीर ध्यान लावून बसलेले, ते बहुतेक हिंदी बोलत, तर काही जण न बोलणे पसंत करीत.

अशाच एका गुहेत मला त्या वाटाड्याने नेऊन सोडले. त्या साधूच्या जटा, दाढी पांढरी शुभ्र आणि जटा, दाढी जमिनीला लागलेली. गौरवर्णाचे पण तेजस्वी वाटला. त्यांचे बरेच शिष्यही त्या गुहा वजा घरात राहत होते. गुहेत पाण्याचे माठ व फळे दिसत होती. काही वनस्पतींचा पाला, पाल्याच्या काड्या पडलेल्या दिसत होत्या. गुहेच्या एका बाजूने सूर्यप्रकाश येत होता. माझे पूर्व भाग्य असावे म्हणून त्या महात्म्याने माझी चौकशी केली. माझा मोकळा स्वभाव आणि पूर्वसुकृत पूर्व भाग्याने त्यांचे मला दर्शन घडविले. पुढील जीवनाबद्दल काही उपदेश करून, काही योगक्रिया शिकवून-सांगून मला उपकृत केले. दोन तासानंतर मी परतताना त्यांनी काही झाडमुळ्या दिल्या. त्या खाल्या असताना ऊन, वारा, थंड, भूक यापासून कित्येक दिवस राहता आले असते. मी बाहेर पडलो. त्यावेळी बराच उशीर झाला होता. वाटाड्याबरोबर मी परत निघालो. तेव्हा त्या किरकोळ देहयष्टीच्या, पाणीदार डोळ्यांच्या, विरक्त अशा परमेश्वर स्वरूपी संन्याशाची मला आठवण येत होती. तर मी सात-आठ वर्षाचा असताना भेटलेले ते योगी तर नाहीत ना? अशी शंका येऊ लागली.

मला माझ्या बालपणाची आठवण झाली. माझ्या घरची परिस्थिती अत्यंत गरीबीची होती. उन्हाळ्याचे दिवस होते. वडिल सलूनचे दुकान बंद करून अंघोळ करून आजीला जेवायला घेऊन बसत. घरातल्या शिंकाळ्यात ठेवलेल्या मडक्यातील आंब्याचे लोणचे काढत असतानाच दोन साधू घराच्या अंगणात भिक्षेसाठी उभे राहिले. आजीने त्यांना सोप्यात आणून घोंगड्यावर बसवले. त्यांचे दर्शन घेतले. माझ्या आई-वडिलांनी त्यांचे श्रद्धेने दर्शन घेतले. त्यातील एक साधू थोडे वयस्कर होते. मुखाने त्यांचा जप चालू होता. ते अत्यंत तेजस्वी दिसत होते. दुसरे साधू तरूण, गौरवर्णीय आणि तेजस्वी असे होते. हे बहुधा शिष्य असावेत. माझ्या वडिलांनी मोडक्या तोडक्या भाषेत हिंदी मिश्रित मुस्लिम भाषेत जेवण करता काय? असे विचारले. परंतु आम्ही जेवण करीत नाही. तांदूळ दिले तर चालतील असे सांगितले. एवढ्यात मी माडीवरून खाली

येऊन बाहेर खेळण्यासाठी निघालो. मला आजीने त्यांना नमस्कार करायला सांगितला. मी घाबरून त्यांना नमस्कार करायला तयार नव्हतो. पण ते साधू होते, मला ते म्हणाले, "आओ बेटा, डरो मत।" मला त्यांनी जवळ घेतले. तोंडावरून, अंगावरून हात फिरवला. अंगारा लावला व माझ्या आई-वडील, आजीकडे पाहत म्हणाले, "यह बेटा हमारा है " व मला ओढून मांडीवर बसविले मी घाबरून रडू लागलो. आई वडिल रडू नको म्हणत होते. हळूच त्यांनी मला सोडून दिले व पुन्हा "ये बेटा हमारा है, कई साल बाद वो आवेगा." माझे आई, वडील, आजोबा यांना यातील काही कळले नसावे. परंतु त्या साधू संन्याशांच्या आशीर्वादाने माझे काहीतरी चांगले होणार असे वाटू लागले. ते दोन साधू महाराज वडिलांनी दिलेला तांदूळ व दोन पैसे घेऊन ते पुढील प्रवासाला मार्गस्थ झाले.

त्या पूर्व साधूंची गुहेत भेट झाली नसेल ना? त्यांनीच मला पुढील जीवनासाठी आशीर्वाद दिला नसेल ना?

श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या दिव्य जीवनाच्या, चमत्काराच्या गोष्टी स्व. माईसाहेब शिर्के, स्व. जाधव आक्का यांच्या तोंडून ऐकत आलो होतो. या गोष्टी ऐकल्या की, माझे मन भारावून जात असे. परिणामी माझ्या हृदयात त्यांच्याबद्दल विलक्षण भक्तीभाव, उत्साह, सुर व संवेदनांच्या लहरी निर्माण होत असत. मी आता देवांच्या गोष्टी आणि देवमाणसांच्या सहवासात रमत चालल्याने मनातील स्वैरविचार शांत होत चालले होते. माझ्या भटक्या जीवनाचा मला कंटाळा आला होता. बाह्य सुखाचा हव्यासही आता संपला होता. निष्ठावान साधकाला तीव्र तळमळ लागते ती प्राप्त होऊ लागल्याने श्रीश्रीकृष्ण सरस्वती महाराजांची दिव्य अनुभूती येत होती. त्यांचे अगम्य असे अनुभव येत होते.

माझ्या आई-वडिलांनी, घरच्या लोकांनी माझे लग्न ठरविण्याचा तीन वेळा प्रयत्न केला होता. परंतु तो मी हाणून पाडला होता. ईश्वरसदृश्य असलेल्या श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या वरील माझ्या श्रद्धेत आवेश येत होता. दैनिक जीवनात किरकोळ गोष्टींना मी आता सहज बाजूला सारू लागलो होतो. श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे जीवनकार्य मला उत्तेजित करीत होते.

त्यांच्या अनंतरूपी उपकाराच्या आठवणी आठवून माझ्या डोळ्यात अश्रूधारा वाहू लागत. त्यांच्या बद्दलच्या आठवणी मला बेचैन करीत. त्यांचे मुख्य कार्य होते, या मनुष्य जातीचा दु:खभार हलका करणे. मग ते कार्य दिव्य अनुभूती, उपदेश, कर्मसिद्धांत या मार्गांनी केलेले होते. ते दत्तावतारी होते. साक्षात्कारी होते. योगी होते. विश्वव्यापक, सर्वव्यापी आणि चैतन्यशील होते. आता त्यांचा संजीवन समाधी सोहळा दिन साजरा करावा, असे मनात येत चालले होते.

२० ऑगस्ट १९०० साली श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांनी श्रावण वद्य दशमीला पहाटे ३.३० ते ३.४५ च्या सुमारास पुण्यश्लोक ताराबाई शिर्के यांच्या निवासस्थानी संजीवन समाधी घेतली होती. २५ ऑगस्ट २००० साली त्यांनी समाधी घेऊन शंभर वर्षे पूर्ण होणार होती. हिंदू धर्मशास्त्राची शिकवण अशी आहे की, अवतार संताची-साधूंची जयंती-पुण्यतिथी साजरी करावी. त्यांची शिकवण, उपदेश, त्यांचे कार्य हे पुढील पिढीला आदर्श, संस्कारमय, सुख-शांती आणि आदर्श जीवन पद्धतीला जन्म देत राहते. सन २००० पर्यंत आम्ही वर्षातून चार उत्सव सार्वजनिकरित्या मोठ्या प्रमाणात साजरे करीत होतो. श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांची जयंती (माघ वद्य पंचमी), पुण्यतिथी (श्रावण वद्य दशमी), श्रीगोकुळ अष्टमी, श्रीस्वामी समर्थांची पुण्यतिथी (चैत्र कृष्ण त्रयोदशी) या उत्सवांना मिरज, सांगली, जयसिंगपूर, उदगाव, समडोळी, म्हैसाळ आदी परिसरातून भक्त मंडळी उत्साहाने येत, उत्सव साजरा करीत आणि महाप्रसादाचा लाभ घेऊन नामसंकीर्तनाच्या सान्निध्यात भजन-कीर्तनाचा आस्वाद घेऊन जात असत.

आता श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज, कोल्हापूर यांच्या संजीवन समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त श्रीज्ञानेश्वरी पारायण अंखड सोहळा, म्हैसाळ

स्टेशन येथील श्रीदत्त मठीत आयोजित करण्यात आला होता. सदर सोहळा श्रावण वद्य नवमी गुरूवार दि. २४/८/२००० ते भाद्रपद शुद्ध द्वितीया दि. ३१/८/२००० या कालावधीत आयोजित करण्यात आला होता. सदर महाउत्सवाची सुरूवात श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज मठी, मिरज येथून श्रीदत्त महाराजांच्या पालखी सेवेनी सुरू झाली.

सकाळी नऊ वाजता सर्वश्री रमेश महाराज कुलकर्णी, गोविंद महाराज कुलकर्णी, केशवराव गोखले, सखाराम महाराज साळुंखे, अशोकराव खटावकर, श्री. प्रदीपपंत बाळेकुंद्री, सुरेश पाटील, श्री. जगन्नाथ म्हस्के (बापू) माझे अन्नदाते शिवाजीराव धुळूबुळू यांच्या अमृतहस्ते पूजनाने पालखी सेवेचा शुभारंभ झाला.

श्रीपंत मंदिर, लक्ष्मी मार्केट, हायस्कूल रोड, शास्त्री चौक या मार्गाने पालखीची भव्य मिरवणूक अशा स्वरूपात निघाली. सायंकाळी चार ते पाच या काळात म्हैसाळ येथील दत्त मंदिर परिसरातील पारायण मंडपात पोहोचली.अशाप्रकारे उत्सवाला प्रारंभ झाला.

या महोत्सवात प.पू.पट्टदेवरू शिवयोगी महाराज, ह.भ.प. श्री. चंद्रशेखर केळकर महाराज, ह.भ.प. गुरुनाथ कोटणीस महाराज, ह.भ.प. लक्ष्णशास्त्री मोटे, ह.भ.प. मनोहर सारडा, ह. भ.प. शरद गद्रे, ह. भ.प. विश्वास आण्णा गवळी, मा. उद्योगपती प्रवीणशेठ लुंकड, श्री. शहाजीराव जगदाळे, श्री. सुभाष लुंकड, श्री. विनोद गुळवणी, श्री. गणेश गाडगीळ, श्री. दीपकबाबा शिंदे (म्हैसाळकर), श्री. मनोजबाबा शिंदे (म्हैसाळकर), श्री. रतनसिंह बाबा (म्हैसाळकर), डॉ. ए.पी. भुपटकर, श्री. बापूसाहेब किणीकर, स्व. नाथा देवल, स्व. बापूसाहेब जामदार, ह. भ.प. पांडुरंग भोसले महाराज आदी मान्यवरांनी हजेरी लावली.

सर्वश्री ह.भ.प. विठ्ठलराव भोसले, रमेशबुवा शिवापूरकर, दत्ता वडगावकर, सिताराम कुमठेकर, सोपानकाका इसादकर, रामराजे पाठक, विश्वेश बोडस, मुकुंदकाका जाटदेवळेकर, शामराव आप्पा कराडकर, पांडुरंग महाराज घुले, एकनाथ महाराज हंडे, संदिपान शिंदे, हसेगावकर यांची कीर्तनसेवा झाली. सर्वश्री ह. भ.प. म. बा. जोशी, श्री. गुरुनाथ कोटणीस, श्री. आ. म. ग्रामोपाध्ये,

श्री. लाला मास्तर, श्री. दा. का. घावरे (भाऊ) श्री. विवेकानंद वास्कर महाराज, यांची प्रवचन सेवा झाली.

तर प्रा. स्व. शिवाजीराव भोसले, स्व. पां. ना. कुलकर्णी, स्व. नंदाकाका बापट, श्री. बापू जाधव, श्री. वैजनाथ महाजन, श्री.धर्मदिवाकर, लक्ष्मीसेन भट्टारक या वक्त्यांची व्याख्यानमाला संपन्न झाली. या व्याख्यान मालेत माजी आमदार हाफिजभाई धत्तुरे, श्री. अ.या. मेश्राम, अ‍ॅड. चिमण लोकूर, श्री. दीपक लेले. श्री. भिमगोंडा आण्णा पाटील, (गावकामगार म्हैसाळ) श्री. आर. पी. पाटील, श्री. महालिंग आण्णा पाटणे, बापूसाहेब किणीकर, डॉ. व्ही. के. आमटे, सुभाष कुलकर्णी, अ‍ॅड. एन.ए.कोतवाल, श्री. बाबा पाटील, डॉ. अनिल मडके, डॉ. रणजीत सुल्ह्यान ही प्रमुख मंडळी कार्यक्रमास उपस्थित होती.

कु. मंगला जोशी, श्री. ऋशिकेश बोडस, सौ. चंदाताई तिवारी, कु. प्रज्ञा टोणपे, सौ. शुभदा भोगले यांची गायनसेवा तर श्री. धोंडीराम मगदूम, श्री.विठ्ठलराव कुशिरकर, श्री. सिद्धेश्वर कोळी, श्री. बाबासाहेब कुंभार, श्री. ओलेकर बंधू, श्री. मोहन सपकाळ, श्री. माणिकराव इंदुलकर, श्री. आण्णाप्पा कोरवी, एम. आर. सावंत यांची भजन-गायन सेवा संपन्न झाली.

या महोत्सवातील श्रीज्ञानेश्वरी पारायण वाचक म्हणून दीड हजार वाचकांचा समावेश होता. या सर्वांना रोज विविध भोजन स्वाद, चहा, नाष्टा, यांची उत्कृष्ट प्रकारे सोय करण्यात आली होती. गुरूवार दि.३१/८/२००० रोजी सकाळी आठ वाजता श्रीरुद्रपशुपती कोळेकर स्वामीजी व श्री. रमेश महाराज कुलकर्णी यांच्या हस्ते ज्ञानेश्वरी ग्रंथ वाचन समाप्ती करण्यात आली. त्यानंतर भव्य दिंडी-यात्रा काढण्यात आली.

दोन प्रहरी एक वाजता उद्योगपती श्री. प्रवीणशेठ लुंकड, श्री. महेश शिर्के, श्री. प्रदीपपंत बाळेकुंद्रीकर, श्री. आनंदराव पाटील, श्री. आनंदराव शेलार, सर्वश्री मारुती साळे, विठ्ठलराव सूर्यवंशी, ढवळे पेंटर, स्व. संगाप्पा मामा माळी, स्व. आण्णा शिंदे, स्व. सुरेशपंत बाळेकुंद्रीकर, स्व. चंद्रकांत जाधव, स्व. बाळू तुका घोरपडे आदी मान्यवरांच्या हस्ते महाप्रसाद वाटप करण्यात आले.

श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज संजीवनी शताब्दी महोत्सवासाठी प्रामुख्याने सर्वश्री सावंता म्हेत्रे, बाजीराव घोरपडे, दौलत घोरपडे, अजित सूर्यवंशी, संतोष सुर्यवंशी, लक्ष्मण जगताप, मुन्ना भोजमालपाणी, आप्पा झेंडे, रमेश बंगले, चंद्रकांत कुरणे व बंधू, चंदू होमकर, दत्ता भोकरे, सुरेश कांबळे, मोहन कांबळे, आनंदराव शेलार व बंधू, डॉ. मधुकर म्हेत्रे, प्रमोद बसरगे, शिवाजीराव जाधव, मधु पवार, शशिकांत गोवे, यशवंत चव्हाण, मंगल शिंदे, तानाजी घोरपडे, आनंदराव मंडले, पोपट सातपुते, विठ्ठल विजापुरे, सुमेरसिंग रजपूत, मनोहर कदम, वसंत गडकरी, बालाजी काटकर आणि बंधू, सदाशिवराव वड्ड व बंधू, अशोक तंगडी, तानाजी शिंदे, आनंदराव माळी, विलास शिंदे, मारुती गायकवाड, लक्ष्मण जगताप, स्व. बाबूराव सूर्यवंशी, स्व. बापूसाहेब जामदार, स्व. निवृत्ती काटकर, स्व. खराडे तात्या, दिलीप केसरखाने ही सर्व मंडळी खूप श्रमली, राबली म्हणून तर हा उत्सव मोठ्या आनंदाने, उत्साहाने पार पडला. या सर्वांविषयी प्रेमभराने कृतज्ञता व्यक्त करतो.

दि. २४/८/२०००ते दि. ३१/८/२००० या कालावधीत विजयनगर (म्हैसाळ स्टेशन) येथे श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांची संजीवनी समाधी शताब्दी महोत्सव, श्रीग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण अत्यंत वैभवशाली थाटात पार पडले. याचे सर्व श्रेय म्हणजे श्रीदत्त महाराजांची कृपाच होती. हा संजीवन सोहळा उत्तम रितीने पार पडल्यास मी तीन वर्षे पंढरपूरास पायी चालत जाऊन दर्शन घेईन, पांडुरंगाला असा नवस केला होता. त्याप्रमाणे स्व. खराडे तात्या, श्री. सावंता म्हेत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सन २००१ दि. १९/१२/२००१ ते दि. २५/१२/२००१, सन २००२ दि. १७/१२/२००२ ते दि. २३/१२/२००२ व सन २००३ दि. २७/११/२००३ ते दि. २/१२/२००३ या कालावधीत पंढरपूरला पायी दिंडी काढून, पायी प्रवास करून श्रीविठ्ठलाचे दर्शन घेऊन नवस पूर्ण केला होता. त्याचा मनस्वी आनंद मला प्राप्त झाला.

आता थोडा काळ मी विश्रांती घेऊ लागलो. या दरम्यान माझ्या हाती श्रीमती खेडेकर वहिनी यांनी दिलेले श्री. आगासकर यांचे **श्री साई चरित्र** हाती आले. ते वाचून मी अतिशय प्रभावित झालो. या पुस्तकातून बाबांचे जीवन चरित्र, त्यांचे कार्य, सोप्या भाषेत मांडलेले दृष्टांत, चमत्कार, मानवी जीवनविषयक

प्रेम, प्राणीमात्रांवर असलेली दयादृष्टी, प्रेम, आशीर्वाद अशा अनेक बाबींनी व केळकर वहिनी, सांगली यांच्या साई भक्तीने मला झपाटून टाकले होते. हायस्कूलच्या काळात माझी श्री. रामलिंग चिकोडे (दादा), श्री. विठ्ठल विजापुरे यांची मैत्री जमली.

आम्ही मार्च १९६९ ला जुनी एस.एस.सी. (मॅट्रीक) परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी. आजही आमची मैत्री, स्नेह, प्रेम अखंड आहे. श्री. विठ्ठल विजापुरेंचे वडील स्व. भिमराव विजापुरे हे रेल्वे तिकीट तपासणी नोकरीत होते व ते दरवर्षी आपल्या घरातील सर्वांना घेऊन श्रीसाईबाबांच्या दर्शनाला जात. त्यांचे संपूर्ण घरच साईभक्ताने व्यापून गेलेले होते. त्यामुळे ते शिर्डीला जाऊन आले की, मला उदी, प्रसाद देत असत.

यानंतर मी १९८० च्या दरम्यान शिर्डीला स्व. बाबूराव सूर्यवंशी (दादा) यांच्या बरोबर प्रथमच गेलो होतो. त्यावेळी सूर्यवंशी दादा हे सांगली नगरपालिकेचे नगरसेवक होते. स्व. रघुनाथ घोडके, मुसाभाई शेख(भिस्ती) मगदूम आण्णा (मुडिस हाऊस) कलगुटगी, लाळगे साहेब हे नगरसेवक, श्री. राजाराम घाटगे (दादांचे जावई) ही मंडळीही सोबत होती.

त्याकाळी साईबाबांच्या दर्शनासाठी बेसुमार गर्दी नव्हती. श्रीसाईबाबांचे दर्शन आम्हांला व्यवस्थित मिळाले. श्रीसाईबाबांच्या या दर्शनाने त्यांचे विषयीची माझी श्रद्धा वाढतच राहिली.

सांगलीत मी दर मंगळवारी दादांच्या घरीच थांबत असे. दर मंगळवारी रात्री आठ वाजता सामूहिक आरती होत असे. या सामूहिक आरतीला सांगलीतील बरीच मंडळी उपस्थित राहत होती. त्यात प्रामुख्याने स्व. रघुनाथराव घोडके, श्री. भानुदास पडळकर, श्री. बाळकृष्ण गोखलेसाहेब, स्व. बाळासाहेब यादव, स्व. निंबाळकर आबा, स्व. दत्तात्रय शेलार (इस्लामपूर) आरती झाल्यावर आम्ही सर्वजण एकत्रित जेवण घेत असू. या आरतीला श्रीगोविंद महाराज कुलकर्णी हजर राहत असत. ते वयाने आणि अधिकाराने ज्येष्ठ असलेने आरतीनंतर त्यांचे दर्शन घेण्याची पद्धत होती. संपूर्ण सूर्यवंशी परिवारांनी त्यांचा अनुग्रह घेतला होता.

श्री. सूर्यवंशी दादांचा परिचय देणे हे मी अगत्याचे समजतो. त्यांचे

संपूर्ण नाव बाबूराव जोतिबा सूर्यवंशी. त्यांच्या धर्मपत्नीचे नाव लक्ष्मीबाई बाबूराव सूर्यवंशी. त्यांचे माहेरचे नाव बायजाबाई असे होते. त्यांना मोहन, राजू, प्रकाश, सुधाकर, विजय ही मुले तर सौ. कमल शिंदे (इचलकरंजी), स्व. पद्मा घाटगे, मिरज, सौ. सरुताई (सांगली), सौ. अलका सूर्यवंशी (मिरज) अशा चार कन्या असा हा त्यांचा परिवार आणि सुंदरसा संसार चालू होता. पण त्यांच्या जीवनात अचानक एक वादळ आले. दादांचा दोन क्रमांकाचा मुलगा राजा हा अचानक वारला. त्यांनी चालवत असलेली भिशी लोकांनी बुडविली. त्यामुळे हे कुटुंब अत्यंत वाईट अडचणीत सापडले. त्यांची अवस्था दयनीय होऊन गेली. त्यातच त्यांचा नुकताच लग्न झालेला मुलगा मोहन हा गंभीररित्या भाजला. या घटनाक्रमाने सारा सूर्यवंशी परिवार हतबल झाला. ट्रकच्या कर्जापोटी बँकेच्या जप्तीच्या नोटीसा सुरू झाल्या. उत्पन्नाचे सर्व मार्ग बंद झाले. आशेचे किरणच दिसेनासे झाले.

यातून काही मार्ग काढावा या हेतूने दादांचे जावई श्री. राजाराम दत्तोबा घाटगे त्यांना घेऊन माझ्याकडे आले. सूर्यवंशी दादा व माझा परिचय त्यांच्यामुळेच झाला होता. पुढे हा परिचय दृढ होत गेला. या परिचयाचे रूपांतर स्नेहात झाले. जणू आपल्या मुलात मला सामावून घेतले. त्यांना घेऊन मी दर रविवारी कोल्हापूरला श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या समाधी दर्शनाला श्री. शिर्के यांच्या मठीत जाऊ लागलो आणि हळूहळू श्रीदत्त महाराजांच्या कृपादृष्टीने त्यांचे दिवस बदलू लागले.

स्व. सौ. लक्ष्मीबाई सूर्यवंशी यांनी मी सुरूवातीला राजाराम घाटगेंच्या परिचयामुळे मामी म्हणत असे. मामी अत्यंत प्रेमळ, कर्तबगार, धाडसी, श्रद्धाळू, गरीबीतही सुख मानणाऱ्या अशा त्या होत्या. त्याही कोल्हापूरला दर्शनाला येत असत. श्री. मोहनचे लग्न १९७१ साली झाले होते. त्यांच्या पत्नीचे नाव शोभा, त्यांचे माहेर कोल्हापूर. प्रकाशचे लग्न १९८० चे. त्यांच्या पत्नीचे नाव सुरेखा, त्यांचे माहेर निपाणी. तर सुधाकर आणि विजय यांचे लग्न १९८६ मध्ये झाले. सुधाकरची मंडळी मीना तर विजयच्या पत्नीचे नाव मनीषा. जी नात्याने मामींची भाची लागत होती.

सन १९७६ पासून दादांच्या घरी श्रीकृष्ण दत्त महाराजांची आरती

सुरू होती. १९८० साली श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या तसबिरीची स्थापना झाली. सांगली येथे पूजापाठ, आरती, असे सर्व कार्यक्रम नित्यनियमाने सुरू झाले. दिवसेंदिवस गर्दी वाढतच होती. जागा कमी पडत होती. नव्याने मठी बांधणे आवश्यक होते. सन १९९३ साली दादा सूर्यवंशीच्या नव्या दत्त मठीची, मंदिराची उभारणी करणेत आली. मंदिरात श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज, श्रीस्वामी समर्थ, श्रीपंत महाराज बाळेकुंद्रीकर, श्री शिवचिदंबर महास्वामी यांच्या तसबिरीची स्थापना, श्रीगोविंद महाराज कुलकर्णी, श्रीरमेश महाराज कुलकर्णी यांच्या अमृतहस्ते झाली. दर मंगळवारी रात्रीच्या आरतीला मी व श्री. गोविंद कुलकर्णी हजर राहत असू. बरेच भाविक लोकांची उपस्थिती होऊ लागली. आता श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांची जयंती व पुण्यतिथी सार्वजनिकरित्या मोठ्या प्रमाणात सुरू झाली. स्व. दादा व स्व. मामी (ढोली आई) हे प्रेमळ दांपत्य होते. त्यांच्या पूर्वभाग्याने, पूर्वपुण्याईने श्रीदत्त मठीची स्थापना झाली. श्रीदत्त मठीची व्यवस्था, सेवा, लोकसेवा, भक्तसेवा यातच त्यांनी आपले जीवन व्यथित केले. मला त्यांनी मुलगा मानले होते. मला वडिलांचे प्रेम, माया, आपुलकी दिली. एका गतजन्माचा धागा जुळून आला.

अशा प्रकारे सांगलीत श्रीदत्त मठाचे कामकाज सुरू झाले. सौ. सूर्यवंशी मामी या दि.३/२/२००९ रोजी स्वर्गवासी झाल्या तर दादा हे दि.३१/५/२००९ रोजी स्वर्गवासी झाले. त्यांच्या पश्चात त्यांनी लावलेला या दत्त मठीचा वेल वाढत-पसरत राहिला आहे. अनेक भाविक आत्मेच्छुक मंडळी या मंदिरात येतात, दर्शन घेतात. स्व. सूर्यवंशी दादा, स्व. मामी (आई) यांच्याविषयी कितीही कृतज्ञता व्यक्त केली तरी ती अपुरीच ठरणारी आहे. श्रीसाईबाबांच्या दर्शनाला जाण्याचा सर्वप्रथम योग मला सूर्यवंशी दादांनीच घडवून आणला होता. त्यानंतर वरचेवर मला शिर्डीला जावे असे वाटू लागले. पण नोकरीची अडचण, आर्थिक वानवा यामुळे ते मला जमत नव्हते. सन १९८५ साली मी, स्व. शंकरराव कांबळे, स्व. दत्तोबा शिंदे, श्री. शिवाप्पा येवारे आण्णा, श्री. राम महाजन, श्री. सावंता म्हेत्रे इत्यादी मंडळींसह श्रीसाईबाबांच्या दर्शनाला, श्रीगजानन महाराजांच्या शेगावला दर्शनाला जाऊन आलो. श्री.विनोद गोखलेंनी श्रीशिर्डी संस्थानचे वॉटर पोल्यूशनचे काम घेतल्याने त्यांच्या बरोबर सन २०००

या कालावधीत तर सौ. इंदूआई, श्रीमती शांताई शेलार, श्री. आनंदराव शेलार यांच्याबरोबरही सन २००१ च्या शिर्डीला दर्शनासाठी जाऊन आलो. माझी शिर्डीच्या साईबाबांच्या बद्दलची श्रद्धा वाढतच होती. त्या श्रद्धेने मला साईबाबांचे मंदिर उभे करावे ही भावना निर्माण केली, पण जागा मिळत नव्हती. पण श्रीसाईबाबांच्या कृपेने स्व. शंकरराव शिंदे यांनी त्यांची जागा उपलब्ध करून दिली व साई समर्थ विठ्ठल मंदिराचे बांधकामाचे काम म्हैसाळला चालू झाले.

श्रीसाई समर्थ विठ्ठल मंदिराची रचना व देखरेख श्री.एस.एम सन्नके इंजिनिअर साहेबांनी केली. या मंदिरासाठी श्री. तानाजी शिंदे, श्री. आनंदराव माळी, शशिकांत शिंदे, आनंदराव शेलार बंधू, ढवळे पेंटर, चंदर कुरणे, मंगल शिंदे, सावंता म्हेत्रे. विजय गुजर, चंदू होमकर, शशिकांत कुरणे, हाफिजभाई, स्व. सुभाष उळागड्डे यांनी अत्यंत परिश्रम घेतले.

श्रीसाई समर्थ विठ्ठल मंदिराचा उद्घाटन सोहळा माघ वद्य तृतीया दि. १९/२/२००३ ते माघ वद्य दशमी दि. २६/२/२००३ या कालावधीत झाला. या उद्घाटन महोत्सवाची सुरूवात श्रीग्रंथराज ज्ञानेश्वरीने पारायणाने झाली. श्री. प.पू. गुरुमहंत पट्टदेवरू शिवयोगी महाराज, श्री. रमेश महाराज कुलकर्णी-अक्कोळकर महाराज, श्री. चंद्रशेखर केळकर (आण्णा) श्री. गुरुनाथ कोटणीस महाराज, श्री. प्रदीपपंत बाळेकुंद्रीकर महाराज, श्री. बापूसाहेब पुजारी, सर्वश्री ऋषिकेश बोडस, डॉ. जयसिंगराव शिंदे, दीपकबाबा शिंदे, मनोजबाबा शिंदे, स्व. केदारराव शिंदे, हणमंतराव शिंदे, शंकरराव सातपुते, श्री. मनोहर सारडा, ह.भ.प. डॉ. शरद गद्रे, विश्वास आण्णा गवळी, विजयराव धुळबूळू, बाळासाहेब कुरणे, अरूण रामतीर्थकर, पवनकुमार कोचेटा, ॲड. दीपशीखा आपटे, स्व. बापूसाहेब जामदार, स्व. चंद्रकांत जाधव आदींच्या अमृतहस्ते झाले.

या महोत्सवात सकाळी ह. भ.प. बाळशास्त्री हरिदास, श्री. लक्ष्मणशास्त्री मोटे, श्री. प्रसाद महाराज बडवे, श्री. श्रीकांत महाराज बोधले, श्री. चैतन्यमहाराज देगलूरकर, स्व. सीताराम बुवा कुमठेकर, स्व. नाना जोगळेकर, स्व. दत्तदास घागबुवा यांची श्रवणीय कीर्तने झाली तर रात्रीची कीर्तनसेवा डॉ. श्री.आबालाल नदाफ, श्री. एकनाथ महाराज हंडे, श्री. मनोहर बुवा शिरसाट, रामराजे पाठक यांची झाली.

तर प्रवचन सेवेत ह.भ.प. वा. ना. उत्पात, श्री. गुरुनाथ कोटणीस, श्री. दा. का. थावरे, श्री. पुंडलीक महाराज पाटील, श्री. शिवरूद्र बसरगे, गुरुवर्य श्री. विवेकानंद वास्कर, वै. विठ्ठलराव भोसले यांची सेवा झाली.

तसेच डॉ. म. बा. जोशी, वैजनाथ महाजन, ल.रा. नसिराबादकर, श्री. म.गो. धडफळे, श्री. अशोक कामत, बापू जाधव, पां. ना. कुलकर्णी यांची मंत्रमुग्ध व्याख्याने संपन्न झाली. गायनसेवा श्री. धनंजय जोशी, श्री. ऋषिकेश बोडस, कु. मंगला जोशी, सौ. मंजुषा कुलकर्णी तर भारुड भजनसेवा श्री.चंदाताई तिवारी, श्री. मोहन कडेगावकर यांची झाली.

दि.२७/२/२००३ रोजी सकाळी श्रीसाईबाबा,श्रीस्वामी समर्थ, श्रीविठ्ठल-रुक्मिणी या मूर्तींची प्राणप्रतिष्ठा सर्वश्री रमेश महाराज अक्कोळकर, केशवराव गोखले, गोविंद महाराज कुलकर्णी, सखाराम महाराज, दीनानंद महाराज (कांडगावकर), श्री. सुभाष बेळगावी यांच्या अमृतहस्ते व श्री. डी. के. पाटील, श्री. आर. के. पाटील, आमदार संजयकाका पाटील यांच्या उपस्थितीत झाली. दि. २३/२/२००३ रोजी वैकुंठवासी माईसाहेब शिर्के सभागृहाचे उद्घाटन मा. पद्मश्री डॉ. डी. वाय.पाटील साहेब (राज्यपाल बिहार), श्री. पंडितराव चव्हाण, श्री.महेश शिर्के, श्री. डी. एस. भोसले आदींच्या अमृतहस्ते झाले.

दि.२६/२/२००३ रोजी सकाळी काल्याचे कीर्तन होऊन श्री.रूद्रपशुपती कोळेकर महाराज, मा. उद्योगपती प्रवीणशेठ लुकंड, श्री. आण्णासाहेब कुरणे, स्व. रघुनाथ घोडके, स्व. वसंतराव घोडके, श्री. वसंत सूर्यवंशी, श्री. भानुदास पाटील, श्री. चंद्रकांत हुलवान, सर्वश्री शिवाजीराव जाधव, भाऊ नरोटे, माधवराव पोतदार, राम घोडके आदी मान्यवरांच्या हस्ते महाप्रसाद वाटपाचा कार्यक्रम झाला.

श्रीसाई समर्थ विठ्ठल मंदिर उद्घाटन सोहळा महोत्सवासाठी सर्वच भक्त मंडळी श्रद्धापूर्वक श्रमली. निमंत्रित सर्व मान्यवरांचे बद्दल कृतज्ञता.

थोर शिक्षण महर्षी पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील साहेब (राज्यपाल) यांच्यासारखी महान विभूती या कार्यक्रमास उपस्थित राहीली. त्यांचे ऋण मानावे तेवढे थोडेच!



श्रीक्षेत्र शिर्डी (लेंडीबाग)
दि.२८-०२-१९८२

आता श्रीसाई समर्थ विठ्ठल मंदिरात पूजा-अर्चा व्यवस्थित चालू झाली. मनाला एक प्रकारचा अनाकलनीय आनंद वाटतो. त्यानंतर लवकरच मी, सर्वश्री विनोद गोखले, मंगल शिंदे, आप्पा कुडचे, चंदर कुरणे, चंदू होमकर या सर्वांना घेऊन शिर्डीच्या साईबाबांचे दर्शन घेऊन आलो.

दिवस आनंदात जात होते. पण मी काढलेल्या कर्जाचा बोजा मला अवस्थ करीत होता. श्रीसाई समर्थ विठ्ठल मंदिराच्या बांधकामासाठी नेहमी प्रमाणे मला कर्ज काढावे लागले होते. ते पगारातून फेडणे शक्य नव्हते. तथापि, माझी श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या वरील श्रद्धा, विश्वास, श्रीसाईबाबांच्या वरील माझी अतूट भक्ती यांनी काहीतरी  मार्ग निघेल, श्रीमहाराज, श्रीसाईबाबा मला या कर्जातून मुक्त करतील, असा विश्वास वाटत होता. निदान मनाला तरी आधार वाटत होता, काहीतरी मार्ग ते काढतील, असा मला ठाम विश्वास होता आणि झालेही तसेच.

या कलियुगात तर परमेश्वराने आपल्या भक्ताला पैसे दिल्याचे तरी मला आठवत नाही. पण अप्रत्यक्षपणे श्रीदत्त महाराजांनी, श्रीसाईबाबांनी मला अप्रत्यक्ष रीतीने पैसे पाठवले. माझे ते भाग्य, पुण्याई यातून मला तसा टोकाचा अनुभव तरी आला. त्याचे असे झाले, पुढे काही दिवसांनी समडोळी गावात गर्ल्स हायस्कूलसाठी बंपर लॉटरी सोडतीत प्रथम क्रमांक मारुती कार व इतर मोटर सायकल, कपाटे, शिवणयंत्रे आणि शेवटी वॉटर पॉट अशा बक्षीसांची खैरात होती. माझ्या कार्यालयातील जिवलग मित्र श्री. सी. के. पाटील हे समडोळीचे. त्यांनी मला तिकीटे दिली. मी एकंदर पाच तिकीटे घेतली. त्यातील दोन सुभाष उळागड्डे यांचेसाठी घेतली. सदरची गोष्ट मी विसरूनही गेलो. प्रत्येक तिकीटाची किंमत रू. दोनशे होती. पगार झाल्यानंतर श्री. सी. के. पाटील, यांना एक हजार रूपये देऊन विषय संपवला. तो दिवस होता

गुरुपौर्णिमेचा. सन ७/२००३ सकाळी मी पेपर वाचत असताना मला सांगली जवळच्या खेडेगावातील गुरूंना एका त्याच्या शिष्याने गुरुपौर्णिमेनिमित्त टाटा सुमो गाडी घेऊन दिली होती, असे दिसून आले. मला हसूही आले आणि विस्मयही वाटले. नवीन महाराजांना त्यांचा शिष्यवर्ग टाटा सुमो घेऊन देतो परंतु इतकी वर्षे माझ्या बरोबर असणाऱ्या माझ्या माणसांनी मला सायकलही घेऊन दिली नव्हती. म्हणून मी चेष्टेने ॲड. आप्पासाहेब कुडचेंना फोन करून ही बातमी वाचण्यास सांगितली. यावर थोडयाच वेळात त्यांचाही फोन आला. तुम्हालाही गाडी हवी असेल तर आम्ही घेऊन देतो यावर मी त्यांना तुमची चेष्टा केली, असे सांगून विषय टाळला.

नेहमी प्रमाणे गुरुपौर्णिमेदिवशी मी, सर्वश्री चंदर कुरणे, ॲड. आप्पा कुडचे श्रीक्षेत्र नृसिंहवाडी, श्रीदत्त मठी कोल्हापूर, श्रीक्षेत्र आदमापूर करून अक्कोळला जाऊन श्रीरमेश महाराजांचे दर्शन घेऊन रात्री म्हैसाळला परतलो. जेवण करून झोपणार इतक्यात श्री. सी. के. पाटील यांचा समडोळीहून फोन आला. फोनवर मला एक आनंदाची बातमी दिली. ती बातमी म्हणजे त्यांच्या गावातील गर्ल्स हायस्कूलच्या मदतीसाठी जी बंपर लॉटरी सोडत काढली होती. त्यातील पहिल्या क्रमांकाचे बक्षीस मारुती मोटर व्हॅन मी सुभाष उळागड्डे यांच्यासाठी काढलेल्या तिकीटासाठी लागले होते. हा प्रसंग मला सुखद धक्का देऊन गेला. मी सकाळीच ॲड. आप्पा कुडचे यांच्याजवळ चेष्टेने व्यक्त केलेली गाडीची इच्छा आजच्या प्रसंगाने श्रीदत्त महाराजांच्या कृपेने, श्रीसाईबाबांच्या कृपेने सत्य होऊ पाहत होती.

दुसऱ्या दिवशी स्व. सुभाष उळागड्डेच्या कानावर ही बातमी घातली. त्यांनाही खूप आनंद झाला. माझ्यावर वारंवार कर्जाचा बोजा वाढत होता. अशा परिस्थितीत गाडी वापरणे योग्य नव्हते. तसेच गाडीचा खर्चही मला परवडणारा नव्हता. ती मारुती व्हॅन गाडी विकून मला येणारी रक्कम कर्ज फेडण्यासाठी द्या, अशी विनंती मी स्व. सुभाष उळागड्डे यांना केली. ती त्यांनी मान्य करून अडीच ते तीन लाख रूपये मला दिले, त्या विषयी मी कृतज्ञ राहीन. अशा प्रकारे माझे कर्ज फेडण्यासाठी श्रीदत्त महाराजांनी व श्रीसाईबाबांनी मारुती व्हॅन मला व सुभाषला लॉटरीत देऊन कर्ज फडण्याची सोय केली. हे

कलियुगात शक्य आहे का? परंतु त्यांच्या कृपेने हे शक्य झाले. डोक्यावरचे कर्ज खांद्यावर आले.

दुसरा अनुभव असा की श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज मठीतील मातोश्री माईसाहेब शिर्के यांच्या नावे एक सार्वजनिक ट्रस्ट स्थापन करण्यात आला होता. मातोश्री माईसाहेब शिर्के यांनी दि. ४/२/१९९४ रोजी देह ठेवला. त्यानंतर त्या ट्रस्टची व्यवस्था चालविणे, हिशेब सादर करणे हे वयोमानामुळे ट्रस्टींना जमेना. म्हणून तो ट्रस्ट आमच्या श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज मठी, विजयनगर (म्हैसाळ स्टेशन) मध्ये विलीन करून घेण्याची विनंती स्व. माईसाहेब शिर्के यांचे जावई श्री. मधुकर नाईक यांनी आम्हांला केली. दि. ३१/७/२००० मातोश्री माईसाहेब शिर्के सार्वजनिक ट्रस्ट आमच्या ट्रस्टमध्ये कायदेशीर बाबी पूर्ण करून विलीन झाला. त्या ट्रस्टच्या नावे असलेली दोन ते तीन लाख रूपये मला मिळाले. अशा प्रकारे अप्रत्यक्षपणे श्रीदत्त महाराजांनी माझे कर्ज फेडण्यासाठी एवढी मोठी रक्कम पाठविली होती, ही वस्तुस्थिती आहे. ही त्यांची परमकृपा आहे. या रकमेने माझे कर्ज आता संपले होते.

मला आठवते की, सन १९६९-७० पासून मी श्रीनृसिंहवाडीला श्रीदत्त दर्शनासाठी जात असे. आज ज्या ठिकाणी पार्किंगची सोय केली आहे तेथे चिंचेचे बन होते. बरीच चिंचेची झाडे तेथे होती. त्या चिंचेच्या बनात एक पत्र्याचे बसस्थानकाचे शेड होते. दत्त जयंती सोडली तर इतर वेळी भक्तांची माणसांची वर्दळ तशी कमी होती. पौर्णिमेला मात्र तेथे बऱ्यापैकी गर्दी असे. श्रीदत्तात्रेयांच्या मनोहररूपी पादुकांचे निवांतपणे दर्शन होई. गडबड-घाई गर्दी नसायची. एक प्रकारची नीरव शांतता, प्रसन्नता असायची.

वडील-आजी ही सर्व मंडळी वारकरी असलेने ते कधीतरी श्रीक्षेत्र पंढरपूरला जात. वडील त्यांचे मित्र भिमसिंग रजपूत, पुंडलिक सिंग रजपूत, बाबूसिंग रजपूत यांच्या बरोबर नेहमी श्रीक्षेत्र पांडुरंगाच्या दर्शनाला पंढरपूरला जात. माझे थोरले बंधू वसंतराव हे कृष्णाघाट-अर्जुनवाड-शिरोळ मार्गे नृसिंहवाडीला सायकलवरून नियमित जात.

सन १९७४-७५ पासून मी श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज मठीत कोल्हापूरला नियमितपणे दर्शनाला जाऊ लागलो. मी व श्री. चंदर कुरणे मोटर

सायकलने (रॉयल इनफिल्ड एम.एच.एम. ६३६) नृसिंहवाडी व कोल्हापूर न चुकता दर्शनाला जाऊ लागलो. तसेच श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे गुरुस्थान श्रीक्षेत्र अक्कलकोट असल्याने मला जमेल तेव्हा सुट्टीच्या दिवशी अक्कलकोटला जात असे. आठवत नाही, परंतु श्री. रमेश कुलकर्णी (अक्कोळकर) यांच्या परिचयानंतर लवकरच श्रीक्षेत्र मुरगोडच्या श्रीशिवचिदंबर महास्वामींच्या समाधी दर्शनाला व श्रीक्षेत्र बाळेकुंद्रीला श्रीपंत महाराज बाळेकुंद्रीच्या समाधी दर्शनाला जाऊ लागलो.

श्रीरमेश महाराजांनी मला काय शिकवलं? मला काय दिलं? यापेक्षा मला योग्य वेळी योग्य मार्गदर्शन केलंच. शिवाय या दोन थोर सत्पुरुषांचा आशीर्वाद प्राप्त करून दिला, छाया प्राप्त करून दिली. माझ्या अनेक जन्माची पूर्व पुण्याई उदयास आणली व जन्मोजन्मीचा अनमोल ठेवा मिळवून दिला हे माझे परमभाग्य समजतो.

श्रीक्षेत्र मुरगोड हे बेळगावपासून ४०-४५ कि.मी. अंतरावर आहे. बेळगाव-बागलकोट महामार्गावर कतरी फाट्यापर्यंतजावे लागते. कतरी फाट्यापासून बैलहोंगल रस्त्याला श्रीक्षेत्र मुरगोड आहे. येथे श्रीचिदंबर स्वामींची समाधी आहे. या मुरगोड मधील भागाला-वस्तीला श्रीक्षेत्र केंगरी म्हणतात. श्रीशिवचिदंबर स्वामींच्या मंदिरासमोर जुनाट असा प्रचंड आकाराचा पिंपळवृक्ष आहे. पिंपळवृक्षाच्या पाठीमागे श्रीशिवचिदंबर स्वामींचे समाधी मंदिर आहे. श्रीमंदिराच्या डाव्या बाजूला ज्या ठिकाणी श्रीशिवचिदंबर स्वामींना मंत्राग्नी दिला त्या ठिकाणी मंत्राग्नीच्या तिसऱ्या दिवशी रक्षेतून उगम पावलेला एक सुंदर औदुंबर वृक्ष आहे. तर उजव्या बाजूला श्रीराम मंदिर, श्रीविष्णूपंचायतन मंदिरे, संस्कृत पाठशाळा, भोजनगृह, मंदिराच्या पाठीमागे छोटेसे पाण्याचे तळे असून, समोर उंच अशा डोंगर टेकड्या आहेत.

पिंपळवृक्षाखाली श्रीदत्ताच्या पादुका, जवळच डाव्या बाजूला मंडप आहे. श्रीक्षेत्र मुरगोडला पहिल्यांदाच मी रमेश महाराजांच्या आईसाहेब यांच्याबरोबर दर्शनाला गेलो. कतरी फाट्यापर्यंत एस.टी.ने आलो आणि छोट्या झटका टांग्यातून मुरगोडला पोहोचलो. पुढे बारा वर्षे पौर्णिमा ते पंचमी पर्यंत या

क्षेत्री येऊन श्रीचिदंबर स्वामींच्या समाधीचे दर्शन घेतले. त्यावेळी माझी आर्थिक स्थिती बिकट होती. नोकरीवर उपजीविका होती. पण श्रीस्वामींच्यावर असलेली दृढ श्रद्धा होती. कालांतराने मला आईंच्याकडून या श्रीशिवचिदंबर महास्वामींच्या अवताराची माहिती होत चालली होती.

भारतभूमी ही जशी पुण्यभूमी आहे, तशी ती पूर्णावतारी पुरुष प्रसविनीही आहे. तिच्या उदरी संत-महंत, ऋषि-मुनी, ज्ञानी पुरुष यांचा जन्म झाला. तद्वत शिवअवतारी श्रीशिवचिदंबर दीक्षीत हे या मुरगोड क्षेत्री दिव्य पुरुष दिव्य अवतार धारण करणारे होते. त्यांचा जन्म श्रीक्षेत्र मुरगोड (ता. बैलहोंगल जि. बेळगाव) कार्तिक वद्य षष्ठी सोमवार शके १६८० (इ.स. २०/११/१७५८) चंपाषष्ठी रोजी झाला. या मुरगोडचे नाव **अमरकल्याण** आहे. श्रीशिवचिदंबर महास्वामींच्या रूपाने या भूतलावर शिवानेच अवतार घेतला होता. त्यांच्या वडिलांचे नाव श्रीमार्तंडशास्त्री दीक्षित तर आईचे नाव श्रीलक्ष्मीमाता असे होते. या पुण्यवान दांपत्याने श्रीमुरगोड पासून पाच मैलावर असलेल्या श्रीक्षेत्र सोगल येथील श्रीसोमनाथ मंदिर, श्रीक्षेत्र देवर हिप्परगी येथील मार्तंडभैरव-मल्हारी तसेच आकाश चिदंबर येथे घोर तपश्चर्या करून श्रीशंकराला प्रसन्न करून घेतले. भगवान शंकर त्यांना प्रसन्न होऊन श्रीलक्ष्मीमातेच्या पोटी शिवचिदंबर रूपाने जन्म घेतला. जन्मताच त्यांच्या उजव्या कानावर बेलाची पाने, शुभ्र अक्षता, तर डाव्या कानावर तुळशीची पाने, मंजिऱ्या दिसून आल्या. श्रीचिदंबर महास्वामी म्हणजे प्रत्यक्ष शिवअवतारच होय. श्रीवासुदेवानंद सरस्वती महाराज (टेंबे स्वामी) यांनीही त्यांच्यावर श्लोक रचना केली आहे.

**शिव, स्वयं भूमितलेवतीर्णं।**
**चिदंबरार व्यो भुटि दीक्षिते यः॥**

तर अक्कलकोटचे स्वामी समर्थ म्हणत चिदंबर दीक्षितांच्या यज्ञात मी तूप वाढायला होतो. लोकांना सदाचार, सधर्म, ईश्वरभक्तीचा महिमा, भजन, कीर्तन, अन्नसंतर्पण, दिलासा, दिव्यबुद्धी, अद्वैतवाद, ईशभक्तीचे तत्त्वज्ञान रुजवून आपला अवतार पौष शुद्ध चतुर्थी शके १७३७, दि. ३/१/१८१६ रोजी समाप्त केला.

लोकांना स्वधर्म, सदाचार, श्रद्धा, भक्ती यांची जाणीव करून देण्यासाठी

त्यांनी कधी कधी चमत्कार करून भक्तांना भक्ती मार्गाला लावून मानवी जीवन सुखी केले, आनंदी केले. श्रीरामपूरपासून २५–३० कि.मी. अंतरावर बाभूळगाव-गंगा येथे श्रीचिदंबर स्वामींचे भव्य मंदिर आहे. त्यांचे पट्टशिष्य श्रीदास राजारामांनी मोठ्या प्रमाणात अभंग रचनाही केली आहे. त्यांना संत तुकारामांचे अवतार मानले आहे.

बारा वर्षे पौर्णिमा ते पंचमी या काळात जसा श्रीक्षेत्र मुरगोडला श्रीचिदंबर स्वामीजींच्या दर्शनाला जात होतो. तसा मी बाळेकुंद्रीला दत्त दर्शनाला जात होतो. श्रीपंतमहाराज बाळेकुंद्रीकर यांचा दत्त अवतार होता. प्रपंच व परमार्थाचा समन्वय साधून समाजाला परमार्थाचा, सदाचाराचा, नीतीचा मार्ग त्यांनी दाखवला. त्यांचे पूर्ण नाव श्री. दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी, त्यांचे मूळ घराणे बाळेकुंद्री. येथील कुलकर्णी वतनापैकी त्याच बाळेकुंद्रीला आता श्रीक्षेत्र पंतबाळेकुंद्री असे नाव आहे. श्रीपंत महाराजांचा जन्म श्रावण वद्य अष्टमी, रोहिणी नक्षत्र, दिवसाचा तिसरा प्रहर, वार सोमवार, इंग्रजी दिनांक ३/९/१८५५ रोजी झाला. मातोश्रींचे नाव गोदाक्का/सितामाई होते. श्रीपंत महाराजांचा जन्म त्यांचे आजोळ दड्डी येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण त्यांचे मामा श्रीपादपंत कुलकर्णी दड्डीकर यांचेकडे झाले. त्यांचे मावसभाऊ गणू मरिहाळकर, हणमू दड्डीकर यांच्या बरोबर शिक्षणासाठी दड्डी येथे होते.

दड्डी येथील त्यांच्या आजोळी व त्यांच्या पंत बाळेकुंद्रीकर कुलकर्णी या दोन्ही घराण्यात फार पुरातन काळापासून दत्तभक्ती चालत होती. दड्डी व श्रीपंत बाळेकुंद्रीकर कुलकर्णी ही दोन्ही घराणी सात्त्विक, सत्त्वशील, धर्मपरायण अशी होती. वैशिष्ट्य म्हणजे या दोन्ही घराण्याकडे एका दत्तावधूतांचे येणे-जाणे होते, आशीर्वाद होता. या दत्तावधूतांचे नाव होते श्री. बालाजी अनंत कुलकर्णी उर्फ बाळाप्पा. ते पार्श्ववाड (जि. बेळगाव) येथील वतनदार कुलकर्णी होते. त्यांची सांपत्तिक परिस्थिती उत्तम होती. त्यांनी प्रपंचही केला. त्यांना गोपाळप्पा, रंगप्पा, तुंगव्वा अशी तीन अपत्ये होती. पूर्वभाग्याने त्यांना संसाराचा वीट आला. त्यांनी सर्व कर्मकांडांचा, कर्मठपणाचा त्याग करून ते साधू-संतांच्या दर्शनासाठी कुलकर्णी पदाचा त्याग करून गुरूशोधार्थ रानावनात हिंडू लागले. भटकू लागले. घोर तपश्चर्या, खडतर योगसाधना, परिणामी त्यांच्यावर

श्रीरामावधूतांची कृपा होऊन अनुग्रह झाला. श्रीरामावधूतांवर श्रीभगवान दत्तात्रेयांचा अनुग्रह झाला होता. पार्श्ववाड जवळच असलेल्या कबरीबनात त्यांना मडवळाप्पा, नागलिंगाप्पा अशा अनेक योग्यांच्या मार्गदर्शनाखाली साधना करण्याचा योग आला. योग साधनेत ते उच्चस्थितीला आणि पूर्णावस्थेला पोहोचले. त्यांचे पूर्ण अवधूत स्थितीत रूपांतर झाले. ते सिद्ध पुरुष ठरले.

वाढलेल्या जटा, अंगावर फाटकी वस्त्रे, लांब दाढी-मिशा, पाप-पुण्यापासून दूर अशा आत्मानंदात रमलेल्या तपस्वी असलेल्या बाळाजी अनंत कुलकर्णीला लोक वेडा म्हणू लागले. हुच्च बाळाप्पा म्हणू लागले. हुच्च या कानडी शब्दांचा अर्थच वेडा. हा हुच्च बाळाप्पा गावोगावी भटकू लागला. बाळेकुंद्रीजवळ कर्देगड्डी गाव आणि त्याच्या शेजारच्या डोंगरात ते वस्ती करू लागले. तेथील बेरड, धनगर लोक त्यांचे शिष्य बनले. अधून-मधून ते बाळेकुंद्रीला भिक्षेसाठी श्रीपंतमहाराजांच्या वाड्यावर जात. वाड्याच्या कट्ट्यावर मुक्काम करीत तर कधी समोरच्या श्रीरामेश्वरच्या मंदिरात मुक्काम करीत. ते बेळगाव, दड्डी व त्या परिसराच्या खेड्यात फिरत असत. त्यांनी जरी सगळे पाश तोडले असले तरी भक्तांत मात्र रमत असत. आता त्यांनी अवधूत संप्रदायाच्या पेरणीला सुरवात केली होती. त्यांचे तसे सर्वदूर नावही झाले होते. हातात एकतारी, गबाळा वेष, काखेला झोळी, अंगभर भस्म पण आनंद आणि स्वच्छंदीपणात ते सर्वत्र विहार करीत. बाळेकुंद्री व दड्डी येथील दोन्ही घराण्यातील लोक हुच्च बाळाप्पाला मानत होते. परंतु त्यांच्या वेडेपणाच्या बाह्य स्वरूपाने श्रीपंत महाराज त्यांना मानत नव्हते. त्यांच्यावर श्रद्धा नव्हती. उलट श्रीपंत महाराज हुच्च बाळाप्पाची टर उडवायचे. पण हुच्च बाळाप्पाची क्षमाशीलता, प्रेमळपणा. वात्सल्य आणि अनेक जन्मांचा ऋणानुबंध असलेने टर उडविणाऱ्या या दत्तूला आश्विन वद्य द्वादशी-गुरुद्वादशीला अनुग्रह देऊन अवधूत पंथाची दिशा देऊन, जीव-शिव एक करून, अनुभव देऊन अधिकार दिला. सन १८७५ वयाच्या विसाव्या वर्षी दत्तूला हा विधीवत अनुग्रह देऊन, कृपा करून गृहस्थाश्रम पत्करून अवधूत संप्रदाय चालविण्याचा अधिकार देऊन आपला उत्तराधिकारी नेमला.

सन १८७७ साली श्रीपंत महाराज पब्लिक सर्व्हीस परीक्षा उत्तीर्ण

झाले व लंडन मिशन स्कूल बेळगाव येथे शिक्षकाची नोकरी करू लागले. खडतर कष्ट, आत्यंतिक प्रेमळपणा, या गुणांनीयुक्त बाळेकुंद्री घराण्याचे, अवधूत संप्रदायाचे मोठ्या ममतेने पालन केले. सर्व सहोदर, आप्त गुरुबंधू, भक्त परिवार यांच्यासाठी असीम कष्ट व दु:ख सहन करून, स्थितप्रज्ञ राहून गुरुसेवेत राहिले. प्रपंच सांभाळून हे सारे केले.

श्रीपंतमहाराजांनी श्रीदत्त प्रेम लहरीमधून २७५७ इतकी पदे लिहिली. त्यापैकी २७३० पदे मराठी भाषेत असून, २७ पदे कानडी भाषेत आहेत. या पदातून त्यांनी प्रामुख्याने गुरुभक्ती, आत्मानुभव, अवधूत रूपाचे दर्शन वर्णीलेले आहे. आपले गुरू हुच्च बाळाप्पा यांना सुंदर असे बालमुकुंद बालावधूत असे नाव देऊन त्यांची स्तुती, सद्‌गुरुची कृपा, अवधूत संप्रदाय, आत्मानुभव, चिद्विलास, नामस्मरण, योग साधना, दत्तभक्ती याही विषयाचा समावेश श्रीदत्त प्रेमलहरीत आहे.

श्रीपंत महाराजांनी आपल्या भक्तांना शिष्य मंडळींला केलेला उपदेश पराग क्रमांक ७-८ भक्तालाप, श्रींची पत्रे, प्रेमतरंग, बोधानंदगुटिका, आत्मज्योती, अनुभववल्ली, ब्रह्मोपदेश, भक्तोद्‌गार (प्रेम भट) भगवद्‌गीतासार, पद्मानुभव, प्रकाश व इतरक स्फूट लेखनही मोठ्या प्रमाणात केले आहे. श्रीपंत महाराज यांचा हा भजन संप्रदाय, दत्तसंप्रदाय, अवधूत संप्रदाय, सर्व महाराष्ट्र, सर्व कर्नाटकसह देश-विदेशात पसरला आहे. सद्‌गुरु भक्ती, बंधुप्रीती, आत्मशांती ही शिकवण त्यांनी आपल्या पद्यरचनेतून जीवन जगत आणि परमेश्वर ऐक्य हे सारे सोप्या भाषेत विशद केले आहे. अशा प्रेमावतारी श्रीपंतमहाराज बाळेकुंद्रीकरांनी सोमवार दि. १६ आक्टोबर १९०५ रोजी अवतार लीला समाप्त केली.

सन १९८० साली श्रीपंत महाराज बाळेकुंद्रीकर यांचा अमृतमहोत्सव (७५ वर्षे) श्रीदत्त संस्थान, श्रीक्षेत्र पंत बाळेकुंद्री व भक्तांनी अखंड परिश्रम घेऊन अतिशय संपन्नपणे साजरा केला. सर्वश्री आण्णासाहेब बाळेकुंद्रीकर, आप्पासाहेब पंत बाळेकुंद्रीकर, दादासाहेब पंत बाळेकुंद्रीकर, सुरेशपंत बाळेकुंद्रीकर या सर्वांचे काटेकोर नियोजन, शिस्त यामुळे त्या वर्षीचा पालखी सोहळा, उत्सव, महाप्रसाद अविस्मरणीय ठरला.

हा अमृतमहोत्सव मला पूर्वभाग्याने बघायला मिळाला. सन २००५ च्या श्रीपंत पुण्यतिथी शताब्दी सोहळ्याची तयारी सन २००४ च्या मार्च महिन्यापासून सुरू झाली होती. कोल्हापूर येथे सर्व पंत भक्तांची एक सभा, मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला. श्री. रजतमुद्रा (चांदीची नाणी) श्रीपंत पादुका-परिक्रमा व २००४ चा सोहळा यावरंही सविस्तर चर्चा करण्यात आली. २००५ ला श्रीपंत पुण्यतिथी शताब्दी सोहळा यावरही सविस्तर चर्चा करण्यात येऊन श्रीपंत वाङमय प्रसाद, अवधूतमार्ग प्रसाद, समाज प्रबोधन, भजन परंपरा प्रवचने, कीर्तन, श्रीक्षेत्र सुधारणा, महिला व युवा कल्याण, जप व मेळावे आदी विषयाबाबत उत्कृष्ट प्रकारे नियोजन करण्यात आले. आक्टोबर २००४ ते आक्टोबर २००५ या कालावधीत श्रीपंत पुण्यतिथी शताब्दी सोहळा यावरही चर्चा करण्यात येऊन श्रीपंत वाङ्मय प्रसाद, अवधूतमार्ग प्रसाद, समाज प्रबोधन, भजन परंपरा, प्रवचन किर्तन, श्रीक्षेत्र सुधारणा, महिला व युवा कल्याण जप व मेळावे आदी विषयाबाबत नियोजन करण्यात आले. दि.१८/१०/२००५ ते २१/१०/२००५ ते या कालावधीत श्रीपंत पुण्यतिथी शताब्दी महोत्सव फार मोठ्या प्रमाणात श्रीक्षेत्र पंत महाराज बाळेकुंद्री येथे झाला. शेवटच्या दिवशी सुमारे दोन लाख लोकांनी महाप्रसाद ग्रहण केला. सर्वांना शिस्तबद्धपणे दर्शन व महाप्रसाद मिळाला. जन्मला येऊन श्रीपंत समाधी शताब्दी महोत्सवाच्या पालखीचे दर्शन झाले. सेवा करण्याची संधी मिळाली हे माझे पूर्वभाग्यच होय. पुढे वर्षभर श्रीपंत महाराज समाधी शताब्दी महोत्सवाची आठवण काढत काढत वर्ष कसे संपले हे कळालेच नाही. आमच्या भागात श्रीपंत पादुका परिक्रमेला श्री. वसंतराव जाधव व अन्य सेवेकऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले होते.

सन २००५ मध्ये माझी बदली तासगाव उपविभागाकडे झाली. सांगलीत विभागीय कार्यालय व मंडळ कार्यालयात मी बरेच वर्षे काढली होती. श्री. जी.आर. कुलकर्णी, श्री. ए. वाय मेश्राम, श्री. एस. ए. देशमाने, यांच्या हाताखाली मी कार्यरत होतो. श्री. सी. के. पाटील, श्री. मारुती आलदर, श्री. तम्मा शिष्टे, श्री. राजाभाऊ डोंगरे, श्री. मदन बोंगाळे, श्री. विनायक मेटकरी, श्री. बबन पडोळकर, श्री. विवेक खेडेकर, श्री. दीपक लेले, श्री. बापू

माणगावकर, श्री. महादेव देवरुखकर, श्री. पांडुरंग गोंधळे, श्री. लिमकर अशा असंख्य जिवाभावाच्या मित्रात माझी नोकरीची वर्षे कशी आणि कधी गेली हे समजलेच नाही.

तासगाव उपविभागात श्री. एम.व्ही. मेटकरी, श्री. आर.व्ही. पाटील हे अधिकारी व श्री. आर. आर. गडकर, श्री. हणमंत कांबळे, श्री. आर. एस.पाटील, श्री. अनिल घाईल, श्री. रामभाऊ सपाटे, श्री. अशोक अमृतसागर, श्री. कुंभार, श्री.. मुजावर, श्री. ए.बी. कारंजी, श्री. सुशांत कुलकर्णी, श्री. आर. जी. पाटील, श्री. मराठे यांच्या सर्वांच्या मैत्रीपूर्ण जिवाभावाच्या संबंधाने माझे तासगाव उपविभागातील दिवस आनंदात, हसत खेळत जात होते.

जुले २००५ सालात कृष्णेला आलेल्या महापुराने अतिवृष्टीने सर्वसामान्यांचे जीवन उद्धवस्त झाले. सांगलीत आलेल्या कृष्णेच्या पुराने सांगलीचा संपर्क तुटला. वखारभाग, गावभाग, कर्नाळ रोड, बायपास रोड, आंबराई हा सर्व भाग पाण्यात गेला. सूर्यवंशी दादांच्या घरी असलेले श्रीदत्त मंदिर पाच फूट पाण्यात राहिले. त्यामुळे या भागातील बऱ्याच नागरिकांना मी त्वरित म्हैसाळ स्टेशनच्या दत्त मठीत हलवून त्यांच्या जेवणाची राहण्याची सोय केली. तसेच मिरज येथील कृष्णाघाटावरील स्वामी समर्थ मंदिरातही थोडे पाणी शिरल्याने, रस्त्यावर १० ते १५ फूट पाणी आल्याने तिथल्याही काही लोकांची सोय म्हैसाळ स्टेशनच्या दत्त मठीत केली. यावेळी रेल्वे पुलाच्या अलीकडे रस्त्यावरचे पाणी मिरज म्हैसाळ रस्ता येथे आले आणि कर्नाटकाकडे जाणारा रस्ता बंद झाला. मिरज-कोल्हापूर-सांगली-कोल्हापूर रस्ताही बंद झाला. या महापुराने सर्वत्र हाहाकार माजला.

हा महापूर ओसरण्यास पंधरा दिवस लागले. १९१४ नंतरचा हा सर्वात मोठा महापूर होता. सन २००६, २००७ चे महापूर सन २००५ च्या मानाने कमी होते. आता महापुराच्या गोष्टी विस्मृतीत जात आहेत.

दरवर्षी मी शक्यतो श्रीस्वामी समर्थांच्या समाधी दर्शनाला श्रीक्षेत्र अक्कलकोटला जात असे. सन २००७ च्या श्रीक्षेत्र अक्कलकोट दर्शनाच्या वेळी श्री. बाळकृष्ण महादेव गोखले साहेबांच्या बरोबर श्री. ह.भ.प. श्री. दामोदर काशिनाथ थावरे यांच्या घरी मुक्काम केला होता. ह.भ.प. श्री. दा.का.

थावरे हे श्रीज्ञानेश्वर महाराजांचे शिष्य श्रीसंत सच्चिदानंदबाबा यांच्या घराण्यातील तेवीसावे वंशज. श्रीक्षेत्र नेवासा येथे श्रीज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी सांगितली ती श्रीसच्चिदानंद बाबांनी लेखनिक होऊन उतरून घेतली. श्री. थावरेभाऊ हे संत कुळीत जन्मलेले अधिकारी सत्पुरुष ते महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्यात उपनिबंधक पदावर (वर्ग-२) कार्यरत होते. श्री. गोखले साहेबांच्यामुळेच माझा आणि श्री. थावरे भाऊंचा परिचय झाला. श्री. थावरे भाऊ सोलापूरातील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या बँक कॉलनीत त्यांच्या मुलाकडे वास्तव्याला होते. प्रवचनाच्या निमित्ताने भाऊंची रोजची फिरती असायची आणि ती संपूर्ण महाराष्ट्रभर असायची. विशेषत: मराठवाडयातील अनेक संत, सत्पुरुषांची ऊठबैस, बैठक भाऊंच्या घरी असे. त्यामुळे त्यांचे घर हे संताचे माहेरघरच बनले होते. श्री. भाऊंची मंडळी, श्री. माळी आदी मंडळी घरी येणाऱ्यांची बडदास्त ठेवत असत. संपूर्ण महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाला श्री. भाऊंविषयी आदर, प्रेम, आपुलकी वाटत असे. बऱ्याच अप्रकाशित संतांची चरित्रे भाऊंनी आपल्या सोलापूरातील श्रीसंत मंडळाच्या सहाय्याने प्रकाशित केली होती. श्री. भाऊंना श्रीज्ञानेश्वरी मुखोद्गत आहे. संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज यांचा जन्म माघ शुद्ध ५ शके १५३० (इ. स. १६०८) रोजी देहू येथे झाला. माघ शुद्ध ५ दि. १२/२/२००८ रोजी श्रीतुकाराम महाराजांना जन्माला येऊन ३९९ वर्षे पूर्ण होऊन ४०० वर्षे लागणार होते. त्यांचा ४०० व्या जन्म शताब्दी जयंतीचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर करण्याची प्रेरणा मला श्री. थावरे भाऊंनी दिली आणि मी त्या कार्यक्रमाच्या नियोजनाच्या मागे लागलो.

सोमवार दि. २५/२/२००८ ते मंगळवार दि. ४/३/२००८ या कालावधीत श्रीजगद्गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या चतु:शताब्दी (४०० व्या) जयंतीचा कार्यक्रम विजयनगर (म्हैसाळ स्टेशन) येथे साजरा करण्याचे ठरले. सदरची ४०० वी जयंतीचा कार्यक्रम ह.भ.प. श्री. दा. थावरे भाऊ, सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत मोठ्या थाटात वैभवशालीरीत्या संपन्न झाला.

सोमवार दि. २५/२/२००८ रोजी या कार्यक्रमाची सुरवात मिरजेतील श्रीदत्त मठीतून खालील मान्यवरांच्या अमृत हस्ते प्रारंभ झाला. प. पू. रमेश

महाराज कुलकर्णी, ह. भ. प. श्री. विश्वेश बोडस, श्री. प्रदीपपंत बाळेकुंद्रीकर, ह. भ. प. श्री. रमाकांत बोंगाळे, प.पू. गुरुमहंत श्रीपट्टदेवरु शिवयोगी महाराज, प.पू. चंद्रशेखर केळकर महाराज, प.पू. श्री. गुरुनाथ कोटणीस महाराज, ह.भ.प. सुभाष महाराज कुंभार, श्री. गणेश गाडगीळ, डॉ. भूपटकर, श्री. किशोर जामदार, ह.भ.प. श्री. बापूसाहेब पुजारी, ह.भ.प.श्री.जगन्नाथ म्हस्के (बापू), डॉ. श्री. जयसिंगराव शिंदे (म्हैसाळकर), हणमंतराव शिंदे (म्हैसाळकर) श्री. विश्वास आण्णा गवळी, ह. भ. प. श्री. चंद्रकांत कुंभार, ह. भ. प. भोसलेबुवा, ह. भ. प. डॉ. शरद गद्रे या मान्यवरांची उपस्थिती कार्यक्रमाला शोभा आणणारी होती.

मिरजेतील मुख्य रस्त्यावरून श्रीसंतश्रेष्ठ जगद्‌गुरु तुकाराम महाराजांच्या प्रतिमेची व पालखीची भव्य शोभायात्रा काढण्यात आली. हजारो भाविकांनी या शोभायात्रेत,दिंडीत भाग घेतला. शोभायात्रा म्हैसाळ स्टेशनवरच्या दत्त मठीत आली. श्रीसंत तुकाराम महाराज अभंगगाथा पारायणात सुमारे हजार बाराशे लोकांनी वाचक म्हणून भाग घेतला. यासाठी भव्य मंडप उभा करणेत आला होता. ह.भ.प. श्री. ज्ञानेश्वर खाडे, बेडग व ह. भ. प. श्री.हिरालाल परदेशी सोनी, ह. भ. प. विठ्ठलराव सूर्यवंशी, श्री. मारुती साळे, भोसलेबुवा यांनी मुख्य वाचक म्हणून काम केले.

डॉ. श्री. श्रीकृष्ण देशमुख मुरगूड, डॉ. श्री. म. बा. जोशी कराड, डॉ. शिवाजीराव भुकेले गडहिंग्लज, डॉ. म. अ. कुलकर्णी कोल्हापूर, ह. भ. प. श्री. चंद्रकांत कुंभार यड्राव, श्री.विनयानंदमहाराज हुपरी, श्री. तुकाराम महाराज येलूर, ह. भ. प. भाऊ थावरे यांची प्रवचन सेवा या कार्यक्रमात झाली तर ह. भ. प. श्री. विठ्ठलराव कोरे (वास्कर) पंढरपूर, श्री. भाऊसाहेब पाटील हसूर, श्री. विश्वेश बोडस मिरज, श्री. पांडुरंग महाराज घुले आळंदी, श्री. बापूसाहेब देहूकर देहू, श्री.संदीपान शिंदे-हसेगावकर, दादा महाराज मनमाडकर यांची कीर्तनसेवा झाली.

तसेच डॉ. अशोक कामत पुणे, डॉ. तारा भवाळकर सांगली, डॉ. श्री. रा. गो. प्रभुणे कराड, डॉ. प्रा. श्री. दादा आवटी जयसिंगपूर, ह. भ. प. श्री. इंद्रजित देशमुख कराड यांची व्याख्याने लोकांना सद्‌गदित करून गेली.

कु. मंगला जोशी सांगली, सौ. मंजुषा कुलकर्णी पुणे, यांची गायनसेवा श्री. धर्मानंदबाबा वळिवडे, श्री. शामराव सुतार, श्री. पंडित चिले कोल्हापूर यांची भजनसेवा तर चंदाताई तिवारी पंढरपूर यांची भारुड सेवा झाली.

मंगळवार दि. ४/३/२००८ रोजी भव्य दिंडी सोहळा, पालखी सोहळा होऊन प.पू. रमेश महाराज कुलकर्णी, श्री. रुद्रपशुपती कोळेकर महाराज, श्री. महेश शिर्के, श्री. संजयपंत बाळेकुंद्रीकर, श्री. आनंदराव शेलार, श्री. युवराज जाधव, स्व. रघुनाथ घोडके, स्व. चंद्रकांत जाधव, स्व. बाबूराव सूर्यवंशी यांच्या अमृतहस्ते तीस ते चाळीस हजार भक्तांना महाप्रसाद वाटप झाले. या कार्यक्रमाला सध्याचे उत्तर प्रदेशचे राज्यपाल श्री. राम नाईक मुंबई हे दि. १/३/२००८ रोजी विशेष अतिथी म्हणून लाभले. या उत्सवासाठी आमचे विश्वस्त व भक्त मंडळी खूपच राबली आणि हा जगद्गुरु तुकाराम महाराजांचा चतु:शताब्दी सोहळा अभूतपूर्व झाला.

जीवनामध्ये एकाच वेळी अनेक भूमिका निभावणे फार अवघड असते. एक प्रकारची कसरतच असते हेच खरे. नोकरीत मला फार सुख लागले, प्रगती झाली असे काहीच नव्हते. नोकरी मला पोटासाठीच करावी लागली. माझे काही लोक मला म्हणत असत, तुमच्या पगाराएवढे व्याज मिळेल इतकी रक्कम आम्ही तुमच्या खात्यात ठेवतो, आता नोकरी सोडा. परंतु ही कल्पना, हा विचार माझ्या बुद्धीला पटणारा नव्हता. या नोकरीमुळे तर माझं घर चालत होतं. उदरनिर्वाह होत होता. या नोकरीमुळेच मला श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या देवमार्गाचा परिचय झाला होता. या नोकरीमुळेच माझं आध्यात्मिक जीवन उजळून निघालं होतं. या नोकरीत भविष्य निर्वाह निधी (प्रा. फंड) मधून पैसे काढायला मिळत होते. याच नोकरीच्या आधारावर मी कर्ज उचलून म्हैसाळ, कृष्णाघाट, मिरज येथे श्रीगुरुदेवांची मंदिरे उभी केली होती. या सगळ्या व्यापात मला म. ना. शेवडेसाहेब, श्री. जी. आर. कुलकर्णी, श्री. अरविंद मेश्राम, श्री. सुभाष देशमाने साहेब, श्री. मधुकर मेटकरी, श्री. आर. व्ही. पाटील या अधिकारी वर्गानी मला सांभाळून घेतले होते. माझ्या कामाचा आवाका मोठा होत होता. मी चोखपणे काम करीत असे. स्व. म. ना. शेवडेसाहेब हे तर माझे अन्नदाते होते.

त्यांनीच मला शासकीय सेवेत घेतले होते. प्रथम शिपाई नंतर क्लार्क व कनिष्ठ लिपिक पदावर असा तो प्रवास होता. मीसुद्धा अत्यंत प्रामाणिक नोकरी केली.

सन २००४ ते २०१० ही वर्षे मला त्रासाची धावपळीची व दु:खकारकच गेली. सन २००४ साली माझी आई श्रीमती लक्ष्मीबाई झेंडे यांच्या मांडीच्या हाडाचे पहिले ऑपरेशन डॉ. किरण प्राणी यांनी यशस्वीरित्या केले. माझी आई मिरजेतील घरात-मठीत वॉकरच्या साहाय्याने फिरत होती. ये-जा करीत होती. मठीत आरतीला येणाऱ्यांची चौकशी करायची. मठीत शिकणाऱ्या मुलांची चौकशी करायची. त्यांच्या जेवणाची, अभ्यासाची, त्यांच्या घरचीही विचारपूस करायची. सुरूवातीच्या काळात माझी बहीण श्रीमती जनाबाई जाधव याच मुलांना जेवण करून वाढत असे. माझी आई वयाच्या ८५ व्या वर्षापर्यंत शेतीवर फेरी मारून येत असे. ती स्वत:च शेती करीत असे.

मला चांगले आठवते माझ्या लहानपणी आमच्या घरची परिस्थिती अतिशय गरीबीची. आम्ही पाच भावंड, आई, वडील, आजोबा, आजी असा आमचा परिवार. आमचं सलूनचं दुकान. वडिलांची तब्येत बरी नसायची पण माझ्या आईने कधी धीर सोडला नाही. दुसऱ्याच्या रानात शेंगा काढायला जाणे, कार जोंधळा काढायला जाणे, मळणी खुडणीला जाणे, ती या शेतीच्या कामासाठी भल्या पहाटे उठून वड्डी करल ते म्हैसाळ हद्दीपर्यंत जात असे. वाटणीला आलेली ज्वारीची कणसं घेऊन रात्रीच्या वेळेपर्यंत ती घरी पोहचत असे. कणसं अंगणात टाकायची, ती वाळवायची, बडवण्यानं बडवून जोंधळे काढायची. तेच जोंधळे पहाटे उठून जात्यावर दळत असे आणि त्याची भाकरी करून जेवण तयार करून पहाटे आपल्या कामासाठी जात असे. भल्या पहाटेच जात्यावरची तिची गाणी आम्ही ऐकत असू.

पंचमीची गाणी तिला खूप येत असत. ती शिकलेली नव्हती पण व्यवहारी आणि दयाळू होती. ती भल्या पहाटे लाकडी काटवटीत हातावरच्या भाकऱ्या करी. सणावाराला मोठ्या पुरण पोळ्या करी. दिवाळीच्या सणात आमच्या गल्लीतील देसाई, बाणदार, कुरणे या मुस्लिम बांधवांच्या घरी दिवाळीचा फराळ सर्वप्रथम जायचा आणि मग आमच्यासाठी. रोजाच्या

महिन्यातील संपूर्ण महीना ती रोजा करीत असे. रोजाच्या काळात भल्या पहाटे उठून स्वयंपाक करून जेवण करून ती रानात कामाला जात असे. सायंकाळी शेतातून परत आल्यावर मिरासाहेबांच्या दर्ग्यात जाऊन दर्शन घेत असे. तेथल्या चिंचेच्या झाडाचा एक पाला खाऊन रोजा सोडत असे. रोजा करायची तसा ती उपवासही करायची. आमच्या परिवारासाठी, गल्लीतल्यांच्यासाठी ती खूपच काम करी. झिजून काम करी, सगळी गल्ली तिला वहिनी म्हणत असे. गल्लीतल्या आया-बायांना ती एक आधार होती. सावली होती.

माझ्या नोकरीतही बदली आणि मंदिराचा वाढता व्याप माझ्याभोवती सदा असला तरी, माझ्या आईला सुख लाभावे म्हणून मी प्रयत्न करीत असे. सन १९९५ मध्ये श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांचे मंदिर झाले. या मंदिरा लगतच श्री. आनंदराव शेलार व मी चर्चा करून आईच्या राहण्यासाठीची सोय केली. माझी आई आणि बहिण या जागेत राहू लागले. सन २००४ साली माझ्या आईचे मांडीचे हाड मोडल्याने मोठी शस्त्रक्रिया करावी लागली आणि तिच्या स्वावलंबनावर मर्यादा आल्या. मठीत-घरात ती वॉकर घेऊन चालू लागली. स्वयंपाक, धुणी-भांडी यासाठी दोन महिलाही नेमल्या. तिची देखभाल या दोन महिला उत्तम रितीने करीत. माझी थोरली बहीण जनाबाई ही तिची सुश्रुषा करीत असे. लहान बहीण भामाबाई ही जाऊन येऊन शक्य तेवढी सेवा करीत असे. अलीकडे आई बसूनच राहू लागली. मी तिची रोज आस्थेपूर्वक चौकशी करीत असे. पण अकस्मात काय झाले हे कळाले नाही. जेवण झाल्यानंतर उठत असताना तिचा तोल गेला आणि पूर्वी ऑपरेशन झालेल्या पायाची मांडी पुन्हा फ्रॅक्चर झाली. जे व्हायला नको होते तेच झाले. तिला डॉ. किरण प्राणींच्या हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मी, माझी माणसं तिच्यासाठी झटू लागलो. डॉ. किरण प्राणींनी केलेले ऑपरेशन यशस्वी झाले. मला वाटत होते आई पुन्हा वॉकरच्या सहाय्याने चालू लागेल, फिरू लागेल. माझी आमच्या सर्वांची मायेने पुन्हा चौकशी करू लागेल, हसत खेळत राहील. पण असे काही झाले नाही. आता फिरणे-चालणे बंद झाले. ती पूर्णवेळ कॉटवर विश्रांती घेत झोपून असे. उठून बसूही शकत नव्हती. आमची साऱ्यांची सेवा चालूच होती. पण तिला आता वेदना सहन होत नसत. आम्हा भावंडाची, इतरांची चौकशी

ती करीत असे, सर्वांशी बोलत असे. पण मला वाटायचे त्या बोलण्यात तिचा जीव राहिला नव्हता. मला दररोज रात्री झोपताना, मोकळा असताना, निवांत असताना आपल्या व वडिलांच्या आठवणीने खूप रडताना दिसे आणि ते पाहून मलाही रडू यायचे. माझे वडील गेल्यापासून मला त्यांची आठवण आईने होऊ दिली नाही. वडील आणि आई या दोन्हीही भूमिका तिने मनापासून, निष्ठेने निभावल्या होत्या. मला अलीकडे काही काही सुनावलेही नव्हते. दुखावले नव्हते. तिच्या कष्टमय जीवनात तिने जे हाल सोसले, भोगले त्या दिवसाची आठवण येऊन माझे अश्रू अनावर होत. निदान आतातरी तिचे हाल होऊ नयेत यासाठी वाटेल ते करायचे हा माझा ठाम निश्चय मी कृतीत आणू पाहत होतो. तिचे हाल होऊ नयेत एवढीच प्रार्थना मी मनोमनी श्रीगुरुदेवांच्या चरणी करीत असे.

तो श्रावण महिना होता. आभाळ ढगांनी भरून गेलेले होते. अंगाला गार वारा झोंबत होता. दि. ११/८/२००६ रोजी रात्री आईला डॉ. म्हेत्रेंच्या दवाखान्यात दाखल करण्यात आले. पहाटे चारच्या सुमारास सर्वांची समाधानाने चौकशी करीत- बोलत-बोलतच आपली आयुष्य यात्रा संपवली. तो दिवस होता ११/८/२००६, श्रावण वद्य द्वितीया. मला काय करायचे- करावे हेच सुचेना. समजेना. सारं स्तब्ध झाल्यासारखे वाटले. डॉ. म्हेत्रे, सूर्यवंशी दादा, देवमानेसाहेब, वड्ड बंधू, सर्वश्री आनंदराव मंडले, शिवाजीराव जाधव, आप्पा झेंडे, रामभाऊ झेंडे, चंदर कुरणे, आप्पा कुडचे, चंदू साळुंखे, मंगल शिंदे, चंदू होमकर, सावंता म्हेत्रे, चंद्रकांत जाधव व अनेक मंडळीं मला धीर देत होती.

माझ्या आईची अंत्ययात्रा निघाली त्यावेळी दहा ते पंधरा हजार लोक उपस्थित होते. त्यावेळी कृष्णा नदीला मोठा महापूर आलेला होता. त्यामुळे नदीवेस, मिरज मार्केट, सराफ कट्टा, शिवाजी पुतळा या मार्गे अंत्ययात्रा मिरज- पंढरपूर रस्त्यावरील स्मशानभूमीकडे नेण्यात आली. तेथे अंत्यसंस्कार करण्यात आले. मोठा पाऊस, महापूर अशाही अवस्थेत आईच्या अंत्ययात्रेसाठी सर्वच थरातील माणसं हजर होती. माणसं हिच माझी आणि आईची कमाई होती.

तिच्या भावंडात ती सर्वात थोरली होती. माझे मामा, मावश्या सर्व नातलगच कर्नाळचे. तिच्या माहेरच्याही शेजारचीही सर्व मंडळी हजर होती.

तिसऱ्या दिवशी माझे थोरले बंधू वसंतराव झेंडे मुंबईहून आले. शेवटचे कार्य सर्वांनी पार पाडले. मला आधार दिला. तसेच श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांची श्रावण वद्य दशमी पुण्यतिथी माझ्या अपरोक्ष चांगल्या रीतीने पार पाडली. या सर्वांचा मी ऋणी आहे.

आईच्या मुत्युनंतर मला एकटेपण आले होते. कशातच मन लागत नव्हते. माझे वडील भिमराव झेंडे यांचे निधन २/७/१९८३ रोजी झाले होते. रमेश महाराज व सांगलीच्या सूर्यवंशी दादांनी मला मुलासारखे सांभाळून आपलेसे केले होते. माझे मन आता मिरजेत लागत नव्हते. तेथे आई राहिली नव्हती. पूर्वी दर मंगळवारी मी सांगलीत मुक्काम करीत असे. आता मी सांगलीतच राहणे पसंत केले. सूर्यवंशी दादा आणि मामी (ढोली आई) यांनी मला आई-वडिलांचे प्रेम, माया दिली. मला आपला मानला, आपलसं केलं, हळूहळू आईच्या धक्यातून मी बाहेर येऊ लागलो. रोज सांगलीतून तासगावला नोकरीवर येणे-जाणे सुरू झाले. मिरजेला मठीत, घरी जाऊन देखरेख करीत होतो. जनाबाईची चौकशी करीत होतो. तिची काळजी घेत होतो. आईच्या मृत्यूनंतर मी घरातील सर्व चिजवस्तू लुटून टाकल्या. जनाबाईच्या पोटापाण्याची-औषधाची व्यवस्था करून मी निवांत झालो होतो. हळूहळू दिवस जात होते. दर आठवड्याला कोल्हापूरला श्रीदर्शनाला जात होतो.

आई वारल्यानंतर मी मिरजेचा मुक्काम हलविला. मिरजेत मन रमत नव्हते. आठवड्यात एकदा श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज समाधी मंदिर, कोल्हापूर आणि श्रीक्षेत्र पंढरपूर, श्रीक्षेत्र तिरुपतीला असा क्षेत्र दर्शन दौरा करू लागलो. पंधरा दिवसाला एकदा अक्कोळला जाऊ लागलो. प.पू. रमेश महाराज, प.पू. आईसाहेब व घरातील मुलांना भेटून मी येत असे. चार समजूतीच्या गोष्टी आईसाहेब सांगत असत. त्यांच्या बोलण्यातून त्यांच्या माहेरच्या देशपांडे घराणे (बेळगाव) व अक्कोळकर कुलकर्णी घराण्यातील सात्त्विक पिढ्यांची माहिती मला समजत असे. कर्नाटक केसरी स्वातंत्र्य सैनिक हणमंतराव देशपांडे आईसाहेबांचे चुलत चुलते होते. तर त्यांच्या माहेरच्या सगळ्याच मंडळींनी देशासाठी सर्वस्वाचा त्याग केला होता. आईनी व काकांनीही स्वातंत्र्य लढ्यात

सहभाग घेऊन तुरुंगवास भोगला होता. माहेरकडून त्यांना श्रीशिव चिदंबर महास्वामीजी व श्रीवासुदेवानंद सरस्वती टेंबे महाराज (श्रीटेंबे स्वामी) या थोर सत् पुरुषांचा आशीर्वाद त्यांना लाभला होता.

तर सासरकडून श्रीपंत महाराज बाळेकुंद्रीकर यांचा आशीर्वाद लाभला होता. त्यांच्या थोरल्या जाऊबाई या श्रीपंत महाराज बाळेकुंद्रीकर यांच्या पुतणी होत्या. श्रीपंत महाराजांचे जाणे-येणे, राहणे, टिपऱ्या खेळणे असे अक्कोळगाव हे त्यांना माहेर वाटे. सन १९८२ साली आईच्या आग्रहावरूनच मी प.पू. रमेश महाराजासोबत श्रीकेदारनाथ, बद्रीनाथ यात्रेला गेलो होतो. त्यांचे सदैव शेगाव संत गजानन महाराज यांच्या पोथी वाचनाचे कार्य चालू असे. त्यांच्या हाती सदैव जपमाळ असे. प.पू. रमेश महाराजांना भेटायला आलेल्या भक्तांना त्यांनी कधी उपाशी पाठवले नाही. घरी लक्ष्मण नसतील तर ते स्वत: स्वयंपाक करून वाढत असत. गोर गरिबांना त्यांचा मदतीचा हात सदैव असे. काकांना दवाखान्यात नेणे, दाखवणे, ॲडमिट करणे, परत अक्कोळला घरी नेऊन सोडणे ही सारी कामे मी आईच्या मार्गदर्शनाखाली करीत असे. त्या स्वभावाने अत्यंत मायाळू, व्यवहारी व धीट होत्या. सन १९९७ च्या सुमारास त्यांच्या गुडघ्यावर मोठी शस्त्रक्रिया झाली होती. तेव्हापासून वॉकर घेऊन घरातल्या घरातच चालत असत. श्रीदत्त जयंती, गुरु पौर्णिमेच्या उत्सवात भाग घेत. श्रीशिव चिदंबरस्वामी, श्रीपंतमहाराज बाळेकुंद्रीकर या थोर अवतारवत् पुरुषांच्या समाधीचे दर्शन मला त्यांनी करवून देऊन माझा आध्यात्मिक पाया पक्का व समृद्ध केला होता. आता त्यांचे वय होत चालले होते. सन १९७४ पासून त्यांच्या जीवन साधनेचे, परोपकारी वृत्तीचे आणि मायास्वरूप आईचे विविध अनुभव मी घेत आलो होतो. त्यांच्या हातचे चार घास मी खाल्ले होते. त्या व काका मला देव अवतारीच वाटत आले. त्यांच्या कृपाशीर्वादाने मला आयुष्यात काही कमी पडले नाही. अशा या आमच्या अक्कोळच्या थोर साध्वी आई वयाच्या ९७ व्या वर्षी सोमवार दि. २१/५/२००७ रोजी देवाघरी गेल्या. प. पू. रमेश महाराज, प. पू. गिरीजा वहिनी यांनी त्यांची खूप सेवा केली होती. आईच्या बोलण्यातून प. पू. गिरीजा वहिनींच्या कर्तबगार स्वभावावर प्रकाश पडे. आईच्या जाण्याने मला दुसरा मोठा धक्का बसला होता. निराश झालो होतो. आता

हळूहळू माझे अक्कोळला जाणं कमी होत चाललं होतं. वरचेवर प. पू. रमेश महाराज यांचे निरोप येत. परंतु माझे मन तिकडे वारंवार जायला तयार होत नसे. आई-काका असतानाचे दिवस आनंदाचे, सुखाचे त्यांच्या आठवणीतच आता सुख मानत पुढे जात होतो.

सन २००७ ला महापूराचा तडाखा बसला होता. सन २००८ कसे तरी संपले. एवढ्यात माझ्यावर दु:खाची आणखी एक कुऱ्हाड कोसळली. सांगलीत जरी मी सूर्यवंशी दादांच्या घरी राहत होतो. त्यांनी मला माझे मुलासारखे पालन पोषण केले. मला उगीचच मामींची म्हणजे ढोले आईंच्या तब्येतीची काळजी वाटत होती. त्यांना मधुमेहाचा, रक्तदाबाचा त्रास होता. पण त्या खंबीर आणि धीट होत्या. अशा अवस्थेत त्यांनी घर चालवले होते. ती सर्वांची खऱ्या अर्थाने ढोली आई होती. सन २००९ चा श्रीदत्त महोत्सव पार पडला आणि आईने अंथरूण घातले. त्यांना किडनीचा त्रास चालू झाला होता. डॉ. पलंगेची औषध सेवा सुरू होती. कालांतराने तब्येत सुधारू लागली. फारसे काळजी कारण नव्हते असे वाटू लागले. केवळ दोन दिवस त्यांना डॉ. पलंगेच्या निदर्शनाखाली दवाखान्यात दाखल करण्यात आले. तब्बेत साथ देत होती, आशा वाढत होत्या.

पण दुर्दैवाने मंगळवार दि. ३/२/२००९ दुर्गाष्टमी दिवशी काळानं त्यांना आपलसं केलं. त्या सर्वांना सोडून गेल्या. घरचे पै-पाहुणे आणि व्यक्तिश: मला मोठा धक्का बसला. त्यांनी कोणाकडूनही थोडीही सेवा घेतली नाही. दादांच्यावर आणि माझ्यावर दु:खाचा आघात झाला. कोण कोणाचे सांत्वन करणार, कोण कोणाला आधार देणार? आधार देणारी आईच, आमची देवमावशी, आमच्या घरातून निघून गेली होती. सौभाग्यवती म्हणून निघून गेली होती. आपलं असं एक खास जीवनाचं वैशिष्ट्यं म्हणून प्रेम, माया हे मागं ठेऊन निघून गेली होती. तिच्या अंत्ययात्रेसाठी सात-आठ हजाराचा जमाव जमला होता. भजन करीत अंत्ययात्रा सांगलीच्या वैकुंठधामात सायंकाळी चार वाजता पोहोचली. पाचच्या सुमारास अंत्ययात्रा आटोपून दु:खी मनाने जड पावलांनी परतलो.

मी बाहेरून आलो की, दादा-आई कॉटवर बसलेले दिसत. पण

आज आई दिसत नव्हती. तिची छाया दिसत नव्हती. सांगली मठीत आता आनंद वाटत नव्हता. आई असताना मठात घरात सारं काही भरलेलं वाटायचं. दादाही आता कॉटवर बसायचे बंद झाले होते. येणाऱ्या जाणाऱ्यांना कॉटवर बसणाऱ्या आई- दादांची सतत आठवण येई. दादा आता घरातच बसत. त्यांच्या चेहऱ्यावर प्रसन्नता नसे. आई गेल्यापासून त्यांचे मन विषण्ण झाले होते. आम्ही त्यांना आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करीत होतो. दर मंगळवारच्या आरतीला दादा अनुपस्थित राहत. त्यांचे मन हल्ली कशातच रमत नसे. कसेतरी श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांची जयंती (माघ वद्य पंचमी) पार पाडली. समर्थांची पुण्यतिथी पार पाडली आणि दादांनी रविवार दि. ३१/ ५/२००९ रोजी बोलत-चालत कोणाचीही सेवा न घेता सकाळी अकरा वाजता देह ठेवला. त्यांचे हार्ट अॅटॅकने अकस्मात निधन झाले. ही वार्ता समजताच मी म्हैसाळमधून सांगलीला धाव घेतली. घरात-मठात हलकल्लोळ होता. त्यांना दवाखान्यात नेईपर्यंत त्यांचे निधन झाले होते.

माझे वडील भिमराव झेंडे लवकरच वारले होते. पण त्यांची उणीव मला सूर्यवंशी दादांनी पुढील आयुष्यात कधीच भासू दिली नव्हती. ऊन-वारा-पाऊस काहीही असो ते मला स्कूटर वरून सांगलीला नेत, आणून सोडत. माझी सगळी काळजी ते घेत. शिवाय माझ्या मनाला कोणत्याही प्रकारचे दु:ख होऊ नये याची ते काळजी घेत. माझ्या तऱ्हेवाईक स्वभावाचा, हेकेखोरपणाचा त्यांना बराच त्रास होई पण तो त्यांनी कधीही स्पष्ट अथवा अस्पष्टपणे व्यक्त केला नाही. माझ्या आनंदासाठी दादा व आई सर्वस्वाचा त्याग करीत. आई गेल्यानंतर आता दादाही गेल्याने मनाला एक प्रकारची खिन्नता आली. विषण्णता दाटू लागली. रोज रात्री त्यांच्या आठवणीने डोळे भरून येत. त्यांच्या आठवणीने असह्य बेचैन होऊ लागलो आणि सांगलीचा मुक्काम म्हैसाळ मठीत करू लागलो.

ढोली आई-दादांची आठवण येतच असे. येतच राहणार आहे. माझ्या निवांत वेळी कधीतरी मला भूतकाळ आठवत असे. मे संपला, जून उजाडला, उन्हाळा संपला. पावसाळा आला. मृग माऊलीच्या धारा बरसू लागल्या. आभाळ ढगानं झाकोळलेले जायचे. अधून मधून ऊन पडे. आकाशात इंद्रधनुष्य,

इंद्रगोप दिसू लागे. हळूहळू मृगाचा गार वारा सुटू लागायचा. जोराच्या वाऱ्यानं झाडं गदगदू लागायची. मग मृगाच्या पावसाचा फेर सुरू व्हायचा.

म्हैसाळच्या शिवारात मी पहिल्यांदा आलो त्यावेळी कुठं कांदा, वांगी, ज्वारी, बाजरी शिवारात असायची. आता त्या शिवारात ही पिकं दिसत नाहीत. अंगणात माळवदावर छप्परावर उगवणारं पोपटी गवत आता दिसत नाही आणि साळुंख्या, चिमण्याही दिसत नाहीत. शिवारातल्या दाटीवाटीने उभ्या राहिलेल्या झोपड्या, खोपी, छपरं, मातीची घरं, धाब्याची घरं ही सारी गेली आहेत. तिथं आता बऱ्यापैकी सिमेंटची, स्लॅबची घरं उभारलेली आहेत. इथल्या कष्टकऱ्यांनी आता आपल्या जीवनाचा व्यवसाय निश्चित केला आहे. अंगच्या मेहनतीने, कसबीनं, श्रमाच्या जिवावर वैज्ञानिक युगाची साथ घेऊन द्राक्षबागा फुलवल्या आहेत. ऊस, भाजीपाला अशी पिके आहेत. श्रीमंती आता खुणावत आहे.

म्हैसाळ मंदिरात माझ्या मुक्कामात नवरा बायकोची भांडण ते किरकोळ चोऱ्या मारामाऱ्या पर्यंतच्या अनेक तक्रारी माझ्याकडे येत. मी जेव्हा सोमवारी मिरज सांगलीला निघे तेव्हा कुणाचा तरी कोणाला तरी निरोप, कुणाच्या तरी वस्तू, कोणाचे औषध, कोणाचे जेवणाचे डबे, माझ्याकडे देत असत. ही सर्व कामे मी बिनतक्रार करीत असे. अशा कार्यात-सेवेत मला आनंदच वाटत असे.

कालांतराने हे दिवस मागे पडले. आठवणी तशाच ओल्याचिंब राहिल्या. अलीकडे तासगावला नोकरी चालू झाली होती. सहकार्याशी चेष्टा, मस्करी विनोद यात आनंदाने वेळ जात असे. तासगाव-मणेराजुरी रस्त्यावर दत्त माळावर आमचं कार्यालय. तेथील श्रीदत्त मंदिरात मी रोज दत्त दर्शनाला जात असे. माझी सेवानिवृत्तीची तारीखही जवळ येत होती. ती तारीख होती २८/२/२०१० सर्वश्री आर. व्ही. पाटील साहेब, आर. जी. पाटील, श्री. ए. बी. कारंजी, श्री. जी. एस. कुलकर्णी, बेलवलकर, आर. आर. गडकर, ए. बी. घाईल, एस. आर. मराठे, आर. एस. पाटील, ए. ई. अमृतसागर, मुजावर, एस. सी. कुंभार, रामभाऊ सपाटे, भूपाल कांबळे इत्यादी स्नेह्यांचा, अधिकारी वर्गाचा माझा प्रेमाचा सहवास संपणार होता. मी दि. २५/ ५/१९७३ साली नोकरीत रुजू झालो होतो. वयाची अठ्ठावन्न वर्षे पूर्ण झालेने ३६ वर्षे ९ महिने ३ दिवस नोकरी झाल्याने मी आता

सेवानिवृत्त होणार होतो. बघता बघता नोकरी संपत आल्याचे मला कळालेच नाही. कोल्हापूर, चांदोली, इस्लामपूर, मिरज, सांगली करीत मी आता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, तासगाव येथून सेवानिवृत्त झालो. मी चांगल्या प्रकारे आणि प्रामाणिकपणे नोकरी केली होती. उत्कृष्ट कामानिमित्त मला दोन आगाऊ वेतनवाढी (Two Advance Increment) मिळाल्या होत्या. तर बऱ्याच लोकांना मी आमच्या खात्यात निस्पृहपणे नोकऱ्या लावल्या. आमच्या खात्याची पतसंस्था स्थापण्यात माझा मोलाचा वाटा होता. कामगार संघटनेला माझे सहकार्य होते. दि. २८/२/२०१० रोजी मला उपविभागातील वर उल्लेखलेल्या अधिकारी वर्गाने व सहकाऱ्यांनी प्रेमाचा निरोप दिला. मला त्यांनी अडचणीच्यावेळी सांभाळून घेतलं होतं. त्याबद्दल त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करतो.

सेवानिवृत्त होण्यापूर्वी मला कधी एकदा लवकर सेवानिवृत्त होतो असे वाटत होते. २००५ पासून मला नोकरीचा कंटाळा आला होता. परंतु कर्जाचा डोंगर, आईचे आजारपण, यामुळे माझ्यासमोर पर्यायच नव्हता. मला वाटत होतं सेवानिवृत्त झाल्यावर मला फिरायला मिळेल. दिवस आनंदात जातील. परंतु घडलं उलटंच. मला मूळव्याधीचा त्रास सुरू झाला. सन २०१० रोजी मला डॉ. संजय कुलकर्णी यांच्या विश्रामबाग मधील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. माझ्यावर मोठी शस्त्रक्रिया करण्यात आली. केवळ श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज व गुरुदेवांच्या आशीर्वाद कृपेने मी आजारपणातून उठलो. डॉ. श्री. संजय कुलकर्णी, डॉ. बिंदूसार पलंगे, डॉ. एम.जी. म्हेत्रे, डॉ. केदारीप्रसाद कुलकर्णी, डॉ. भालचंद्र जोशी, डॉ. विनोद शिंदे यांनी केलेली माझी सेवा व दिलेले आधाराचे शब्द यामुळे मी बरा झालो. या आजारपणात माझ्या लोकांनी प्रत्यक्ष भेट देऊन आधार देऊन जगण्यासाठी उर्मी दिली. त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करूनही ती अपुरी आहे.

आक्टोबर २०१० ते ३१ जानेवारी २०११ पर्यंत मी सांगली मठीत पडून राहिलो. डॉ. विनोद शिंदे रोज ड्रेसिंग करीत तर विनोद गोखले, सुहास जाधव हे गाडीतून डॉ. संजय कुलकर्णी यांचेकडे आठवड्यातून एकदा ड्रेसिंगला नेत असत. ड्रेसिंगचा खूप त्रास होई. सौ. शोभावहिनी, सौ. रेखा वहिनी, सौ.

मीना वहिनी, सौ. मनीषा वहिनी, कु. केरु, कोंडा, पोपट, सिताराम, रामू, गुड्डू, संतोष, अजित, बाजीराव, घोरपडेमामी ही सर्व सूर्यवंशी मंडळी माझ्याबरोबर छायेसारखी वावरली. हेही दिवस गेले. गुंतून ठेवणाऱ्या या आठवणी होत्या. स्मरणात सदैव राहणाऱ्या त्या स्मृती शलाका.

मी ३६ वर्षे श्रीनृसिंहवाडी, श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज समाधी मंदिर कोल्हापूर येथे प्रत्येक पौर्णिमेला गेलो. पण ३६ वर्षानंतरच पहिल्यांदाच माझी श्रीपंत महाराज बाळेकुंद्रीचा उत्सव, श्रीदत्त जयंती हे उत्सव चुकले होते. तब्येत बरी नव्हती. अशक्तपणा होता. दिवसभर अंथरुणावर पडून कंटाळलो होतो. या सहा महिन्यात संगीत आणि वाचन मात्र चालू राहिले. तेवढाच विरंगुळा होता. अंथरुणावर पडल्या पडल्या अनेक सामाजिक कामाची आखणी, मंदिराचे व्यवस्थापन, पुढील वीस वर्षाच्या कामाचे नियोजन, सामाजिक उपक्रम अशा विषयावर चिंतन करीत असे. तर कधी भूतकाळाच्या जीवनाचा, माणसांचा, त्यांच्या स्वभावाचा, मनाचा आढावा घेत असे. या आजारपणात मागील जीवनात झालेल्या चुका, श्रीगुरुदेवांचे विषय, त्यांचे ऋण, आई वडिलांच्या आठवणी, अक्कोळच्या आई-काकांच्या आठवणी, ढोली आई-दादांच्या आठवणी यांनी मन सैरभैर होत असे. या आजारपणात माझ्या डोळ्यासमोर अनेक विचार-तरंग उभे राहिले. श्रीगुरुदेवांचे कार्य व्यवस्थितरित्या प्रामाणिकपणे माझ्या हातून सुरू होतेच. पण सामाजिक कार्याची उर्मिही मला स्वस्थ बसू देत नव्हती.

मी मागे उल्लेख केल्याप्रमाणे माझे आजोळ कर्नाळ आठवायचे. सांगली पासून ५-६ मैलावरील हे खेडेगाव. लहान असताना आईबरोबर सुट्टीत तेथे जात असे. १५ ऑगस्ट १९४७ साली देश स्वतंत्र झाला. आमच्या आजोळच्या घराच्या कट्ट्यावर स्वातंत्र्याच्या चळवळीची, देश स्वतंत्र झाल्याची चर्चा चालत असे. त्या गोष्टी कानावर पडत. स्व. वसंतदादांच्या अनेक गोष्टी ऐकायला मिळायच्या. सन १९४२ मध्ये सांगलीचा तुरुंग फोडून, गोळी अंगावर घेऊन कृष्णेच्या पात्रातील त्यांचा प्रवास, त्यांचे देशप्रेम, धडाडी नंतरच्या काळात त्यांचे समाजकार्य या साऱ्या गोष्टी कानावर येत. परिणामी वसंतदादांविषयी माझ्या मनात एक प्रकारचा आदर वाढत होता. ते एक शेतकरी परिवारातील पण गोरगरीबांसाठी नेतृत्व करणारे एक लोकनेते अशी माझी श्रद्धा बनली होती.

मला आता नक्की आठवत नाही पण १९६६-६७ साली स्व. आप्पासाहेब देशपांडे वकील यांनी मिरजेतील तरुण वर्गासाठी एक अभ्यास मंडळ काढले होते. स्व. आप्पासाहेब देशपांडे वकील किल्ला भागात राहत. या अभ्यास मंडळात ॲड. श्री. चिमण लोकूर, अशोक पाटील, आण्णाप्पा भेंडे, कोकाटे सर व इतर अनेक मंडळी होती. ही अभ्यास मंडळाची बैठक मिरज मार्केट मधील श्रीमंत बाळासाहेब ज्युबिली लायब्ररीत एका हॉलमध्ये भरत असे. लायब्ररीचे अध्यक्ष आप्पासाहेब देशपांडे वकीलच होते. त्यातून आमची जडण घडण झाली. समाजसेवा, समाज शिक्षण आदींचे बाळकडू या अभ्यास मंडळातून ज्येष्ठ मंडळींकडून आम्हांला मिळत असे. सुमारे १९६६ च्या दरम्यान स्व. आप्पासाहेब देशपांडे वकील, श्री. चिमण लोकूर वकील यांनी आदरणीय थोर समाजसेवक बाबा आमटे व साधनाताई आमटे यांना निमंत्रित करून त्यांचा सत्कार केला होता. त्यावेळी बाबा आमटे चंद्रपूरचे नगराध्यक्ष होते. अद्याप आनंदवनाची निर्मिती झाली नव्हती. पण त्या काळातही बाबा आमटेंचे त्यागी जीवन मला खुणावून गेले, शांती देऊन गेले, आनंद देऊन गेले.

नंतर मी प. पू. विनोबा भावेंच्या दर्शनाला गेलो. त्यांच्या आश्रमात राहून मनाला प्रगाढ शांतता मिळाली आणि सर्वोदयाच्या कामाची प्रेरणा मिळत गेली. समाजासाठी काही तरी काम केले पाहिजे ही भावना, हे प्रेरणास्रोत या थोर समाज सेवकाकडून, देव माणसांच्याकडून लाभले.

१९७१-७२-७३ साली महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला. पाऊस नाही, पाणी नाही, हाताला रोजगार नाही. त्यावेळी वसंतदादा हे पाटबंधारे खात्याचे मंत्री होते. तर शंकरराव चव्हाण हे मुख्यमंत्री होते. वसंतदादांनी आपल्या कर्तबगारीने, हुषारीने महाराष्ट्रातील दुष्काळ हटविण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नातून सांगली जिल्ह्याला पंचवीस उपसा जलसिंचन धडक योजना (Lift Irrigation Scheme under crash programme) मंजूर झाल्या. या पंचवीस योजनांच्या माध्यमातून सांगली जिल्ह्यातील पन्नास हजार हेक्टर जमीन कृष्णा नदीच्या पाण्याच्या ओलीताखाली येणार होती. आशिया खंडातील सर्वात मोठी ही योजना होती. योगायोगाने वसंतदादा पाटील, शिवाजीराव धुळूबळू दादा यांच्यामुळे या खात्यात मी नोकरीला लागलो. श्री.

म. ना. शेवडे साहेब यांच्या कुशल मार्गदर्शनामुळे सर्व धडक योजना यशस्वी झाल्या.

त्याकाळी मिरजेला स्व. कमलाकर केशव काळे हे मिरज नगर परिषदेला मुख्याधिकारी प्रशासक म्हणून आले. अत्यंत स्वच्छ हात, मन आणि सेवाभाव त्यामुळे माझे संबंध दृढ होत गेले. आज मिरजेतील गणेश मार्केट, गणेश तलाव, मिरासाहेब मार्केट, श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज शॉपिंग सेंटर, मिरज हायस्कूल व इतर बऱ्याच इमारती त्यांच्या प्रशासकीय कारकीर्दीत झाल्या. तसेच मुख्य रस्ते रुंद झाले. बरीच लोकोपयोगी कामे त्यांनी केली. या कामात मीही सहभाग घेतला. काही मंदिरांचा जीर्णोद्धार केला. ते अत्यंत धार्मिक, आध्यात्मिक होते. शिर्डीसाईबाबा व शेगावचे संत श्रीगजानन महाराज यांचे ते भक्त होते. त्यांच्याही कारकिर्दीत मी बऱ्याच मुलांना मिरज नगर परिषदेत नोकरीस लावले. आजही ती चांगल्या पदावर कार्यरत आहेत. मला भेटतात, आठवण ठेवतात यात सारं काही येतं.

वारणा मेकॅनिकल यांत्रिकी विभाग दोन चांदोली येथे असताना प्रकल्पग्रस्तांचे अनेक प्रश्न सोडविले. नोकरीत त्यांचे पुनर्वसन केले. नोकरीतही मी एक प्रकारे समाजसेवा चालूच ठेवली होती. सन १९७९-८० च्या सुमारास मी परत मिरज येथे बदलून आलो. आता माझा व आमदार विठ्ठलदाजी पाटील यांचा परिचय वाढत चालला होता. त्यांचे मूळ गाव सलगरे होते. वसंतदादा पाटील यांचे ते एकनिष्ठ व सच्चे कार्यकर्ते होते. त्यांची माझ्या कार्यावर श्रद्धा होती. त्यांचे एक कार्यकर्ते राम हरी खराडे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष असताना मी सुचविलेल्या बऱ्याच मुलांना त्यांच्या शिक्षणानुसार निरपेक्षपणे त्यांनी नोकऱ्या लावल्या. आमदार दाजी पाटीलानीही काही मुलांना सरकारी खात्यात नोकरी लावल्या.

बॅं. अंतुले मुख्यमंत्री पदावरून पाय उतार झाले आणि वसंतदादा मुख्यमंत्री झाले. त्यांनी सांगली जिल्ह्यातून आमदार विठ्ठलदाजी पाटील यांना मंत्री म्हणून घेतल्याचा निरोप दाजी पाटील यांना जाताच विठ्ठलदाजी मला म्हणाले, "मुलाला मुलगी बघायला जायचे व पसंत पडल्यावर आपणच करून घ्यायचे, हे माझ्या पठडीत बसत नाही. बॅ. अंतुले, बॅ. बाबासाहेब

भोसले हे मुख्यमंत्री असताना आम्ही श्री. शिवाजीराव देशमुख यांचे नाव सुचवले आणि हे मंत्रीपद चालून येताच मी मंत्री होतो हे म्हणणे महाराज, मला बरोबर वाटत नाही आणि पटतही नाही. त्यापेक्षा मिरजेचा पूर्वभाग व कवठेमहांकाळचा बराचसा भाग दुष्काळी आहे त्यासाठी मी दादांना पाण्याचा आग्रह धरणार आहे. तुमचा मला आशीर्वाद पाहिजे." ही वस्तुस्थिती आहे. शेवटपर्यंत एका खऱ्या मऱ्हाटमोळ्या आमदाराने मंत्रीपद लाथाडून कवठेमहांकाळच्या पाण्यासाठी जीवन पणाला लावले. कवठेमहांकाळ येथे वसंतदादा पाटील यांच्या उपस्थितीत पाणी परिषद घेऊन दुष्काळी भागाला कृष्णेच्या पाण्याची मागणी केली आणि वसंतदादांनी ते मान्य केले.

आता कृष्णा नदीचे पाणी मिरज पूर्व भागाला, कवठेमहांकाळाला देण्याचे ठरले. मान्यही झाले पण ते कोठून आणि कसे देणार? ही चर्चा चालू झाली. मी चांदोली धरणावर काम केल्यामुळे मला थोडेफार समजत होते. त्याबाबतचा थोडा अभ्यास झाला होता. मूळच्या ताकारी योजनेतून खानापूर तालुक्यातील शाळगाव खिंडीतून कृष्णेचे पाणी हे मिरज पूर्व भागाला आणणे मला अव्यवहार्य वाटत होते. मी स्वत: दाजी पाटील यांना पटवून देत होतो. ताकारी योजनेतून मिरज पूर्व भागाला कवठेमहांकाळला पाणी न आणता म्हैसाळ येथून पाणी उचलले तर ते कमी खर्चात व लवकर येईल. लवकरच हे दाजी पाटलांना पटत गेले आणि माझे त्यांना कौतुक वाटत राहिले. त्यावेळचे दे. स्व. दरेकर व इतर अधिकाऱ्यांच्या मागे लागून नवा सर्व्हे करून रात्रंदिवस परिश्रम घेवून ताकारी योजनेचा उपविभाग म्हणून कृष्णा कोयना योजना वसंतदादांच्याकडून दाजींनी मंजूर करून घेतली. याच योजनेला म्हैसाळ कालवा योजना म्हणतात.

एक दिवस दाजी पाटील मिरजेतील मठीत सकाळी सहा वाजता आले आणि मला म्हणाले, "चला, आज म्हैसाळ योजनेचा नारळ तुमच्या हस्ते फोडू." मी त्यांना नम्रपणे नकार दिला. परंतु त्यांची माझ्यावरची अलोट श्रद्धा. त्यांचा आग्रह मी टाळू शकलो नाही. मी, पाटबंधारे खात्याचे दोन अधिकारी व स्वत: दाजी म्हैसाळ धरणावर-बंधाऱ्यावर सकाळी सात वाजता गेलो. माझ्या हस्ते म्हैसाळ योजनेचा नारळ फुटला. या कार्यक्रमास चौघेच होतो. ना फोटोग्राफर, ना लोकांची गर्दी, ना समर्थ साथ, मोठेपणाची डिजीटल बोर्ड.

दाजी पाटील यांना हे मान्य नव्हते. प्रसिद्धीपासून अलिप्त असे आमदार. मनमाडकडील बंद कार्यालये इकडे बदलून आणण्याचा सल्ला मी दाजींना दिला व तो त्यांनी मान्य केला. तसेच आमदार फंडातून वर्षाला दोन कोटीतून मुख्य कालव्याचे काम सुरू करण्याचा सल्ला मी दाजींना दिला व त्यांनी तो मान्य केला. सरकारी यंत्रणा राबू लागली. दाजी पाटील स्वत: रात्रंदिवस पाहणी करून कामावर देखरेख करू लागले. पहिला टप्पा चांगल्या प्रकारे पार पडला. दुसरा टप्पा शिवाजीराव (बापू) शेंडगे मंत्री असतांना पार पडला. ही योजना आता पार पडणार याची खात्री दाजींना पटली होती. पण त्यांचे अचानक दि.१७/४/१९९३ रोजी निधन झाले. एक कर्तबगार, नि:स्पृह, करारी, तत्त्वनिष्ठ आमदार आमच्यातून निघून गेले. त्यांच्या निधनासमयी त्यांच्यावर १० ते ११ लाख रुपयांचा कर्जाचा बोजा होता. मीच एकदा दाजींना म्हणालो होतो. "दाजी, तुमच्या रामदासाला ताकारी योजनेतील एक चाळीस लाखाचे काम देऊ या. काम करून पोट भरू दे." यावर ते मला म्हणाले, "तुमच्यासाठी काहीही मागा. जीव मागा. परंतु माझ्या लोकांच्यासाठी काहीही मागू नका. मी असे पर्यंत माझ्या घरातील एकही व्यक्ती मी राजकारणात आणणार नाही." असे करारी, दिलदार, मोठ्या मनाचे, स्वच्छ हाताचे दाजी होते. या म्हैसाळ योजनेच्या सार्वजनिक कामात मलाही घेऊन दुष्काळग्रस्तांची दिशा दाखवली होती. आता या म्हैसाळ योजनेचे पाणी मिरज पूर्वभाग-कवठेमहांकाळ, जत, तासगाव तालुक्याच्या दुष्काळी भागात पोहचून शेतकऱ्यांचे जीवन समृद्ध करीत आहे. आनंद वाटतो. स्व. आमदार दाजी पाटील व शिवाजीराव शेंडगे (बापू) यांच्या कामाविषयी वारंवार कृतज्ञता व्यक्त करणे माझा स्वभाव आहे.

आज समाजसेवा करणाऱ्या संस्था आहेत पण पूर्वीच्या समाज कार्याच्या कल्पना, कार्य वेगळे आणि आजचे वेगळे. सेवाभावी माणसंही आज समाजात राहिली नाहीत. निरपेक्षवृत्तीने समाजकार्य करणारी माणसं आता मिळणं कठीण आहे.

म्हैसाळ स्टेशनला आल्यानंतर या भागासाठी आपण काहीतरी करावे, येथील समाजासाठी लोकांच्यासाठी आपण काही तरी देणे लागतो, असे मला वाटत असे. नवी पिढी घडविण्यासाठी चांगल्या वाचन संस्कृतीची गरज आहे

असे माझे ठाम मत आहे. मला वाचनाची अत्यंत आवड आहे. माझे विचार व सामाजिक कार्य हे वाचन संस्कृतीनेच घडवले आहे. विद्यार्थी दशेपासून मी चांगल्या उत्तम लेखकांची पुस्तके विकत घेऊन वाचत असे. चांगल्या उत्तम पुस्तकांचा माझा बराच मोठा संग्रह आहे. माझ्या पूर्वभाग्याने वि.स. खांडेकर, ना.सि. फडके, शंकर खंडू पाटील, आण्णाभाऊ साठे, गो. नि.दांडेकर, वसंत कानेटकर, पु.ल. देशपांडे, द. मा. मिरासदार अशा थोर लेखकांची व्याख्याने-भाषणे ऐकायला मिळाली. त्यांच्या पुस्तकाचेही वाचन केले, अजून वाचन चालू आहे

म्हैसाळ स्टेशन सारख्या ग्रामीण भागात दवाखान्याची सोय नव्हती. मुलांच्यासाठी बगीचा नव्हता. हे करावं असं ठरवलं. पण पैशाच्या अतिशय अडचणी होत्या. मंदिराच्या बांधकामाचे कर्ज अजून फिटले नव्हते. कर्ज वाढतच चालले होते. माझा एकूण पगार ५६३५/- इतका होता आणि सर्व वजा जाता रु.२४७५/- इतकी रक्कम हाती पडत होती.

परिणामी मी अशा समाजकार्यासाठी चांगल्या दानशूर व्यक्तींचे सहकार्य घ्यायचे ठरवले. समाजात पुष्कळ श्रीमंत माणसं असतात. परंतु त्यांना एखाद्या चांगल्या कामास आर्थिक मदत करावी अशी भावना असतेच असे नाही आणि मदत केली तर अपेक्षा ठेवून, सढळ हातांनी निरपेक्ष भावनेनं मदत करतीलच असं नाही. मी अशा दोनचार व्यक्तींना भेटलो पण फारसे यश आले नाही. असली कामे तुम्ही कशाला करता? त्यांची तुम्हाला जरूरी काय? असा उपदेश ऐकावा लागला. निराश मनाने परतावे लागले. परिणामी मी निवांत राहिलो.

योगायोगाने सांगलीत एका कार्यक्रमात श्री. संभाजीराव कुंभार साहेबांची भेट झाली. सन १९७७ ते १९८० मध्ये कुंभार साहेब व मी दररोज रेल्वेने कोल्हापूरला नोकरीला जात असे. कुंभार साहेब हे त्यावेळी टेलिफोन खात्यात अधिकारी होते. त्यांचा माझा चांगला परिचय झाला होता. तेच मला म्हणाले, “ महाराज, एकदा तुमची आणि प्रवीणशेठ लुंकड यांची गाठ घालून देतो. मोठ्या मनाचा चांगला माणूस आहे. ते तुम्हाला मदत करतील?” यावर मी त्यांना “ बरं ” म्हणून त्यांचा निरोप घेतला. त्या भेटीत मी वाचनालय, दवाखाना या विषयी कुंभार साहेबांना बोललो होतो. त्या दिवसापर्यंत मला श्री. प्रवीणशेठ लुंकड

यांचे नावही माहीत नव्हते.

पण लवकरच सुयोग श्री. कुंभार साहेबांनी आणला. ते मला एक दिवस कुपवाड येथील त्यांच्या चाकण ऑईल मिलवर घेऊन गेले. त्या थोर मनाच्या माणसाचा परिचय दिला. त्यांच्या पहिल्याच भेटीनं मी भारावून गेलो. कृष्णा व्हॅली चेंबर्स क्लब, कृष्णा व्हॅली स्कूल अशा मोठमोठ्या सार्वजनिक संस्था त्यांनी उत्तम पद्धतीने उभ्या केल्या होत्या, चालविल्या होत्या. ऑईल मिल आणि पशुखाद्य मिलमध्ये हजारो लोक काम करीत होते. हजारो लोकांचा पोशिंदा, जीवनधार होते. ते नम्र पण करारी आणि माणूसकीचा ओलावा असलेले असे मला वाटले. श्री. कुंभारसाहेबांनी माझी माहिती व माझ्या संकल्पनांची माहिती दिली. दवाखाना व वाचनालयाच्या इमारतीसाठी काहीतरी मदत महाराजांना करा, अशी त्यांनी विनंती केली.

त्यावेळी बांधकामासाठी त्यांच्याकडून माझी फार मोठी अपेक्षा नव्हती. पंचवीस ते तीस हजार रुपये मिळाले तरी बरे होईल, असे वाटत होते. इकडून तिकडून फंडातून वगैरे रक्कम गोळा करून काम चालू करावे, अशा विचारात मी होतो. इतक्यात प्रवीण शेठनी एका इसमाला बोलावून पंचवीस हजाराचे चार चेक काढून आणायला सांगितले. थोड्याच वेळात ते चारी चेक पाकिटात घालून माझ्या हातात दिले व मला म्हणाले, “महाराज, काम चालू करा. आणखी काही लागले तर बघू या. पण आधी काम चालू करा. चांगले काम आहे सुरू करा.” मला आश्चर्याचा धक्काच बसला. ना माझी ओळख-पाळख, ना परिचय, ना संबंध. परंतु त्यांनी माझ्यावर अत्यंत विश्वास दाखवला. ज्यावेळी मी हजार रूपयाला महाग होतो. त्यावेळी त्यांनी मला लाख मोलाची लाख रूपयाची मदत केली होती. त्यांचे केवढे उपकार! हा सर्व योग श्री. कुंभार साहेबांच्यामुळे मला आला. त्यांनी एका थोरउद्योगपतीची व माझी ओळख करून दिली. विश्वास दिला, कृतज्ञ राहिलो.

माझे पहिले सार्वजनिक काम आता खऱ्या अर्थाने चालू झाले. मोफत दवाखाना, वाचनालय, ग्रंथालय यांच्या इमारती उभ्या राहू लागल्या. याच दरम्यान ओमप्रकाश नय्यर हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध संगीतकार यांचा माझा थोडा परिचय होता. अनेक चित्रपटात त्यांच्या संगीताने गाणी प्रसिद्धीला आलेली

होती. त्यांचा हिंदी गाण्यासाठी पाश्चिमात्य संगीताचा वापर यशस्वी झाला होता. लहानपणी त्यांच्या संगीताची गाणी ऐकण्यासाठी जाहिरात करणाऱ्या टांग्यामागे मी फिरत असे. ते सिनेमे पाहत असे. त्यांनी त्यांचे संगीत गानसम्राज्ञी लता मंगेशकरशिवाय लोकप्रिय केले होते. असे थोर हिंदी चित्रपट संगीतकार ओ.पी. नय्यर साहेब हे सांगलीला श्री. श्रीधर खोत यांचा मुलगा राजू खोत यांच्या लग्नाला येणार होते. उद्योगपती प्रवीणशेठ लुंकड व ओ. पी. नय्यर यांच्या शुभहस्ते स्व. सूरजमलजी रतनचंदजी लुंकड दवाखाना, वाचनालय व ग्रंथालयाचे उद्‌घाटन करावयाचे असे ठरले. या कामी श्री. मोहन कुंभोजकरांच्या मध्यस्थीने हा उद्‌घाटन सोहळा दि. १/१२/१९९७ रोजी संपन्न झाला. कार्यक्रम खूप मोठा झाला. ओ. पी. नय्यरसाहेबांना पाहायला खूपच गर्दी झाली होती. या कार्यक्रमाच्या निमित्ताने अनेक मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. हळूहळू माझा व श्री. प्रवीणशेठ लुंकड यांचा परिचय वाढत चालला होता.

दिवसामागून दिवस जात होते. कामात मग्न असलो की, दिवस जायचा मात्र रात्र झाली की मन सैरभैर व्हायचं. माझ्या स्व.आई, वडील, अक्कोळचे आई-काका, सांगलीचे दादा-आई यांच्या आठवणीने मन अस्वस्थ व्हायचे. तसेच स्व. शंकरराव कांबळे, मारुती कुरणे, आण्णा घेवारी यांचीही आठवण येत असे. निवांतक्षणी माझे मन मला सहकार्य केलेल्या आणि माझ्यावर श्रद्धा असलेल्या माणसांचे उपकार आठवत, त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करताच त्यांचा सहवास पुन्हा मिळावा, दोन घास खायला घालून त्यांच्याशी गप्पा माराव्यात, आनंद मिळवावा असे वाटत राहते.

दि.२८/२/२०१० रोजी मी सेवानिवृत्त झालो, तरी माझी तब्येत बिघडत चालली होती. १९/१०/२०१० रोजी माझ्यावर अवघड शस्त्रक्रिया झाली होती. पुढे सहा महिने मी विश्रांती घेत राहिलो होतो. गुरुदेवांच्या कृपेने माझे आयुष्य पुन्हा वाढत राहिले. मरणाची छायाही त्याकाळी मी ओळखून चुकलो होतो. सर्व सहकार्यांचे, हितचिंतकाचे आणि ज्यांनी माझ्यावर प्रेम केले त्या सर्वांच्या ऋणातून उतराई होण्यासाठी माझी एकसष्ठी करून ही उतराई करावी, असे मनाशी ठरवले.

पूर्वी मी एकदा नृसिंहवाडीला गेलो होतो. सायंकाळची वेळ होती.

श्रीदर्शन घेऊन परतणार इतक्यात प.पू. रमेश महाराज, श्री. अनिकेत व श्री. बी. एस. सूर्यवंशी भेटले. तेही दर्शनाला आले होते. प. पू. रमेश महाराजांचा ६१ वा वाढदिवस असल्याने ते दर्शनासाठी आले होते. मी त्यांना नमस्कार करून दीर्घायुष्य चिंतले. प. पू. रमेश महाराजांनी मला त्यांच्या ६१व्या वाढदिवसाबद्दल काहीही सांगितलं नाही. पण मला मात्र वाटलं की, एवढ्या मोठ्या व्यक्तीची ६१ वी मोठ्या प्रमाणात साजरी व्हायला हवी होती. मला ती एक प्रकारची रुखरूख लागून राहिली. पण त्याच क्षणी मी ठरवलं की, त्यांची ७१वी आणि माझी एकसष्ठी मोठ्या प्रमाणात साजरी करून त्यांच्याविषयी कृतज्ञता आदर व्यक्त करावयाचा.

त्यादृष्टीने मी तयारीला लागलो. ग्रामीण भागासाठी एक प्रशिक्षण काढणेचा मी संकल्प सोडला. या प्रशिक्षण केंद्रात औद्योगिक प्रशिक्षण, राज्यसेवा परीक्षा प्रशिक्षण, महिला अल्पबचत गट योजना आदींना उत्तम प्रशिक्षण देऊन एक नवी पिढी तयार करण्याचा मानस व्यक्त करून माघ वद्य पंचमी २०११ रोजी श्रीश्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराजांच्या जयंती दिवशी प. पू. रमेश महाराज यांच्या अमृतहस्ते पायाभरणी केली. या इमारतीचा उपयोग भक्तनिवास म्हणूनही होणार होता. या इमारतीला सर्व हातभार श्री. प्रवीणशेठ लुंकड यांच्या सूरज फौंडेशनने उचलला होता. लवकरच काम सुरू झाले. इमारत आकाराला येऊ लागली होती. हे एक चांगले स्वप्न होते. आम्ही सर्वजण झटत होतो. कामाचा पसारा, व्याप वाढत होता. त्यामुळे मला प. पू. रमेश महाराजांच्याकडे नियमित जाणं घडत नव्हतं. ते मिरजेला तब्येत दाखवायला आले की मी भेट घ्यायचा.

एप्रिल ११ मधील श्रीस्वामी समर्थ महाराजांची पुण्यतिथी उत्सव-महाप्रसाद त्यांच्या अमृतहस्ते पार पडला. त्यानंतर दोन-तीन वेळा त्यांची सांगलीत भेट घेऊन कामाची माहिती वगैरे दिली. वारंवार माझ्या कामाविषयी ते गौरव उद्गार काढीत. माझ्याविषयी त्यांना खूप माया, प्रेम, आदर होता. एकेक वेळा माझ्या मित्राजवळ ते म्हणत "जर मी एक रुपया असेन तर झेंडे बाबा सव्वा रुपये आहेत. काम करणारा चोख माणूस आहे." या प्रशिक्षण केंद्राच्या भव्य इमारतीचं उद्घाटनही त्यांच्या अमृतहस्ते करावयाचे मी ठरवले होते. पण नियतीच्या मनात ते नव्हते. १५ जुलै २०११ च्या गुरुपौर्णिमेला मी

त्यांच्या दर्शनाला जाऊ शकत नव्हतो. म्हणून मी आदल्या दिवशी जाऊन त्यांचे दर्शन घेतले. तेच माझे शेवटचे दर्शन ठरले. कधी कधी ते म्हणत, " आता माझं काय राहिलयं. मी जाणार." असे म्हणून ते ओक्साबोक्सी रडत. तर कधी म्हणत, "अरे, आता तुला हे सांभाळायला पाहिजे." त्यावर मी म्हणत असे, " असं बोलू नका महाराज, एवढी गुरुपौर्णिमा झाली की, तुम्ही विश्रांतीला या. आनंदात दिवस घालवूया." यावर ते म्हणाले, " बजू. आता विश्रांती कशाची? विश्रांतीला आता येणं घडणार नाही." महाराज एक क्षणभर एखाद्या घाबरलेल्या लहान मुलाप्रमाणे बोलायचे. त्या समयी त्यांच्या हाताचा कंप मला जाणवून जायचा. मी त्यांना सोडून जावे असे त्यांना वाटत नसे. मी त्या दिवशी पुढील योजना, बांधकाम याविषयी बोलतच राहिलो. निरोप घेताना आपल्या नेहमीच्या पद्धतीनुसार शांत मनाने मला आशीर्वाद दिला. त्यांच्या मनात काय चालले आहे, त्यांच्या वागण्यातील, बोलण्यातील फरक माझ्या लक्षातच आला नाही. मी अनेक वर्षे त्यांच्या प्रेमाच्या सूर्य किरणात न्हाऊन निघालो होतो. ते आपले प्रेम कधीही बोलून दाखवत नसत. त्यांचे प्रेम, त्यांच्या पूर्वसूचना मी माझ्या जाणत्या मनात साठवून ठेवल्या होत्या. " बजू, तू आलास मला फार बरं वाटलं." असे म्हणून ते माझ्या गळी पडले. कित्येक वर्षांनी त्यांचे हे भावदर्शन मला झाले. थोडा फार मी घाबरूनही गेलो. गेल्या काही वर्षातील त्यांच्या पुनीत स्मृती मला आठवू लागल्या. मनाला समाधान देणारे त्यांचे ते वचनपर मधुर शब्द, मुग्ध करणारं प्रेमभाव, आध्यात्मिक जीवन, अनासक्तपणे जगणारे जीवन, हे सारं माझ्या डोळ्यासमोरून तरळून गेलं. पुढील प्रवास लांबचा असल्यानं मी त्यांच्या पवित्र चरणावर लोटांगण घालून भरल्या डोळ्यांनी बाहेर पडलो.

परतीच्या प्रवासात त्यांच्या ऐहिक जीवनातील अनेक तरंग माझ्या नजरेसमोर तरळत होते. त्यांच्या वागण्याची पद्धत साधी होती. पण विचारसरणी उच्च होती. नेहमी दुसऱ्याचा गुण गौरव करीत. आपत्तीनं गांजलेल्या व जीवनाचे भय वाटणाऱ्यांना ते आधार देत. त्यांच्या हृदयात आशेचा किरण निर्माण करीत. जनात प्रेमभाव, श्रद्धाभाव निर्माण केल्याने त्यांना लोक देवदूतच मानत. उच्च पदस्थ विभूती मानत. त्यांच्या सात्त्विक, सत्य दर्शनामध्ये लोकांना,

भक्तांना आनंद होई.

माझे पुढील काही दिवस बांधकाम, जुन्या मित्रांना भेटणे यात गेले. अविश्रांत गडबडीच्या कामात गेले. प. पू. रमेश महाराजांची मागील आठवड्यातील भावूक भेटही मला आठवत होती. त्यातच शुक्रवार दि. २२/७/२०११ रोजी पहाटे तीनच्या सुमारास अक्कोळच्या आई स्वप्नात आल्या व म्हणू लागल्या, "अक्कोळला लवकर या." मी घाबरून जागा झालो. मला अक्कोळला लवकर यायला आईनी का सांगितलं असेल. मनातून मी घाबरलो होतो. मनात अनेक विचारांचे काहूर माजले होते आणि सकाळी सहा वाजता अक्कोळहून फोन आला की, पहाटे चार ते पाचच्या सुमारास रमेश महाराजांनी या जगाचा निरोप घेतला. माझ्या मनावर एक प्रकारचा आघातच झाला. डोळे पाण्यांनी भरून आले. हुंदका फुटेना, काय करावे हे समजेना, कसाबसा सावरून मी अक्कोळला जायला निघालो. माझ्या मोबाईलवर अनेकांचे निरोप येत होते. कसाबसा मी महाराजांच्या वाड्यात पोहोचलो. बाहेर प्रचंड गर्दी जमली होती. वाड्यात जाताना वाट काढणे मुश्किल होते. वाडा रडण्याच्या आवाजाने, गोंधळाने व्यापून गेला होता. गिरीजा वहिनी, गुरु, अनिकेत, अपर्णा, हेमा यांचे रडून रडून डोळे सुजले होते. सर्वत्र आकांत माजला होता. त्यांचा देह अगदी जिवंतपणी दिसतो तसा दिसत होता. त्यांचा चेहरा प्रेमभावाने व्यापून राहिला होता. त्यांच्या निधनाच्या अगोदर दोन दिवस त्यांची प्रकृती बरी नव्हती. गुरुपौर्णिमेपासून ते फारसे बाहेरगावी गेले नव्हते. झोपेतच त्यांचे पहाटे चार-पाच वाजण्याच्या सुमारास निधन झाले होते. त्यांचा चेहरा प्रसन्न दिसत होता. त्यांच्या चेहऱ्यावर एक अनामिक शांतता झाकोळून राहिली होती. त्यांच्या पवित्र आठवणीने माझे मन भरून आले आणि मी कोसळलो.

सगळीकडे शोकाकूल वातावरण, वाड्याबाहेर भक्त मंडळींची गर्दी, त्यांचा आक्रोश, रडणे, शोक, सारेच भावनिक झालेले, दोनप्रहरी एकच्या सुमारास प. पू. रमेश महाराजांची अंत्ययात्रा निघाली. अंत्ययात्रेत आठ ते दहा हजार लोक होते. गावातून भजन करीत, देवाच्या नावाचा जयघोष करीत, अंत्ययात्रा त्यांच्या निपाणी रस्त्याला बाळोबाच्या माळावर आली. त्यांच्या कोडीच्या शेतात प. पू. रमेश महाराजांच्या पार्थिवावर प्राचीन रिवाजानुसार

अंत्यसंस्कार करण्यात आले. सर्वजण दु:खद मनाने बसली होती. श्रद्धांजली वाहून सायंकाळी सर्व मंडळी परतू लागली. श्री. गुरुनाथ, श्री. अनिकेत दु:खद मनाने निरोप देऊ लागले. तो दिवस होता आषाढ वद्य सप्तमी शुक्रवार दि. २२/७/२०११.

माझे मन दु:खाने शोक करू लागले. पुन्हा महाराज आता अक्कोळच्या वाड्यात कधीही दिसणार नाहीत. अमरत्वाच्या राज्यात चिरंतन होऊन गेले. चाळीस वर्षाचा व अनेक जन्माचा प्रवाह आता थांबला होता. त्यांच्या निधनाचे वृत्त मी विसरू शकत नव्हतो. त्यांच्या मृत्यूने माझी नीरव शांतता पार उडून गेली होती. प. पू. रमेश महाराजांच्या सहवासाने, कृपेने माझ्या आजपर्यंतच्या चांगल्या वाईट कर्मातून मला इथंपर्यंत त्यानी आणले होते. त्यांचा मी नेहमीच कृतज्ञ असेन.

प. पू. रमेश महाराजांच्या अकाली जाण्याने एक प्रकारची पोकळी माझ्या मनात निर्माण झाली. या जगातून प्रयाण करण्यापूर्वी त्यांनी अनेक अवतारी महापुरुषांचे चरित्र व त्यांच्या जीवनातील काही प्रसंग मला सांगितले होते. आमच्या हिमालयातील प्रवासात–एकांतवास तर हरिद्वारच्या परिसरातील पवित्र गंगेच्या खळखळणाऱ्या प्रवाहासारखा प. पू. रमेश महाराजांचा हा प्रवास माझ्या दृष्टीने अविस्मरणीय असाच होता.

त्यांच्या सोबतच्या हरिद्वार प्रवासातील गंगेचा प्रवास, लक्ष्मण झुला नीरव शांतता, ऋषिकेश, गूढ शांतता यांची आठवण करून देत होते. त्यांनी मला खूप काही भरभरून दिलं हातं. आध्यात्मिक सामर्थ्याने स्मरण, आध्यात्मिक सामर्थ्याचा आनंद, तो आनंद परस्परांना द्यावयाचा हे सांगितलं होतं. समाज देवस्वरूप मानून सेवा करण्यास शिकवले होते. भक्तीचे सामर्थ्य पटवून दिले होते. उत्कट भक्ती व साधनेने परमेश्वर प्राप्ती होऊ शकते, हेही सांगितले होते. समाजातील सर्व मानवतेची समबुद्धीने सेवा करावी, असा संदेश दिला होता.

दिव्य विश्वातील आध्यात्मिक ज्ञानाचा अभ्यास व समाजसेवा मी करीतच आलो होतो. माझ्या सर्व संकल्पना आणि विचारांना मन:पूर्वक साथ व प्रोत्साहन देणारे प. पू.रमेश महाराज व इतर सर्व गुरुवर्य, आप्त इष्टमित्र यांचे मनापासून आभार मानावेत, त्यांच्या संबंधी कृतज्ञता व्यक्त करावी यासाठी

माझी षष्ठ्यब्दीपूर्ती साजरी करण्याचा मानस यापूर्वी मी व्यक्त केला होता. तो लोकांना सांगितला, मांडला. त्यांनाही तो विचार पटला. दि. ६/४/२०१२ हनुमान जयंती त्या दिवशी मला साठ वर्षे पूर्ण झाली. दि. १९/४/२०१२ रोजी माझी एकसष्ठी करण्याचे ठरले. त्या दिवशी श्रीस्वामी समर्थ महाराजांची पुण्यतिथी येत होती. दरवर्षी श्रीस्वामी समर्थांची पुण्यतिथी मोठ्या प्रमाणात साजरी करीतच होतो. त्यात माझ्या एकसष्ठीचाही कार्यक्रम घेण्याचे ठरले.

बुधवार दि. ११/४/२०१२ ते गुरुवार दि. १९/४/२०१२ या कालावधीत श्री. बापू जाधव, सौ. रेणू दांडेकर, ह.भ.प. डॉ. श्री. रामचंद्र देखणे, श्री. विजयदादा आवटी, ॲड. श्री. श्रीकांत माळकर, श्री. वामन काळे यांची व्याख्याने तर ह. भ. प. श्री. चंद्रकांत कुंभार, श्री. बाबालाल नदाफ, श्री. पांडुरंग महाराज कासार, श्री. नामदेव वास्कर महाराज, डॉ. भालचंद्र जोशी, श्री. बंडोपंत कोरे महाराज, यांची कीर्तने तर श्री. दिलीप सुतार, स्व. शिवाजी माळी, श्री. संजिवनी भजनी मंडळ यांचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. त्यासाठी अनेक मान्यवरांच्या समावेशाने षष्ठ्यब्दीपूर्ती गौरव समारंभ स्थापन केला. कार्यकर्ते झटू लागले. आणि दि. १९/४/२०१२ रोजी सकाळी सार्वजनिक रक्तदान, आरोग्य शिबीर झाले. सकाळी ११ वाजता प. पू. श्री. दा.का. थावरेभाऊ, श्री. चंद्रशेखर केळकर महाराज (आण्णा) श्री. गुरुनाथ कोटणीस महाराज, श्री. प्रदीपपंत बाळेकुंद्रीकर, श्री. विजयानंद महाराज, दीनानंद महाराज, श्री. गुरुनाथ कुलकर्णी, श्री. महेश शिर्के, श्री. एस. एम. बेळगावी, श्री. आपटे बाबा, श्री. रुद्रपशुपती विजयानंद कोळेकर स्वामी, श्री. गुरुमहंत पट्टदेवरु शिवयोगी, सखाराम महाराज यांच्या अमृत हस्ते आमदार संजय (काका) पाटील, शिवाजीराव धुळूबुळू, श्री.बापूसाहेब पुजारी, श्री. प्रवीणशेठ लुंकड, श्री. दीपकबाबा शिंदे-म्हैसाळकर, श्री. मनोजबाबा शिंदे-म्हैसाळकर, श्री. जगन्नाथ म्हस्के (बापू), श्री. डी. के. पाटील (काका), श्री. रामराव दादा पाटील, केदारराव शिंदे-म्हैसाळकर, कॉ. लक्ष्मणराव जाधव, स्व. श्री. चंद्रकांत जाधव आदींच्या प्रमुख उपस्थितीत एकसष्ठीचा कार्यक्रम मोठ्या थाटाने साजरा करण्यात आला.

मला मानणारी बरीच मंडळी मोठ्या आनंदाने, उत्साहाने प्रचंड संख्येने

उपस्थित होती. सर्व थरातील आणि प्रेम करणारी ऋणानुबंधाची ही सारी मंडळी होती. या सर्वांच्या सान्निध्यात प्रसाद-सहभोजनानंतर कार्यक्रम संपला.

गतस्मृतींना उजाळा देताना मला हे अनुभवाअंती आठवायला लागते. योगायोगाने म्हणा किंवा माझ्या पूर्वभाग्याने म्हणा मला अनेक थोर पुरुषांचे दर्शन झाले होते. त्यात विनोबाजी भावे, बाबा आमटे, वि.स. खांडेकर, ना. सि. फडके, आण्णाभाऊ साठे, ग. त्र्यं माडखोलकर, रणजित देसाई तर माझ्या जीवनावर अनेक पुस्तकांचा प्रभाव राहिला. श्यामची आई या पुस्तकाची किती पारायणे झाली हे सांगता यायचे नाही. गुरुजींचा आशीर्वाद माझ्या जीवनात भरून राहिला. प्रतिवर्षी विजयनगर (म्हैसाळ स्टेशन) येथे साने गुरूजी व्याख्यानमाला सुरू केली. सामाजिक, कृषी, आध्यात्म अशा विषयातून त्या त्या विषयांची माहिती व्हावी, असा त्या व्याख्यानमालेचा हेतू. साने गुरूजींचे कायमचे स्मारक व्हावे या हेतूने मनाला शांती मिळावी, आनंद प्राप्त व्हावा यासाठी त्यांच्या नावाची एक नारळ बागच तयार केली, फुलवली, वाढवली. या झाडांना मी स्वत: पाणी घालत असे. आता बागेला चांगले स्वरूप प्राप्त झाले आहे. या आवारातच आम्ही ग्रामीण भागासाठी व गोरगरीबांच्या लग्न कार्यासाठी साधे लॉन टाईप मंगल कार्यालय उभे केले. या बागेचे क्षेत्र २ एकर २ गुंठे इतके असून, सुमारे दोनशे नारळ झाडे, माड १०० ते १२५, सुपारीची झाडे ३००, सागवान, केवड्याचे बन, फुलांची झाडे, सोनचाफा, मुबलक पाणी, असा हा रम्य परिसर याच बागेला साने गुरुजी उद्यान असे नाव ठेवले आहे. तर समोरचा जि.प. प्राथमिक शाळा म्हणून या भागाला साने गुरुजी नगर असे नाव द्यावयाचे ठरविले.

दरम्यानच्या काळात माघ वद्य पंचमी २०११ प.पू. रमेश महाराज यांच्या शुभहस्ते "स्व. बबीबाई लुंकड प्रशिक्षण केंद्र" या नवीन इमारतीचा पाया भरणीचा शुभारंभ करण्यात आला होता.

ही इमारत श्री. प्रवीणशेठ लुंकड, अध्यक्ष सूरज फौंडेशन यांनी मोठ्या मनाने, पुढील पिढीचा विकास ग्रामीण भागातील शिक्षण/रोजगार यासाठी बांधून दिली होती. तेव्हा या दोन्हीचे उद्घाटन कार्यक्रम घेण्याचे मी ठरविले. त्यासाठी मी मा. पद्मश्री डी. वाय. पाटीलसाहेब, राज्यपाल त्रिपुरा यांना भेटलो. श्री. डी. वाय.

पाटीलसाहेब यांना आम्ही दादासाहेब म्हणतो. सन २००३ ला श्रीसाई मंदिराचे उद्‌घाटन त्यांच्या हस्तेच झाले होते. श्री. दादासाहेब यांचे जीवन खूप मोठ्या उंचीचे, आध्यात्मिक असे आहे. सामान्य माणसांची जाण असणारे आहे. अनेक थोर सत्पुरुषांचा आशीर्वाद प्राप्त झालेले आहे. अनेक सत्पुरुषांना त्यांनी श्रद्धेने आपलेसे करून घेतले. आहे. अशा थोर सत्पुरुषांच्या हस्ते "साने गुरुजी उद्यान" व "स्व. बबीताई लुंकड प्रशिक्षण केंद्र" याचे उद्‌घाटन करण्याचे ठरविले. या उद्‌घाटनाला येण्याचे त्यांनी मान्य केले. मी एक साधा नोकरी करून पोट भरणारा मनुष्य परंतु त्यांनी माझे निमंत्रण स्वीकारले, याबद्दल मी त्यांचा कायमपणे ऋणी/ कृतज्ञ राहीन.

उद्‌घाटनाची तारीख ठरली रविवार दि. २७/५/२०१२, सकाळी ११.०० वाजता. उद्‌घाटनाचा हा समारंभ मोठ्या प्रमाणात व सुंदर व्हावा म्हणून आम्ही सर्वजण झटू लागलो. राज्यपाल येणार म्हणून सर्व शासकिय यंत्रणाही झटू लागली. मा. आमदार श्री. संजय पाटील (आता खासदार) हेही आमच्याबरोबर झटू लागले. आणि तो शुभ दिवस उजाडला. रविवार दि. २७/५/२०१२ रोजी मा. पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटीलसाहेब, राज्यपाल त्रिपुरा (आता राज्यपाल बिहार) यांच्या शुभहस्ते स्व. आर. आर. पाटील, स्व. सा. रे. पाटीलसाहेब, मा. आमदार श्री. काकासाहेब पाटील, मा. आमदार श्री. संजयकाका पाटील, मा. श्री. प्रवीणशेठ लुंकड, मा. श्री. मोहनशेठ कदम, मा. श्री. चिमण लोकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. मा. दादासाहेबांच्या हस्ते अनेक मान्यवरांचा सत्कार झाला, सुंदर पण छोटखानी भाषण झाले. हजारोंच्या संख्येने लोक हजर होते. श्री. पंडीतराव चव्हाण, श्री. डी. एस. भोसले, स्व. अवधूत जाधव व आम्ही सर्वांनी हा कार्यक्रम सुंदर रीतीने पार पडावा म्हणून झटलो होतो. त्यात आम्हांला यश आले.

*"विचाराने वागा, विचाराप्रमाणे वागण्याचे धैर्य दाखवा, नेभळेपणा नको, जाती धर्माचे द्वेष पसरवू नका, जो गरीब असेल, जो जो छळला जाणारा असेल, तो आपला माना, छळणारा जो जो असेल तो परका माना, हिंदू-मुसलमान, काळे-गोरे असे भेद खरे नाहीत. खरे भेद प्राचीन काळापासून दोनच सांगितले आहेत. ते म्हणजे दुसऱ्यांच्या संसाराची धुळदाण करणारे व ती*

*धुळदाण बंद करणारे, असा हा अनंत काळापासूनचा झगडा आहे. तुम्ही न्यायाच्या बाजूने उभे राहा. जे काही शिकाल ते घेऊन या झगड्यात मन:पूर्वक सामील व्हा." हा प.पू. साने गुरुजींचा संदेश सर्वांना देऊन या मातीत रुजविण्याचे माझे कार्य चालू आहे.*

परमेश्वराशी संपर्क साधण्याची सुरूवात ही मंदिरापासून होते, असे मला वाटते. मंदिरात नियमितपणे जाण्याने संसारातील मनुष्य नेहमीची कर्मे करीत, मन स्थिर करीत, चांगले विचार निर्माण करू शकतो. उच्च दर्जाच्या आध्यात्मिक प्रगतीपर्यंत जावू शकतो. अविरत प्रवाहित शांत गती मिळवू शकतो. अंतर्विश्व व  बाह्यविश्व यांचे सर्वज्ञान मिळवू शकतो. ऐहिक, पारलौकिक जीवनाच्या गतीचा फरक समजून घेऊ शकतो. तीव्र साधनेस आपले नैसर्गिक शरीर उभा करू  शकतो. पुण्य सत्कर्म जोडू शकतो. योगिक शक्ती व शरीर धारण करू शकतो. मनामध्ये परिवर्तन घडवून आणू शकतो. मनातील भीती, काम, क्रोध, सौम्य करू शकतो, नाहीसे करू शकतो. मन व इंद्रियावर ताबा ठेवून चिंतन करू शकतो. सावकाशपणे आध्यात्मिक उन्नत्तीकडे, परमतत्त्वाकडे वाटचाल करू लागतो. आपल्या कुविचार, मोहातून बाहेर काढून अहंकाराचा त्याग करू शकतो. मुख्य म्हणजे हळुहळु त्याच्यात ईश्वर प्रेम निर्माण होवू लागते. परमतत्त्वाचा लाभ झाल्यावर तो अहंकार विरहित होतो. एक भला-चांगला माणूस तयार व्हायला मंदिर हेच प्राथमिक माध्यम आहे, असे मला वाटते.

मागे माझ्या हिमालयातील प्रवासाचा उल्लेख आलेला आहे. दि. १९/११/१९९२ ते ३०/११/१९९२ या काळातील गुजरात दौऱ्यात सोरटी सोमनाथ, द्वारका, रणछोडदास, भगवान स्वामी नारायण, गरुडेश्वर, नारेश्वर, जलाराम बाप्पा यांचे दर्शन केले होते. बरीच धर्मस्थाने, तीर्थस्थाने पाहिली. श्रीक्षेत्रेही पाहिली. बहुतेक सर्व तीर्थक्षेत्रांना जाऊन आशीर्वाद आणि आनंद घेण्याचा प्रयत्न केला. तसं मी तीर्थक्षेत्र शेगाव व पावसला जात होतो. माझ्या मनात एक नवीन विचार येऊ लागला. शेगाव संत श्रीगजानन महाराजांचे व पावसचे थोर संत स्वातंत्र्यसैनिक श्रीस्वामी स्वरूपानंद महाराजांचे मंदिर बांधावे. लवकरच ती सदिच्छाही गुरुदेवांनी पूर्ण केली.

माझ्या षष्ठ्यब्दीपूर्ती गौरव समारंभात गौरव समितीने मला भरीव असा निधी अर्पण केला होता. त्याच निधीत मी माझ्या पेन्शन विक्रीचे, भविष्य निर्वाह निधीच्या रकमेची भर घालून शेगाव संत श्रीगजानन महाराज मंदिर बांधण्याचा संकल्प सोडला. स्व. बापू नाना शिंदे, श्री. विष्णू नाना शिंदे, श्री. तुकाराम नाना शिंदे यांची दीड ते पावणेदोन एकर जमीन खरेदी करण्यात आली. ईश्वराच्या कृपा प्रसादाला पात्र होणे, एका विशाल ईश्वरप्रेमी कुटुंबाची निर्मिती करणे, नैतिक आध्यात्माची, त्यांच्या मूल्यांची जोपासना करणे आणि आयुष्याचे ध्येय म्हणून या कार्याकडे पाहणे. सुंदर बाग, मोकळी हवा असे आध्यात्मिक वातावरणास पूरक वातावरण निर्माण करणे, एवढाच उद्देश हे मंदिर निर्माण करण्यामागे होता.

हळूहळू बांधकामाने गती घेतली. सर्वश्री प्रल्हाद धुमाळ, विलास लाड, भाऊ गवंडी, आनंदराव शेलार, नाईक बंधू, एस. एम. सन्नके, सदाशिव वड्ड, संदीप पाटील, श्रीकांत मंगावते यांच्या मार्गदर्शनाखाली मंदिराचे काम पूर्ण केले. सर्वश्री आनंदराव माळी, तानाजीराव शिंदे, शशिकांत शिंदे व इतर मंडळी खूप राबली. या मंदिराचा उद्‌घाटन समारंभ श्रावण सप्तमी दि. २७/८/२०१३ ते श्रावण वद्य दशमी दि. २/९/२०१३ या कालावधीत संपन्न झाला.

प्रेम ध्वजारोहणासाठी सर्वश्री प्रदीपपंत बाळेकुंद्रीकर, डॉ. बापूसाहेब पुजारी, डॉ. जयसिंगराव शिंदे-म्हैसाळकर, दत्तात्रय गोसकी, सुनिल पाटील, बाळासाहेब पवार (कुंडल), शिवाजीराव इंगवले तर वीणापूजन समयी सर्वश्री मनोहर सारडा, विश्वास आण्णा गवळी, विजयभाई शहा, आपटेबाबा, विष्णू गोपाळ कुलकर्णी, रमेश घोलप, ह.भ.प. रोहित दांडेकर हजर होते. चंद्रकांत कुंभार, दत्तदास घागबुवा, पांडुरंग कासार, सौ. कमलताई जोशी यांचे कीर्तन, तर मंगला जोशी यांचे गायन, सर्वश्री अनिल फडणवीस, दिलीप सुतार, जयभवानी भजनी मंडळ, इचलकरंजी, श्री. भजनी मंडळ सोनी यांची भजने झाली.

श्रीगजानन महाराज मूर्तीची प्राणप्रतिष्ठा वे. शा. सं. श्री. यज्ञेश्वरशास्त्री जोशी सातारा, वे. शा. सं. श्री. पालमकर-नांदेड, श्री. चंद्रशेखर केळकर महाराज, श्री. कोटणीस महाराज, डॉ. अविनाश पाटील, सर्वश्री महेश शिर्के, श्रीपाद

राजाराम नेर्लेकर, गुरुनाथ कुलकर्णी यांच्या अमृतहस्ते तर श्रींची आरती व श्री. सौ. सुधाकर रेगोडकर, श्री. व. सौ. डी. के. पाटील साहेब, श्री. व सौ. संजय पाटील, सोलापूर, आमदार संजय काका पाटील, राजाराम मगदूम आदमापूर यांच्या शुभहस्ते पार पडली.

यािप्रसंगी श्रीहनुमानदास महाराज यांच्या चरित्राचे प्रकाशन व महाप्रसाद सर्वश्री चंद्रशेखर केळकर महाराज, डॉ. केदारीप्रसाद कुलकर्णी, डॉ. बिंदूसार पलंगे, पंडितराव चव्हाण कोल्हापूर, एन. जी. कामत सर, धोऊका साहेब, श्रीशैल्य मोटगी यांच्या हस्ते झाले. हजारो लोकांनी महाप्रसाद ग्रहण केला. माझ्या जीवनातील शेवटचे काम श्रीगुरुदेवांनी पूर्ण केल्याचा आनंद मिळाला.

दरवर्षी आषाढ महिन्यात हट्टी लक्ष्मीची आंबील होते. या म्हैसाळ स्टेशनच्या पूर्वेला एक-दोन कि.मी. वर छोटीसी टेकडी आहे. त्या टेकडीवर हट्टी लक्ष्मीचं मंदीर पूर्वी खोपटवजा होतं. आजूबाजूला सगळं माळ, खडक, तरवड, उंच उंच रानगवतातून रस्ता शेजारून जाणारी रेल्वे लाईन असा तो भाग. सगळ्यांच्या नवसाला पावणारी, पीकपाणी चांगलं आणणारी ही हट्टी लक्ष्मीदेवी आहे. बरीच वर्षे खोपटात असलेल्या हट्टी लक्ष्मीदेवीचं आता आसपासच्या, शेजारच्या शेतकऱ्यांनी एक छोटसं देऊळ बांधलं आहे. दरवर्षी आसपासचे लोक जत्रा करतात. खीर, भात, आमटीचा प्रसाद करतात. हट्टी लक्ष्मीच्या कृपेने हा भाग सुखी होऊ लागला. नक्षत्रा मागून नक्षत्र पाऊस पडू लागला. शिवार पिकू लागलं. जुनी छप्परं, काडाची छपरं जाऊन आता बऱ्यापैकी घरं दिसू लागली. चिमण्या, कावळे, साळुंक्या, पानकोबडं, भोरड्या, मोर या हिरव्यागार माळावर दिसू लागलं. धनगरांची मेंढरांची खांड, पावसाळ्यात माळावर बसू लागली. रानातून बैलांचा पैरा दिसू लागला. पूर्वी इथं गावात पाणी नव्हतं. पाणी नसल्यामुळे जमीन पिकत नव्हती. त्यामुळे गावातील लोकांचे हाल होत होते. गाव सोडून बाहेर जाऊन काम करणंही लोकांना जमत नव्हतं. माळावर लोकांचे हाल होते.  माळावर पारध्यांची, कुणब्यांची वस्ती होती. साधी कौलारु, चिखल मातीत बांधलेली, भेड्यांची घरं, झोपड्या होत्या. गावात जगताना कष्टाशिवाय दुसरा मार्ग नव्हता. तो भूतकाळ वाईट होता.

त्याकाळी स्वस्ताई असली तरीसुद्धा लोकांना पोटभर अन्न मिळत नव्हतं. त्या काळात शाळासुद्धा तशा नव्हत्या. अशा गरीबीतही लोक कष्ट उचलून मुलांना शाळा शिकवत. मात्र वाऱ्यासारख्या भरकटलेल्या मनावर लोकांचा ताबा होता. इथल्या माणसांच्या संसाराचं चाक कधी सुखातून तर कधी दुःखातून जात होतं. राबणारे हात ढिले पडत नव्हते.

रस्त्याच्या दुतर्फा भरधाव वेगाने आता गाड्या धावत आहेत. माणसाचं फाटकं आयुष्य, जीवन आता संपलं आहे. भरपूर शाळा शिकवून नोकरी लावून, आयुष्य शांत कसं घालावायचं याचा विचार गाव करू लागला. नवीन शाळा, नवीन कॉलेजला मुलं जाऊ लागली आहेत. अंधारून येणारे काळे ढग, पाऊस, इंद्रधनुष्यं आता दिसत नाहीत. कालव्यांच्या पाण्यावर, योजनांच्या पाण्यावर आता ऊस, द्राक्षबागा, पिकू लागली आहे. माळावर फार्महाउस उभं राहू लागलं आहे. काळ बदलत चालला आहे. इथल्या शेतकऱ्यांची मुलं मोठ्या प्रमाणात शिकून डॉक्टर, वकील, इंजिनियर झाली आहेत. रोज वेगवेगळ्या गोष्टींचा शोध लागत आहे. त्यामुळे इथल्या शेतकऱ्यांना पैसा, शिक्षण मिळून गावचा विकास होत चालला आहे. भूतकाळ असा होता की, पैसाही नव्हता तरी तो सुखी, संपन्न काळ होता. त्याकाळी गायी, म्हशी, शेळ्या, लहान पाड्या, लोक एकमेकांना फुकट पाळण्यासाठी देत. लोक जनावरांचे दूध, दही खाऊन दणकट होते. आता गाई म्हशींच्या किंमती फार वाढल्या आहेत. गाई, म्हशी, बैल कमी होत चालले आहेत. तरीही गाईंच्या गोठ्याने, गाईंच्या दूधाने इथल्या माणसांच्या संसाराला हातभार लावला आहे. एक काळ असा होता की, घरात, गावात रेडिओ शिवाय काही करमणूक नव्हती. रेडिओच्या बातम्यांवर लोक समाधान मानत होते. आपापली सगळी कामं करीत होती. आता रेडिओची जागा टी.व्ही.ने घेतली आहे. टी.व्ही. वरच्या मालिकांचे वाऱ्यासारखे बदलणारे रूप, बदलणारी चॅनेल्स, पहाटे पाच वाजल्यापासून ते रात्री बारापर्यंत चालू असतात. तरुण पिढी टी.व्ही. समोरून हालत नाहीत. गावागावात परिवर्तन, बदल होऊ लागला आहे. पोटाचा उदरनिर्वाह चालवून आपल्या समाजाला एका प्रकारे प्रबोधन करणारा वासुदेव, जोगते, दरवेशी, गोंधळी, पोतराज, पिंगळा, नंदीवाले, कडकलक्ष्मी, बहुरुपी आता

दिसून येत नाहीत. आता टपाल, तार जाऊन मोबाईलवर प्रेमाची भाषा सुरु झाली आहे. पूर्वी घरोघरी जाती होती. जात्यावर दळण दळून पीठाच्या भाकरी खाणं म्हणे एक आनंद होता. आता पिठाच्या गिरण्या आल्या. आज हा सारा जमाना बदलत निघाला. आता बेंदराची बैलं निघत नाहीत. पंचमीची गाणी, गौरीचे फेर, झिम्मा, फुगडी, घोडा, सूप नाचवणे दिसत नाहीत. आधुनिकतेच्या नावाखाली दिवस बदलू लागले. कुटुंबं लहान होत चालली. माझ्या लहानपणी आमटीला चटणी मिळत नव्हती. ओल्या मिरचीचा खरडा आमटीत मिसळत, नाचणीची भाकरी, कार जोंधळ्याची भाकरी, हिरव्या मिरचीचा खरडा, आंब्याचे लोणचे, डांगर, पात्रीची भाजी, आंबाड्याची भाजी, कुर्डुची भाजी, सणावाराला भात, पोळ्या कधी तरी चपाती हे जेवण होतं. विहीरीवर मोट चालू असायची. कुठं तरी मळ्यात ऊस असायचा. लोक अपरुबाईनं ऊस मागून खात. तर दिवाळीला लाडू, चकली, कानूला एवढंच खायला मिळे. दिवाळी गरीबीत साजरी व्हायची. त्या दिवसात माणसाकडं पैसा नव्हता पण माणसं अगदी साधी सरळ होती. आनंदात राहात होती. दिवस बदलत चालले. पैसा आला, रोजच दिवाळी. आलेली कळत नाही, संपलेली कळत नाही. वरील सगळ्या आठवणी या माझ्या लहानपणीच्या मामाच्या गावच्या, इतर खेडेगावच्या आहेत. जुनी खेडेगावं बदलली आहेत. त्यांनी नवीन रूप धारण केलेलं आहे. म्हैसाळ स्टेशनने ही आता नवीन रूप धारण केलेलं आहे. खापरीची घर जाऊन आता बेंगलोरी कौलाची घरं उभी राहिली आहेत. काडाची, पांगिऱ्याची कुडं, शेवगा, लिंबारीची कुडं, झोपड्या जाऊन आता स्लॅबची घरं उभी राहू लागली आहेत. रॉकेलची चिमणी, काचेचा कंदील जाऊन दिवे होऊ लागले आहेत. गावातील मुरुम–खडीचे रस्ते जाऊन आता पक्क्या टाक्या डांबरीचे रस्ते तयार होऊ लागले आहेत. घरोघरच्या रेडिओनी आता माना टाकल्या आहेत. घराघरात टी.व्ही. समोर माणसांचा घोळका रात्रंदिवस बसू लागला आहे. घरातील गाडग्यांच्या उतरंडी नाहीशा झाल्या आहेत. बैलजोडीची जागा ट्रॅक्टरने घेतली आहे. गावा बरोबरीनं शिक्षणाने प्रगती केली आहे. बघता बघता गावाचा कायापालट झाला आहे.

मी रोज संध्याकाळी फिरायला जातो. कधी आडव्या रस्त्याने तर

कधी बेडगच्या शिवारात, तर कधी रेल्वे स्टेशनवर. सायंकाळची पॅसेंजर गाडी येण्याची, रेल्वे स्टेशनवरील घंटा वाजली की माझे पाय आपोआप स्टेशनकडे वळतात. रेल्वेच्या प्लॅटफॉर्मवरील एका टोकाच्या बाकड्यावर मी बसून राहतो. मिरजेहून बेळगावला जाणारी पॅसेंजर हळूहळू प्लॅटफॉर्मवर येऊन उभी राहते. हळूहळू पॅसेंजर चालू लागते. बरेच गावकरी, तरुण मुले, मुली स्टेशनवर उतरतात. तरुणाई दंगा करीत स्टेशनच्या बाहेर पडत असते. थोड्या वेळाने स्टेशनवर एक अनामिक शांतता पसरते. प्लॅटफॉर्मवर मी निवांत बसून असतो. मन कोणाची तरी वाट पाहत असतं. पूर्वी मी व स्व.शिवाजीराव माळी या पॅसेंजरने येत असे. अंधारातून मार्ग काढत मंदिरात जात असे. मुक्काम करून दुसऱ्या दिवशी परत पॅसेंजरने मिरजेला जात असे. आनंद वाटे. अंधार होईल तसं मन सैरभैर होतं. सातच्या पॅसेंजरची मन वाट पाहते. मिरजेहून कोणीतरी येईल. पण आता माझे जुने सहकारी लोक अनेकजण देवाघरी गेले आहेत. ते कधीही पॅसेंजरने मला भेटायला येणार नाहीत. पण कोणीतरी येईल, असं सांगून माझं मन मला आशेचा मार्ग दाखवतं. मलाही आता जावं लागणार आहे. शेवटच्या पॅसेंजर गाडीतून प्रवासी चालू लागतात. मीही कुणाची तरी वाट पाहून रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवरून मंदिराकडे परत यायला निघतो. पॅसेंजर सुटण्याची घंटा वाजते, गाडी सुटते. खिन्न मनानं प्लॅटफॉर्मकडे पाहत मी वाट चालू लागतो. आता रात्र झालेली आहे. आभाळात दूरवर चांदणं परसलेलं आहे. मंदिरातील घंटेचा आवाज कानात घुमतो आहे. मंदिराच्या आवारातून हळू हळू जाणाऱ्या पॅसेंजरचे डबे उजेडासह दिसत आहेत. पॅसेंजरच्या शिट्टीचा आवाज अंधाराची शांतता भंग करीत आहे. हळूहळू पॅसेंजर अंधारातून नजरेआड दूर दूर चालली आहे. डोंगर आता म्हातारा होत चालला आहे.

* * *

# साधकांशी प्रश्नोत्तररूपी हितगुज

**१. मनुष्याने साधना करावी काय?**

. मनुष्याने सुख, शांती, परमेश्वराचा आनंद मिळविण्यासाठी साधना केली पाहिजे.

**२. साधना म्हणजे काय?**

विशिष्ट हेतू धरून केलेले नामस्मरण, जप, विशिष्ट मंत्रसंहिता ही अखंडपणे करणे, याला साधना म्हणावे.

**३. साधना करणे आवश्यक आहे काय? साधनेचा फायदा काय?**

मन हे चंचल, अस्थिर, भ्रमणशील असते. मन हे कधीही स्थिर रहात नाही. मनातून निर्माण होणाऱ्या विचारांची संख्या शास्त्रकारांच्या मते मिनिटाला २७००० ते २८००० अंदाजे आहे. मन अतृप्त असते. अशा मनाला स्थिर करण्यासाठी जप, तप, मंत्र, योग, नामस्मरण इत्यादींच्या सहाय्याने साधना करणे आवश्यक आहे.

**४. जप, तप, मंत्र, तंत्र, योग, नामस्मरणाने मनाला स्थिर करता येईल काय?**

जप, तप, मंत्र, तंत्र, योग, नामस्मरण हे मनाच्या आधारेच करावे लागणार आहे. मन हेच साधनेचे मूळ आहे. ज्ञानमार्ग, कर्ममार्ग, भक्तीमार्ग जोपर्यंत परिपूर्ण होत नाहीत, तोपर्यंत मनाच्या सहाय्याने मुक्तीकडे वाटचाल राहणार आहे. जसजशी जप, तप, मंत्र, तंत्र, योग नामस्मरण यांची गती वाढेल, तसतशी मनाला स्थिरता येणार आहे. उन्मत्त झालेल्या हत्तीच्या गंडस्थळावर जसा अंकुशाचा मारा करून त्याला स्थिर केले जाते, तसेच सैरभैर, अस्थिर, अतृप्त, चंचल मनावर जप, तप, मंत्र योग, नामस्मरण इत्यादी द्वारे मारा करून मनाची गती कमी करता येते. स्थिरता आणता येते, एकाग्रता प्राप्त करता येते.

**५. साधना करणेसाठी गुरूची आवश्यकता आहे काय?**

होय. साधना करणेसाठी गुरूची आवश्यकता आहे.

**६. गुरुंचे प्रकार किती ?**

शास्त्राने गुरूंचे १२ प्रकार सांगितले आहेत. धातुर्वादी, चंदन, विचार, अनुग्रह, परीस, कच्छप, चंद्र, दर्पण, छायानिधी, नादनिधी, क्रौंचपक्षी, सूर्यकांत.

**७. वरील गुरुंपैकी आजच्या प्रचलित काळामध्ये कोणत्या प्रकारचे गुरू श्रेष्ठ आहेत? कोणाला गुरू करावे?**

आजच्या काळामध्ये अनुग्रह व परिस प्रकारचे गुरू दिसून येतात.अनुग्रह गुरु आपल्या शिष्याला नामाद्वारे, मंत्राद्वारे, जपाद्वारे आत्मकल्याणाचा मार्ग दाखवितात. तर परिस गुरु हे आपल्या सहवासाने शिष्याचे जीवन सोने बनवतात. शिष्याला केवळ साधनभार न लावता निस्पृहपणे शिष्याच्या जीवनाचा कायापालट करतात म्हणून परिस

गुरु हे श्रेष्ठ वाटतात. त्यांनाच सिद्धगुरु म्हटले जाते. अशा सिद्ध मुक्त गुरुंना निसर्ग नियम लागू होत नाहीत.

**८. सिद्ध गुरू काय शिकवतात?**

सिद्ध गुरु,परिस गुरु हे शिष्याचे कर्तृत्व संपवून त्याला ईश्वरी कृपा प्राप्त करून देतात. मनुष्य, पशु, पक्षी यांचासुद्धा उद्धार केल्याचे दिसून येते, म्हणून सिद्ध गुरु हे श्रेष्ठ वाटतात.

**९. सिद्ध पुरुष, गुरू यांची शिष्याला कोणती देणगी प्राप्त होते?**

विवेक, ज्ञान यांतून ईश्वरप्राप्ती ही सिद्ध गुरुंची मोठी देणगी होय.

**१०. गुरूला जातपात, कालभेद, स्थळ भेद असतो काय?**

गुरूला जातपात काहीही नसते. ते कोणतीही जात, देश, काल, स्थल धारण करीत नाहीत. मानव जीवन अत्यंत दुर्लभ आहे. मनुष्यामध्ये असलेल्या कामना, वासना दूर करुन त्यांच्यात निष्काम बुद्धी निर्माण करुन त्याला गुरू हे शिवत्व प्राप्त करुन देतात. मानवी जीवन सुखमय करतात.

**११. व्यवहारामध्ये गुरू व संत यात काय फरक आहे.**

व्यवहारामध्ये एकेक वेळा गुरूंचे आचरण, वर्तन द्विधा अवस्था निर्माण करणारे असते. त्यामुळे शिष्यावर त्यांचा प्रभाव पडेल असे नाही. तर संत सहवास, संत विचार शिष्याचे, जीवाचे कल्याण करणारे दिसून येतात.

**१२. सत् संगाने काय प्राप्त होते?**

सत्संगाने नामात राहणे घडते. नामातून, जपातून ध्यानात जाणे घडते, प्राप्त होते. विचारांची संख्या कमी होते.

**१३. जप, तप, मंत्रदीक्षा, अनुग्रह, साधना व भक्ती यात काय फरक आहे?**

भक्तीमार्गातून ज्ञानमार्ग साधणे सोयीस्कर आहे. ज्ञानमार्गाची जननी भक्ती आहे. जप, तप, मंत्रदीक्षा, अनुग्रह, साधना हे ज्ञानमार्गाभोवती फिरणारे मार्ग आहेत. वलये आहेत. भक्तीचे दोन प्रकार आंहेत. एक सकाम भक्ती, दुसरी निष्काम भक्ती. निष्काम भक्ती ही ईश्वरप्राप्ती करून देते.

**१४. मनुष्य जीवनावर गुरुंचा जास्त प्रभाव असतो की? संसाराचा?**

मनुष्य जीवनावर संसारातील गोष्टींचा जास्त प्रभाव असतो. संसारातील सुखाच्या कल्पना या धुक्यासारख्या नाहीशा होणाऱ्या आहेत. म्हणून मनुष्याने गुरुंनी दिलेल्या साधनांचा वापर ईश्वरी अनुसंधान, दया, परोपकार, अहंकारशून्य वृत्तीने वागण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**१५. संसाराचा प्रभाव असलेल्या शिष्यांना गुरू कसे घडवतात?**

संसाराचा प्रभाव असलेल्या शिष्यांना-गुरू निर्भय बनवतात. त्याची जीवनदोरी आपल्याकडे घेवून त्याला निश्चिंत बनवतात.

**१६. भजन, कीर्तन, प्रवचन, सत्संग हे मनुष्याला काय देतात?**

भजन, कीर्तन, प्रवचन, सत्संग हे मनुष्यात परमेश्वराची भक्ती निर्माण करून त्याला स्थिर करण्याचा प्रयत्न करतात. परमेश्वराकडे ओढा निर्माण करतात.

**१७. मनाची एकाग्रता कशी साधेल?**

मनाची एकाग्रता कशी साधेल? हा प्रश्न थोडासा अवघड आहे. तशी मनाची एकाग्रता साधणे अत्यंत अवघड आहे. परंतु एकाग्रतेला मुख्य साधन म्हणजे कर्म. मनुष्याचे कर्म हे स्वच्छ असले पाहिजे. कर्मात सातत्य पाहिजे. जप, तप, मंत्र, नाम, भक्ती इत्यादींनी मनाची एकाग्रता साधली जाते. तशीच ती कुंडलिनी जागृती, शक्तिपात दीक्षा, क्रियायोगदिक्षा यांनीही मनाची एकाग्रता साधली जाते. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे गुरूकृपेने ही मनाची एकाग्रता सहज साधली जाते. पूर्ण शांती लाभते.

**१८. सद्‌गुरू शिष्यांना मोठेपणा प्राप्त करून देतात की शिष्य गुरूंना मोठेपणा प्राप्त करून देतात?**

सद्‌गुरूच आपला आणि शिष्यातील भेद, पडदा दूर करतात. सद्‌गुरू व शिष्य एकरूपच होतात. श्रीपंत महाराज बाळेकुंद्रींनी त्यांचे गुरू बालमुकुंद हे सर्व जगाला प्राप्त करून दिले आहेत. तर स्वामी स्वरूपानंदांनी परमगुरू रामभाऊ तिकोटीकर, विश्वनाथ बुवा रुकडीकर, बाबा महाराज वैद्य ही गुरूपरंपरा जगाला प्राप्त करून दिली आहे.

**१९. शिष्यापुढील मुख्य कोणत्या समस्या आहेत? त्या गुरू कशा प्रकारे निवारण करतात?**

शिष्यापुढील मुख्य समस्या ही दिसणारे बाह्य जग व बाह्य जगातील व्यवहार. घरदार, संसार, प्रपंच, पैसा, नाती इत्यादी इत्यादी. बाह्य जगतापासून शिष्य अथवा कोणीही अलिप्त राहू शकत नाही. बाह्य जगातील गोष्टी जीवाला आनंदी/दु:खी करत असतात. सुख-दु:ख हे मानण्यावर आहे. भासमान आहे. सद्‌गुरु हे शिष्याचे अंतरंग संस्काराने, कृपेने उन्नत करून वासनेतून, आसक्तीतून, विकारातून सोडवितात. मुक्त करतात.

**२०. मनुष्य संसारात जास्त का गुरफटतो?**

मनुष्य अहंकारामुळेच जास्त गुरफटतो. अहंकार त्याला सत्य ते काय समजू देत नाही. अहंकारातूनच सर्व प्रकारचे विकार विचार उत्पन्न होतात. अहंकारातून निर्माण झालेली आसक्तीच मनुष्याचा नाश करू शकते.

**२१. संसारात नेहमी जागृत राहणेसाठी मनुष्याने काय करावे?**

मनुष्याने संसारात जागृत राहणेसाठी जप, तप, भजन, साधन नियमितपणे करावे. यामुळे मन व इंद्रियांचा वेग कमी होऊन अंतर्मुख, समाधानी राहता येते.

***

# कल्पवृक्षाच्या छायेत
## श्रीम्हादबा पाटील महाराज (धुळगावकर)

विसाव्या शतकात अनेक थोर सत्पुरुष संत होवून गेले त्यांपैकी एक श्रीम्हादबा पाटील (धुळगावकर) होय. त्यांचा जन्म आश्विन शुद्ध त्रयोदशी, सोमवार, शके १८३८ दि. ९/१०/१९१६ रोजी धुळगाव (डुबल धुळगाव), ता. तासगाव, जि-सांगली येथे झाला. त्यांच्या वडीलांचे नाव श्री. बाबगोंडा पाटील तर आईचे नाव बायाक्का असे होते. श्री. बाबगोंड पाटील हे गावचे पाटील होते. ते श्रीदत्त भक्त असल्याने दर पौर्णिमेला नृसिंहवाडीला श्रीदत्त दर्शनाला जात. श्रीनृसिंह सरस्वतीनीच त्यांच्या पोटी अवतार घेतला, असे समजणेस हरकत नाही.



श्रीम्हादबा पाटील महाराज हे नेहमी विदेही अवस्थेत वावरत. त्यांचा मुख्यत: वावर मिरज, सांगली, इचलकरंजी, कुरुंदवाड, नृसिंहवाडी व सर्वत्र असे. त्यांच्या गुरूंचे नाव श्रीरामानंद महाराज खटावकर (नांद्रे-खटाव) होते. श्रीम्हादबा महाराजांचा सर्वत्र वावर पायी, सायकल, मोटर सायकल, टांगा, बैलगाडी मिळेल त्या वाहनाने असे. आपल्या भक्तांना थोडाही त्रास न होवू देण्याची त्यांची इच्छा असे. शेवटपर्यंत त्यांनी एक रूपायाला हात लावला नाही.  एक रुपायाही जवळ ठेवला नाही. असे ते निरीच्छ होते.

धोतर, कोट, डोक्याला पटका, रुमाल, पायात कापडी बूट असा त्यांचा पेहराव असे. हातात काठी असे. त्यांचे बरेच पाहुणे आमच्या पाटील गल्लीत राहत असल्याने लहानपणापासूनच मला त्यांचे दर्शन घडत असे. पौर्णिमा ते संकष्टी असे चार दिवस मिरजेतील सतारमेकर गल्लीतील महासाधू आण्णा बुवांच्या मंदिरात संध्याकाळी येत. त्यांच्या दर्शनाला तेथे बरीच गर्दी होई. ते दत्त अवतार होते. त्यांचा थोडा फार सत्संग मला झाला, हे माझे महाभाग्य.

श्रीम्हादबा पाटील महाराज यांनी आपल्या भक्तांना पूर्व कल्पना देवून, दुचिन्हे दाखवून ज्येष्ठ पौर्णिमा (वटसावित्री पौर्णिमा) रविवार शके १९०४ दि. ६ जून १९८२

सकाळी ६.०५ मिनिटांनी श्रीक्षेत्र नृसिंहवाडीला समाधी घेतली. त्यांच्या समाधी मंदिराचे व मठाचे बांधकाम त्यांचे सत्‌शिष्य पद्मश्री. डॉ.श्री. डी. वाय. पाटील साहेब व भक्त परिवाराने नृसिंहवाडीत केले.

*

## श्रीदासराम महाराज, सांगली.

मानवधर्म असलेल्या चिमड संप्रदायातील एक थोर सत्पुरुष म्हणजे श्रीदासराम महाराज. यांचे पूर्ण नाव श्रीराम गोविंद केळकर होय. त्यांच्या आईचे नाव इंदिराबाई. श्रीदादांचा जन्म शके १८४२, श्रावण वद्य षष्ठी, गुरुवार दि. ६/८/१९२० रोजी त्यांच्या मामांच्या घरी म्हणजे कुरुंदवाडला झाला. श्रीदादा हे श्रीतात्यासाहेब कोटणीस महाराजांचे कृपांकित शिष्य होते. वयाच्या केवळ पाचव्या वर्षापासून दादांनी कीर्तने सुरू केली व ती अखेरच्या श्वासापर्यंत चालू ठेवली. श्रीदादा हे संसारात राहून सिद्ध संत झालेले होते. श्रीदादांनी प्रपंचात राहून सामान्यांना, सर्व थरातील लोकांना परमार्थ शिकवला. दुसऱ्यांना चांगले म्हणणे हा त्यांचा स्थायिभाव होता. कोणत्याही प्रसंगी त्यांच्यात अष्टभाव जागृत होवून त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहात. ते अतिशय प्रेमळ व कोमल अंत:करणाचे थोर संत होते. त्यांना श्रीज्ञानेश्वरी, श्रीदासबोध, श्रीतुकाराम गाथा, श्रीगुरुलिंग गीतामधील अभंग मुखोद्‌गत होते.



पूर्व भाग्याने मला श्रीदादांचा सहवास व कृपा १९८० आसपास लाभली व माझ्यावर कृपाही झाली.

श्रीदादांनी श्रावण शुद्ध षष्ठी २५/७/२००१ रोजी रात्री ७.४० वाजता नागपंचमी दिवशी आपले अवतार कार्य संपविले. त्यांचे पुढील कार्य श्री.चंद्रशेखर आण्णा अतिशय प्रेमळपणे, समर्थपणे चालवीत आहेत.

*

# श्रीगोविंद महाराज कुलकर्णी, सांगली.



श्रीगोविंद महाराज कुलकर्णी यांचा जन्म दि. २ जुलै १९२१ रोजी ब्रह्मनाळ (जि. सांगली) येथे झाला. त्यांच्या वडीलांचे नाव बाळकृष्ण तर आईचे नाव सरस्वती होते. त्यांना तीन भाऊ व तीन बहिणी होत्या. त्यातील गोपाळराव हे त्यांचे भाऊ, श्रीपांडुरंग महाराज ताम्हनकर यांचे ते शिष्य होते. श्रीपांडुरंग महाराज ताम्हनकर हे श्रीपंत महाराज बाळेकुंद्रीकर यांच्या शिष्य परंपरेतील होते. सन १९५७ साली मार्गशीर्ष वद्य १४ ला गोविंद महाराजांना श्रीपांडुरंग महाराज ताम्हनकर यांनी विधिवत दीक्षा देवून त्यांना अवधूत संप्रदाय चालविण्याची आज्ञा केली. पटेल चौक सांगली येथे त्यांचे कुलकर्णी बंधू टी क्लब म्हणून प्रसिद्ध हॉटेल होते. या हॉटेलची सर्व व्यवस्था श्रीगोविंद महाराज पहात. झोपडपट्टीतील लोकांपासून ते श्रीमंत वर्गापर्यंत त्यांनी पायी, सायकलीवरून फिरून अवधूत संप्रदाय वाढविला. त्यांचा माझा परिचय स्व. बाबूराव सूर्यवंशी यांच्यामुळे आला. ते अतिशय साधे, प्रेमळ, आपुलकी, माणुसकी असणारे संत होते. दर मंगळवारी सूर्यवंशी दादांच्या घरी आम्ही दोघे आरतीला असू. ते सुंदर भजने, पदे म्हणीत. त्यांचा सत्संग माझ्यासाठी मोलाचा राहिला. त्यांनी दि. २४ मार्च २००३ रोजी रात्री ११.३० वाजता आपले अवतार कार्य संपविले. त्यांची समाधी सांगलीत कृष्णा नदी काठी श्रीपंत महाराज बाळेकुंद्रीकर मंदिराच्या आवारात आहे.

*

## श्रीहनुमानदासजी महाराज, यशवंतनगर, सांगली

श्रीहनुमानदासजी महाराज यांचा परिचय मला डॉ. बिंदुसार पलंगे व डॉ. केदारीप्रसाद कुलकर्णी, सांगली यांच्यामुळे सन २००१ च्या आसपास झाला. त्यावेळी त्यांचे वय अंदाजे ६५ ते ७० वर्षे असावे. ते बालब्रह्मचारी व एका विशिष्ट कोटीचे सिद्धपुरुष होते. त्यांना ईश्वरी साक्षात्कार झालेला होता. त्यांचे जीवन फार अद्‌भुत होते. त्यांचे मूळ गाव येळावी, ता. तासगाव, जि. सांगली. त्यांच्या प.पू. वडीलांचे नाव अनंत गोविंद जोशी तर मातोश्रींचे नाव रुक्मिणी अनंत जोशी असे होते. अशा पुण्यश्लोक माता-पित्यांच्या पोटी श्रीहनुमानदासजी महाराजांचा जन्म फाल्गुन शुद्ध प्रतिपदा, रविवारी सकाळी १० वाजून १० मिनिटांनी म्हणजेच रविवार दि. २३/२/ १९३६ रोजी बेळगाव, अनगोळ येथे झाला.



त्यांच्यावर प्रज्ञाचक्षू श्रीचरणानंद सरस्वती नावाच्या एका संत महापुरुषाची कृपा वयाच्या १२ व्या वर्षी झाली. त्यांनी त्यांना **श्रीराम जयराम जय जय राम** हा मंत्र दिला. उत्तर आयुष्यात सर्व भारतभर भ्रमण केले. हिमालयात भ्रमंती, नर्मदा प्रदक्षिणा बऱ्याच वेळा केल्या.

एकांतवास व तीव्र साधना यात त्यांनी आपुले आयुष्य व्यतीत केले. पूर्व भाग्याने मला यांचा अल्पसा सहवास व कृपा लाभली. आजच्या काळात जानवी (यज्ञोपवीत)विकून उदर निर्वाह करणारे ते एक थोर सत्पुरुष. त्यांनी श्रावण वद्य अष्टमीयुक्त नवमी दि. १०/८/२०१२ रोजी दोन प्रहरी १ वाजून १७ मिनिटांनी आपला  अवतार काल संपविला.

*